

# विषुववृत्ताच्या .....पलीकडे

वा. छ. कर्णिक



REFBK 0009736

REFBK-0009736

म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. क्र. २९८

# विषुववृत्ताच्या पलीकडे

( ऑस्ट्रेलिया–न्यूझीलंडचों प्रवासवर्णन )

22991
29e
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
REFBK-0009736

लेखक

वासुदेव बळवंत फाणक

( वाडगीण, लोकशाहीचें माहेर या पुस्तकांचे कर्ते )

REFBK-0009736

किंमत दोन रुपये

प्रकाशक :
ग. ल. ठोकळ, बी. ए., बी. टी.
ठोकळ प्रकाशन,
६२ बुधवार, पुणें २.

* * *

पहिली आवृत्ति
जून १९५७

* * *

मुद्रक :
सी. एस्. लाटकर,
प्रशान्त प्रिंटिंग प्रेस,
२५२।५ अ, नारायण, पुणें २.

# हितगुज

'वाडगीण' व 'लोकशाहीचें माहेर' हीं माझीं दोन पुस्तकें प्रसिद्ध झालीं तेव्हां श्री. के. नारायण काळे व श्री. अनंत काणेकर या माझ्या साहित्यिक मित्रांनीं व आचार्य भिसे आणि सौ. शांताबाई भांडारकर या समाजसेवकांनीं त्यांचा पुरस्कार केला. आतां वाचकांशीं झालेल्या परिचयाच्या आधारावर मी स्वतःच त्यांच्याशीं हितगुज करायला तयार झालों आहे.

'विषुववृत्ताच्या पलीकडे' हें माझें तिसरें पुस्तक मराठी वाचकांच्या पुढें ठेवतांना मला आनंद होत आहे. वास्तविक पाहतां हें पुस्तक १९५३ च्या सुमारास प्रसिद्ध व्हायला पाहिजे होतें. परंतु तसा योग आला नाहीं. आज माझे मित्र श्री. बाबूरावजी ठोकळ यांच्याच प्रेमळ सहकार्यामुळें हें पुस्तक प्रसिद्ध होत आहे. त्यांनीं दाखविलेल्या आपुलकीबद्दल मी त्यांचा नितांत ऋणी आहे.

या पुस्तकांत मला ऑस्ट्रेलियांत व न्यूझीलंडमध्यें जें जें पाहायला मिळालें तें तें मी दैनंदिनीच्या स्वरूपांत वाचकांना सांगण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तकांत यायला हवी होती अशी बरीचशी माहिती आली नाहीं, याची मला जाणीव आहे. ऑस्ट्रेलियाबद्दल प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत तेथील क्रिकेटच्या खेळाविषयीं मुळींच माहिती नाहीं, हें पाहून माझे क्रिकेट-प्रेमी विद्यार्थी नाराज होतील, याची मला जाणीव आहे. ऑस्ट्रेलियांतील सुप्रसिद्ध 'एकशिक्षकी' शाळांविषयीं मी कांहीं लिहिलें नाहीं, म्हणून माझे शिक्षणप्रेमी मित्र कुरकूर करतील, याची मला जाणीव आहे. अशा अनेक उणीवा या पुस्तकांत आहेत; तथापि मी स्वतः जें जें पाहूं शकलों त्याविषयीं जास्तींत जास्त मी सांगण्याचा प्रयत्न केला आहे. क्रिकेटचा खेळ तेथें चालू असतांना मी जाऊं शकलों नाहीं. (मला त्या खेळांत फारसें समजत पण नाहीं, हें सत्य कशाला लपवून ठेऊं!) नाहीं म्हणायला 'डॉन् ब्रॅडमन्' चें निवासस्थान ॲडेलेडमध्यें गेलों असतांना मी लांबून पाहून घेतलें. ते गृहस्थ त्या दिवशीं शहरांत नव्हते. नाहींतर त्यांची भेट मी घेतली असती. एकशिक्षकी शाळांबद्दलची माहिती मीच भाषांतर केलेल्या

' एकशिक्षकी शाळा ' या नांवानें प्रसिद्ध झालेल्या माझ्याच पुस्तकांत भरपूर आली असल्यामुळें मी ती येथें देण्याचें टाळलें आहे.

ऑस्ट्रेलियांतील आदिवासी व न्यूझीलंडमधील मावरी यांच्याबाबत आपल्या लोकांमध्यें खूपच उत्सुकता आहे, असें मला गेल्या चारपांच वर्षांत अनेक लोकांशीं बोलतांना आढळून आलें. त्याचप्रमाणें मावरी लोकांच्याबद्दल फारच चुकीची माहिती आपणांला आहे, असें पण मला आढळून आलें. ऑस्ट्रेलियांतील आदिवासी मला फारसा पाहायला मिळाला नाहीं; त्याचें कारण मी फक्त मेलबोर्न व सिडने या दोन शहरांतच माझा वेळ घालविला. या भागांत आदिवासी महाप्रयत्नानें पाहायला मिळतो. ऑस्ट्रेलियांतील आदिवासी हळूहळू नामशेष होत चालला आहे. आतां त्याला जागविण्याचा प्रयत्न चालू आहे. पण हा प्रयत्न फार उशीरा होत आहे. प्रारंभींच्या काळांत या वर्गाकडे पाहण्याची साम्राज्यशाहीची दृष्टि वेगळी होती व त्यामुळें हा वर्ग नाहींसा करण्याचे पद्धतशीर प्रयत्न या काळांत झाले. या वर्गाविषयीं जेवढी मिळवितां येईल तेवढी माहिती मला युरोपियन लोकांकडूनच मिळवावी लागली. प्रत्यक्ष आदिवासी लोकांत जाऊन व राहून त्यांच्याकडून ही माहिती मिळवितां आली असती, तर मला आनंद झाला असता.

जें काम मी ऑस्ट्रेलियांत करूं शकलों नाहीं तें मला न्यूझीलंडमध्यें करतां आलें. या देशांत मला फारच थोडा काळ घालवितां आला; पण या अल्प मुदतींत मी ' मावरी ' लोकांबद्दल खूपच माहिती मिळविली आहे. आपल्या देशांतील क्रमिक पुस्तकांत प्रसिद्ध झालेली मावरी लोकांची माहिती वाचून, मावरी लोकांबद्दलच्या विकृत कल्पना उराशीं बाळगून मी तेथें गेलों. मि. विनीएटा या नांवाचे एक मावरी प्रौढशिक्षणाधिकारी मला भेटले व त्यांच्याकडून मावरी जमातीबद्दल मला खूपच जाणून घेतां आलें. मी मावरी तरुणांना–मुलांना व मुलींना–भेटूं शकलों. त्यांच्याबरोबर बसलों, जेवलों व त्यामुळें मला त्यांच्या जीवनाचें चांगलें दर्शन झालें.

प्रारंभींच्या काळांत युरोपियन लोकांनीं त्यांचा उपयोग करून घेतला; नंतर त्यांचा संपूर्ण नायनाट करण्याचा प्रयत्न केला; परंतु ऑस्ट्रेलियांतील आदिवासीपेक्षां न्यूझीलंडमधील मावरी अधिक झुंजार वृत्तीचा असल्यामुळें तो युरोपिअन

लोकांना शौर्यानें तोंड देऊं शकला. त्यानंतर धर्मांतराचें जाळें पसरलें गेलें. मावरी लोकांच्या तरुण मुलींशी व मुलांशीं युरोपिअन मुलांमुलींचीं लग्नें लावण्यांत आलीं. तरी मावरी मावरीच राहण्याचा प्रयत्न करू लागले व युरोपिअन लोकांना मावरी या देशांत मावरी म्हणूनच राहणार ही गोष्ट मान्य करावी लागली.

आजचा नवा मावरी, ' मी मावरी आहे, " असें अभिमानानें सांगू लागला आहे. मावरी भाषा तो अट्टाहासानें बोलत आहे. मावरी कथा, मावरी लोकगीतें, मावरी नृत्यें यांमध्यें तो रंगून गेला आहे. मावरी हा युरोपिअन लोकांपेक्षां कोणत्याहि बाबतींत कमी नाहीं, त्याला जर समान संधि ( Equality of opportunities )मिळाल्या तर कुठल्याहि क्षेत्रांत तो मागें पडणार नाहीं, याची त्याला जाणीव झाली आहे. मावरी लोकांसाठीं जास्तींत जास्त सवलती मिळवून घेण्याचा तो कसोशीनें प्रयत्न करीत आहे. निरक्षरतेला या वर्गानें संपूर्ण मूठमाती दिली आहे. मि. विनिएटा ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें मावरी लोकांत साक्षरतेचें प्रमाण १०० टक्के आहे इतकेंच नव्हे तर जवळ जवळ सर्व लोकांना सात सात वर्षांचें शिक्षण मिळालेलें आहे.

गोऱ्या साम्राज्यशाहीनें 'सवर्ण' Coloured लोकांविषयीं गैरसमज फैलावणें हें आपलें कर्तव्य मानलें. त्यांच लोकांनीं पुरविलेल्या माहितीच्या आधारावरच आम्ही पण आपली गुजराण केली. पण वस्तुस्थिति व आपणांस असलेली माहिती यांत किती अंतर आहे, हें प्रत्यक्ष त्या लोकांत हिंडल्याफिरल्यावर मला समजलें. माझ्या या छोट्याशा पुस्तकांत मला मावरी लोकांबद्दल जी माहिती मिळाली ती मी देण्याचा प्रयत्न केला आहे. या लोकांसंबंधीं मजजवळ असलेली सर्व माहिती या पुस्तकांत मला घालतां आली नाहीं.

हें पुस्तक व याच्या आधीचें 'लोकशाहीचें माहेर' हें पुस्तक लिहिण्यांत माझा हेतु आमच्या देशांतील लोकांना परदेशी लोकांच्या जीवनाचें दर्शन घडवून द्यावें हाच आहे. मी जें पाहिलें तें लिहिलें. उगीच भडक वर्णनें केलीं नाहींत. माध्यमिक शाळांतील शिक्षकांना भूगोलविषयक पाठ देतांना व पुरवणी-वाचनासाठीं मुलांच्या हातांत पुस्तकें देतांना माझ्या या दोन पुस्तकांचा उपयोग होतो, असें मला समजलें तर मला आनंद होईल.

हें पुस्तक लिहिण्याची संधि मला भारत सरकार व मुंबई राज्य सरकार यांच्यामुळें मिळाली. त्यांनीं जर माझी निवड या देशांत जाण्यासाठीं केली नसती, तर

मला हें लिखाण करतां आलें नसतें. या दोन्ही सरकारांचें ऋण मी जाहीरपणें मान्य करतों. त्याचप्रमाणें आमचे इलाखा शिक्षणाधिकारी श्री. सी. शा. भांडारकर यांनीं मला हें पुस्तक प्रसिद्ध करण्यास परवानगी दिली व जें प्रोत्साहन दिलें त्याबद्दल त्यांचे मी मनापासून आभार मानतों.

पुस्तकांतील चित्रें आमचे मित्र श्री. ग. वि. देशपांडे यांनीं उत्साहानें काढून दिलीं. मी पुस्तकांतील मजकूर सांगितला व माझे तरुण मित्र श्री. जगदीश नलावडे यांनीं तो लिहून घेतला. त्यांच्यामुळेंच हें पुस्तक मी नेटानें पूर्ण करूं शकलों; नव्हे त्यांनीं नेटानें हें पुस्तक माझ्याकडून लिहवून घेतलें. श्री. लाटकर यांनीं पुस्तकाच्या छपाईकडे लक्ष पुरविलें व ग. ल. ठोकळ यांनीं हें पुस्तक प्रसिद्ध केलें याबद्दल या सर्व मित्रांचे मी मनापासून आभार मानतों.

शांतिनिकेतन,
३१९ सोमवार, पुणें २.

**वासुदेव बळवंत कर्णिक**
१ जून १९५७

# अर्पणपत्रिका


गेलीं २३ वर्षें माझ्या सुखासाठीं रात्रंदिवस धडपडून माझ्या हरएक कार्यांत जिनें मला मोलाची मदत केली व माझें जीवन जास्तींत जास्त सुखी व आनंदी करण्यासाठीं जिनें खूप परिश्रम घेतले त्या माझ्या प्रिय पत्नीस

**सौ. मीनाक्षी कर्णिक ( मीनू )** हीस

हें पुस्तक मी आमच्या विवाहाच्या २३ व्या वाढदिवशीं अर्पण करीत आहे.

**वा. ब कर्णिक**

१ जून १९५७



ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व लेखकानें केलेल्या प्रवासाचा मार्ग

“ काय कर्णिक, विषुववृत्ताच्या पलीकडे जाणें, तुम्हांला आवडेल कां? पूर्वी कधीं परदेशांत तुम्हीं गेला होता कां? गेला नसलांत तर ही एक संधि आली आहे. दोनतीन महिने बाहेर जाऊन जग बघून या. ” असें त्या वेळचे इलाखा-शिक्षणाधिकारी मला म्हणाले. त्यांच्या बोलण्याचा अर्थ मला नीटसा समजला नाहीं. तथापि माझ्या नेहमींच्या स्वभावाला अनुसरून, “ आपण पाठविलें तर मी कुठेंहि जायला तयार आहे, ” असें मी म्हणालों. त्यानंतर थोड्याच दिवसांत ‘कोलंबो योजनेतर्फे ऑस्ट्रेलियामध्यें जाण्यासाठीं तुमची निवड करण्यांत आली आहे. तुम्ही तयार रहा,’ असें सरकारतर्फे मला कळविण्यांत आलें. परदेशांत जाण्याची ही माझी पहिलीच पाळी होती. एवढ्या लांबच्या प्रवासाला लागणारी साधनसामुग्री मजजवळ नव्हती. वेळ थोडा होता. त्यामुळें खूपच गडबड उडाली. कशीबशी तयारी मी चालविली होती. इतक्यांत एकाएकीं पत्र आलें कीं, ‘तुम्हीं अमुक दिवशीं कलकत्त्याला जाऊन हजर व्हा. तेथून विमानानें तुम्हाला ऑस्ट्रेलियांत पाठविण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.’

८ जानेवारी ५२

आज रोजीं सकाळीं पूना मेलनें घरच्या मंडळींबरोबर मी माझ्या दूरच्या प्रवासाला जाण्यास निघालों. मुंबईत पोहोंचल्यावर टॉमस कुक या सुप्रसिद्ध कंपनीच्या ऑफिसांत जाऊन प्रवासाबाबत माहिती मिळविली. पैसे भरून कांहीं इंग्लिश पौंड खरेदी केले. प्रवास विमानानें होणार असल्यामुळें तेथील कारकुनाच्या सूचनेवरून मी स्वतःचा विमा उतरून घेतला. मुंबई येथील ऑस्ट्रेलिअन ट्रेड कमिशनरच्या ऑफिसांत जाऊन त्यांच्याकडून जरूर ती माहिती घेतली. विमान कोणकोणत्या देशांतून जाणार आहे तें सांगून त्या त्या देशांतून प्रवास करण्यासाठीं ‘व्हीसा’ घेण्याची त्यानें सूचना केली. मुंबईच्या पासपोर्ट खात्याच्या ऑफिसांत जाऊन जरूर ते फॉर्म मी भरले व आपली तयारी पूर्ण झाली, अशा कल्पनेनें निघालो.

१० जानेवारी ५२

भारत एअरवेज् कंपनीच्या विमानानें मी कलकत्त्याला जाण्यासाठीं जुहूच्या विमान-तळावर आलों. हा माझा पहिलाच प्रवास असल्यामुळें सर्व नातेवाईक व कांहीं

मित्र विमानतळावर आले होते. त्या सर्वांचा निरोप घेऊन मी विमानांत जाऊन बसलों. विमानानें जाण्याची ही पहिलीच वेळ असल्यामुळें या प्रवासाबद्दल सारखी भीति वाटत होती. त्यामुळें प्रवासाची मजा अनुभविण्याची मनःस्थिती नव्हती. विमानांत ओळखीचें कोणीहि नव्हतें. त्यामुळें प्रवास अगदीं कंटाळवाणा झाला. विमान नागपूरच्या तळावर आलें व आम्ही सर्व मंडळी चहा घेण्याकरितां खालीं उतरलों. अर्धापाऊण तास इथें थांबल्यावर आम्ही पुन्हां प्रवास सुरू केला. आतां विमानाच्या प्रवासाची ओळख झाली होती. पूर्वीची भीति व बुजेरपणा हळूंहळूं कमी होऊं लागला होता. थोड्याच वेळांत कलकत्ता शहराचे दिवे दुरून दिसूं लागले. त्यानंतरचा सारा वेळ आकाशांतून दिसणारी या शहरची शोभा पाहण्यांत गेला. अखेर एकदांचें कलकत्ता शहर आलें व मी विमानतळावर उतरलों.

'गोवन एजन्सीज' या नांवाची प्रवाशांची व्यवस्था करणारी एक कंपनी आहे. या कंपनीमार्फत आमची सोय करण्यांत आली आहे, असें मला भारतसरकारनें कळविलें होतें व त्याप्रमाणें मी अमुक विमानानें येणार असल्याचें कंपनीच्या चालकांना तारेनें कळविलें होतें. माझी अपेक्षा होती कीं, त्यांच्यातर्फे कोणीतरी येऊन माझी पुढली व्यवस्था करील, परंतु विमानतळावर माझ्यासाठीं कोणीहि हजर नव्हतें. पुढील प्रवास K. L. M. च्या विमानानें दुसऱ्या दिवशीं सकाळीं सुरू होणार होता. पुढील प्रवासाची काय व्यवस्था आहे, आजची रात्र कुठें काढायची इत्यादि प्रश्नांनीं मला बेचैन केलें. सामान बरोबर घेऊन विमानतळावर असलेल्या K. L. M. च्या ऑफिसमध्यें जाऊन मी उभा राहिलों व माझ्या परिस्थितीची त्यांना कल्पना दिली.

"उद्यां सकाळच्या विमानानें तुमची व इतर तीन भारतीयांची व्यवस्था करण्यांत आली आहे." असें त्यानें सांगितलें. "तुमचे पासपोर्ट वगैरे व्यवस्थित आहे ना?" असें त्यानें विचारल्यावरून, मी त्याला माझ्याजवळचे सर्व कागदपत्र दाखविले. ते पाहिल्यावर त्यानें एक मोठा सुस्कारा टाकला व तो म्हणाला, " तुमचे ' व्हीसा ' बरोबर नाहींत. तुम्हांला उद्यां सकाळीं जातां येणार नाहीं." त्याचे हे उद्गार ऐकून मला धडकीच भरली. कलकत्त्यासारख्या अनोळखी शहरांत आतां आपण काय करणार? ' व्हीसा ' साठीं परत मुंबईला जावें लागेल कां? पुढल्या प्रवासाची सोय कशी होईल? अशा अनेक प्रश्नांनीं माझ्या डोक्यांत थैमान घालायला सुरुवात केली. एव्हांना प्रवाशांना घेऊन जाणारी विमान-कंपनीची बस कलकत्ता शहराकडे निघून गेली होती. डमडम विमानतळ कलकत्ता शहरापासून खूप दूर आहे. एवढ्या रात्रीं

शहरांत जायचें कसें व रात्रीं थांबायचें कुठें, याचाहि मी विचार करूं लागलों. तो मनुष्य मधून मधून टेलिफोनवरून कोणाशीं तरी बोलण्यांत गुंतलेला असल्यामुळें कांहीं काळ माझ्यापुढें असलेल्या प्रश्नचिन्हांचा विचार करण्यांत मला वेळ घालवावा लागला. शेवटीं त्याचें माझ्याकडे लक्ष गेलें. मी म्हणालों, "मी एक अनुनभवी प्रवासी आहे. माझी या शहरांत कोणाशींहि ओळख नाहीं. मी गोवन एजन्सीला तार केली होती. त्यांच्यातर्फे कोणी हजर नाहीं. आपण जर मला मदत केली, तर मी आपला खूप आभारी होईन." माझ्या बोलण्याचा त्या गृहस्थावर चांगला परिणाम झाला व त्यानें तेवढ्या रात्रीं त्याच्या कंपनीचे कलकत्त्यांतील मॅनेजर मिस्टर हॅशम यांना फोन-वरून माझी परिस्थिती समजावून सांगितली. मिस्टर हॅशम् त्याला म्हणाले, " मी स्वतः तिथें येतों. तोपर्यंत सदर गृहस्थांना काय हवें नको तें तुम्ही पहा."

थोड्याच वेळांत मि. हॅशम् तेथें येऊन थडकले व त्यांनीं खूप आस्थेवाईकपणें माझी विचारपूस केली. ते मला म्हणाले, "उद्यां तुम्हांला येथील पासपोर्टच्या ऑफिसमध्यें मी घेऊन जाईन व त्या ठिकाणीं जरूर ते व्हीसाज घेऊं. मात्र उद्यां सकाळीं तुमच्या मित्रांबरोबर तुम्हांला जातां येणार नाहीं. पुढील दोनतीन दिवसांत आमचें विमान ऑस्ट्रेलियांत जाणार नाहीं; परंतु B.O.A.C. चें विमान दोनतीन दिवसांत जाणार आहे. त्या विमानांत तुमची सोय करण्याचा प्रयत्न करतों. तुम्ही काळजी करूं नका." त्या गृहस्थाच्या या आश्वासनानें मला खूप धीर आला. त्यांची एकंदर वागणूक अत्यंत सौजन्याची होती. परदेशी व्यापारी कंपन्यांचे अधिकारी गिऱ्हाइकांशीं किती शालीनतेनें व आपुलकीनें वागतात, तें पहायला मिळालें. सदर गृहस्थानें आपल्या स्वतःच्या मोटरींतून मला बरोबर घेतलें व कलकत्त्यांतील सुप्रसिद्ध अशा ग्रँड हॉटेलमध्यें माझी व्यवस्था केली. त्या हॉटेलचा एकंदर रुबाब पाहून मी स्तिमितच झालों. ते गृहस्थ मला म्हणाले, " आतां तुम्ही जेवा व शांतपणें झोपा. दुसरा कसलाहि विचार करूं नका. उद्यां सकाळीं आमचा मनुष्य येऊन तुम्हांला जरूर त्या ठिकाणीं घेऊन जाईल व तुम्हांला सर्व मदत करील. येथून २४ तासपर्यंत हॉटेलचा खर्च आम्ही करूं व त्याहून अधिक राहावें लागल्यास पुढील खर्च तुम्हांला करावा लागेल." नोकरानें सामान खोलींत आणून ठेवल्यावर तेथील थाटमाट पाहून एक निराळाच विचार सुरू झाला. या ठिकाणीं आपणांस किती दिवस राहावें लागेल? ही ऐश्वर्याची राहणी आपल्या खिशाला कशी परवडेल?

या सर्व दगदगीमुळें व त्रासामुळें मी खूप थकून गेलों होतों. रात्र बरीच झाली होती. तथापि त्या मॅनेजरनें सांगितल्यामुळें हॉटेलच्या चालकांनीं माझ्याकरितां कांहीं खाण्याचे पदार्थ पाठवून दिले. त्यांचा समाचार घेऊन मी पलंगावर अंग टाकलें. प्रवासाची सुरवात कांहीं चांगली झाली नाहीं. पुढें आणखी कोणकोणत्या अडचणी येणार याचा विचार करीत असतांनाच, दिवसभरच्या थकव्यामुळें मला झोप केव्हां आली कोणास कळे !

११ जानेवारी ५२

सकाळीं दहाच्या सुमारास K.L.M. कंपनीतर्फे एक गृहस्थ माझा तपास करीत आला. मी त्याच्या बरोबर गेलों व प्रवासाच्या दृष्टीनें जरूर .ते सर्व कागदपत्र व परवाने त्यानें मला मिळवून दिले. B. O. A. C.चें एक विमान तारीख १२ ला रात्रीपर्यंत येथें येणार होतें. त्या विमानांत माझी सोय करण्याचा त्यांनीं प्रयत्न चालू केला.

ऑफिसमार्फत येणाऱ्या विमानांबरोबर संदेशांची देववेव सुरू झाली.संध्याकाळच्या सुमाराला मला सांगण्यात आलें कीं, ' सदर विमानांत सिंगापूर ते सिडनेपर्यंतच्या प्रवासाची तुमची सोय करण्यांत आली आहे. परंतु कल्कत्ता ते सिंगापूरपर्यंत सदर विमानांत जागा मिळेल कीं नाहीं हें निश्चित सांगतां येत नाहीं. त्याबाबत नक्की निर्णय उद्यां दुपारपर्यंत कळेल. जर या विमानांत तुम्हांला जागा मिळाली नाहीं, तर दुसऱ्या कोणत्या तरी विमानानें तुम्हांला सिंगापूरला पोहोंचविण्याचा आम्ही प्रयत्न करूं.'

१२ जानेवारी ५२

आज सारा दिवस B.O.A.C. व K.L.M. या कंपन्यांच्या ऑफिसांत चकरा मारण्यांत गेला. पुढील प्रवासाबाबत अजून अनिश्चितता असल्यामुळें कल्कत्ता शहरांत हिंडून तेथील प्रेक्षणीय स्थळें पाहण्यास उत्साह वाटला नाहीं. अखेर संध्याकाळीं ५ चे सुमारास मला बातमी समजलीं कीं, उद्यां पहाटे ३।।चे सुमारास निघणाऱ्या B.O.A.C. कंपनीच्या सुपर कॉन्स्टेलेशन्मध्यें माझी व्यवस्था करण्यांत आली आहे. त्याच रात्रीं १।। च्या सुमारास मी तयार रहावें. कंपनीची बस मला नेण्यासाठीं येईल. मी दोन तीनतास शहरांत हिंडून हॉटेलांत परत आलों. जेवण आटोपून १।। वाजेपर्यंत मी थोडी झोप घेण्याच्या हेतूनें बिछान्यावर पडलों. ११–११। चे सुमारास

हॉटेलच्या नोकरानें मला येऊन उठविलें व टेलिफोन आला असल्याचें सांगितलें. मी टेलिफोनपाशीं दाखल झालों. फोन B. O. A. C. कंपनीकडून होता. त्यानें मला सांगितलें कीं, "तुमचें विमान ३॥ ला सुटणार होतें, पण तें १॥ लाच सुटेल. कारण शहराभोंवतीं फार मोठ्या प्रमाणांत धुकें पसरत चाललें आहे. तुम्ही ताबडतोब तयार व्हा. कंपनीची बस तुम्हांला डमडम विमानतळावर घेऊन जायला निघाली आहे." त्याप्रमाणें मी माझें सामान घेऊन तयार झालों. हॉटलमध्यें आल्याला आतां ४८ तास पूर्ण झाले होते. २४ तासांचा आकार K.L.M. कंपनीनें द्यावयाचें कबूल केलें होतें. राहिलेल्या २४ तासांचे पैसे त्यानें माझ्याकडून घेतले. हे पैसे देतांना मला असें आढळून आलें कीं, या आकारांत पुण्यांतील बादशाही बोर्डिंगांत अथवा दवे हिंदू लॉजमध्यें मी एक आठवडाभर सहज राहूं शकलों असतों. प्रवासांत चारदोन पैसे अधिक जायचेच, असा विचार मी करतों तोंच विमान कंपनीचा इसम मला शोधीत आला.

१३ जानेवारी ५२

बरोबर १ च्या सुमारास आम्ही विमानतळावर येऊन पोहोंचलों. थोड्या वेळानें एकदोन गुजराथी गृहस्थ माझा तपास करीत आले. त्यांनीं, " आपणच कर्णिक कां ?" असें विचारतांच मला आश्चर्य वाटलें. नंतर त्यांनीं खुलासा करायला सुरुवात केली. त्यांपैकीं एक गृहस्थ म्हणाले, "माझ्या भावजयीला सिंगापूरला जावयाचें आहे. तिला इंग्रजी मुळींच येत नाहीं. म्हणून कुणीतरी महाराष्ट्रीयन अथवा गुजराथी सहप्रवासी आम्ही शोधीत होतों. कंपनीच्या ऑफिसमधून आज संध्याकाळींच समजलें कीं, आपण या विमानानें प्रवास करणार आहांत. कृपा करून आमच्या या भावजयीला विमानामध्यें काय हवें नको तें पहा व तिला जरूर ती मदत करा. आपले आमच्यावर फार उपकार होतील." मी त्यांना गुजराथींत म्हणालों, " आपण कांहीं काळजी करूं नका. पण सिंगापूरला यांना पोहोंचविण्याची व्यवस्था काय करावयाची ?" त्यावर ते म्हणाले, " आमचे बंधू विमानतळावर येतील. आपण गुजराथी इतकं चांगलं बोलतां. त्यामुळें कुटुंबांतला मनुष्य भेटल्याचाच आम्हांला आनंद झाला आहे. आतां या भावजयीच्या प्रवासाबद्दल आम्ही पूर्ण निर्धास्त राहूं शकतों." विमान सुटण्याच्या सुमारास ते गृहस्थ पुन्हां मजजवळ आले व म्हणाले, "विमानांत न्याहरी वगैरे दिली जाईल. आमच्या भावजयीला इंग्रजी खाद्यपदार्थांची माहिती नाहीं. आम्ही जैन आहांत. हे विमानांतले लोक चुकीनें तिला मांसाहार किंवा अंड्याचे

पदार्थ देणार नाहींत एवढें तुम्ही काळजीपूर्वक पहा." या गृहस्थानें खटपट करून या बाईसाठीं माझ्या जवळपासचीच जागा मिळविली होती. प्रवासांतसुद्धां आहाराबाबतचे आपले निर्बंध कसोशीनें पाळण्याची त्यांची धडपड पाहून मला आश्चर्य वाटलें. त्याचप्रमाणें इंग्रजीचा एक शब्दहि न येतां लांब अंतराचे प्रवास एकटेपणानें करण्याचें गुजराथी लोकांचें धाडस पाहून मला त्यांचें कौतुक वाटलें. आतां विमान सुरू होत आहे. भारत एअरवेज्च्या विमानाच्या मानानें हें B.O.A.C. चें विमान खूप मोठें आहे. याला सुपर कॉन्स्टेलेशन् म्हणतात. बसण्याची व्यवस्था अधिक आरामशीर आहे. विमानांतील सर्व व्यवस्था खूप आकर्षक वाटली. रात्रभर विमान चालू होतें. सकाळीं विमानांतच न्याहरी झाली. सुमारें दहाच्या सुमारास आम्ही सिंगापूरच्या विमानतळावर जाऊन पोहोंचलों. आमच्या घड्याळांत जरी दहा वाजले होते, तरी त्या वेळीं सिंगापूरच्या घड्याळांत मात्र १२ वाजून ५ मिनिटें झालीं होतीं. आम्ही सर्वांनीं आपापल्या घड्याळाचे काटे फिरविले.

विमानतळावर उतरल्यावर तुम्हांला आमचा कार्यक्रम देण्यांत आला. आमच्या एअर होस्टेसनें येऊन सांगितलें कीं, "उद्यां सकाळीं सात वाजेपर्यंत आपण सिंगापूरलाच राहणार. इथून बसनें तुम्हांला हॉटेलांत नेण्यांत येईल. त्या ठिकाणीं चार वाजेपर्यंत जेवण व विश्रांति झाल्यावर विमान-कंपनीमार्फत सिंगापूर शहर दाखविण्याची व्यवस्था करण्यांत येईल. आज रविवार असल्यामुळें फारसें कांहीं पहायला मिळणार नाहीं; परंतु थोड्या वेळांत जास्तींत जास्त पहाण्याचा आपण प्रयत्न करूं."

सिंगापूरला उतरल्यापासून उन्हाचा खूप त्रास होऊं लागला. विमानांतून प्रथम वर्गाच्या प्रवाशाला फक्त ६६ पौंड सामान बरोबर नेता येतें. त्यामुळें अधिक वजनाचे गरम कपडे अंगावर चढविले होते. सिंगापूरच्या प्रखर उष्णतेमुळें या कपड्यांचा खूप त्रास होत होता. ऑस्ट्रेलियांतील हवापाण्याची फारशी कल्पना नसल्यामुळें इंग्लंडला जातांना जी तयारी केली जाते तशीच तयारी मी केली होती. बरोबरचे सर्व कपडे लोकरीचे होते व ती लोकरसुद्धां खादीची होती. विमानतळावरून आम्हीं सिंगापूर येथील सुप्रसिद्ध हॉटेल PAFFLES येथें गेलों. सिंगापूरमधील हें एक अत्यंत बडें हॉटेल आहे. आंतरराष्ट्रीय सर्व प्रवासी बहुधा या हॉटेलांत राहतात. प्रत्येक खोलीमध्यें हवा थंड राहण्याची सोय केलेली होती व स्वतंत्र टेलिफोन पण होता. खोलींतील सर्व व्यवस्था खूप ऐषआरामाची होती.

चारच्या सुमारास तयार होऊन आम्ही खालीं हॉटेलच्या दिवाणखान्यांत जमलों. एअर हॉस्टेस आपल्या हातांतील यादीवरून प्रत्येक प्रवाशाचें नांव ताडून पाहात होती. आम्हांला सर्वांना चहा देण्यांत आला व आम्ही शहर पाहण्यास निघालों. सिंगापूर हें खूप मोठें शहर आहे. ब्रिटीशांनीं या शहराला अद्ययावत्पणा आणण्याचा बराच कसोशीनें प्रयत्न केला आहे. या ठिकाणीं चिनी लोक फार मोठ्या प्रमाणांत राहतात. आज रविवार असल्यामुळें मोठमोठीं दुकानें बंद होतीं. हॉटेलें मात्र उघडीं होतीं व सर्व गर्दी हाटेलांसमोर होती. या ठिकाणीं खाण्याच्या पदार्थांची विपुलता असावी, असें वाटलें. कित्येक दुकानांतून मांस विक्रीसाठीं ठेविलेलें होतें. येथें डुकराचें मांस अधिक प्रमाणांत खपत असावें असें दिसलें. रस्त्यांमधून सुद्धां खाद्यपदार्थ विकले जात होते. ठिकठिकाणीं आढळणारे चिनी लोक रविवारच्या सुट्टीमुळें सुस्तावलेले दिसत होते. मोटर चालू असतांना आमची एअर होस्टेस तोंडापुढें लाऊडस्पीकर घेऊन आजूबाजूच्या सर्व स्थळांची माहिती सांगत होती. माझें मात्र आजूबाजूला हिंडणाऱ्या माणसांकडेच अधिक लक्ष होतें.

आमची मोटर एकाएकीं थांबली. या ठिकाणीं भगवान् बुद्धाचें एक मोठें मंदिर होतें. आम्ही सर्वजण त्या मंदिरांत गेलों. पादत्राणें काढून ठेवण्याची सूचना होती. त्या सूचनेला मान देऊन आम्ही आंत प्रवेश केला. त्या ठिकाणीं बुद्धाची एक फार मोठी प्रतिमा पहायला मिळाली. त्या प्रतिमेच्या जवळ मेणबत्त्या लावल्या होत्या; निरनिराळे दिवे लावले होते व धूपाचा वास सर्वत्र दरवळत होता. एक चिनी बाई आपल्या देवळांतील पुजाऱ्याप्रमाणें तेथें बसून होती. या देवळांतील एकंदर वातावरण अत्यंत प्रशांत व गंभीर होतें. या वातावरणाचा माझ्या मनावर अविस्मरणीय असा परिणाम झाला. भगवान् बुद्धाचें एक चित्र विकत घेऊन मी सिंगापूरला सुखरूप पोहोंचल्यावर दोन ओळी त्यावर लिहून, तें मी माझ्या छोट्या मुलीला –प्रतिभेला– भेट म्हणून पाठवून दिलें.

शहर पाहून आल्यावर आम्ही पुन्हां हॉटेलांत आलों. हॉटलमधील सर्व नोकर चिनी होते. माझ्या खोलीच्या बाहेर जो नोकर होता त्याला फक्त चिनी भाषाच येत होती. मला त्याची भाषा समजत नव्हती. एकदोन वेळा खुणा वगैरे करून जेवणाची वेळ समजावून घेण्याचा मी प्रयत्न केला. तो मनुष्य दिसायला उग्र होता. आपली करपल्लवी भाषा त्याला समजली नाहीं व जर त्याचा गैरसमज झाला, तर निष्कारण भलताच प्रसंग ओढवायचा या भीतीनें मी तो नाद सोडून दिला.

आज रविवार असल्यामुळें सिंगापूरमधील पुष्कळ श्रीमंत लोक आपल्या जिवाची चैन करण्याकरितां या हॉटेलमध्यें येत होते. संगीताचा कार्यक्रम चालू झाला होता. एखाद्या मोठ्या समारंभाचें वातावरण या हॉटेलभोंवतीं पसरलेलें होतें. भोंवतालीं खूप गर्दी असतांनासुद्धां मी मात्र एका टेबलावर एकटाच बसून आपलें जेवण उरकीत होतों. जेवण संपल्यावर पहाटे पांच वाजतां मला उठविण्याची कांहीं व्यवस्था करतां येईल कां असें मी तेथील व्यवस्थापकाला विचारलें. त्याला इंग्रजी चांगलें येत होतें. "सकाळीं तुम्हांला उठविण्याची व्यवस्था मी करीन. तुम्ही शांतपणें झोपा." असें त्यानें मला सांगितलें.

आमच्या विमानांत एक तरुण प्रवासी होता. तो मुका व बहिरा होता. त्याला मदतीची गरज भासत होती. मला पाहिल्यावर तो माझ्या भोंवतीं भोंवतीं फिरत होता. मी या खोलींत राहिलों तर चालेल कां, रात्रीं खुणेनें त्यानें मला विचारलें. तो मुका व असहाय्य असल्यामुळें त्याला मदत देणें आपलें कर्तव्य आहे, असें मानून मी त्याला माझ्या खोलींत राहण्याची परवानगी दिली. हा मुका अँग्लोइंडियन् होता. त्याला शिंप्याचें काम चांगलें येत होतें. ऑस्ट्रेलियांत स्थायिक झालेल्या त्याच्या एका नातेवाइकानें नोकरीसाठीं त्याला बोलावून घेतलें होतें व त्या ठिकाणीं तो चालला होता, अशी माहिती त्यानें दाखविलेल्या पत्रावरून मला मिळाली. दिवसभरच्या दगदगीमुळें, आदल्या दिवशींच्या जागरणामुळें व खोलींतील थंड वातावरणामुळें थोड्याच वेळांत मला चांगली झोप आली.

१४ जानेवारी ५२

खोलींतील टेलिफोनची घंटा सारखी वाजूं लागली. माझ्या बरोबरचा प्रवासी बहिरा व मुका असल्यामुळें त्याच्यावर त्या घंटेचा कांहीं परिणाम झाला नाहीं. मी उठून टेलिफोन घेतला. हॉटेलच्या व्यवस्थापकानें 'सुप्रभात' म्हणून पांच वाजल्याची जाणीव करून दिली. वेळेवर उठविल्याबद्दल त्याचे आभार मानून मी त्याला टेलिफोन बंद करण्यास सांगितलें. तासाभरांत तयार होऊन आम्ही खालच्या दिवाणखान्यांत आलों. आम्हांला चहा देण्यांत आला. कंपनीची बस वाट पहात उभीच होती. आम्हीं विमानतळावर गेलों. बरोबर सातला विमान सुटलें. दोन तास प्रवास केल्यावर सुमारें नऊच्या सुमारास विमान खालीं येऊं लागलें. "इंडोनेशियाची राजधानी 'जकार्ता' येथें आपण येऊन पोहोंचलों आहोंत. या ठिकाणीं विमान पेट्रोल घेईल, आपण चहा घेऊं आणि तासभरानें येथून निघूं." असें सांग-

ण्यांत आलें. विमानतळावर उतरतांना चित्रविचित्र रंगांच्या मोठमोठ्या छत्र्या घेतलेले लोक दिसले. उन्हाळ्याचा खूप त्रास होत होता. या ठिकाणीं आम्हीं न्याहरी घेतली. विमान तात्डतोब निघणार असल्यामुळें व विमानतळ शहरापासून दूर असल्यामुळें जकार्ता शहर पाहायला मिळालें नाहीं. त्यामुळें थोडी निराशा झाली.

आम्हीं पुन्हां विमानांत जाऊन बसलों. विमान चालू झालें. आतां सुमारें साडे-दहा वाजले आहेत. ऑस्ट्रेलियांतलें पहिलें बंदर डार्विन येथें विमान थांबणार आहे. तोंपर्यंत सात साडेसात तास सारखा प्रवास चालणार आहे. जकार्ता सोडल्या-वर सुरबाया देशावरून आम्ही जरी उडत चाललों होतों, तरी या देशांतील भौगोलिक परिस्थितीची चांगली कल्पना आली. हा भाग खूप सुपीक आसावा असें वाटलें. पाण्याची विपुलता दिसत होती. विमानांतून सुरबायाचें जें दर्शन झालें तें खूपच रमणीय वाटलें. जकार्ता ते डार्विन या दरम्यानचा प्रवास एकंदरींत पाहतां जरी कंटाळवाणा असला तरी या प्रवासाचे दरम्यान विषुववृत्त ओलांडावयाचें असल्यामुळें या प्रवासाला एक विशेष महत्त्व प्राप्त होतें. माणसानें विषुववृत्त ओलां-डणें म्हणजे सागराधिपति नेपच्यून् याचा गुन्हा करणें असें समजण्यांत येतें. विमानामध्यें विषुववृत्त फार झटपट ओलांडलें जातें. बोटीनें प्रवास करतांना विषुव-वृत्त ओलांडण्याच्या वेळीं कांहीं विशिष्ट कार्यक्रम केले जातात. तसे कार्यक्रम करा-यला विमानामध्यें वाव मिळत नाहीं. तथापि विषुववृत्त ओलांडण्याच्या वेळीं विमानांत असलेलीं दहा वर्षांच्या आंतील वयांचीं सर्व मुलें एअर होस्टेसनें एकत्रित केलीं व त्या मुलांचीं छायाचित्रें घेण्याचा कार्यक्रम झाला. विमानांत असलेल्या प्रत्येक प्रवाशाला B. A. O. C. तर्फे त्या प्रवाशाचें नांव घालून विषुववृत्त ओलां-डल्याबद्दल एक भली मोठी सनद देण्यांत आली.

संध्याकाळीं पांचच्या सुमारास आम्ही डार्विनला पोहोंचलों. आमच्या घड्या-ळांत जरी पांच वाजले होते तरी डार्विनच्या घड्याळांत सात वाजले होते, म्हणून आम्ही आमचीं घड्याळें दोन तास पुढें केलीं. सिंगापूरच्या वेळेपेक्षां डार्विन येथील वेळ दोन तासांनीं पुढें असते. या ठिकाणीं एक प्रशस्त उपहारगृह होतें. त्या उपहारगृहांत आम्ही तीनचार तास थांबणार होतों. या वास्तव्यांत प्रत्येक प्रवाशाला एक स्वतंत्र खोली देण्यांत आली होती व त्या खोलीवर त्याच्या नांवाची चिट्ठी लावण्यांत आली होती. एवढ्या अल्प मुदतीच्या वास्तव्यांत प्रत्येक प्रवाशाला स्वतंत्र

खोली देण्याची आवश्यकता प्रारंभीं माझ्या लक्षांत आली नाहीं. परंतु जेवणाच्या वेळीं आपल्या खोलींतून बाहेर पडणाऱ्या स्त्रीप्रवाशांनीं केलेली वेषभूषा पाहिल्यावर विमान-कंपनीच्या योजकतेची जरूरी पटली. आम्ही जेवण घेतलें. रात्रीं बरोबर दहा वाजतां विमान सुरू झालें. निघण्यापूर्वी आम्हांला सागण्यांत आलें कीं, "आतां पुढील प्रवास न थांबतां नऊदहा तासांचा आहे. आपण येथून जे निघूं ते सिडनेला जाऊन उतरूं." विमान चालूं झालें आहे. विमानांतील खुर्चीवर पडून मी निद्रेची आराधना करीत आहे.

१५ जानेवारी ५२

आतां पहाटेचे पावणेचार वाजले आहेत. एअर होस्टेसनें जागे केल्यामुळें मी उठून बसलों आहे. ती म्हणाली, "आतां तुम्हांला आम्ही न्याहरी देणार आहोंत. आपण सातला सिडनेला पोहोचूं. त्याच्या आंत हा कार्यक्रम आटोपला पाहिजे." उतारूंना जागे करून अट्टाहासानें त्यांना न्याहरी देण्याची या लोकांची तत्परता पाहून मला आश्चर्य वाटलें.

आतां फटफटीत उजाडलें आहे. आमचें विमान सिडने विमानतळावर येऊन थडकलें आहे. माझ्या घड्याळांत साडेसहा वाजले आहेत. समोरील विमानतळा-वरील घड्याळांत बरोबर सात वाजले आहेत. डार्विनच्या वेळेपेक्षां सिडने येथील वेळ अर्ध्या तासानें पुढें आहे. मुंबई सोडल्यापासून मला माझें घड्याळ साडेचार तासांनीं पुढें करावें लागलें.

ऑस्ट्रेलियाच्या मध्यवर्ती सरकारतर्फे मि. बर्मन नांवाचे एक गृहस्थ माझा तपास करीत आले. ते म्हणाले, "ऑस्टेलियन परराष्ट्रीय खात्यातर्फे मी आपलें स्वागत करतों. आपले तीन भारतीय मित्र आधींच येथें आले आहेत. पलीकडे ते आपली वाट पाहात उभे आहेत. साडेआठच्या सुमारास ऑस्ट्रेलिअन एअरवेजच्या विमानांतून आपण मेलबोर्नला जाणार आहांत. आपलें सामान ताब्यांत घ्या. आपण एक कप चहा घेऊं. इतक्यांत विमान सुटण्याची वेळ होईलच."

मि. बर्मन यांच्याबरोबर सामान घेऊन मी बाहेर पडलों. त्या ठिकाणीं आमचे भारतीय मित्र उभे होते. या तिघांपैकीं पश्चिम बंगालचे प्रौढ शिक्षणाधिकारी निखिलरंजन रॉय यांचा व माझा पूर्वपरिचय होता. त्यांनीं माझें सहर्ष स्वागत केलें व इतर दोघांचा परिचय करून दिला. या दोघांपैकीं श्रीयुत चंद्रकांत भट हे

अनुक्रम ..२२९९८.. दि: ...३१-५-१९५७
क्रमांक ... २१८......

३१/८/५६

गुजराथी गृहस्थ मुंबई सरकारच्या मजूर खात्यांत डेप्युटी कमिशनर होते. मला गुजराथी चांगलें येत असल्यामुळें श्रीयुत भट यांची व माझी तात्कालिक गट्टी जमली. दुसरे गृहस्थ ओरिसा येथील एक प्रसिद्ध कवि श्रीयुत राऊत रॉय हे कलकत्ता येथील बिर्लांच्या एका कारखान्यांत मजुरांच्या कल्याणाची योजना पाहणारे अधिकारी होते. आम्ही सर्वांनीं मिळून चहा घेतला; तोंच विमानांत जाऊन बसण्याची सूचना मिळाली.

बरोबर साडेआठ वाजतां विमान सुरू झालें. आतां ओळखीची मंडळी बरोबर असल्यामुळें विमानांतील प्रवास खूप मजेंत चालला आहे. श्रीयुत भट हे फार बोलके आहेत. त्यांनीं आपलें शिक्षण लंडन व ऑक्सफर्ड येथें घेतलें आहे. त्यामुळें युरोपियन् पद्धतीची राहणी, तेथील आचारविचार यासंबंधीं त्यांनीं अत्यंत उपयुक्त अशा भरपूर सूचना दिल्या. त्यांच्या या सूचनांचा पुढें खूप उपयोग झाला.

आतां साडेदहा वाजले आहेत. लवकरच विमान मेलबोर्नच्या विमानतळावर उतरणार आहे. त्यामुळें प्रवाशांची धडपड सुरू झाली आहे. दहा वाजून पन्नास मिनिटांनीं आम्ही विमानांतून खालीं उतरलों आहोंत. येथील सरकारच्या परराष्ट्रीय खात्यातर्फे मि. ग्रिन् या नांवाचे एक गृहस्थ आम्हांला शोधीत आले. त्यांनीं आपल्या सरकारतर्फे आमचें स्वागत केलें. मि. ग्रिन् यांनीं आमचें सामान आपल्या ताब्यांत घेतलें व आम्हांला बरोबर घेऊन ते शहराकडे निघाले. मेलबोर्नच्या मुक्कामांत आमची राहाण्याची व्यवस्था सेंट ऑर्नाड गेस्टहाऊस, ९९९ पार्क स्ट्रीट, साउ थारा येथें करण्यांत आली असल्याचें त्यांनीं सांगितलें.

विमानतळावरून या गेस्ट हाउसकडे जातांना मेलबोर्न शहराचें धावतें दर्शन झालें. हें एक अद्ययावत् पद्धतीचें चांगलें शहर आहे. ऑस्ट्रेलियांतील व्हिक्टोरिया प्रांताची राजधानी मेलबोर्न येथें आहे. मेलबोर्न शहर अनेक सुधारणांनीं परिपूर्ण असल्यामुळें ऑस्ट्रेलियाच्या मध्यवर्ती सरकारची राजधानी मेलबोर्न येथेंच असावी, असा राजधानी ठरविण्याच्या वेळीं व्हिक्टोरिया प्रांतांतील लोकांनीं खूप आग्रह धरला. परंतु त्याला न्यू साऊथ वेल्स् प्रांतांतील लोकांनीं जोराचा विरोध केला. त्यांचें म्हणणें असें कीं, ऑस्ट्रेलियांतील सर्वांत जुनें शहर सिडने आहे. चांगलें बंदर म्हणून सिडनेची जगामध्यें ख्याति आहे. तेव्हां मध्यवर्ती सरकारची राजधानी सिडने येथेंच राहिली पाहिजे. अशा रीतीनें राजधानीबाबत या दोन प्रांतांत चाललेल्या रस्सीखेचीचा समाधानकारक निकाल न लागल्यामुळें राजधानीचें शहर

म्हणून कॅनबाराची निवड करण्यांत आली. हें शहर संपूर्णतः नव्यानें व आधुनिक पद्धतीनें बांधून काढण्यांत आलें. आज कॅनबारा येथें मध्यवर्ती सरकारची राजधानी मोठ्या वैभवांत थाटली गेली आहे. ही सर्व हकिगत आम्हांला मि. ग्रिन् यांच्याकडून समजली.




आमची गाडी गेस्टहाऊसच्या दारांत येऊन उभी राहिली. गेस्टहाऊसचे चालक मि. लॅम्परिल व चालिका मिसेस् लॅम्परिल यांनीं आमचें स्वागत केलें. श्रीयुत रॉय व मी एका खोलींत राहणार असून श्रीयुत भट व राऊत रॉय यांच्यासाठीं दुसरी एक खोली ठेवण्यांत आली होती. " आपण थोडी विश्रांती घ्या. मी तीनच्या सुमारास परत येतों. मग आपण बँकेत जाऊं या. तिथें खर्च करण्यासाठीं तुम्हांला कांहीं पैसे देण्यांत येतील. त्यानंतर आपण कांहीं व्यक्तींना भेटून पुढील कार्यक्रम निश्चित करूं. " असें म्हणून मि. ग्रिन् यांनीं आमचा निरोप घेतला.

आतां आयुष्यांतील एका नव्या अनुभवाला सुरुवात होत आहे. गोऱ्या लोकांच्या घरांत राहून त्यांच्या राहणीशीं जमवून घेण्याचें काम आतां करावयाचें आहे. काटेचमचे संभाळण्याचें तंत्र फारसें अवगत नाहीं. युरोपियन् पद्धतीच्या आहाराची संवय नाहीं. आम्ही जेवायला बसलों, तों आहाराबाबतचा अनुभव फारच विचित्र आला. ऑस्ट्रेलिअन् लोक जेवणाचे पदार्थ तयार करतांना कोणतेहि मासले वापरत नाहींत. मांस, बटाटे, भाज्या इत्यादि सर्व पदार्थ फक्त उकडलेले असतात. त्यांत ना मीठ ना मिरची. त्यामुळें पहिल्या जेवणाच्या वेळी तोंडांत घांस फिरूं लागला. आमच्यापैकीं श्रीयुत भट यांनीं चार पांच वर्षें इंग्लंडमध्यें काढले

असल्यामुळें तें व्यवस्थितपणें जेवत होते. हळूहळू आपणांला या जेवणाची संवय करून घ्यावी लागेल, असा मनाशीं विचार करून आम्ही कसेंबसें जेवण उरकलें.

दुपारचे तीन वाजले आहेत व मि. ग्रिन् आमचा तपास करीत आले आहेत. चहा घेऊन आम्हीं त्यांच्याबरोबर बाहेर पडलों. आम्हांला घेऊन ते एका बँकेंत शिरले. अर्धाएक तास आम्ही तेथें थांबलों, तीनचार सह्या केल्या व नंतर आमच्यापैकीं प्रत्येकाच्या हातांत ११ पौंड ६ शिलिंग ३ पेन्स् एवढी रक्कम ठेवली गेली. श्रीयुत भट हे जास्त व्यवहारी आहेत. परदेशांत कांहीं काळ काढल्यामुळें त्यांच्यामध्यें एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झालेला आहे. “ ही एवढीच रक्कम कोणत्या हिशोबानें तुम्ही आम्हांला दिलीत ?” त्यांनीं मि. ग्रिन् यांना स्पष्टपणें विचारलें. त्याचप्रमाणें “ आमच्या या वास्तव्यांत आम्हांला भत्ता कोणत्या हिशोबानें मिळणार आहे ?” असाहि रोकडा सवाल त्यांनीं त्यांच्यापुढें ठेविला. मि. ग्रिन् म्हणाले, “ येथें येणाऱ्या परदेशीयांना जी शिष्यवृत्ति देण्यांत येते, ती दोन प्रकारची असते. एक सीनिअर फेलोशिप व दुसरी ज्यूनिअर. ज्यांना सीनिअर फेलोशीप देण्यांत येते त्यांना आठवड्याला १४ पौंड १४ शिलिंग मिळतात व ज्यांना ज्यूनिअर फेलोशिप मिळते, त्यांना यापेक्षां आठवड्याला चार पांच पौंड कमी मिळतात.” श्रीयुत भट म्हणाले, “आम्हांला तुम्ही ज्यूनिअर फेलो म्हणून वागविणार आहांत कां ? आम्ही कांहीं विद्यार्थि म्हणून येथें आलों नाहीं. आमच्यापैकीं प्रत्येकजण अधिकाराच्या जबाबदार जागेवर काम करीत आहे. आमचा अनुभव मोठा आहे. आम्हांला सीनिअर फेलोशीप मिळाली पाहिजे. तुम्ही आमचें म्हणणें तुमच्या सरकारला कळवा. जरूर वाटल्यास आम्ही आमचें लेखी निवेदन सादर करूं.” मि. ग्रिन् म्हणाले, “ आपण निवेदन देण्याची आज गरज नाहीं. मी जरूर ती व्यवस्था करतों. ” त्यांनीं म्हटल्याप्रमाणें केलें. एक आठवड्याच्या आंतच त्यांच्या मध्यवर्ती सरकारकडून आम्हांला सीनिअर फेलोशीप दिल्याचें कळविण्यांत आलें.

बँकेंतील कामकाज अटोपल्यावर मि. ग्रिन् आम्हांला घेऊन कॉमनवेल्थ सोशल सर्व्हिस डिपार्टमेंटच्या ऑफिसांत गेले. त्या ठिकाणीं एक खास संशोधन खातें आहे आमच्या ट्रेनिंगची व्यवस्था या खात्याकडे सोंपविण्यांत आली आहे. या खात्याची प्रमुख मिस् हेलर या नांवाची एक बाई आहे. तिनें आमचें स्वागत केलें. मि.

ग्रिन् यांनीं आमचा परिचय करून दिला. उद्यां सकाळपासून कामाला सुरुवात होईल. या बाईंना भेटून आम्ही गेस्टहाऊसकडे यायला निघालों. मेलबोर्नचा एक नकाशा आमच्यापैकीं प्रत्येकाला देण्यांत आला होता. आमचा निरोप घेऊन मि. ग्रिन् निघून गेले होते. तेव्हां हॉटेलपर्यंतचा रस्ता शोधून काढण्याचें काम आतां आम्हांलाच करावें लागणार होतें. रस्त्यानें जातांना 'पायपर, पायपर' असा शब्द उच्चारीत कांहीं मुलें हिंडत होतीं. 'पायपर' ही काय भानगड आहे, हें प्रथम आम्हांला समजलें नाहीं. नंतर त्यांच्या हातांतील वर्तमानपत्रांचे गठ्ठे पाहिल्यावर 'पायपर' हें 'पेपरचें' अपभ्रष्ट रूप असल्याची माहिती मिळाली.

ऑस्ट्रेलियांतील सर्व लोक इंग्रजी भाषा बोलतात, हें जरी खरें असलें, तरी प्रथम प्रथम येथील सर्वसाधारण माणसांचें इंग्रजी समजणें आम्हांला कठीण वाटलें; कारण या लोकांचें उच्चार फार चमत्कारिक. पेपरला हे 'पायपर' म्हणतात, लेडीला 'लायडी' म्हणतात. शिवाय हे लोक तोंडांतल्या तोंडांत बोलतात. त्याचप्रमाणें आमचें इंग्रजी समजायला त्यांनाहि कठीण जात असावें, असा पण अनुभव आला. आमचें इंग्रजी व्याकरणदृष्ट्या शुद्ध, बोलण्याचा वेग जास्त व वाक्य संपूर्ण वापरण्याचा अट्टाहास !

आम्ही बाहेर निघतांना आमच्या निवासस्थानाच्या चालिकेनें आम्हांस संध्याकाळचें जेवण बरोबर सहा वाजतां होतें, असें बजावून सांगितलें होतें. ऑस्ट्रेलियामध्यें नोकरांचा खूप तुटवडा आहे. त्यांचे कामाचे तास ठरलेले आहेत व त्यामुळें संध्याकाळीं साताच्या आंत सर्व नोकरांना मोकळे करावें लागतें. त्यामुळें संध्याकाळची जेवणाची वेळ सहाची निश्चित झालेली आहे. सहा वाजण्याच्या आंत आम्ही गेस्टहाऊसमध्यें परत आलों व भोजनगृहांत शिरलों. त्या ठिकाणीं पांचसहा चिनी मुलें बसलेलीं दिसलीं. सिंगापूर, मलाया या विभागांतून हीं मुलें आलीं आहेत. आम्हीं त्यांच्या जवळ जाऊन त्यांची ओळख करून घेतली. सर्वांच्या नांवांमध्यें इतकें सादृश्य होतें कीं, आज त्यांपैकीं एक नांव आठवत असेल तर शपथ ! या मुलांना पाहतांच पाश्चात्य पद्धतीची राहणी यांनीं चांगलीच आत्मसात केलेली दिसली.

जेवण झाल्यावर गेस्टहाऊसपासून जवळच थोडेसें हिंडून आलों. गेस्टहाऊसच्या चालिका मिसेस् लॅम्परिल या आम्हांला दारांतच भेटल्या. त्यांनीं आम्हांस खोलींत नेऊन आमची आपुलकीनें विचारपूस केली व आपल्या गेस्टहाऊसबद्दल

माहिती सांगितली. त्यांचा निरोप घेऊन आम्ही आमच्या खोलींत आलों. येथें सुखरूप पोहोंचल्याची तार घरीं पाठविण्यासाठीं मि. ग्रिन् यांच्याजवळ मी लिहून दिली होती. ती रवाना केल्याबद्दलची त्यांची चिठी मिळाली. कालची सारी रात्र विमानामध्यें घालविल्यामुळें आज लवकर झोप येऊं लागली.

१६ जानेवारी ५२

सकाळीं ठीक पाउणेनऊ वाजतां आम्हीं आपल्या कार्यालयांत जाऊन दाखल झालों व मिस् टेलर यांना भेटलों. त्यांनीं आपल्या हाताखालीं काम करणाऱ्या तीनचार बायांना बोलाविलें व त्यांची आमच्याशीं ओळख करून दिली. नंतर मिस् सॅम्बलस् यांच्याबरोबर आम्हीं एका हॉलमध्यें गेलों. तेथें आमच्यापैकीं प्रत्येकाची एक टेबलखुर्ची निश्चित करण्यांत आलेली त्या बाईनें दाखविली. आमचीं नांवें त्या टेबलावर लाविलीं होतीं. पुढील दोन अठवड्यांतील कार्यक्रमांची टाइप केलेली एकेक प्रत आम्हांला देण्यांत आली. आम्हीं तिथें बसलों असतांनाच मिस वेलो नांवाची दुसरी एक बाई आणखी चार लोकांना घेऊन आली. या चारांपैकीं तिघेजण सिलोनमधून आले होते व एक इंडोनेशियांतील होते. त्या बाईनें आमची त्यांच्याशीं ओळख करून देण्याचा आव आणला, परंतु आमच्यापैकीं कोणाचेंहि नांव तिच्या लक्षांत राहिलें नव्हतें. सिलोनी लोकांनीं आपलीं नांवें सांगितलीं, तरी त्या नांवांचा उच्चार करणें मला जमेना. पुढें आम्हांला असें आढळून आलें कीं भट, रॉय आणि कर्णिक हीं तीन नांवें उच्चारांत बदल करून ही मंडळी वापरूं शकलीं, परंतु सिलोनी लोकांचीं नांवें व श्री. राऊत रॉय यांचें नांव उच्चारतांना त्यांची खूप त्रेधा उडे.

सिलोनी लोकांपैकीं एक स्त्री होती. तिचें नांव मिसेस विक्रमसिंगे. सिंह या संस्कृत शब्दाचें सिलोनी भाषेंत शिंगे असें विडंबन झालेलें पाहून मला आश्चर्य वाटलें. बाई आपलें नांव सांगतांना विक्रमशिंगे असें नांव सांगत असे, दुसरे गृहस्थ होते रत्नसिंगे. तिसऱ्या गृहस्थाचें नांव होतें धर्मवर्धन. या तिन्ही नांवांवरून सिलोनमधील लोकांचीं नांवें अद्यापि संस्कृत शब्दांनाच धरून ठेविलीं जातात, असें दिसून आलें. चौथे गृहस्थ इंडोनेशियांतून आले होते. त्यांचें नांव अँड्रयूज. आतां आम्हीं आठजण झालों. पांचदहा मिनिटें परस्परांशीं बातचीत झाली. नंतर आम्हांला व्याख्यानगृहांत पाचारण करण्यांत आलें.

ऑस्ट्रेलियांतील मध्यवर्ती सरकारच्या लोककल्याणकारी योजनांच्या खात्याचें डायरेक्टर मिस्टर रो यांनीं आमचें ऑस्ट्रेलिअन सरकारच्या वतीनें स्वागत केलें.

त्यांनीं उद्घाटनाचें भाषण न करतां अनौपचारिक गप्पाच मारल्या. बोलतां बोलतां त्यांनीं कोलंबो योजनेचें स्वरूप व ऑस्ट्रेलियांतील कल्याणकारी योजनांची प्रगति याबद्दल माहिती सांगितली. एका खात्याच्या डायरेक्टरला शोभेल असा गंभीरपणा त्यांच्याजवळ मुळींच नव्हता. अत्यंत खेळीमेळीनें वीसपंचवीस मिनिटांत त्यांनीं आमच्याशीं चर्चा केली. नंतर चहा आला व हा कार्यक्रम संपला. आज दुपारपासून या खात्यांतील एक अधिकारी मि. ट्रिटन यांच्या व्याख्यानानें कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे.

ऑस्ट्रेलियाबद्दल माहिती सांगतांना मिस्टर ट्रिटन म्हणाले, " एक काळ असा होता कीं, युरोपियांतील लोक ऑस्ट्रेलियांत यायला भीत असत. आपला जो नातेवाईक ऑस्ट्रेलियांत जायला निघे तो पुन्हां कधींहि आपल्याला दिसणार नाहीं, असें मानून त्याला कायमचा निरोप देण्याची प्रथा त्या वेळीं चालू होती. जाणारा माणूस सुद्धां, ' देवा, माझें रक्षण कर ' असें म्हणून देवाची प्रार्थना करीत असे. येथें येणाऱ्या लोकांचीं आमच्या देशाविषयीं दोन प्रकारची प्रतिक्रिया घडते. एक तर त्यांना आमचा देश अतिशय आवडतो, किंवा आमच्या देशावर ते अत्यंत नाराज होतात. यापैकीं कोणत्या वर्गांत आपण जाऊन बसाल, हें आज मला सांगतां येत नाहीं. आमच्या देशांतील प्रजा एकजिनसी स्वरूपाची आहे. या देशांतील ९७ टक्के लोक ब्रिटीश आहेत. ते अद्यापि स्वतःला ब्रिटिश असें मानतात. आमच्यापैकीं जे लोक गरीब आहेत ते मात्र स्वतःला ऑस्ट्रेलियन म्हणवून घेतात. या देशांत वास्तव्य करून राहिलेल्या लोकांना फार काळ एकलेपणानें राहावें लागल्यामुळें त्यांच्यामध्यें एक प्रकारचा अहंमन्यपणा वाढलेला तुम्हांला दिसेल. या देशांतील लोकांचें लक्ष अद्यापि इंग्लंडकडे असल्यामुळें यांच्या राहणीवर व चालीरीतींवर इंग्लंडचा ठसा उमटलेला तुम्हांला आढळेल. तथापि आमची मंडळी अधिक आतिथ्यशील असल्यामुळें आमचा देश तुम्हांला आवडेल, अशी आशा आहे. "

१७ जानेवारी ५२

आज सकाळच्या कार्यक्रमाला सुरुवात मिस्. एल्हा बील हिच्या व्याख्यानानें झाली. तिनें ऑस्ट्रेलियाबद्दल भौगोलिक व इतर माहिती सांगितली. ती म्हणाली, " जरी ऑस्ट्रेलिया खंडाच्या आस्तित्वाची माहिती लोकांना फार पूर्वीपासून होती व या खंडामध्यें वसाहत करण्यापूर्वीं सुमारें दीडशें वर्षें आधींपासून जरी या देशाकडे इंग्लंडचें थोडेंबहुत लक्ष लागलेलें होतें, तरी १७७० पर्यंत

या देशांत कोणत्याहि ब्रिटिश माणसानें पाऊल टाकलें नव्हतें. कुक् या नांवाच्या ब्रिटिश आरमारी दलांतील एका गृहस्थानें ऑस्ट्रेलियांत प्रथम पदार्पण केलें. २० एप्रिल १७७० या दिवशीं त्याला ऑस्ट्रेलियाचें प्रथम दर्शन झालें. १७७० सालीं अमेरिकेनें स्वातंत्र्यासाठीं जें युद्ध सुरू केलें, तें १७८० च्या सुमारास संपलें. अमेरिका स्वतंत्र झाल्यावर, जन्मठेपीच्या शिक्षा झालेले आपले कैदी कोठें पाठवावे, असा ब्रिटनला प्रश्न पडला. ह्याच काळांत आस्ट्रेलिया खंडाचा लाभ झाल्यामुळें आपले कैदी येथेंच पाठविण्याचा ब्रिटननें निर्णय घेतला व १७८७ सालीं कैद्यांची पहिली तुकडी घेऊन ब्रिटनचें एक जहाज ऑस्ट्रेलियाकडे निघालें. या कैद्यांची जबाबदारी कॅप्टन ऑर्थर फिलिप यांच्याकडे होती. १३ मे १७८७ या दिवशीं ११ जहाजें बरोबर घेऊन फिलिप ऑस्ट्रेलियाकडे जायला निघाला. या ११ जहाजांमधून १५०० माणसें होतीं, पैकीं ८०० कैदी होते. १८ जानेवारी १७८८ या दिवशीं ऑस्ट्रेलियांतील 'बॉटनी बे' या ठिकाणीं हे लोक येऊन पोहोंचले व तेथून आठच दिवसांत आज ज्या ठिकाणीं 'सिडने' हें शहर वसलेलें आहे, तेथें या सर्व लोकांना कॅप्टन् फिलिप घेऊन गेला. इथूनच ऑस्ट्रेलियाच्या वसाहतीला पद्धतशीर प्रारंभ झाला.

"आमच्या या देशावर पर्जन्याची कृपा सारख्या प्रमाणांत वाटलेली नाहीं. कांहीं भागांत भरपूर पाऊस पडतो, तर कांहीं भागांत पाण्याच्या थेंबासाठीं गुरांना तडफडावें लागतें. या भागांतून वर्षाला दोन इंचसुद्धां पाऊस पडत नाहीं. याच्या उलट क्विन्सलँड व टास्मानिया येथील कांहीं भागांतून १३० ते १४० इंच पाऊस पडतो. स्थूल मानानें ऑस्ट्रेलियाचें वर्णन पुढीलप्रमाणें करतां येईल. या देशांतील सुमारें २० टक्के प्रदेश पूर्ण नाठाळ आहे. या ठिकाणीं गवतसुद्धां उगवत नाहीं. शेतीला लायक व उत्तम पीक येणारा भाग असा २१ टक्के आहे. जवळ जवळ ३४ टक्के प्रदेश असा आहे कीं, त्या ठिकाणीं मेंढ्यांना भरपूर चारा मिळूं शकतो व सुमारें २५ टक्के प्रदेश असा आहे कीं, ज्या ठिकाणीं थोडी फार शेती होऊं शकते. ऑस्ट्रेलियांतील मोठ्या शहरांत पावसाचें प्रमाण सरासरी पुढीलप्रमाणें आहे. सिडने ४६ इंच, ब्रिसबेन् ४४ इंच, पर्थ ३५ इंच, मेलबोर्न् २५ इंच, होबार्ट २४ इंच, कॅनबारा २२ इंच व ॲडिलेड २१ इंच.

"या देशांत कोळसा मुळींच नाहीं; तेलाच्या खाणी नाहींत. त्यामुळें आमची सारी भिस्त विजेवरच असते. ही वीज आम्ही पाण्यापासून तयार करतों. या देशांत सोन्याच्या व लोखंडाच्या खाणी आहेत. आम्हांला जर भरपूर वीज मिळाली,

तर आम्ही वाटेल तेवढें पोलाद उत्पन्न करूं शकूं.

" ऑस्ट्रेलियामधील वसाहतीला जरी कैद्यांपासून प्रारंभ झाला असला, तरी हळू हळू स्वतंत्र नागरिकसुद्धां येथें येऊं लागले. ज्या कैद्यांची शिक्षा पूर्ण झाली, त्यांची सुटका झाल्यावर ते इंग्लंडला परत न जातां येथेंच वास्तव्य करूं लागले. या लोकांनीं आपल्या उपजीविकेसाठीं निरनिराळे व्यवसाय करायला सुरुवात केली. जॉन मॅकआर्थर नांवाच्या गृहस्थानें मरिनो जातीच्या मेंढ्यांच्या पैदाशीचें काम हातीं घेतलें. हा एक नवा धंदा लोकांना मिळाला. १७९२ ते १८४० या काळांत या खंडामध्यें जरी लोक वसाहत करूं लागले होते, तरी ही प्रगति फार संथपणें चालू होती. आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठीं झगडणारे राजकीय पुढारी, इंग्लंडमधील मजूर पुढारी व लोकशाही स्थापन करण्याकरितां धडपडणारे क्रांतिवीर यांना आपल्या देशांत शिक्षा झाल्यावर आस्ट्रेलियामध्यें पाठविलें जाई. राजसत्तेसाठीं धडपडणाऱ्या या मंडळींनीं येथें आल्यावर येथील राजकारणांतसुद्धां आपणांला कांहीं हक्क मिळावेत म्हणून प्रयत्न चालविला. या चळवळीला यश आलें व ब्रिटिश सरकारनें एक स्थानिक सल्लागारमंडळ गव्हर्नरांना मदत करण्यासाठीं नेमिलें. इतःपर ऑस्ट्रेलियामध्यें कैदी पाठविले जाऊं नयेत व ऑस्ट्रेलिया यापुढें जबाबदार नागरिकांसाठीं राखला जावा, अशी जोरदार मागणी त्यांनीं केली. या सुमारास दुसरी एक महत्त्वाची घटना घडली. १८५० सालीं न्यू साऊथ वेल्स् व व्हिक्टोरिया या दोन प्रांतांमध्यें सोन्याच्या खाणींचा शोध लागला. त्यामुळें ऑस्ट्रेलियाचें स्वरूप संपूर्णतः बदलायला सुरुवात झाली. चांगले प्रतिष्ठित लोक सोनें मिळविण्याच्या आशेनें ऑस्ट्रेलियाकडे धाव घेऊं लागले व ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या एकसारखी वाढूं लागली.

" १८५० ते १८६० या काळांत येथील लोकांनीं राजकीय हक्क मिळविण्यासाठीं खूप प्रयत्न केले. या काळांत येथील बहुतेक वसाहतींना स्वायत्तता देण्यांत आली. यापुढें या देशांत गुन्हेगार न पाठविण्याचा ब्रिटननें निर्णय घेतला व कालपर्यंत जी केवळ गुन्हेगारांची वसाहत म्हणून ओळखली जात होती, त्या ठिकाणीं प्रामाणिक, जबाबदार नागरिक वास्तव्य करूं लागले. १८५० ते ६० या काळांत इतरत्र युद्धें चालू होतीं. तेव्हां ऑस्ट्रेलियांत संपूर्ण शांतता असल्यामुळें व बाहेरील जगाची लुडबुड नसल्यामुळें या नव्या देशाला आपली प्रगति फार झपाट्यानें करतां आली. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तीन सत्प्रवृत्तींचा प्रसार करण्याची धडपड


कांहीं लोकांनीं सुरू केली. पद्धतशीर पायावर कामगारांची संघटना उभी राहूं लागली. अशा रीतीनें नवा ऑस्ट्रेलिया मोठ्या आवेशानें आणि उत्साहानें प्रगति-पथावर पावलें टाकूं लागला."

याप्रमाणें या खंडाचा इतिहास अतिशय आकर्षक पद्धतीनें त्या बाईनें आमच्या-पुढें ठेविला. दुपारीं व्याख्यानें बंद होतीं. या खात्यांतील दोन तीन जबाबदार अधिकाऱ्यांनीं आमची वैयक्तिक मुलाखत घ्यावी व या देशांत आम्हांला काय काय पाहावयाचें आहे व कोणत्या विशेष गोष्टी जाणून घ्यावयाच्या आहेत, याची माहिती मिळवावी, असें ठरलें होतें. त्याप्रमाणें मिसेस हॉर्न् या बाईनें मला मुलाखती-साठीं बोलाविलें. सुमारें दोन तास मुलाखत चालू होती. या दोन तासांच्या अव-धींत त्या बाईनें भारतामध्यें मी करीत असलेल्या कामाबद्दलची संपूर्ण माहिती मिळविली. माझ्या येथील वास्तव्यांत मला कोणकोणत्या संस्था पाहावयास आवडेल व कोणत्या विषयांबद्दल माहिती गोळा करण्यांत मला रस वाटेल, हें तिनें समजून घेतलें. मुलाखतीच्या शेवटीं ती म्हणाली, "तुमच्या देशाची परिस्थिति मला माहीत नसल्यामुळें तुम्हाला नेमकें काय हवें, त्याची मला कल्पना नाहीं. तुमचें येथील वास्तव्य फारच अल्प मुदतीचें आहे. या थोड्या वेळांत तुम्हांला असें कांहीं मिळावें कीं, त्यापैकीं कांहीं तरी तुम्हांला बरोबर नेतां येईल व येथें मिळालेल्या अनुभवाचा जास्तींत जास्त फायदा तुमच्या देशाला करून देतां येईल." आपल्या हाताखालीं शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा मगदूर, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांच्या गरजा व त्यांच्या आशाआकांक्षा समजून घेण्यासाठीं येथील प्राध्यापकांनीं अवलंबिलेलें हें मुलाखतीचें तंत्र मला फारच चांगलें वाटलें.

१८ जानेवारी ५२

ऑस्ट्रेलियामधील राज्यकारभाराबाबत डॉ. शार्प नांवाच्या गृहस्थांनीं फारच उद्-बोधक अशी माहिती आज सांगितली. ते म्हणाले, "आमच्या देशांतील सर्व संस्था व आमची राजकीय घटना ब्रिटिश नमुन्याची आहे. याचें मुख्य कारण म्हणजे आम्ही ब्रिटनला आपलें माहेर मानतों. ब्रिटनमध्यें जें जें आहे तें तें ऑस्ट्रे-लियांत असावें असें आम्हांस वाटतें. आमच्या देशांत १९०० सालापासून संघराज्य स्थापन झालें आहे. या संघराज्याच्या पार्लमेंटची पहिली बैठक ९ मे १९०१ रोजीं भरली. या संघराज्यांत पुढील प्रांतीय राज्यें समाविष्ट झालीं आहेत. (१) न्यू साऊथ वेल्स, (२) व्हिक्टोरिया, (३) क्वीन्सलँड, (४) टास्मानिया,

( ५ ) दक्षिण ऑस्ट्रेलिया व ( ६ ) पश्चिम ऑस्ट्रेलिया. गव्हर्नर जनरल हा ब्रिटिश राजाचा प्रतिनिधि असून लोकनियुक्त मंत्र्यांच्या साह्यानें राज्यकारभार चालवितो. प्रांताचा राज्यकारभार ब्रिटिश सरकारनें निवडलेला गव्हर्नर आपल्या मंत्र्यांच्या मदतीनें चालवितो. हे मंत्री लोकांनीं निवडलेले असतात व ते लोकांना जबाबदार राहतात. आमच्या देशांत पार्लमेंटमधील विरोधी पक्षाच्या नेत्याला खूप मान दिला जातो. त्याला सरकारी खजिन्यांतून पगार मिळतो. पार्लमेंट, मंत्रिमंडळ व लोकसभा या तीन संस्थांपेक्षां येथील हायकोर्टवर आमच्या लोकांचा खूपच विश्वास आहे. आम्ही अभिमानानें असें सांगूं शकतों कीं, आमच्या देशांतील हायकोर्ट न्यायदानाचें काम अत्यंत चोख रीतीनें बजावतें व त्यामुळें जनतेला हायकोर्टाचा मोठा आधार वाटतो.



मेलबोर्न मधील पार्लमेंटगृह

" आमच्या देशांत स्थानिक स्वराज्य संस्थांची वाढ मुळींच चांगली झालेली नाहीं. इतर देशांतील स्थानिक स्वराज्य संस्थांविषयीं लोकांना जी आपुलकी वाटते, तशी आपुलकी या संस्थांविषयीं आमच्या लोकांना अजून वाटत नाहीं. आमच्या देशाचा हा एक मोठा दोष आहे, असें मी मानतों. याचें एक कारण म्हणजे आमच्या

लोकांना पुष्कळदां उद्योगानिमित्त वरचेवर हिंडावें लागतें आणि दुसरें कारण म्हणजे आमच्या देशांतील लोकसंख्या बरीच विखुरलेली आहे. अलीकडे अलीकडे तरुण लोक स्थानिक संस्थांमध्यें लक्ष घालूं लागले आहेत. माझ्या मतें ही एक स्वागतार्ह घटना आहे."

या गृहस्थांनीं येथील मजूर चळवळीबाबत व लोकांच्या परिस्थितीबाबत बरीचशी माहिती सांगितली. मजुरीबाबत बोलतांना ते म्हणाले, "आमच्या देशांत ट्रेड युनियन्सची संख्या तुम्हांला खूप आढळेल. त्यामध्यें सभासदांची संख्याहि बरीच दिसून येईल. परंतु संघटनेच्या निकषावर येथील ट्रेड युनियन्स तपासून पाहिल्या तर त्या दुबळ्या आहेत असें दिसून येईल."

संध्याकाळीं आम्हांला व्हिक्टोरिया प्रांताचें पार्लमेंटगृह पाहण्यासाठीं बोलाविण्यांत आलें होतें. आम्ही तेथें गेलों. तेथील 'सार्जंट ॲट आर्म्स' नांवाच्या अधिकाऱ्यानें आमचें स्वागत केलें. त्यानें जरूर तीं माहिती सांगितली. त्यानंतर आम्हां सर्वांना अल्पोपाहार देण्यांत आला.

१९ जानेवारी ५२

आज शनिवार. ऑस्ट्रेलियामध्यें शनिवार व रविवार हे दोन्ही दिवस रजेचे असतात. कामगारांनीं जोराची चळवळ करून एका आठवड्यांत चाळीस तासच काम करण्याची सवलत मिळविली आहे. कारकून वगैरे पांढरपेशा मंडळींना (white collar professions) दर आठवड्याला पावणेसद्तीस तास काम करावें लागतें. या योजनेबाबत थोडी गंमतीची माहिती मला मिळाली. आम्ही ज्या कार्यालयांत काम करीत होतों, तें संध्याकाळीं पांच वाजून सहा मिनिटांनीं बंद होत असें. "तुमचें कार्यालय असें पांच वाजून सहा मिनिटांनींच कां बंद होतें?" असें मीं विचारतांच तेथील एक बाई म्हणाली, "आम्ही आठवड्याला बरोबर पावणेसद्तीस तासच काम करणार. हिशोब बिनचूक येण्यासाठीं आम्हांला आमचें कार्यालय पांच वाजून सहा मिनिटांनींच बंद ठेवावें लागतें." या लोकांची ही हिशेबी वृत्ति पाहून मला बरेंच आश्चर्य वाटलें.

आज मद्रासहून येथें आलेले श्रीयुत रामचंद्रन् भेटले. गेलीं दोनतीन वर्षें ते या देशांत अर्थशास्त्र, बँकिंग इत्यादि विषयांचा अभ्यास करीत आहेत. मनुष्य खूप बोलका व हुशार दिसला. भारतांतून येथें आलेल्या इतर हिंदी विद्यार्थ्यांविषयीं त्यांनीं माहिती सांगितली. दुपारीं कांहींच काम नसल्यामुळें त्यांच्या आग्रहा-

वरून आम्ही आपल्या देशबांधवाना भेटण्यासाठीं त्यांच्या वसतिगृहांत गेलों. आपली मंडळी भेटणार म्हणून मोठ्या आनंदांत आम्ही तेथें जाऊन दाखल झालों. परंतु पुढें या मित्रांनीं उधळलेलीं वाक्सुमनें ऐकून खूपच वाईट वाटलें.

येथें आलेले हे भारतीय चांगले श्रीमंत दिसले. भारतीय विश्वविद्यालयांत यांचा टिकाव न लागल्यामुळें हे बडे बापके बेटे, या ठिकाणीं अभ्यासाच्या निमित्तानें येऊन राहिले होते. या लोकांच्यामध्यें राष्ट्रीय भावनेचा लवलेशहि दिसून आला नाहीं, इतकेंच नव्हे, तर नवभारताविषयीं कांहीं विकृत कल्पना त्यांनीं उराशीं बाळगलेल्या दिसल्या. ते म्हणाले, "आजचा भारत खूप बदललेला आहे. चांगल्या लोकांना त्या ठिकाणीं सन्मानानें जगतां येणार नाहीं. आमच्यासारख्यांना यापुढें भारतांत नीट जगतां येणें शक्य नाहीं. आम्हांला चांगल्या नोकऱ्या मिळणार नाहींत. म्हणून शक्य तों येथेंच राहण्याचें व येथें न जमल्यास इंग्लंड किंवा अमेरिका या पुढारलेल्या देशांत स्थायिक होण्याचें आम्हीं ठरविलें आहे." हीं मुक्ताफळें ऐकल्यावर मी त्यांना म्हणालों, "भारतानें लोकशाहीचा एक फार मोठा प्रयोग हातीं घेतला आहे. नवभारताच्या निर्मितीचा कार्यक्रम योग्य रितीनें आंखून तो अंमलांत आणण्याचा प्रयत्न आमचे पुढारी करीत आहेत. त्यांना तंत्रज्ञांची फार मोठी उणीव भासत आहे. ऑस्ट्रेलियासारख्या प्रगतिपर देशांत राहून आपण जें तांत्रिक शिक्षण मिळविलें आहे त्याची आपल्या देशाला आज खूपच गरज आहे. आपण शक्य तितक्या लवकर आपलें शिक्षण पुरें करून जर स्वदेशीं परत आलांत, तर आपली मायभूमि तुमचें खूप प्रेमानें स्वागत करील." माझें भाषण त्यांना रुचलें नाहीं, असें त्यांच्या चर्येवरून दिसलें. मी बोलत असतांनाच सर्वांनीं जोरानें धूम्रपानास सुरुवात केली व मी सुद्धां भावनांवर ताबा मिळवून त्यांची इतर विचारपूस केली.

आज शनिवार असल्यामुळें दुकानें फार लवकर बंद झालीं. आमचे नवे मित्र रामचंद्रन् म्हणाले, "येथील उपाहारगृहें सुद्धां साताच्या सुमारास बंद होतात. ठिकठिकाणीं काम करणाऱ्या मोलकरणीसुद्धां लवकर घरीं परत जातात." त्यामुळें घाईघाईनें आम्ही निवासस्थानीं परत आलों. तेथील नोकरमंडळींनीं आज रजा घेतल्यामुळें आमच्या यजमानीणबाईंना फारसे श्रम न घेतां जें देणें शक्य झालें, तेवढ्यावरच आम्हीं आमची भूक भागविली.

२० जानेवारी ५२

आज रविवार. सारीं दुकानें, गिरण्या, कारखाने, कार्यालयें सर्व कांहीं बंद. त्यामुळें शहर फारच उदास दिसत होतें. सर्व लोक मिळेल त्या वाहनांत बसून समुद्राच्या दिशेनें प्रवास करीत होते. सायंकाळीं ट्रॅम्, बस या सर्व वाहनांतून गर्दीनें जाणारी मंडळी दिसत होती. बरीच मंडळी पायीं सहलीला निघाली होती. बहुतेकांनीं आपल्या कुटुंबांतील लोक बरोबर घेतले होते. सर्वांचे पाय शहराच्या बाहेर पडण्याची फार जोरानें खटपट करीत होते. पांच दिवस खूप गडबड व गजबजाट असलेल्या शहराच्या मगरमिठींत सांपडलेली जनता या सर्व गडबडीपासून दूर, शांत अशा जागीं पळून जाण्याचा प्रयत्न करीत होती. औद्योगिक क्रांतीनंतर शहरांची जी झपाट्यानें वाढ होते, त्या वेळीं खेड्यांतील लोक शहराकडे फार मोठ्या प्रमाणांत धांव घेऊं लागतात. त्यामुळें शहरें खूप खूप मोठीं होतात व तेथील लोकांना कृत्रिम जीवन जगावें लागतें. या जीवनाचा त्यांना पुष्कळदा उबग येतो. या धकाधकीच्या जीवनांतून अल्पकाळ का होईना, आपली सुटका व्हावी, म्हणून जो तो शहरापासून दूर जाण्याचा प्रयत्न करतो. येथील सारे लोक यामुळेंच सहलीला निघाले होते. आम्ही पण किनाऱ्याच्या दिशेनें फिरायला निघालों. समुद्रावर जाऊन पाहतों तर त्या ठिकाणीं भरपूर गर्दी दिसत होती. कोणी खेळत होते, कोणी पोहत होते, कोणी नुसते वाळूवर पडून गप्पा मारीत होते, तर कोणी शांतपणें पुस्तकें वाचण्यांत गढून गेले होते. कांहीं अगदीं निष्क्रीय गृहस्थ आकाशाकडे टक लावून नुसते पाहात राहिले होते. स्त्रिया या पुरुषांपेक्षां अधिक कामसू आहेत याची सत्यता येथेंहि पटली. बहुतेक सर्व स्त्रिया आपापलें विणकाम बरोबर घेऊन आल्या होत्या व त्यांचे हात कामांत गुंतलेले होते.

किनाऱ्यावरून आम्ही घरीं परत आलों. वसतिगृहांतील निम्या नोकरांना आज रजा होती. येथें राहणारे गोरे लोक सहलीसाठीं निघून गेले होते. त्यामुळें आमचे चिनी मित्र व आम्ही एवढीच मंडळी सकाळच्या जेवणाला हजर होतों. जेवण व्यवस्थित झालें; परंतु संध्याकाळचें जेवण मात्र थंडया फराळावरच भागवावें लागलें. एकहि पदार्थ गरम नव्हता. डब्यामधून बंद असलेले आयते पदार्थ यजमानीणबाईनें आणले होते. तेच आम्हांला वाढण्यांत आले. आमच्या चिनी मित्रांना येथील जीवनाची चांगली कल्पना असल्यामुळें ते या जेवणाला उपस्थित राहिले नाहींत. जेवणाचा थाट पाहून पुढल्या रविवारीं आपण कुठें तरी बाहेर गेलें पाहिजे, असा आम्हीं निर्णय घेतला.

२१ जानेवारी ५२

आज सोमवार. सर्व लोक ताज्या दमानें आपआपल्या कामावर रुजू झाले आहेत. शहर उत्साहानें फुलून गेलेलें आहे. आमचा कार्यक्रम आज व्यवस्थित सुरू होणार असल्यामुळें आम्ही व्याख्यानासाठीं वेळेवर जाऊन हजर राहण्याच्या धडपडींत आहोंत. आज मिस् मार्गारेट केली नांवाच्या बाईचें येथील कल्याणकारी योजनेबाबत व्याख्यान झालें. या देशांत या योजनांचें सर्वस्पर्शी असें एक सुंदर जाळें विणण्यांत आलें आहे. या योजनांबाबत खूपच माहिती येथील वास्तव्यांत आम्हांस मिळणार आहे. हें कार्य करणाऱ्या बऱ्याच संस्था आम्ही पाहणार आहोंत.

२२ जानेवारी ५२

आज मिस्टर रायल नांवाच्या गृहस्थाचें व्याख्यान झालें. त्यांनीं येथील कल्याणकारी योजनांबद्दल बोलताना सांगितलें कीं, “जरी आमच्या देशांतील लोकांना या योजनांचा भरपूर फायदा मिळत असला, तरी आमच्यापुढें असलेल्या कांहीं अडचणींमुळें जें कांहीं करायला हवें तें आम्ही पूर्णपणें करूं शकत नाहीं. आमच्या जवळ अशा संस्था चालविण्यासाठीं लागणारीं माणसें पुरेशा प्रमाणांत नाहींत, ही आमची पहिली अडचण आहे. दुसरी अडचण जागेची. या संस्थांसाठीं घरें बांधण्याला जेवढी जागा पाहिजे, तेवढी आज उपलब्ध नाहीं, आणि तिसरी अडचण म्हणजे जनतेच्या आरोग्यासाठीं व सुखसोयींसाठीं लागणारीं आधुनिक उपकरणें पुरेशा प्रमाणांत खरीद्ण्याकरितां जरूर असणारे अमेरिकन् डॉलर्स भरपूर प्रमाणांत आज आमच्याजवळ नाहींत. तथापि येथील कल्याणकारी योजनांमुळें जनतेला सुख, शांति व समाधान बऱ्याचशा प्रमाणांत मिळालें आहे.”

२३ जानेवारी ५२

आजच्या व्याख्यानांत येथील सामाजिक परिस्थितीबाबत भरपूर माहिती मिळाली. १९४७ च्या शिरगणतीप्रमाणें ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या जवळजवळ ८० लाख आहे. देशाचा विस्तार जर पाहिला, तर यापेक्षां कितीं तरी अधिक लोक या देशांत नीटपणें राहूं शकतील. आपल्या देशांतील लोकसंख्या वाढावी, अशी ऑस्ट्रेलियन सरकारची व लोकांची इच्छा आहे. त्यामुळें परदेशांतील गोऱ्या लोकांनीं येथें यावें व वसति करून राहावें, म्हणून सर्व प्रकारची मदत त्यांना देण्यांत येते. दुसऱ्या महायुद्धानंतर परदेशांतील किती तरी गोरे लोक येथें येऊन कायमचें वास्तव्य करून राहिले आहेत.

ऑस्ट्रेलियाला आज मनुष्यबळाची फार मोठ्या प्रमाणांत गरज आहे. पुरेशा प्रमाणांत माणसें मिळालीं, तर उत्पादनाच्या क्षेत्रांत ऑस्ट्रेलिया फार झपाट्यानें प्रगति करूं शकेल. मनुष्यबळाची इतकी तीव्र गरज भासत असतांनासुद्धां ऑस्ट्रेलियानें गौरेतर लोकांना आपल्या देशांत येऊन कायमचें वास्तव्य करून राहण्याला बंदी घातली आहे. येथें वास्तव्य करून राहिलेले चिनी व हिंदी लोक जरी आज आढळत असले, तरी नव्या लोकांना मात्र अशा रीतीनें येथें कायमचें वास्तव्य करतां येणार नाहीं. गौरेतर लोक ठराविक काळापुरते येथें येऊं शकतील. परंतु त्यांना येथें कायमची वस्ती करतां येणार नाहीं. या ऑस्ट्रेलियाच्या धोरणाला ( White Australian Policy ) ' व्हाइट ऑस्ट्रेलिअन पॉलिसी ' असें म्हणतात.

या धोरणाचा अधिक खुलासा आम्हीं मागितला असतांना, असें सांगण्यांत आलें कीं, येथील साखर कारखाने पूर्वी परदेशांतून मजूर आणवीत असत. हे सर्व मजूर गौरेतर असत. ते ज्या देशांतून येत त्या देशांतील लोकांचें राहणीचें मान कमी खर्चाचें असे. त्यामुळें कमींत कमी मजुरींत ते काम करूं शकत. ऑस्ट्रेलियांतील गोऱ्या मजुरांचें राहणीचें मान खर्चाचें असल्यामुळें त्यांना मजुरीचा दर अधिक हवा असे. गौरेतर लोकांच्या बरोबर मजुरीच्या बाबतींत चढाओढ करणें स्थानिक मजुरांना अशक्य झालें व त्यांनीं आपल्या संघटनांमार्फत सरकारवर दडपण आणून गौरेतर मजूर गिरण्या–कारखान्यांतून नेमण्यास बंदी आणविली.

दुसरीहि एक महत्त्वाची गोष्ट या बाबतींत लक्षांत घेण्यासारखी आहे. ऑस्ट्रेलियन सरकारनें येथील जनतेसाठीं कल्याणकारी योजना फार मोठ्या प्रमाणावर आंखलेल्या आहेत. या देशांत मनुष्य जन्माला येण्याच्या आधींपासून तो मरेपर्यंत त्याला कल्याणकारी योजनांमार्फत मदत मिळूं शकते, असें येथील लोक अभिमानानें सांगतात. या योजनांचें इंग्रजींत वर्णन करतांना ऑस्ट्रेलियामध्यें ' Womb to Tomb ' सोशल सर्व्हिस ( कल्याणकारी योजना ) आहेत, असें सांगण्यात येतें. लोकसंख्या मर्यादित असली तरच याचा फायदा जनतेला मिळूं शकेल. गौरेतर लोक ज्या देशांत राहतात तेथें त्यांची सांपत्तिक परिस्थिति खूपच खालावलेली असल्यामुळें व ऑस्ट्रेलियांत लोकांना फार मोठ्या सवलती मिळत असल्यामुळें, जर या लोकांच्या येण्यावर बंदी घातली नाहीं, तर गौरेतरांचे तांडेच्या तांडे येथें येऊं लागतील व मग या सर्वांना कल्याणकारी योजनांचा फायदा देणें

अशक्य होईल. म्हणूनच गौरेतर लोकांवर बंदी घालण्यांत आलेली आहे. या धोरणाचें समर्थन करतांना ते म्हणाले, "जरी गौरेतर लोकांना येथें कायमचें वास्तव्य करतां येत नसलें, तरी एक गोष्ट आम्ही स्पष्ट करू इच्छितों. आमच्या देशांतील सर्वसाधारण नागरिकाला सर्व लोकांना समानतेनें वागविण्याची चांगली संवय लागलेली आहे. वर्णद्वेष येथें औषधालासुद्धां सांपडणार नाहीं. कोणत्याहि जमातीबद्दल आमच्या मनामध्यें जरासुद्धां द्वेष किंवा तिटकारा नाहीं."

आज आम्हीं एका कार्यालयाला भेट दिली. या कार्यालयामार्फत जनतेला मदत पोहोंचविण्याचें काम चालतें. कार्यालयांत पुरुषांप्रमाणेंच स्त्रियाहि काम करतांना दिसल्या. जो तो आपापल्या कामांत गढून गेला होता. येथील कार्यालयांतून शिपाई तुम्हांला आढळणार नाहींत. पांच-सहा कारकुनांमधून एक तरी टेलिफोन ठेवलेला दिसतो. टेलिफोनमुळें शिपायांची गरज कमी भासते. येथील अधिकारी आपले कागद स्वतःच कारकुनांकडे घेऊन जातात व कारकूनसुद्धां स्वतःच कागदांची ने-आण करतात. अधिकारी व कारकून एकमेकांशीं खेळीमेळीनें वागतात. आपणांकडे प्रत्यहीं ऐकूं येणारा 'सर' 'सर' शब्द येथें वापरला जात नाहीं. प्रत्येकजण दुसऱ्याला 'मिस्टर' म्हणूनच संबोधितो. मग तो अधिकारी असो अथवा हाताखालचा नोकर असो.

आज मेलबोर्नमधील हवेमध्यें खूपच फरक पडलेला आहे. मेलबोर्नमधील हवा म्हणजे एखादी लहरी म्हातारी बाई. म्हातारीची लहर केव्हां व कशी बदलेल हें जसें सांगतां येत नाहीं त्याचप्रमाणें मेलबोर्नमधील हवा केव्हां व कशी बदलेल हें सांगतां येत नाहीं. येथील स्त्रिया सकाळीं कामावर जाण्यापूर्वी हवामान खात्याच्या सरकारी अधिकाऱ्याकडे टेलिफोनवरून चौकशी करतात व त्यांच्या सांगण्याप्रमाणें गरम अथवा सुती कपडे घालतात. हवामान खात्याचा अंदाज चुकीचा ठरल्यावर बायका खूप चिडतात. कांहीं स्त्रिया आपल्या कपड्यांचें एक गाठोडें आपल्या कामाच्या जागींच ठेवून देतात; कारण कपड्यामध्यें केव्हां बदल करावा लागेल, याचा नेम नसतो. नित्य संभाषणांत हवेचा उल्लेख कधींहि टाळला जात नाहीं.

आज येथील हवेंत खूपच बदल झाला आहे. उष्णतामान १०९ अंशांवर गेलें आहे. येतांना फक्त गरमच कपडे आणल्यामुळें ही उष्णता मला असह्य झाली आहे. गेल्या तेरा वर्षांत आजच्याइतकें उष्णतामान कधींच वाढलें नव्हतें, असें भोंवतालचे लोक आम्हांला सांगत आहेत. येथें आल्यापासून गरम कपड्यांवर भागणार नाहीं,

हें लक्षांत आल्यामुळें एक नवा सूट मीं खरेदी केला आहे. परंतु थोडाफार बदल करण्यासाठीं मीं तो शिंप्याकडे टाकला आहे. गेलीं कित्येक वर्षे मी संपूर्ण खादीधारी असल्यामुळें हा सूट विकत घेतांना मनाशीं खूप झगडा करावा लागला. शेवटीं नाइलाज म्हणून २१ गिनी देऊन एक सूट मीं विकत घेतला. आम्ही ज्या गेस्ट-हाऊसमध्यें राहतों, त्याचे मालक मि. लॅंपरिल फार उत्तम स्वयंपाक करतात, अशी त्यांची स्तुति त्यांची पत्नी मिसेस् लॅंपरिल आमच्याजवळ करते. ती स्वतः स्वयंपाकघरांत जात नाहीं. माल विकत घेणें, उतारूंचीं बिलें वगैरे तयार करून देणें, सर्व हिशेब लिहिणें इत्यादि कामें ती करते. आमच्यासाठीं तिनें आज चांगले तांदूळ आणले होते. ‘ मद्रास करी पावडर ’ या नांवाचा कालवणांत घालावयाचा मसाला तिनें मिळविला होता व भारतीय पद्धतीचें जेवण आम्हांला देण्याची तिची धडपड चालली होती. भारतीय पद्धतीचें जेवण असूनसुद्धां ते रात्रीं साडेअकरांला पदरांत पडल्यामुळें जेवणांत तितकीशी गोडी वाटली नाहीं. तथापि बाईंचे भरपूर आभार मानून आम्ही आपापल्या खोल्यांकडे गेलों.

२४ जानेवारी ५२

आज सकाळपासून भरपूर उकडत होतें. पाऊस पडेल असें वाटत होतें. परंतु पाऊस अद्यापि आला नव्हता. रुगाईत लोकांवर योग्य ते उपचार करून त्यांना कार्यक्षम करण्याकरितां कांहीं संस्था येथें उघडलेल्या आहेत. त्यांना पुनर्वसाहतकेंद्र ( Rehabilitation centre ) असें म्हणतात. असें एक केंद्र पाहण्याकरितां आज आम्ही बाहेर पडलों आहोंत. या केंद्रावर आमच्या स्वागतासाठीं या खात्याचे सहा-सात अधिकारी उपस्थित आहेत. त्यांच्याबरोबर हिंडून आम्ही संस्थेंतील एक एक विभाग पाहात आहोंत. ऑस्ट्रेलियांतील तरुण मंडळींना मोटरसायकलीवरून हिंडण्याचा खूप छंद आहे. सडका उत्तम असल्यामुळें जास्तींत जास्त वेगानें मोटरसायकली चालविण्याची त्यांची धडपड असते. साहजिकच येथें मोटरसायकलीच्या अपघातांचें प्रमाण फार मोठें आहे.

एकदां आम्ही रस्त्यानें जात असतांना तीनचार मोटरसायकलवाले समोरून येत होते. माझ्या बरोबरीचा ऑस्ट्रेलियन् मला म्हणाला, “ बाजूला व्हा. ते पाहा हंगामी ऑस्ट्रेलियन समोरून येत आहेत. ” “ तुम्ही त्यांना Temporary Australians कां म्हणतां ? ” असें मीं विचारतांच तो गृहस्थ म्हणाला, “हे लोक इतक्या वेगानें मोटरसायकली चालवतात कीं त्यांना मृत्यु केव्हांहि येणें शक्य आहे.

ते जर जिवंत घरीं परत आले तरच नवल!" मोटरसायकलींच्या अपघातांत सांपडलेले व त्यामुळें हातपाय जायबंदी झालेले चांगले चांगले तरुण येथें आम्हांला भेटले. त्याचप्रमाणें पोलीओमुळें अपंग झालेले कांहीं लोक आढळले. येथील रुग्णाइतांवर वेगवेगळे औषधोपचार केले जातातच, परंतु त्याबरोबर त्यांचे स्नायू कार्यक्षम करण्याकरितां कांहीं व्यायाम पण त्यांच्याकडून करवून घेतले जातात. अशा आजारानें व्यथित झालेल्या लोकांचें जीवन एरवीं भकास व दुःखपूर्ण झालें असतें, परंतु एखादा व्यवसाय शिकवून त्यांना स्वाभिमानाचें जिणें जगतां यावें, अशी पात्रता त्यांच्यामध्यें निर्माण करून त्यांचें जीवन आनंदमय करण्याचें महान् कार्य अशा संस्थांनीं चालविलेलें आहे. येथें काम करणाऱ्या सर्व लोकांचे चेहरे खूप आनंदी दिसले. येथील सरकारतर्फे जनतेसाठीं खूपच चांगलें काम केलें जातें, याची जाणीव झाली. संस्थेंतील व्यवस्थापकांनीं आम्हांला चहा व अल्पोपाहार दिला.

आतां पावसाची झिमझिम आल्यामुळें हवेंत थोडासा चांगला बदल होऊं लागला होता. ही संस्था पाहून झाल्यावर आम्ही आमच्या निवासस्थानीं जाण्यासाठीं मोटरींत जाऊन बसलों. या ठिकाणीं आम्ही आल्यापासून ज्या ज्या वेळीं आम्हांला बाहेर जावें लागे, त्या त्या वेळीं मध्यवर्ती सरकारतर्फे आमची ने-आण करण्यासाठीं वाहनाची व्यवस्था करण्यांत आली होती. दोन उत्तम गाड्या आमच्या प्रवासासाठीं नेहमीं मिळत होत्या व म्हणूनच थोड्या वेळांत खूप हिंडण्याची व पाहण्याची सोय होऊं शकली.

२५ जानेवारी ५२

दोन दिवस कडक उन्हाच्या तावडींत सांपडलों होतों. आज चांगलाच पाऊस पडला. कार्यालयांत जातांना भिजून अगदीं चिंब झालों. पाऊस पडल्यामुळें मनाला प्रसन्नता वाटली. आज संध्याकाळीं येथील एका मोठ्या स्टोअर्समध्यें आम्ही गेलों. या ठिकाणीं कोणतीहि वस्तु विकत मिळूं शकते. इंग्रजींत वर्णन करायचें तर Pin to Piano (टांचणीपासून तों पियानोपर्यंत) सर्व वस्तू येथें मिळूं शकतात. या स्टोअर्समध्यें सात हजार लोक कामावर आहेत. ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें या दुकानाचा नंबर तिसरा लागतो. या दुकानाचें वैशिष्ट्य म्हणजे येथें काम करणाऱ्या नोकरांच्या बारीकसारीक सुखसोयींकडे दुकानाचे मालक लक्ष पुरवितात. या सात हजार नोकरांसाठीं परिचारिका, डॉक्टर व दंतवैद्य ठेविलेले आहेत. नोकरांना शिक्षण देण्याची व्यवस्था फार चांगल्या रीतीनें आंखलेली आहे. प्रौढ-

शिक्षणाचे वर्ग चालू आहेत. ऑस्ट्रेलियांतील प्रत्येक मुलाला सात वर्षांचें शिक्षण सक्तीचें व मोफत मिळत असल्यामुळें या ठिकाणीं प्रौढशिक्षणाचा अर्थ फारच व्यापक केला जातो. आपल्या देशांत निरक्षरता फार असल्यामुळें प्रौढशिक्षणाच्या वर्गांतून मुख्यतः साक्षरताप्रसारावरच भर दिला जातो. ऑस्ट्रेलियांत साक्षरतेचें प्रमाण शेंकडा ९८ आहे. येथील लोक नुसतेच साक्षर नाहींत, तर त्यांना सात वर्षांचें शिक्षण मिळालेलें असतें; म्हणून प्रौढशिक्षणाच्या वर्गांतून लोकांना आवडतील असे विषय शिकविले जातात.

आम्ही आतां पाहिलेल्या या स्टोअर्समधील प्रौढशिक्षणाच्या वर्गांतून कांहीं लोक गाणीं शिकत होते; कांहीं वाद्यें वाजवायला शिकत होते; तर कांहीं विविध विषयांवर व्याख्यानें ऐकण्यासाठीं जमलेले होते. येथें काम करणाऱ्या साऱ्या कामगारांना व्यापारविषयक शिक्षण देण्याची तरतूद केली आहे. कांहीं महत्त्वाकांक्षी तरुण विश्वविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठीं धडपडत असतात. त्यांच्या पुढील शिक्षणाची सोय पण येथें केली जाते. एकंदरींत मजुरांच्या उन्नतीसाठीं जेवढें करतां येणें शक्य आहे, तेवढें करण्याची येथील चालकांची धडपड चाललेली दिसली.

हें दुकान पाहून आम्ही निवासस्थानीं परत आलों, तों भोजनाची वेळ झाली. भोजनोत्तर मी व रॉय् फिरायला निघालों. आम्ही एका फळाच्या दुकानांत शिरलों. येथें फळें फार चांगलीं मिळतात. विशेषतः द्राक्षें, सफरचंदें हीं फळें फारच अप्रतिम असतात. फळें खाण्याची मला मुळींच आवड नाहीं. आजारी माणसानें फळें खावींत असें सुभाषित माझी पत्नी फळें देऊं लागली कीं, मी तिला ऐकवितों; परंतु येथील सफरचंदें व द्राक्षें मलासुद्धां मोह पाडूं शकलीं. या फळवाल्यानें आम्हांला विचारलें, "तुम्ही हिंदी का ? येथें चाललेली क्रिकेटची मॅच खेळण्याकरितां तुम्ही आलांत ना ? मीं तुम्हांला ताबडतोब ओळखलें."

या वेळीं मेलबोर्न येथें वेस्ट इंडिज विरुद्ध ऑस्ट्रेलिया असा क्रिकेटचा सामना चालू होता. या सद्‌गृहस्थाला भारतीय व वेस्ट् इंडिज यांमधील फरक कळला नाहीं. आम्ही त्याला भारतांतून आलों आहोंत, असें समजावून सांगितल्यावर तो म्हणाला, "आतां मीं तुम्हालां नीट ओळखलें. तुम्ही गांधींच्या देशांतून आलेले आहांत. गांधींचा खून त्यांच्याच लोकांनीं केला !" आमच्या देशाबद्दल त्याला एवढीच माहिती होती, असें दिसून आलें. आजच्या दिवसांतील विशेष उल्लेखनीय गोष्ट

म्हणजे येथील एज् नांवाच्या वर्तमानपत्रांत आमचीं—चौघा भारतीयांचीं—छायाचित्रें आलीं आहेत.

२६ जानेवारी ५२

आज जानेवारीची २६ तारीख. भारताचा प्रजासत्ताक दिन. शनिवार असल्यामुळें आज सर्वांना सुट्टी आहे. सकाळची न्याहारी आटोपल्यावर रॉय व मी फिरायला निघालों. आम्ही एका तळ्याजवळ जाऊन पोहोंचलों. येथें होड्यांतून फिरण्याकरितां खूप लोक आले होते. भोवतालचें सृष्टिसौंदर्य व लोकांचा नौकाविहार थोडा वेळ पाहिल्यावर आम्ही परत आलों.


परदेशांत अशा सुट्टयांचा उपयोग आपलीं कांहीं कामें उरकण्याकरितां करावा लागतो. धुलाई फार महाग पडत असल्यामुळें आपले सुती कपडे आपणच धुवावे लागतात. मेलबोर्नमधील एका रेल्वेस्टेशनवर जाऊन आम्हीं थोडा वेळ घालविला. स्टेशनवर हमाल मुळींच नसल्यामुळें उतारूंची—विशेषतः बायांची—फारच त्रेधा उडते. ऑस्ट्रेलियांत घरगुती नोकर ठेवणें कोणालाहि परवडत नाहीं. नोकराच्या अभावीं स्त्रियांचे फार हाल होतात. कामावर जाणारी बाई आपल्या लहान मुलाला बरोबर घेऊन जाते व काम करण्याच्या जागीं अथवा इतरत्र एखाद्या शिशुगृहांत तें मूल नेऊन ठेविते, व येतांना त्याला बरोबर आणते. नोकरीवर न जाणाऱ्या बाया दुपारीं खरेदीसाठीं जेव्हां बाहेर पडतात तेव्हां बाबागाडींतून मुलांना घेऊन निघतात. येथील ट्राममधून बाबागाड्याहि घेतल्या जातात. पुष्कळदां ट्राममधून पुरुषांच्याऐवजीं स्त्रियाच कंडक्टरचें काम करतात.

२७ जानेवारी ५२

आज रविवार. अर्थात् सर्व व्यवहार बंद. येथील रविवार एरवीं कंटाळवाणा गेला असता. परंतु आमच्याकरितां आज एक सहलीचा कार्यक्रम आंखण्यांत आला होता. दुपारचें जेवण झाल्यावर दोन सरकारी गाड्या आमच्या वसतिगृहाजवळ येऊन उभ्या राहिल्या. या गाड्यांमध्यें सोशल सर्व्हिस खात्याचे दोनतीन अधिकारी होते. त्यांच्या बरोबर आम्ही कांहीं रम्य स्थळें पाहायला निघालों. हिल्सव्हील नांवाच्या ठिकाणीं आपल्या राणीच्या बागेसारखी एक बाग आहे. ती पाहायला आम्ही गेलों. त्या ठिकाणीं ऑस्ट्रेलियांतील वेगवेगळे प्राणी आम्हीं पाहिले. ऑस्ट्रेलियांतील सुप्रसिद्ध कांगारू आपल्या पिल्लांना घेऊन उड्या मारतांना दिसले. या कांगारूंची शेपटी खूपच मज़बूत असते. या शेपटीचा उपयोग ते पायाप्रमाणें करतात. दुसरा



प्राणी आम्हीं पाहिला. तो म्हणजे ‘ कोला बेअर.’ हा प्राणी फार लवकर माणसाळतो. त्याच्यापासून कोणालाहि उपद्रव होत नाहीं. नांवानें जरी तो अस्वल असला तरी तो झाडावरच असतो. युकॅलिप्टस् ( निलगिरी ) च्या झाडावर तो राहतो व त्या झाडाचीं पानें खाऊन तो आपली उपजीविका करतो. हीं पानें जर मिळालीं नाहींत, तर तो जगूं शकत नाहीं. येथें युकॅलिप्टसचीं फार मोठमोठीं झाडें पाहायला मिळालीं. हीं झाडें फार उंच वाढतात.



दुसरा एक विचित्र प्राणी आम्हीं येथें पाहिला. त्याचें नांव '.डिंगो '. हा साधारण कुत्र्यासारखा असतो. हा मनुष्यावर सहसा झडप घालीत नाहीं; परंतु मेंढ्यांचा मात्र तो कर्दनकाळ आहे. येथील आदिवासी लोक या डिंगोंना माणसाळवून शिकार करण्याकरितां त्यांचा उपयोग करून घेतात.

वॉलबी नांवाचा दुसरा एक नवा प्राणी आम्हीं पाहिला. लोक वॉलबींना पाळतात. हा प्राणी जंगलांतून व झुडुपांतून राहात असल्यामुळें सहसा तो शिकारी



कॉको बूरा—

लोकांच्या तावडींत सांपडत नाहीं. आणखी एक 'कॉको बूरा' या नांवाचा पक्षी आम्हीं पाहिला. हा एक विशेष प्रकारचा स्थानिक पक्षी आहे. असे भिन्नभिन्न प्राणी व पक्षी आम्हीं येथें पाहिले. येथून परत येत असतांना वाटेंत एके ठिकाणीं एका उपाहारगृहाजवळ आम्ही थांबलों. आपली तहान भागविण्यासाठीं ज्यांना ज्या पेयांची आवश्यकता होती, त्यांनीं तीं पेयें घेतलीं. माझी तहान साध्या लेमोनेडवर भागली.

या ठिकाणीं जॉन नांवाचा एक धीट व चुणचुणीत मुलगा आमच्याकडे सारखा टक लावून पाहात होता. आमच्याशीं ओळख करून घेण्याची त्याची धडपड चाललेली दिसली. लहान मुलें मला खूप आवडत असल्यामुळें मीं खूण करून त्याला बोलावून घेतलें. तो जवळ येऊन बसला व मोकळेपणानें गप्पा मारूं लागला. शेजारच्या मेजावर बसलेल्या त्याच्या आईवडिलांनासुद्धां आमची ओळख करून घेण्याची इच्छा दिसली. मुलाच्या निमित्तानें ते आमच्याजवळ आले व त्या मुलाला म्हणाले, " हे नवे पाहुणे तुला आवडले का? तूं त्यांच्या घरीं जातोस का? " त्यावर तो चटकन ' हो ' म्हणाला. त्याचे वडील म्हणाले, " अरे, तुझ्या

अवक्रम २२९७८ दि: क्रमांक २२८ नों. दि.

आईला तर विचार. ती जर परवानगी देत असेल, तर तूं खुशाल जा." त्यानें आपल्या आईच्या गळ्याभोंवतीं हात टाकून, "आई, मला जाऊं दे ना त्यांच्या-बरोबर?" असें म्हणून आईची परवानगी मागितली. ती बाई पण खेळकर वृत्तीची दिसली. ती या गंमतींत मोकळेपणानें सामील झाली. अशा प्रकारें या निष्पाप मुलाच्या गोड सहवासांत कांहीं वेळ घालविल्यावर आम्ही स्वस्थानीं जाण्यासाठीं मोटारींतून निघालों.

मेलबोर्नच्या वाटेवर 'बॉक्सहिल' म्हणून एक उपनगर आहे. या उपनगरांतील नगरपालिकेनें आपल्या हद्दींत संपूर्ण दारूबंदी केली आहे. या उपनगराच्या सभों-वतालच्या सर्व गांवांत दारू मुबलक प्रमाणांत मिळूं शकते. त्यामुळें पिणारे लोक शहराबाहेर जाऊन पिऊं शकतात. परंतु या नगरपालिकेच्या हद्दींत मात्र दारू विकण्याला मज्जाव आहे. आज जवळ जवळ दीडशें मैलांचा मोटारीनें प्रवास केला. कांहीं चांगलीं स्थळें पाहिलीं. एकूण वेळ खूप चांगला गेला!

२८ जानेवारी ५२

ऑस्ट्रेलियाचा आज राष्ट्रीय दिन. तथापि तो अगदीं शांतपणें पाळला जात होता. सभा नाहींत, मिरवणुकी नाहींत, जाहीर कार्यक्रमहि नाहींत. सर्वांना सुट्टी मात्र होती. जो तो आपआपल्या परीनें सुट्टी घालवीत होता. आज आम्हीं मेल-बोर्नमधील सुप्रसिद्ध अशा बागेला (Botanical Garden) भेट दिली. ही बाग खूप मोठी आहे. येथें सर्व प्रकारच्या वनस्पति आढळतात. प्रत्येक झाडावर त्या झाडाची माहिती दर्शविणारे छोटे फलक लावलेले आहेत. आज सुट्टी असल्यामुळें अनेक स्त्रीपुरुष व मुलें बागेंत येऊन आपला काळ सुखानें घालवीत होतीं. बागेंतून आम्ही बाहेर पडलों. नंतर रस्त्यांतून हिंडतांना विशेष असें कांहीं आढळून आलें नाहीं. सुट्टी असल्यामुळें लोक नुसतेच हिंडत होते व दुकानांच्या तावदानांतून



मांडलेला माल पाहात आपला वेळ घालवीत होते. आज स्वातंत्र्यदिन असल्यामुळें

कुठली तरी एखादी जाहीर सभा असेल व या निमित्तानें एखादें भाषण ऐकायला मिळेल, म्हणून तपास केला. पण त्या बाबतींत निराशाच पदरीं पडली !

२९ जानेवारी ५२

आज ऑस्ट्रेलियांतील नांवाजलेल्या एका वृत्तपत्राच्या संपादकाचें व्याख्यान ऐकण्याची संधि मिळाली. याचें नांव 'पीटर रूसो.' आंतरराष्ट्रीय राजकारणाचा एक बडा व्यासंगी म्हणून याची येथें प्रसिद्धि आहे. याचें व्याख्यान अत्यंत विद्वत्ता-प्रचुर झालें. या गृहस्थानें भारताला भेट दिलेली आहे. पंडित नेहरूप्रभृती पुढाऱ्यांशीं त्यानें राजकीय चर्चा केलेली आहे. त्यानें आपल्या व्याख्यानांतून आशियांतील राजकारणाबाबतचा ऑस्ट्रेलियाचा दृष्टिकोन विशद करून सांगितला. तो म्हणाला, "आशियांतील लोक ऑस्ट्रेलियाकडे संशयित नजरेनें पाहतात, याची आम्हांला जाणीव आहे. आशियांतील मागासलेल्या देशांना जरूर ती मदत देण्याची आमची तळमळ आहे. यामुळेंच आम्हीं कोलंबो योजनेमध्यें भाग घेतलेला आहे. आमच्या देशांतील लोकांना, विशेषतः आमच्या मुलांना, आशियाबद्दलची खरीखुरी माहिती देणें अत्यंत अवश्य आहे. त्यासाठीं या देशांतील मुलांना दिलीं जाणारीं क्रमिक पुस्तकें बदललीं गेलीं पाहिजेत. ऑस्ट्रेलियांतील लोकांनीं आशियांतील लोकांशीं संघटन वाढविलें पाहिजे. कम्युनिझमच्या वाढत्या धोक्याला जर व्यवस्थित तोंड द्यावयाचें असेल, तर आशियांतील मागासलेल्या देशांतील दुःख व दारिद्र्य यांच्याशीं निकरानें लढा द्यावा लागेल. हा लढा या देशांना नीटपणें देतां यावा, म्हणून या मागासलेल्या देशांना सर्व प्रकारची मदत द्यायला ऑस्ट्रेलिया तयार राहील. या देशांतील लोकांची जर भरभराट झाली व त्यांची क्रयशक्ति वाढली, तर त्याचा परिणाम ऑस्ट्रेलियांतील उद्योगधंद्यांवर फार चांगला होईल. त्यामुळें आमचे उद्योगधंदे चांगलेच भरभराटीला येतील !"

मि. रूसो यांनीं आपल्या व्याख्यानांत पंडित नेहरूंबद्दल फारच चांगले उद्गार काढले. भारत व पाकिस्तान या दोन देशांतील तेढ कमी होणें फार कठीण आहे, असेंहि ते म्हणाले. आजचें हें व्याख्यान आमच्या कार्यक्रमांतील शेवटचें व्याख्यान. उद्यांपासून एक निराळाच कार्यक्रम आमच्यासाठीं आंखण्यांत आला आहे. त्या कार्यक्रमाबाबत मिसेस् हॉर्न नांवाच्या बाईबरोबर सुमारें तासभर चर्चा केली.

३० जानेवारी ५२

आज महात्माजींचें वर्षश्राद्ध ! येथील भारतीय विद्यार्थी एखादा कार्यक्रम या

दिवसानिमित्त आंखतील व त्या कार्यक्रमाला आपल्याला हजर राहावें लागेल, असें वाटलें होतें. आमचे नवे मित्र मिस्टर रामचंद्रन् यांच्याकडे आम्हीं त्याबाबत तपास केला. परंतु येथील विद्यार्थ्यांनीं या दिवसाची दखल घेतलेली दिसली नाहीं.

आज ऑस्ट्रेलियाबद्दल कांहीं फिलम्स् पाहिल्या. त्यांपैकीं एका फिल्ममध्यें येथील आदिवासींबद्दल माहिती सांगितलेली होती. या देशांतील आदिवासीं-संबधीं जास्तींत जास्त माहिती मिळविण्याचा मी प्रयत्न करीत आहे व या बाब-तींत मला जरूर ती मदत देण्याचें आश्वासन येथील चालकांनीं दिलें आहे. आज येथील कार्यालयाच्या मुख्य मिस् टेलर यांनीं आम्हांस भोजनाचें आमंत्रण दिलें. आपल्या हाताखालीं काम करणाऱ्या इतर बायांना पण त्यांनीं बोलाविलें होतें. त्यांची आमच्याशीं ओळख करून दिल्यावर त्या आम्हांला म्हणाल्या, " तुम्ही आपल्या देशामध्यें जें काम करीत आहांत त्याचा आम्हांला थोडक्यांत परिचय करून द्या." या बाईच्या विनंतीवरून आम्हीं त्यांना आमच्या येथील कार्याबद्दल थोडक्यांत माहिती दिली. या देशांत अशी एक प्रथा आहे कीं, कांहीं महत्त्वाचें बोलणें एखाद्या व्यक्तीशीं करावयाचें असल्यास अथवा त्या व्यक्तीशीं अधिक परिचय हव असल्यास तिला चहाचें अथवा भोजनाचें आमंत्रण देण्यांत येतें. मिस् टेलरनें आज घडवून आणलेला कार्यक्रम याच स्वरूपाचा होता.

३१ जानेवारी ५२

व्याख्यानाऐवजीं संस्था पाहण्याचा कार्यक्रम आजपासून सुरू झाला. 'मेरी पोर्ट' नांवाच्या गांवीं पुनर्वसाहत खात्यातर्फे एक आरोग्य केंद्र चालविलें आहे. या केंद्रांत साठपासष्ट रोगी आहेत. त्यांचें पुढील आयुष्य त्यांना सुखानें व्यतीत करतां यावें म्हणून सर्व प्रकारचे उपचार त्यांच्यावर केले जात आहेत. अपंग अवस्थेंतसुद्धां कांहीं ना कांहीं उत्पादनाचें कार्य करतां यावें, म्हणून त्यांना पेलेल असें शिक्षण येथें दिलें जातें. हें केंद्र मेलबोर्नपासून चाळीसपन्नास मैल अंतरा-वर आहे. येथील कॉमनवेल्थ सरकारनें या सहलीची योजना आंखली होती. या ठिकाणचे रोगी खूप आनंदांत होते. येथील डॉक्टरांनीं व परिचारिकांनीं त्यांच्यावर कोणत्या प्रकारचे उपचार केले जातात व त्यांना कसलें शिक्षण दिलें जातें, याची आम्हांला नीट कल्पना दिली.

भारत सोडल्यापासून आपल्या देशांतील कांहींच हकीकत समजली नव्हती. घरची बातमी पण न समजल्यामुळें मनाला सारखी हुरहूर वाटत होती. सहलीहून

परत आल्यावर घरचें पत्र हातीं पडलें. अधाशाप्रमाणें त्या पत्रावर मीं झडप घातली. पत्र वाचल्यावर घरीं सर्व ठीक आहे, असें समजलें व मनाला चांगलें समाधान वाटलें!

१ फेब्रुवारी ५२

रात्रीपासून पावसानें सारखी पिरपिर चालविलेली आहे. थंडी पण चांगलीच पडली आहे. मेलबोर्नमधील लोक सारखे हवेबद्दल कां बोलत असतात, हें आतां आम्हांला समजूं लागलेलें आहे. काय करतील बिचारे! हवा सारखी बदलत राहते व त्याचे परिणाम लोकांना सहन करावे लागतात. आज मिसेस् हॉर्न् आम्हां चौघांना घेऊन येथील ग्रंथालय दाखवायला निघाली. मेलबोर्नमधील हें ग्रंथालय व त्यांतील वाचनालय खूपच मोठें आहे. येथील ग्रंथपालानें आमच्याबरोबर प्रत्येक खात्यामध्यें हिंडून आम्हांला सर्व माहिती सांगितली. दहाच्या सुमारास चहा व अल्पोपाहार त्यानें दिला. ऑस्ट्रेलियामध्यें सर्व कचेऱ्यांत पावणेनऊच्या सुमारास बसल्या जागींच चहा घेतात. चहाच्याबरोबर एक तरी बिस्कीट घेण्याची प्रथा आहे.

दुपारचें जेवण आम्हीं बाहेर घेतलें. रोजच हें जेवण आम्ही बाहेरच घेत असूं. येथील बहुतेक सर्व लोक दुपारचें जेवण बाहेर घेतात. या वेळीं हॉटेलांमधून अतिशय गर्दी असते. प्रत्येक हॉटेलसमोर मोठी रांग लागलेली असते. या उपाहारगृहांतून मुख्यतः स्त्रियाच काम करतात. या इतक्या झपाट्यानें काम करीत असतात कीं, त्यांचा तो वेग व तत्परता पाहून सकौतुक आश्चर्य वाटतें. पुष्कळ उपाहारगृहांतून गिऱ्हाइकांना समोर ठेवलेले पदार्थ आपल्याच हातानें घ्यावे लागतात. नोकरांची संख्या कमींत कमी आढळते. कांहीं ठिकाणीं दुकानांतून कामासाठीं यंत्राचा पण वापर केला जातो.

ऑस्ट्रेलियामध्यें मनुष्यबळ फार कमी असल्यामुळें यंत्रांचा उपयोग ठिकठिकाणीं फारच मोठ्या प्रमाणांत केला जातो. दुपारचें जेवण झाल्यावर आम्ही मेल्बोर्नमधील रॉयल हॉस्पिटल् पाहण्यासाठीं आलों. तेथें सुद्धां माणसांचीं बरींचशीं कामें यंत्रेंच करीत असल्याचें आढळलें. इस्पितळांतील सर्व कपडे धुणें, उपकरणें शुद्ध करणें, भांडीं स्वच्छ करणें वगैरे सर्व कामें विजेच्या यंत्रांमार्फत केलीं जात होतीं.


इस्पितळांतून बाहेर पडल्यावर आम्ही 'मायर्स एम्पोरियममध्यें' गेलों. या ठिकाणीं थोडी खरेदी करावयाची होती. दुकानांतील वरच्या मजल्यावर त्या वस्तु मिळणार होत्या. वर जाण्यासाठीं 'एस्कीलेटर' (यंत्राच्या साह्यानें वर जाणारा

जिना ) होता. या जिन्याच्या एका पायरीवर आपण उभें राहावयाचें. यंत्राच्या साह्यानें ही पायरी वर उचलली जाते व आपण कोणतीहि हालचाल न करतां वरच्या मजल्यावर जाऊन पोहोंचतों. अजूनपर्यंत या साधनाचा वापर करण्याचा योग आला नव्हता. हा अनुभव नवा होता.

मिस् सँडर्स नांवाच्या बाईनें आज रात्रीं आम्हांस भोजनास बोलाविलें होतें. आमच्यासाठीं तिनें तांदूळ आणले होते. महत्प्रयासानें मिरच्यांची पूड पण तिनें मिळविली होती. ऑस्ट्रेलियन लोक जेवणामध्यें कोणत्याहि प्रकारचा मसाला वापरीत नाहींत. कोणताहि पदार्थ–मांससुद्धां–नुसतें उकडून पुढें ठेवितात. मीठ व मिऱ्यांची पूड टाकून आपण तें खायचें. प्रारंभीं प्रारंभीं हें बेचव जेवण घशाखालीं जाईना, पण हळूहळू त्याचा सराव झाला. पण मधूनच घरच्या अन्नाची आठवण येई. चमचमीत मसालेदार पदार्थ न मिळाले तरी निदान तिखटमीठ नीट घातलेले पदार्थ खाण्याची इच्छा होई. त्या दृष्टीनें मिस् सँडर्सकडे बनविलेलें जेवण स्वागतार्ह वाटलें. त्या बाईनें आमच्याशीं ओळख करून देण्याकरितां पांचसहा बायांना आमंत्रण दिलें होतें. त्यांपैकीं कांहीं शिक्षणक्षेत्रांत काम करीत होत्या व कांहीं मजुरांच्या खात्यांत नोकरीला होत्या. त्यांच्याशीं बोलण्यांत बराच वेळ गेला. रात्रीं बाराच्या सुमारास आम्ही आपल्या निवासस्थानीं परत आलों.

२ फेब्रुवारी ५२

आज शनिवार. सर्व संस्था बंद. म्हणून मिसेस हॉर्ननें आमच्याकरितां एक सहलीचा कार्यक्रम ठेविला होता. मेलबोर्नपासून साठ मैल दूर आम्ही गेलों. जातांना वाटेंत कांहीं ठिकाणीं मेंढ्यांचे कळप पाहिले. लांबून एखादा गालिचा पसरलेला असावा, असें दृश्य दिसलें. येथें दोन प्रकारच्या मेंढ्या प्रामुख्यानें आढळतात. कांहीं मेंढ्यांवर लोकरीचें प्रमाण अधिक आढळतें, तर कांहीं मेंढ्या मांसाच्या पुरवठ्यासाठीं वाढविल्या जातात. ऑस्ट्रेलियांतून ज्याप्रमाणें खूप मोठ्या प्रमाणांत लोकरीची निर्यात होते, त्याचप्रमाणें मांससुद्धां परदेशांत पाठविलें जातें.




खूप लोकर देणारा मेंढा—

येथील शेतकरी ज्याप्रमाणें मेंढ्या पाळतात त्याचप्रमाणें गाई व डुकरें पण पाळतात.

येथून इंग्लंडमध्यें मांस, लोणी, चीज व बेकन् फार मोठ्या प्रमाणांत पाठविलें जातें. ऑस्ट्रेलियामध्यें गाईंच्या व डुकरांच्या पैदाशीवर खूपच लक्ष दिलें जातें. येथील घोडे पण प्रसिद्ध आहेत. आपल्या देशांतसुद्धां येथील घोडे एके काळीं फार मोठ्या प्रमाणांत येत असत. आजची परिस्थिति मला माहीत नाहीं. हे घोडे फार धष्टपुष्ट व मस्त असतात. त्यांचा उपयोग शेतीच्या कामाकरितां करतात. मेंढपाळ व डेअरीवालेसुद्धां घोड्यांचा उपयोग करून घेतात.


सोरांटो नांवाच्या गांवीं आम्ही येऊन पोहोंचलों. या ठिकाणीं लहान मुलांकरितां एक शिबिर चाललें होतें. पुष्कळशीं लहान लहान मुलें व मुली या शिबिरा-



जनावरांचा कळप —

साठीं आलेलीं होतीं. शाळांना सुट्टी असल्यामुळें विद्यार्थ्यांसाठीं ठिकठिकाणीं अशीं शिबिरें घेतलीं जातात, असें सांगण्यांत आलें. मुलांनीं छोटासा कार्यक्रम करून दाखविला व तो कार्यक्रम संपतांच स्वाक्षऱ्या गोळा करण्याच्या वह्या हातीं घेऊन मुलें आमच्यामागें लागलीं. वेळ थोडा असल्यामुळें बऱ्याचशा मुलांना नाराज करावें

लागलें. 'एज्'-नांवाच्या स्थानिक वृत्तपत्राचे बातमीदार व फोटोग्राफर येथें येऊन पोहोंचले होते. त्यांनीं आमचीं छायाचित्रें घेतलीं. येथील आनंदी वातावरणांत कांहीं काळ घालविल्यावर आम्ही मेलबोर्नला परत आलों. सुमारें १२० मैलांची रपेट




झाली. मिसेस् हॉर्ननें आपली स्वतःची गाडी आणली होती. ती गाडी चालविण्यासाठीं तिचे यजमान पण बरोबर आले होते. नवऱ्याच्या मानानें बाईच अधिक तल्लख व हुशार दिसत होती. परंतु आपला नवरा आपल्यापेक्षां प्रत्येक बाबतींत कसा श्रेष्ठ आहे, हें मधून मधून निरनिराळ्या गोष्टी सांगून किंवा त्याच्याबद्दलचे कौतुकाचे उद्गार काढून ही बाई आम्हांला पटवून देण्याचा प्रयत्न करीत होती.

३ फेब्रुवारी ५२

भारतामध्यें असतांना मी नेहमीं रविवारची वाट पाहतों; पण येथें आल्यापासून रविवार अगदीं नकोसा वाटूं लागला आहे. रविवारीं करणार तरी काय? कपडे धुवावयाचे असतात. पण या कामांत कितीसा वेळ जाणार? रविवार अगदीं कंटाळवाणा जातो. आज दुपारीं तीन वाजतां मि. रामचंद्रन् यांनीं आम्हांला आपल्या खोलीवर बोलाविलें होतें. दोनच्या सुमारास ते आम्हांला नेण्यासाठीं आले. त्यांच्याबरोबर आम्ही बाहेर निघालों. मेलबोर्न विश्वविद्यालयाच्या इमारती आम्हीं पाहिल्या. विश्वविद्यालयाचा विल्सन् हॉल् नांवाचा हॉल् पाहिला. विश्वविद्यालयाच्या परिसरांतून फिरतांना मीं मि. रामचंद्रन्ना विचारलें, "आपल्या विद्यार्थ्यांनीं येथें कसा काय जम बसविला आहे? त्यांच्याबद्दल प्राध्यापकांचें सर्व साधारणपणें काय मत दिसतें?"

त्यावर रामचंद्रन् म्हणाले, " येथें आलेले आमचे भारतीय विद्यार्थी अभ्यासाकडे फारसें लक्ष देत नाहींत. त्यांचें सर्व लक्ष मजा व चैन करण्याकडे लागलेलें दिसतें."

भारतीय विश्वविद्यालयांत आपल्या बुद्धिमत्तेनें जे चमकतात असे आपले हुशार विद्यार्थी पुढील अभ्यासासाठीं इंग्लंड, अमेरिका किंवा जर्मनी या देशांत जातात; कारण या देशांत अशा हुशार विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळतो. ज्यांच्याजवळ भरपूर पैसा आहे, पण जे वरील देशांमध्यें जाऊन तथील विश्वविद्यालयांत प्रवेश मिळवूं शकत नाहींत, असे साधारण विद्यार्थीच येथें मोठ्या प्रमाणांत येतात. बुद्धिमत्ता जेमतेम व पैसा भरपूर अशा परिस्थितींत अभ्यासाकडे त्यांचें फारसें लक्ष नसतें. पुष्कळदां येथील अभ्यास त्यांना झेपत नाहीं. याबाबत बोलतांना मि. रामचंद्रन् म्हणाले, " परदेशांत जाणाऱ्या सर्व भारतीय विद्यार्थ्यांची चांचणी परीक्षा भारताच्या शिक्षणखात्यानें घ्यावी. या परीक्षेंत जे लायक ठरतील त्यांनाच परदेशांत जाण्याची परवानगी द्यावी. केवळ पैशाच्या जोरावर वाटेल तो विद्यार्थी परदेशांत जातो. तो भारताच्या पैशाची तर उधळपट्टी करतोच, पण भारताच्या कीर्तीलासुद्धां धक्का लावतो."

मि. रामचंद्रन् यांची ही सूचना खरोखरच विचारार्ह आहे. मि. रामचंद्रन् आम्हांला घेऊन एका चिनी हॉटेलांत आले. चिनी लोकांनीं येथें फार चांगलीं उपाहारगृहें चालविलीं आहेत. या गृहांतून फार रुचकर असें जेवण मिळतें. ऑस्ट्रेलिअन् लोकसुद्धां रुचिपालट करण्याकरितां या उपाहारगृहांत जातात. आज या ठिकाणीं आम्हांला खूप चांगलें जेवण मिळालें. घर सोडल्यापासून इतकें चांगलें जेवण मिळालें नव्हतें. मि. रामचंद्र फार दिवसांपासून येथें राहात असल्यामुळें त्यांना येथली चांगली माहिती आहे. ते म्हणाले, " जेव्हां जेव्हां चांगलें जेवण तुम्हांला घ्यावेसें वाटेल, तेव्हां चिनी किंवा ग्रीक हॉटेलांत तुम्ही येत चला. ग्रीक हॉटेलांतील जेवण तर तुम्हांला अगदीं घरच्या जेवणासारखें वाटेल." स्वादिष्ट जेवणाचा भरपूर आस्वाद घेऊन व इतकें चांगलें जेवण मिळण्याचें ठिकाण दाखविल्याबद्दल मि. रामचंद्रन् यांचे आभार मानून आम्ही स्वस्थानीं परतलों.

४ फेब्रुवारी ५२

आज हवा फार चांगली पडली होती. मिसेस् हॉर्नच्या बरोबर रॉय व मी येथील शिक्षणखात्याच्या कार्यालयांत गेलों. तेथील अधिकाऱ्यांशीं परिचय करून देण्यांत आला. त्यांनीं ऑस्ट्रेलियांतील शिक्षणपद्धतीविषयीं चांगली सविस्तर माहिती

सांगितली. ते म्हणाले, " ऑस्ट्रेलियांतील प्रत्येक प्रदेशराज्यानें आपली स्वतःची शिक्षणपद्धति निश्चित केलेली आहे. राष्ट्रीय सरकारचें शिक्षणपद्धतीवर फारसें नियंत्रण नाहीं. त्यामुळें सबंध ऑस्ट्रेलियाची अशी एक शिक्षणपद्धती नाहीं. सहा प्रदेशराज्यांच्या सहा स्वतंत्र शिक्षणपद्धती आहेत. असें जरी असलें, तरी एका प्रदेशराज्याची शिक्षणपद्धती दुसऱ्या राज्याच्या पद्धतीपासून फारशी वेगळी नाहीं. १८७२ ते १८९३ या काळांत प्रत्येक प्रदेशराज्यानें आपलें एक स्वतंत्र शिक्षणखातें उघडलें व जनतेला शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारनें स्वीकारली. याचा अर्थ असा नव्हे कीं, धार्मिक व इतर खाजगी संस्थांनीं चालविलेल्या शिक्षण-संस्था यामुळें बंद पडल्या. आजहि अशा खाजगी संस्था चांगल्या कार्यक्षम आहेत व ऑस्ट्रेलियांतील शेंकडा २० टक्के मुलें आजसुद्धां अशा खाजगी संस्थां-तून शिक्षण घेत आहेत.

"१९०१ सालीं ऑस्ट्रेलियामध्यें संघराज्य स्थापन झालें. या संघराज्यानें राज्य-कारभाराचीं कांहीं खातीं आपणाकडे घेतलीं; परंतु शिक्षणखात्याचा ताबा मात्र प्रदेशराज्याकडेच ठेवण्यांत आला. अलिकडे मात्र संघराज्यानेंसुद्धां शिक्षण-विषयक प्रश्नांमध्यें लक्ष घालायला सुरुवात केलेली आहे व देशाचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठीं मोलाची मदत द्यायला सुरुवात केलेली आहे. या सहाहि प्रदेशराज्यांतून शैक्षणिक बाबतींत एकसूत्रता आपोआपच येऊं लागली आहे. शैक्षणिक पद्धति, शिकविण्याचें तंत्र, शैक्षणिक दर्जा, इत्यादि बाबतींत सर्व प्रदेशराज्यांतून सारखेपणा दिसूं लागला आहे. एका प्रदेशराज्यांत झालेल्या प्रयोगांचें अनुकरण दुसऱ्या प्रदेशराज्यामध्यें ताबडतोब होऊं लागतें.

" ऑस्ट्रेलियामध्यें प्राथमिक शिक्षण व कांहीं प्रदेशराज्यांतून माध्यमिक शिक्षण-सुद्धां मोफत आहे. ज्या ठिकाणीं माध्यमिक शिक्षण मोफत नाहीं त्या ठिकाणीं विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या इतक्या सढळ हातानें दिल्या जातात कीं, त्यामुळें कोण-ताहि लायक मुलगा पैशाच्या अभावीं शिक्षणाला वंचित होऊं शकत नाहीं. जीं मुलें अपंग असतात, किंवा ज्यांचीं घरें शाळांपासून खूप दूर असतात त्या मुलांना टपालामार्फत शिक्षण देण्याची येथें सोय केलेली आहे. बालवर्गापासून तों मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण अशा मुलांना घरच्या घरीं मिळूं शकतें. मुलांना देण्यांत येणारे गृहपाठ विमानें, आगगाड्या, घोडागाड्या, घोडे किंवा उंट यांच्या मदतीनें मुलांपर्यंत पोहोंचविले जातात व मुलांनीं तयार केलेले पाठ याच मार्गानीं मध्य-

वर्ती असलेल्या शाळेपर्यंत पोहोंचविले जातात.

" प्रदेशराज्यांतील शाळांतून शिक्षण मोफत असतें, परंतु पुस्तकें व वह्या यांचा खर्च पालकांना करावा लागतो. फक्त दोनच प्रदेशराज्यांत अशी व्यवस्था आहे कीं, त्या ठिकाणीं मुलांना पुस्तकें व लेखनसाहित्यसुद्धां मोफत पुरविलें जातें. सक्तीच्या शिक्षणाची वयोमर्यादा चार प्रदेशराज्यांत सहा ते चौदा अशी आहे. एका राज्यांत ही सहा ते पंधरा अशी आहे, तर दुसऱ्या एका राज्यांत ती सात ते सोळा अशी आहे.

" न्यू साउथ वेल्स प्रांतांत शाळांची संख्या सर्वांत जास्त म्हणजे २६०० आहे, तर टॅस्मेनियामध्यें फक्त ३२५ च शाळा आहेत. शहरांतील कांहीं शाळांमध्यें ९०० ते १००० विद्यार्थी असतात, तर खेड्यांतील सर्वांत लहान शाळेंत कमींत कमी सहा विद्यार्थ्यांची शाळा तुम्हांला दिसेल. अलिकडे ऑस्ट्रेलियामध्यें या खेड्यांतील शाळा सुधारण्याच्या दृष्टीनें एक नवा उपक्रम सुरू करणार आहेत. एका मध्यवर्ती ठिकाणीं एक मोठी शाळा बांधण्यांत येते. त्या ठिकाणीं पुरेसे शिक्षक व भरपूर शैक्षणिक साहित्य दिलें जातें. अशी मोठी शाळा उघडल्यावर या शाळेपासून तीन मैलांच्या परिसरांत असलेल्या सर्व छोट्या शाळा बंद करण्यांत येतात व त्या गांवांतील मुलांना सरकारी खर्चानें बसमधून या मोठ्या शाळेंत आणण्यांत येतें. असें करण्यांत उद्देश असा असतो कीं, लहानांतील लहान खेड्यांत राहणाऱ्या मुलांनासुद्धां चांगल्या शिक्षकांचा व चांगल्या शैक्षणिक साहित्याचा फायदा मिळावा. अशा मध्यवर्ती शाळांना Central School अथवा Area School असें म्हणतात. १९४७ सालीं ऑस्ट्रेलियाची लोकसंख्या ८० लाख होती. त्या वर्षी सरकारी शाळांमधून सुमारें ९ लाख मुलें शिकत होतीं. शिक्षकांची संख्या ३२८०० होती. शिवाय २८०० शिक्षक ट्रेनिंग कॉलेजमध्यें होते. याखेरीज त्या काळांत १८०० खाजगी शाळा चालू होत्या व या शाळांमधून १२४०० शिक्षक काम करीत होते व विद्यार्थ्यांची संख्या २५ लाख होती.

"खाजगी शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फी द्यावी लागते. या शाळांतील विद्यार्थ्यांवर हजर राहण्याची सक्ति करण्यांत येते. खाजगी शाळांवर कांहीं बाबतींत सरकारी शिक्षण खात्याचें नियंत्रण असतें. योग्य लायकीचे शिक्षक घेतले जातात कीं नाहीं, शिक्षणाचा दर्जा योग्य राखला जातो कीं नाहीं व मुलें व्यवस्थित हजर राहतात कीं नाहीं याची पाहणी शिक्षण खात्याकडून केली जाते. या खाजगी शाळां-

पैकीं बऱ्याचशा शाळांनीं आपल्या शाळांना जोडून वसतिगृहें चालविलेलीं आहेत. खाजगी शाळांपैकीं जवळ जवळ ७७ टक्के शाळा रोमन कॅथॉलिक लोकांनीं चालविल्या आहेत. प्रत्येक प्रदेशराज्यांतील राजधानीच्या ठिकाणीं एक विश्वविद्यालय आहे. याखेरीज संशोधनकार्य करण्यासाठीं व अधिक उच्च शिक्षणासाठीं कॅनबारा येथें एक राष्ट्रीय विश्वविद्यालय काढण्यांत आलें आहे. या विश्वविद्यालयाला सरकारकडून ग्रॅन्ट मिळते. पश्चिम ऑस्ट्रेलियांतील विश्वविद्यालयांत विद्यार्थ्यांना मुळींच फी द्यावी लागत नाहीं. हें विद्यालय पर्थ येथें आहे. सर्व विद्यार्थ्यांना समानसंधि मिळवून देणें हें लोकशाहींतील सरकारचें प्रमुख कर्तव्य मानलें जातें. प्रतिकूल परिस्थितीमुळें कोणीहि शिक्षणाला वंचित होता कामा नये, असें ऑस्ट्रेलियांतील सर्व प्रदेशराज्यांना वाटतें व म्हणून गरीब विद्यार्थ्यांना उदार हस्तें शिष्यवृत्त्या दिल्या जातात. १९५० सालीं, या विश्वविद्यालयांतून ३२००० विद्यार्थी शिक्षण घेत होते व त्यांपैकीं निम्म्या विद्यार्थ्यांना सरकारची मदत मिळत होती.

" दोन ते सहा वर्षांच्या मुलांसाठीं शिशुगृहें व किंडरगार्टन शाळा चालविल्या जातात. जरी कांहीं ठिकाणीं या शाळा सरकारमार्फत व नगरपालिकांमार्फत चालत असल्या तरी पुष्कळशा ठिकाणीं खाजगी संस्थांनींच या शाळा चालविण्याची जबाबदारी पत्करलेली आहे. या शाळेंतील पालकांना थोडी फी द्यावी लागते. परंतु त्या शाळांना सरकारी मदत पण मिळते. पूर्व प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शिक्षण खात्याऐवजीं आरोग्य खात्यानें स्वीकारलेली आहे.

" दुसऱ्या महायुद्धापूर्वी प्रौढशिक्षणाच्या क्षेत्रांत येथें फारशी प्रगति झाली नव्हती. विश्वविद्यालयानें बहिःशाल मंडळ, कांहीं खाजगी संस्था व कामगारांची संघटना, यांच्यामार्फत प्रौढांकरितां कांहीं व्याख्यानें घडवून आणलीं जात होतीं. यापलीकडे प्रौढशिक्षणाचें काम फारसें त्या काळांत चालू नव्हतें. याचें मुख्य कारण म्हणजे ऑस्ट्रेलियांत साक्षरतेचें प्रमाण खूप मोठें होतें. युद्धकाळांतसुद्धां या देशांत ९८ टक्के लोक साक्षर होते.

" जनतेला साक्षर करून व प्रत्येक प्रौढाची शैक्षणिक पात्रता वाढवून त्याला चांगला नागरिक बनविण्याचें महत्त्वाचें कार्य आम्हीं सुरू केलें आहे. असें करण्यांत आमचा हेतु हा आहे कीं, आमच्या देशांतील प्रत्येक प्रौढाला स्वतंत्र अशी प्रज्ञा असावी व प्रसंगीं योग्य निर्णय घेण्याची कुवत त्याच्यामध्यें निर्माण व्हावी. अशा प्रकारें जर प्रत्येक नागरिकानें आपल्या शिक्षणाचा चांगला वापर केला, तर येथील

लोकशाहीचा महान् प्रयोग यशस्वी होईल. लोकशाही यशस्वी करण्याकरितां चांगलीं माणसें हवींत व चांगलें शिक्षण लोकांना दिल्यावांचून चांगलीं माणसें निर्माण होणार नाहींत."

याप्रमाणें या देशांतील शिक्षणपद्धतीविषयीं स्थूल मानानें परंतु अत्यंत उद्बोधक अशी माहिती या अधिकाऱ्यानें आम्हांला दिली. आम्ही त्याचे मनापासून आभार मानून तेथून निघालों तों 'फिट्झ्रॉय गार्डन्' नांवाच्या उपवनांत गेलों. त्या ठिकाणीं असलेल्या उपाहारगृहांत आम्ही जेवण घेतलें व नंतर तें उद्यान हिंडून पाहिलें. ऑस्ट्रेलियाचा शोध ज्यानें लावला त्या कॅप्टन् कुक्ची झोंपडी आम्हांला पाहायला मिळाली. आज इतकीं वर्षें ती जशीच्या तशी ठेवण्यांत आली आहे.परदेशी प्रवासी हें स्थान पाहण्यास मुद्दाम येत असतात. संध्याकाळपर्यंत येथें वेळ घालवून आम्ही आमच्या निवासस्थानीं परत आलों.

५ फब्रुवारी ५२

आज येथील नभोवाणी केंद्र पाहण्यासाठीं गेलों. या केंद्रांतील शिक्षणविभागाचे अधिकारी भेटले. ऑस्ट्रेलियामध्यें शालेय विद्यार्थ्यांना नभोवाणीतर्फे होणाऱ्या कार्यक्रमाचा भरपूर फायदा मिळवून दिला जातो. विद्यार्थ्यांसाठीं योजनाबद्ध कार्यक्रम आंखले जातात. कोणत्याहि शाळेला रेडिओ व रेडिओचें मासिक विकत घेण्यासाठीं लागणाऱ्या खर्चापैकीं निम्मी रक्कम सरकारकडून मिळतें. तसेंच या कार्यक्रमांबाबत शाळेला होणाऱ्या खर्चापैकीं निम्म्या खर्चाची रक्कम सरकार देतें. सरकारच्या सवलतीमुळें प्राथमिक शाळांनासुद्धां रेडिओ घेणें परवडतें. मेलबोर्नमधील ८७% प्राथमिक शाळांतून रेडिओ आढळतात. सबंध ऑस्ट्रेलियांतील ७५% शाळांना सरकारी मदतीमुळें रेडिओ घेणें सोयीचें झालें आहे. पुष्कळदां रेडिओतर्फे होणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमांची वेळ शाळांना गैरसोयीची वाटते. हा कार्यक्रम चालू असेल त्या वेळीं शालेय वेळापत्रकांत निराळा विषय शिकविला जात असतो. त्या विषयाचें अध्यापन बंद करून मुलांना रेडिओवरील कार्यक्रम ऐकावयाला लावणें गैरसोयीचें असतें. ही अडचण दूर करण्याकरितां एक चांगली युक्ति शोधून काढण्यांत आली आहे. असे अवेळीं होणारे कार्यक्रम शाळा टेप रेकॉर्डरवर मुद्रित करून ठेवतात व वेळापत्रकांत सवड असेल त्या वेळीं हे कार्यक्रम मुलांना ऐकवितात. आपल्याकडे शाळांतून जर अशी सोय झाली, तर नभोवाणीवर होणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमांचा आजच्यापेक्षां विद्यार्थ्यांना अधिक फायदा मिळेल. हे शैक्षणिक कार्यक्रम

ठरवितांना शिक्षकांचा सल्ला घेतला जातो व कार्यक्रम देणाऱ्या शिक्षकाला प्रत्येक कार्यक्रमामागें तीन ते आठ गिनीपर्यंत मुशाहिरा मिळतो.

दुपारीं येथील एक शाळा पाहायला आम्ही गेलों होतों. या शाळेंत विशिष्ट प्रकारचींच मुलें घेतात. मुलाचें वय साडेबारा वर्षांचें झालें कीं तो मुलगा अथवा ती मुलगी ज्या शाळेंत असेल, तेथें एका छोट्या कमिटीमार्फत त्याची तपासणी केली जाते. एखादा विद्यार्थी बुद्धिमत्तेंत कमी आढळला व सर्वसाधारण विद्यार्थ्याला दिलें जाणारें शिक्षण त्याला झेपत नाहीं, असें जर आढळून आलें तर त्या मुलाला त्याच्या शाळेंतून काढून या स्वतंत्र शाळेंत पाठविण्यांत येतें.

या शाळेला Opportunity Grades School असें नांव दिलेलें आहे. मुलांचें बुद्धिमापन करून ज्यांचा बुध्यंश ( I. Q. ) ६० ते ९५ आहे, त्यांना या शाळेंत पाठविण्यांत येतें. 'तुमचा मुलगा (अथवा मुलगी) त्याच्या नेहमींच्या शाळेंत आपली प्रगति करून घेऊं शकणार नाहीं. त्याला त्याचा अभ्यासक्रम झेपण्यासारखा नाहीं. त्याला निराळ्या शाळेंत पाठविलें पाहिजे.' असें ही चांचणी परीक्षा झाल्यावर मुलाच्या पालकाला कळविण्यांत येतें. येथील सर्वसाधारण पालक शिकलेले व समंजस असल्यामुळें शाळेतर्फे आलेली ही सूचना आदेश मानून आपल्या मुलाला या स्वतंत्र शाळेमध्यें पाठवायला तयार होतात.

या शाळेंतील मुलांना ठराविक चाकोरींतून नेलें जात नाहीं. त्यांच्यासाठीं खास असा अभ्यासक्रम आंखलेला आहे. "पूर्वीच्या त्यांच्या शाळेमध्यें जेव्हां हीं मुलें शिक्षण घेत होतीं, तेव्हां त्यांची प्रगति कमी असल्यामुळें या मुलांना सर्वांनीं ' उनाड ', ' टाकाऊ ', ' गचाळ ' ठरविलें जात होतें. त्यामुळें हीं मुलें स्वाभिमानशून्य बनत. त्यांच्यामध्यें न्यूनगंड निर्माण होई." असें येथील मुख्याध्यापक मला म्हणाले. ते पुढें म्हणाले, " या शाळेंत मुलें दाखल झाल्यावर या मुलांमध्यें स्वाभिमान उत्पन्न करण्याचें महत्त्वाचें काम आम्हांला प्रथम करावें लागतें. या काळांत त्यांना क्रमिक विषय शिकविण्याऐवजीं स्वच्छ कसें राहावें हें आम्ही शिकवतों. साधारणपणें हीं मुलें गचाळ असतात. त्यांना स्वच्छता व टापटीप माहीत नसते.त्यांच्यामध्यें आत्मविश्वासाचा अभाव असतो. निरनिराळे उपाय योजून त्यांचा आत्मविश्वास वाढीला लावण्याचें कठीण काम आम्हांला प्रथम करावें लागतें. हें साधण्यासाठीं प्रत्येक मुलाकडे जास्तींत जास्त वैयक्तिक लक्ष पुरवावें लागतें. आमच्याकडील सर्वसाधारण शाळांतून एका शिक्षकाला चाळीस मुलें संभाळावीं लागतात. परंतु आमच्या

शाळेंत एका शिक्षकाला फक्त २८ च मुलांकडे पाहावें लागतें. आज होतें आहे त्यापेक्षां अधिक चांगलें काम व्हावें असें आम्हांला वाटतें. परंतु त्यासाठीं एका शिक्षकाकडे २८ च्या ऐवजीं फक्त २५ च मुलें देणें जरूर आहे."

आम्ही निरनिराळ्या वर्गांतून हिंडत होतों. शाळेचे मुख्याध्यापक आमच्याबरोबर होतेच. ते शाळेबद्दल माहिती सांगत होते. या शाळेंत बौद्धिक शिक्षणापेक्षां व्यावसायिक शिक्षणावरच अधिक भर दिला जातो. एकंदर शाळेच्या वेळेपैकीं दोनतृतीयांश वेळ व्यावसायिक शिक्षण, संगीत व शारीरिक शिक्षण यावर खर्च केला जातो. बाकीच्या एकतृतीयांश वेळांत मुलांना बौद्धिक शिक्षण दिलें जातें. बौद्धिक शिक्षण देतांना पुस्तकांचीं ठराविक पानें वाचून घेण्याऐवजीं निश्चित अशी कांहीं माहिती देण्याकडे शिक्षकांचा कल असतो.

या शाळेंत सुतारकाम, विणकाम, बुकबाइंडिंग, टोपल्या तयार करणें, चामड्याच्या वस्तू बनविणें, पितळेच्या वस्तू बनविणें इत्यादि कामें शिकविलीं जातात. कांहीं मुलें कार्डबोर्डचें काम करतात, तर कांहीं बागाइतीचें काम करण्यांत गुंतलेलीं असतात. मुलींना शिवणकाम शिकविलें जातें. चांगले झगे तयार करणें व टोप्या तयार करणें यांचें शिक्षण मुलींना दिलें जातें. ऑस्ट्रेलियांतील स्त्रिया बाजारहाट करतांना आकर्षक व कलात्मक अशा टोपल्या ( Baskets ) घेऊन जातात. या टोपल्या बनविण्याचें शिक्षण पुष्कळ शाळांतून मुलांमुलींना दिलें जातें. याबाबत चौकशी करतां तेथील अधिकारी मला म्हणाले, "ही टोपली तयार करण्याला साधारणपणें सात शिलिंग खर्च येतो व ती तयार झाल्यावर बाजारांत तिची किंमत दोन पौंडपर्यंत होते." शाळेमध्यें देण्यांत येणारें व्यावसायिक शिक्षण इतकें अर्थोत्पादक होऊं शकतें हें आम्ही तेथें जरी प्रत्यक्ष पाहून आलों असलों तरी येथील आमच्या पुष्कळशा मित्रांना तें खरें वाटणार नाहीं. व्यावसायिक शिक्षणांतून अर्थोत्पादन झालेंच पाहिजे, असें येथील लोक मानतात व त्यानुसार शाळांतून या गोष्टीकडे कटाक्षानें लक्ष पुरविलें जातें. वर निर्देश केलेल्या व्यवसायांखेरीज येथें मुलींना मातीचें काम करणें, गृहव्यवस्था राखणें, स्वयंपाक करणें, कपड्यांना इस्तरी करणें, रफू करणें इत्यादि गोष्टी शिकविल्या जातात.

हीं मुलें मागासलेलीं आहेत. पण त्यांच्याशीं बोलतांना आम्हांला निराळाच अनुभव आला. या शाळेंतील वरच्या वर्गांत येथील मुख्याध्यापक आम्हांला घेऊन गेले. वर्गांतील भिंतीवर जगाचा नकाशा टांगला होता. ते मुलांना म्हणाले,

" आपले पाहुणे कोणत्या देशांतून आले आहेत हें मी तुम्हांला नकाशावरून दाखवितों. हा पाहा तो देश. काय या देशाचें नांव ?

मुलें एकदम ओरडलीं, " इंडिया."

देशाबद्दल तुम्हांला काय माहिती आहे ? "शिक्षकानें विचारलें ? "

मुलांचे हात वर गेले. शिक्षकानें एका मुलाकडे बोट केलें. तो म्हणाला, " या देशांत नुकत्याच निवडणुकी झाल्या व खूप लोक मतें द्यायला गेले."

इतक्यांत दुसरा एक मुलगा उभा राहिला. तो म्हणाला, "सर्व जगांत इतक्या मोठ्या संख्येनें लोक मतदानकेंद्रावर कधींच गेले नव्हते. त्या दृष्टीनें भारत हा पहिला देश आहे. येथें मतदारांची संख्या फार मोठी आहे." या मागासलेल्या मुलांचीं उत्तरें ऐकून मला खूप आश्चर्य वाटलें. आमच्यासाठीं हीं मुलें खास पढवून ठेवलेलीं नव्हतीं.

ही शाळा पाहून त्या शाळेविषयीं जरी माझा ग्रह अनुकूल झाला तरी कांहीं प्रश्न माझ्या डोळ्यांसमोर उभे राहिले. मी त्या मुख्याध्यापकांना म्हणालें, " या मुलांना अशा प्रकारें निवडून एका स्वतंत्र शाळेंत तुम्हीं आणून टाकिलेत. त्यामुळें या मुलांना वाळींत टाकल्यासारखें नाहीं का वाटणार ? आपल्या मित्रांपासून त्यांना या दूरच्या निराळ्या शाळेंत आणल्यामुळें त्यांच्यामध्यें एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होईल असें नाहीं कां तुम्हांला वाटत ? " ते म्हणाले, " मुळींच नाहीं. ज्या वेळीं हीं मुलें साधारण शाळेंत जात होतीं त्या वेळीं इतर मुलांच्या मानानें तीं कमी प्रतीचीं असल्यामुळें त्यांची तेथें नेहमीं टवाळी होई. शिक्षकसुद्धां त्यांना फुकट गेलेलीं समजून वर्गांतील मागच्या बाकांवर बसवीत. त्यांच्याकडे कोणीच लक्ष देत नसे. त्यामुळें त्यांची फारच कुचंबणा होई. त्यांना सहानुभूतीचा शब्द मिळत नसे. त्यामुळें तेथें त्यांची मानसिक वाढ होऊं शकत नव्हती. आमच्या येथें आल्यापासून हीं मुलें येथें अगदीं मोकळेपणानें वागतात. कोणताहि संकोच न बाळगतां सर्वत्र हिंडूं फिरूं शकतात. सर्वच मुलें सारखीं असल्यामुळें तीं एकमेकांना बिचकत नाहींत. आपल्या हस्तकौशल्यानें ती कांहीं वस्तू निर्माण करूं शकतात व त्यामुळें आपणसुद्धां कांहींतरी करूं शकतों, असा आत्मविश्वास त्यांच्यामध्यें हळू हळू उत्पन्न होऊं शकतो. आमच्या शाळेंतील दैनंदिन कारभार आम्ही मुलांच्या मदतीनें व पूर्ण लोकशाही पद्धतीनें चालवितों. मुलांना अधिकाराच्या जागा मिळतात. त्यांच्यावर पडलेली जबाबदारी पार पाडण्यासाठीं जरूर

तो प्रयत्न तीं करतात. सर्व कामें जबाबदारीनें पण चांगलीं करण्यासाठीं मुलें धडपडतात. ही आमची शाळा नसती तर मुलांच्या प्रसुप्त शक्तीला केव्हांच वाव मिळाला नसता. त्यांचें जीवन निराशेनें दुगाळलें असतें. कदाचित् या मुलांमधून कांहीं गुन्हेगार निर्माण झाले असते. आज हीं मुलें येथें किती आनंदांत वावरतात! कशी धीटपणें फिरतात, कशी छान छान कामें करतात, तें तुम्हीं पाहिलेलेंच आहे. या शाळेमुळें या मुलांचें जीवन सुधारलें कीं फुकट गेलें तें तुमचें तुम्हीच ठरवा."

त्यांचा हा खुलासा ऐकून माझें समाधान झालें. येतांना वाटेंत एका प्रथमोपचार केंद्राला भेट देऊन व त्या ठिकाणीं तयार होत असलेल्या आकर्षक टोपल्या पाहून आम्ही घरीं परतलों.

६ फेब्रुवारी ५२

आज सकाळीं येथील प्रौढशिक्षणाच्या कार्यालयाला भेट देण्यासाठीं गेलों. ऑस्ट्रेलियामध्यें सार्वत्रिक शिक्षण आज कित्येक वर्षें सक्तीचें असल्यामुळें व देशांतील लोकसंख्या मर्यादित असल्यामुळें या देशांत दोन टक्के लोकसुद्धां निरक्षर नाहींत. प्रौढांना फुरसतीचा वेळ चांगल्या रीतीनें घालवितां यावा व त्यांचें जीवन अधिक सुखी व समृद्ध व्हावें, हा येथील प्रौढशिक्षण चळवळीचा मुख्य हेतु आहे. या प्रौढशिक्षण वर्गांतून प्रौढांना औद्योगिक शिक्षण दिलें जात नाहीं, तथापि छंद म्हणून एखादा व्यवसाय या वर्गांतून शिकविला जातो.

प्रारंभीं येथील मजूर संघटनांनीं या प्रौढशिक्षण चळवळीला विरोध केला. त्यांना असें वाटलें कीं, मजुरांमध्यें फाटाफूट निर्माण करण्यासाठीं भांडवलशाहीनें ही चळवळ सुरू केली आहे. कालांतरानें त्यांचा विरोध मंदावत चालला. आज या संघटनांनीं या प्रश्नांबाबत तटस्थ वृत्ति स्वीकारलेली आहे. गिरण्या-कारखान्यांच्या मालकांनींसुद्धां या चळवळीला उचलून धरलें नाहीं कारण या लोकांना अशी भीति वाटत होती कीं, जर कामगारांना अधिक शिक्षण दिलें तर दिवसेंदिवस ते अधिक जहाल होत जातील. खास कामगारांना शिक्षण देण्यासाठीं कामगारांनीच एक संघटना कांहीं वर्षांपूर्वी अस्तित्वांत आली. परंतु या संस्थेलासुद्धा मजूर संघटनांकडून पुरेसा पाठिंबा मिळूं शकला नाहीं. आपल्या येथील कामगारांप्रमाणें येथील कामगारसुद्धां या प्रौढांच्या वर्गांत यावयाला फारसे उत्सुक नसतात. ऑस्ट्रेलिअन् सरकारच्या कल्याणकारी योजनांचा भरपूर फायदा या काम-

गारांना मिळत असल्यामुळें व हा फायदा मिळविण्याबाबतची सर्व जबाबदारी मजूर संघटनेनें स्वीकारल्यामुळें आपल्या सुधारणेसाठीं धडपड करण्याची वृत्ति येथील कामगारांत दिसून येत नाहीं. येथील मजुरांनीं आपली संघटना बलिष्ठ करून आपले कामाचे तास कमी करविले आहेत. आठवड्याला फक्त चाळीसच तास त्यांना काम करावें लागतें व त्यामुळें त्यांना फुरसतीचा वेळ सांपडतो. या वेळांत कामगार लोक क्लबमध्यें जातात; वेगवेगळे खेळ खेळतात; बोलपट पाहतात व अशाच रीतीनें कालक्षेप करतात.

लोकशाहीमध्यें प्रत्येक व्यक्तीला आपले स्वतःचे विचार स्पष्टपणें मांडतां येणें अत्यंत जरूर असतें. त्याचप्रमाणें कोणत्याहि प्रश्नाची साधकबाधक चर्चा करण्याची संवयसुद्धां त्यांना लागणें जरूर असतें. या दृष्टीनें चर्चामंडळांना प्रौढशिक्षणाच्या कार्यक्षेत्रांत महत्त्वाचें स्थान आहे. याखेरीज ज्यांना कांहीं कलांचा अभ्यास करावयाचा आहे त्यांच्यासाठीं चित्रकलेचे, नृत्याचे, गाण्याचे, वाद्यें शिकविण्याचे वर्ग चालविले जातात. कांहीं ठिकाणीं निरनिराळ्या फिल्मस् प्रौढांना दाखविल्या जातात व त्या फिल्मसूवर सर्व प्रौढ मोकळेपणानें चर्चा करतात. या बाबतींत प्रौढशिक्षणाधिकारी त्यांना जरूर तें मार्गदर्शन करतात. याखेरीज प्रौढांना ध्वनिमुद्रिका पुरविल्या जातात. त्याचप्रमाणें वाचनीय पुस्तकें पण त्यांना देण्याची व्यवस्था केली जाते. वाचलेल्या पुस्तकांवर प्रौढ चर्चा करतात. प्रौढशिक्षणासाठीं नभोवाणीचासुद्धां चांगला उपयोग केला जातो. अशा प्रकारची येथील प्रौढशिक्षण कार्याची बरीचशी माहिती गोळा करून आम्ही बाहेर पडलों.

येथें आल्यापासून सारा दिवस सारखा कामांत जातो. शनिवार–रविवारखेरीज फुरसत अशी मुळींच मिळत नाहीं. आजहि दिवसभर भटकल्यामुळें थोडा थकवा आला होता. रात्रीं दहाच्या सुमारास आमचे मित्र श्री. भट आमच्या खोलींत आले व त्यांनीं आम्हांला एक महत्त्वाची बातमी सांगितली. रात्रीं साडेनऊ वाजतां ऑस्ट्रेलियन नभोवाणी केंद्रानें जाहीर केलें कीं, इंग्लंडचे बादशहा सहावे जॉर्ज हे मरण पावले. श्रीयुत भट यांनीं सांगितलेल्या बातमीवर थोडा वेळ आम्ही बोलत बसलों. उठतांना भट म्हणाले, "उद्यां कदाचित् आपणांस सुट्टी असेल!"

७ फेब्रुवारी ५२

आज सकाळीं हातीं पडलेलीं सर्व वर्तमानपत्रें सहाव्या जॉर्जबद्दलच्या माहितीनें पूर्ण भरलेलीं होतीं. आमच्या अपेक्षेप्रमाणें सुट्टी मिळाली नाहीं. ऑस्ट्रे-

लिया हा देश कॉमनवेल्थमध्यें असल्यामुळें व ब्रिटिश लोकांशीं त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध असल्यामुळें सहाव्या जॉर्जच्या मृत्यूची भीषण छाया सर्व शहरभर पसरली होती. दुकानाबाहेरील तावदानी शोकेसिसमध्यें मांडलेल्या मालाभोंवतीं काळ्या कापडाच्या चौकटी उभ्या करण्यांत आल्या होत्या. आपलें दुःख व्यक्त करण्याचा हा एकमेव मार्ग सर्वांनीं स्वीकारलेला दिसला. लोकांचे नित्याचे व्यवहार व्यवस्थित चालू होते. शाळासुद्धां बंद नव्हत्या. पूर्वी योजिल्याप्रमाणें आम्ही एक शाळा पाहायला गेलों.

ही एक मुलींची शाळा होती. या शाळेंत बाराव्या इयत्तेपर्यंतचें शिक्षण देण्याची व्यवस्था होती; परंतु शाळेंतील फारच थोड्या मुली मॅट्रिकपर्यंत जाऊन पोहोंचतात. साधारणपणें चौदा–पंधरा वर्षांच्या होईपर्यंत या मुली शाळेंत शिकतात. परंतु पुढें त्यांना कामधंद्यासाठीं शिक्षण सोडावें लागतें. मेलबोर्न शहरापासून पांचसहा मैलांवर असलेल्या एका उपनगरांतील ही शाळा आहे. शाळेच्या आजूबाजूला मुख्य वस्ती कामगार लोकांचीच आहे.

त्यामुळें या शाळेंतील बहुसंख्य मुली विश्वविद्यालयीन शिक्षण मिळविण्याच्या भानगडींत न पडतां अथवा मॅट्रिक पर्यंतचेंसुद्धां शिक्षण न घेतां मध्येंच शाळा सोडतात व नोकरी धरतात. आम्हीं शाळेला भेट दिली, त्या वेळीं शाळेमध्यें चारशेंसाठ मुली होत्या. त्यांपैकीं फक्त बाराच मुली शाळेंतील शेवटच्या वर्गापर्यंत येऊन पोहोंचल्या होत्या. ही माहिती ऐकून मी म्हणालों, "याचा अर्थ असा कीं, मध्येंच शाळा सोडून गेलेल्या बाकीच्या सर्व मुलींवर झालेला खर्च फुकट गेला."

माझें हें विधान ऐकून मला माहिती सांगणाऱ्या मुख्याध्यापिका म्हणाल्या, "असेंच केवळ म्हणतां येणार नाहीं. या मुलींना दिलेलें शिक्षण त्यांच्या पुढील जीवनामध्यें त्यांना खूप उपयोगी पडणार आहे. परंतु ऑस्ट्रेलियांत आज राहणीचें मान फारच खर्चाचें झालें आहे. त्यामुळें सर्वसाधारण कुटुंबांना आपल्या घरांत जास्तींत जास्त पैसा आणण्याची गरज वाटूं लागली आहे. शिवाय मजुरीचे दर चांगलेच आकर्षक असल्यामुळें मुलामुलींना जरुरीपेक्षां जास्त शिकविण्याला लोक तयार नाहींत. त्यामुळें आमच्या शाळेंतून फारच थोड्या मुली शेवटपर्यंत शिक्षण घेऊं शकतात."

या शाळेनें आपल्यासमोर एक विशिष्ट ध्येय ठेवून त्याप्रमाणें आपला शिक्षण-क्रम आंखला आहे. शाळेविषयीं अधिक माहिती सांगतांना त्या बाई म्हणाल्या,

१०७५६

" आमच्या शाळेचा उद्देश मुलींना 'सुमाता व सुगृहिणी' करणं हा आहे. या शाळेंत मुलींना विणकाम, शिवणकाम, कपडे धुणें, इस्त्री करणें, स्वयंपाक करणें, टोपल्या तयार करणें इत्यादि विषय शिकविले जातात. त्याचप्रमाणें आपल्या वसंची व मुलांची काळजी कशी घ्यावी याचें शिक्षण पण आम्ही मुलींना देतों. येथें आम्ही त्यांना इंग्रजी, गणित, इतिहास व भूगोल, हे मुख्य विषय म्हणून शिकवितों. मुलींना एकहि परकी भाषा आम्ही शिकवीत नाहीं. शारीरिक शिक्षण व संगीत शिकविण्याची तरतूद आम्हीं केली आहे. ज्या मुली शाळेंत स्वयंपाकाचें शिक्षण घेतात, त्यांना रोज कांहीं तरी खाद्य पदार्थ तयार करावे लागतात. या मुलींना फक्त चार आण्यांमध्यें दुपारचें जेवण आम्ही देऊं शकतों. सातव्या इयत्तेंतील मुली मात्र स्वयंपाकघरांत काम करीत नाहींत. पाकशास्त्राचें शिक्षण देणाऱ्या शिक्षिका मुलींच्या मदतीनें मुलींसाठीं मधल्या वेळचें जेवण तयार करतात. शाळेंतील बहुतेक सर्व मुली आपलें मधल्या वेळचें जेवण शाळेंतच घेतात. कारण इतक्या स्वल्प किंमतींत व इतकें चांगलें जेवण त्यांना घरीं सुद्धां मिळूं शकत नाहीं."

शाळेला जोडूनच एक आकर्षक असें छोटें घर होतें. चहा देण्यासाठीं मला त्या घरीं नेण्यांत आलें. मला वाटलें, त्या बाईंचेंच हें घर असावें व तसा मीं बाईंना प्रश्न पण केला. त्या म्हणाल्या, " मी येथें राहात नाहीं व या घरांत कोणीसुद्धां राहात नाहीं. आपल्या घराची व्यवस्था कशी ठेवावी याबाबतचें प्रात्यक्षिक शिक्षण मुलींना देण्यासाठीं आम्हीं हें घर बांधलें आहे. घर झाडणें, घरांतील न्हाणीघर व संडास साफ करणें, घरांतील सर्व फर्निचर व सामान साफसूफ ठेवणें, बिछाने नीट घालणें, घराची सजावट करणें, घरांतील पडदे, कपडे वगैरे धुणें इत्यादि नेहमींचीं घरचीं कामें करण्याचें प्रत्यक्ष शिक्षण शाळेंतील मुलींना देण्यासाठीं आम्ही ही सोय केली आहे. उद्यां लग्न झाल्यावर आपलें स्वतःचें घर करून राहण्याची पाळी जेव्हां या मुलींवर येईल तेव्हां कोणत्याहि बाबतींत माझ्या मुली अडून राहणार नाहींत."

या शाळेंत सात ते बारा इयत्ता आहेत. परंतु अकराव्या व बाराव्या इयत्तेंत सहसा मुली नसतातच. मुलींना शिशुसंगोपनाबाबत व मातृत्वाबाबतची माहिती शाळेंत दिली जाते. प्रत्येक मुलीला शिवण आलेंच पाहिजे, असा शाळेचा कटाक्ष आहे. एका वर्षांत एका मुलीला सर्वसाधारणपणें तीन कपडे तरी शिवावे लागतात. शिवण्यासाठीं लागणारें साहित्य मुलीच आणतात व त्यापासून तयार झालेला माल त्यांच्याच मालकीचा असतो. या शाळेंत शिकविणाऱ्या सर्व शिक्षिकाच

होत्या; बहुतेक अगदीं तरुण होत्या. इतक्या चांगल्या शिक्षिका मिळाल्याबद्दल मीं त्या मुख्याध्यापिकेचें अभिनंदन केलें.

या शाळेचें आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथील बहुतेक मुली शरीरप्रकृतीनें चांगल्या दिसल्या. याबाबत प्रश्न विचारतां त्या बाई म्हणाल्या, "या मुलींची वरचेवर शारीरिक तपासणी केली जाते. सरकारी आरोग्यखात्यामार्फत हें काम केलें जातें. जरूर त्या मुलीवर तावडतोब औषधोपचार पण केले जातात. आमच्या मुलींचे दांत पण वरचेवर तपासले जातात. ज्या मुलींना वैद्यकीय उपचारांची गरज असते, त्यांना सरकारमार्फत सर्व मदत मिळवून देण्याची आम्ही व्यवस्था करतों. शाळेंतील सर्व मुलींना फुकट दूध पुरविलें जातें व त्यामुळेंच येथील सर्व मुलींची प्रकृति इतकी चांगली दिसते."

या मुख्याध्यापिकेचा आत्मविश्वास व तिची ध्येयनिष्ठा, येथील शिक्षिकांचा व विद्यार्थिनींचा अपरिमित उत्साह, सर्वांच्या तोंडावरून ओसंडून जाणारा आनंद व शाळेचें एकंदरीत मन प्रफुल्लित करणारें वातावरण पाहून एक चांगली शाळा पाहिल्याच्या आनंदांत आम्ही निवासस्थानीं परतलों.

८ फेब्रुवारी ५२

सकाळीं शिक्षणखात्याच्या कार्यालयांत जाऊन आणखी कांहीं माहिती मिळविली. दुपारचें जेवण एका चिनी हॉटेलांत घेतलें. येथें आल्यापासून ज्या ज्या वेळीं रुचिपालट करावीशी वाटते, त्या त्या वेळीं या चिनी हॉटेलांत जेवायला जाण्याचा उपक्रम आम्हीं सुरू केला आहे. त्यांच्या कांहीं पदार्थांचीं नांवें आतां माहितीचीं झालीं आहेत. त्यामुळें नेमकें काय मागवावें हें आतां नीट समजूं लागलें आहे. लहानपणापासून या चिनी लोकांबद्दल बरेचसे गैरसमज आम्हीं उराशीं बाळगले आहेत. हे लोक वाटेल ते प्राणी खातात, असें आम्ही ऐकत आलों. त्यामुळें प्रारंभीं प्रारंभीं या हॉटेलांत जेवतांना थोडी भीति वाटत असे; परंतु आतां परिचय वाढत गेल्यामुळें गैरसमज दूर होऊं लागले आहेत. ऑस्ट्रेलियांत खूप चांगले मासे मिळतात. येथील कोंबड्या पण चांगल्या आहेत. मी तर सामिष आहार, विशेषतः मासे आवडीनें खात असल्यामुळें मधून मधून चिनी हॉटेलांत येऊन चवदार भोजनाचा आस्वाद घेण्यास उत्सुक असे. जेवणाचा कार्यक्रम आजहि चांगला झाला.

चारच्या सुमारास मिसेस हॉर्न् आम्हांस घेऊन मेलबोर्नमधील पार्लमेंटगृहाकडे निघाल्या. त्या ठिकाणीं आज एक कार्यक्रम होता. इंग्लंडचे बादशहा दिवंगत

झाले होते व राज्याचीं सूत्रें आतां एलिझाबेथ राणीकडे सुपूर्द करण्यांत आलीं होतीं. कार्यक्रमाला खूप लोक जमले होते व त्या सर्व लोकांच्या समोर ऑस्ट्रेलियाचे गव्हर्नर यांनीं एलिझाबेथ ही इंग्लंड, ऑस्ट्रेलिया इत्यादि देशांची राणी झाल्याचा जाहिरनामा वाचला. कार्यक्रम अगदीं छोटासा होता, परंतु अत्यंत गंभीर वातावरणांत तो पार पडला.

रात्रीं मेलबोर्नमधील प्रौढशिक्षण खात्यातर्फे एक नाटकाचा कार्यक्रम आंखण्यांत आला होता. तो पाहण्यासाठीं आम्ही बाहेर पडलों. मेलबोर्नपासून आठ एक मैल अंतरावर असलेल्या एका गांवीं हें नाटक होणार होतें. मूळचें कथानक चिनी वातावरणांतील होतें. परंतु नाटकाची भाषा इंग्रजी होती. नाटकाला तुफान गर्दी जमली होती. खास निमंत्रित पाहुणे म्हणून आम्ही नाटकास हजर राहिलों. एवढ्या गर्दीतसुद्धां आमची व्यवस्था चांगली करण्यांत आली होती. नटनटींनीं आपापलीं कामें उत्कृष्ट केलीं. नाटक आम्हांस खूप आवडलें. नाटक पाहात असतांना माझ्या शेजारीं बसलेल्या प्रौढ शिक्षणाधिकाऱ्यांनीं या उपक्रमाबद्दल फारच उद्बोधक माहिती सांगितली.

ऑस्ट्रेलियांतील नाटक कंपन्या आपले खेळ बहुधा शहरांतूनच करतात. खेड्यामध्यें वस्ती तुरळक असल्यामुळें खाजगी नाटक कंपन्यांना खेड्यांत जाऊन आपलीं नाटकें करणें परवडत नाहीं. खेड्यांतील लोकांना तर सांस्कृतिक कार्यक्रम नेहमीं हवे असतात. लोकांची ही गरज लक्षांत घेऊन येथील प्रौढशिक्षण खात्यामार्फत एक फार चांगला उपक्रम चालविलेला आहे. त्यांनीं फिरत्या थिएटराची योजना आंखली आहे. या खात्यामार्फत नटनटींना नोकरीवर घेण्यांत आलें आहे. त्यांच्याकडून एखादें नाटक बसवून घेतलें जातें व त्या नाटकाचे कार्यक्रम निरनिराळ्या गांवांतून केले जातात. आपल्या गांवीं हा कार्यक्रम केव्हां होणार आहे, याची कल्पना लोकांना आगाऊ देण्यांत येते. साधारणपणें येथील प्रत्येक गांवांतून एखादें सभागृह असतेंच. नसलें तर तेथें एखादी शाळा असते व त्या शाळेंत मोठा दिवाणखाना असतो. या ठिकाणीं नाटकाचा प्रयोग होतो. स्थानिक लोक नाटकाचीं तिकिटें मोठ्या उत्साहानें खपवितात. जें उत्पन्न होईल, त्यापैकीं खर्च वजा जातां निम्में उत्पन्न प्रौढशिक्षण खात्याकडे जातें व बाकीचें अर्धें स्थानिक लोकांकडे जातें.

नाटकाचा प्रयोग होण्याच्या आधीं प्रौढशिक्षण खात्यातर्फे एखादा अधिकारी त्या गांवीं जातो व गांवकऱ्यांची सभा घेतो. आपल्या आगामी प्रयोगाची तो माहिती

सांगतो व जमलेल्या लोकांमधून नाट्यप्रेमी लोकांचें एक नाट्यमंडळ स्थापन करतो. याच मंडळाकडे वर सांगितलेला निधी सोपविला जातो. ज्या नाटकाचा प्रयोग व्हावयाचा असेल, तें नाटक जर छापलेलें असेल तर त्या नाटकाच्या वीसपंचवीस प्रती तो या नाट्यमंडळाच्या स्वाधीन करतो. हेतु हा कीं, प्रयोग होण्यापूर्वी कांहीं लोकांनीं तरी तें नाटक नीट वाचलेलें असावें. नाटकाचा प्रयोग झाल्यावर आठपंधरा दिवसांच्या आंतच तो प्रौढशिक्षणाधिकारी पुन्हां त्या गांवीं येतो. झालेल्या प्रयोगाबाबत तो त्या नाट्यमंडळांतील सभासदांशीं चर्चा करतो. अशा प्रकारचें दुसरें नाटक स्थानिक नाट्यमंडळानें करावें, अशी सूचना पण केली जाते. सदर प्रौढशिक्षणाधिकारी स्थानिक लोकांना अशा प्रकारचे प्रयोग करण्याबाबत सर्व प्रकारचें सहकार्य द्यायला तयार असतात.

आजचा नाट्यप्रयोग सुरू होण्याच्या सुमारें तासभर आधीं आम्ही या ठिकाणीं आलों. याच सुमारास नटनटींना घेऊन प्रौढशिक्षण खात्याची बस आली. पांच मिनिटांच्या आंत सर्व मंडळी कामाला लागली. रंगभूमीची सजावट करण्याचें काम या नटनटींनींच केलें. पडदे टांगण्यासाठीं खिळे ठोकण्यापासूनचीं हलकींसलकीं कामें त्यांनींच केलीं. एका बाजूला रंगभूमि सजविली जात होती, तर त्याच वेळीं हें काम करतां करतां नटनटींची वेषभूषा चालली होती. कोणत्याहि प्रकारचा खोटा अहंकार न बाळगतां हे नट व विशेषतः या नटी हीं कामें करतांना पाहून आम्हांला खूपच आश्चर्य वाटलें. कांहीं स्थानिक लोकसुद्धां एकंदर सजावट लवकर व्हावी म्हणून या लोकांना लागेल ती मदत करण्यासाठीं धडपडत होते.

या प्रयोगांबाबत बोलतांना वरील अधिकारी म्हणाले, " आमचे हे प्रयोग लोकांना खूपच आवडतात. त्यांची तक्रार एकच असते. ते म्हणतात, ' तुम्ही वर्षांतून एकच प्रयोग आम्हांला दाखवितां व बाकीचें राहिलेलें वर्ष तुमच्या प्रयोगाची आतुरतेनें वाट पाहण्यांत आम्हांस घालवावें लागतें. ' यावर आम्ही लोकांस असें सांगतों कीं, तुम्ही धंदेवाईक नटनटींवर अवलंबून राहतां कामा नये. तुमच्यापैकीं कांहीं लोकांमध्यें नाट्यगुण असतीलच. तुम्ही तुमचें नाट्यमंडळ स्थापन करून वर्षांतून एकदोन प्रयोग तरी करायला तयार झाले पाहिजे. याबाबत तुम्हांला लागणारी मदत द्यायला आम्ही सदैव तयार आहोंत.

" ऑस्ट्रेलियामध्यें कामाचे तास कमी झाल्यापासून लोकांना भरपूर सवड मिळूं लागली आहे. या फुरसतीच्या वेळेचा सदुपयोग करायला लोकांना शिकविणें, हें

अनुक्रम २२११८ दि. ३-४ क्रमांक २२८ नों: दि

प्रौढशिक्षण कार्यकर्त्यांचें एक महान् कर्तव्य आहे. नाटक लोकांना खूप आवडतें. नाटक हें लोकशिक्षणाचें एक महत्त्वाचें साधन आहे. खेड्यापाड्यांतून पसरलेल्या लोकांना नाटकासारखे सांस्कृतिक कार्यक्रम पाहण्याची संधि मिळवून देण्याची व्यवस्था आमच्या प्रौढशिक्षण खात्यातर्फे करण्यांत आली आहे. 'कम्युनिटी आर्टस् सर्व्हिस्' असं या योजनेचें नांव आहे. आजचा नाट्यप्रयोग या ह्या योजनेचाच एक भाग आहे."

नाटकाचा प्रयोग संपला व नटनटींनीं पुन्हां सर्व सामान आवरायला सुरुवात केली. प्रत्येक व्यक्ति दिसेल तें काम मोठ्या उत्साहानें करीत होती. अर्ध्यापाऊण तासाच्या आंतच आवराआवर झाली. नटनटींनीं तोंडाला लावलेले रंग पुसले, कपडे बदलले व कॉफी घेण्यासाठीं ते एकत्र जमले. त्यांच्याबरोबर प्रौढशिक्षणाधिकारी व आम्ही पाहुणे कॉफीपानाला हजर राहिलों. आजचा कार्यक्रम फार चांगला झाला. रात्रीं दीडच्या सुमारास आम्ही स्वस्थानीं परत आलों.

९ फेब्रुवारी ५२

आज सुट्टी होती. कपडे धुण्याचा साप्ताहिक कार्यक्रम उरकला. दुपारीं मिस्टर रामचंद्रन् यांच्या बरोबर बाहेर पडलों. ते डॉ. विश्वास नांवाच्या एका बंगाली गृहस्थाकडे मला घेऊन गेले. डॉ. विश्वास कलकत्ता विश्वविद्यालयांत शास्त्राचे प्राध्यापक आहेत. ते फिजिक्सचें उच्च शिक्षण घेण्यासाठीं येथें आले होते. ते विद्यार्थी म्हणून आले, परंतु या शास्त्रांतील त्यांची प्रगति पाहून त्यांना येथें प्राध्यापक म्हणून नेमण्यांत आलें. त्यांच्याबरोबर गप्पा मारण्यांत आम्हीं बराच वेळ घालविला.

१० फेब्रुवारी ५२

आज रविवार. पाऊस सारखा पडत होता. त्यामुळें बिछान्यांत पडून पुस्तक वाचण्यांतच मौज वाटत होती. चारच्या सुमारास भारतीय विद्यार्थ्यांच्या स्थानिक संस्थेनें ठरविलेल्या एका कार्यक्रमाला आम्ही हजर राहिलों. या लोकांनीं कांहीं भारतीय वार्तापट मिळविले होते, ते आम्हीं पाहिले. या ठिकाणीं कार्यक्रमानंतर एक गोरा पाद्री आम्हांला भेटला. आमच्यापैकीं कोणाला मराठी येतें का याचा त्यानें तपास केला. आम्हां चौघांपैकीं मराठी जाणणारा मी एकटाच होतों. त्यामुळें माझ्याकडे वळून तो म्हणाला, "मराठी बोलणारे गृहस्थ फार वर्षांनीं भेटल्यामुळें मला खूप संतोष होत आहे." प्राथमिक शाळेंत मुलांना ज्या प्रकारें शुद्धलेखन घालण्यांत येतें, त्याच थाटांत त्यानें वरील वाक्य उच्चारलें. त्याच्याशीं बोलतांना मला संभ

आढळून आलें कीं, सदर गृहस्थ सुमारें दहापंधरा वर्षांपूर्वी भारतांतून परत आला होता. महाराष्ट्रांतील एका मिशनमध्यें त्यानें वीस वर्षें काम केलें होतें. वीस वर्षें मराठी भाषा सतत वापरल्यामुळें या भाषेबद्दल एक प्रकारची आपुलकी त्याला वाटत होती. गेल्या दहापंधरा वर्षांत मराठी बोलण्याची त्याला संधी मिळाली नव्हती. आज ती त्याला मिळाली व त्यामुळें त्याला खूपच आनंद झाला.

१२ फेब्रुवारी ५२

आज येथील रेडक्रॉस सोसायटीनें मनोविकृति झालेल्या लोकांसाठीं चालविलेल्या एका केंद्राला मीं भेट दिली. या ठिकाणीं असलेले लोक साफ वेडे नव्हते. परंतु आयुष्यांत कांहीं विशेष अप्रिय घटना घडल्यामुळें त्यांच्या डोक्यावर परिणाम झालेला होता. या ठिकाणीं असलेले मानसशास्त्रज्ञ या रोग्यांची संपूर्ण माहिती मिळवून त्यांची विकृति नाहींशी करण्याचा प्रयत्न करीत होते. या लोकांना एखाद्या कलेमध्यें अथवा हस्तव्यवसायांत मन गुंतवायला प्रोत्साहन दिलें जात होतें. आठवड्यांतून एकदां येथें एक अभिनव कार्यक्रम केला जातो. येथें असलेल्या व्यक्तीच्या आयुष्याला असें विपरित वळण लावणारी घटना येथील डॉक्टरांच्या परिचयाची असते. या घटनेवर तो एखादें कथानक रचतो व सदर कथानकाचें नाट्यीकरण या लोकांच्या मदतीनें केलें जातें. सदर कथानक कोणाच्या आयुष्यावर आधारलेलें आहे, हें सांगण्यांत येत नाहीं. ती गोष्ट अगदीं गुप्त ठेवण्यांत येते. या नाट्यप्रयोगाला इंग्रजींत ‘ सायकोड्रामा ’ Psycho Drama म्हणतात. प्रयोग झाल्यावर त्या प्रयोगांत घडलेल्या घटनांवर सदर डॉक्टर व जमलेले रोगी चर्चा करतात. ही चर्चा खूप रंगते. ज्याच्या आयुष्यांत ही घटना घडलेली असते व त्यामुळें ज्याला मानसिक विकृति आलेली असते, त्याच्या मनावर अशा चर्चेचा फार चांगला परिणाम होतो. अंतर्मुख होऊन तो त्याबाबत विचार करूं लागतो व हळूहळू त्याची विकृति कमी होऊं लागते. येथें जे रोगी होते, त्यांपैकीं बहुसंख्य लोक चांगले तरुण होते. प्रेमभंग झाल्यामुळें अथवा पत्नीशीं वारंवार कलह होत असल्यामुळें, अथवा पत्नीनें घटस्फोट घेतल्यामुळें, यांपैकीं कांहीं लोक आज या स्थितींत होते. या ठिकाणीं प्रत्येक रोग्याला खूपच सहानुभूतीनें वागविलें जात होतें व प्रत्येक रोग्याकडे वैयक्तिक लक्ष पुरवून त्यांच्यावर उपचार केले जात होते.

१३ फेब्रुवारी ५२

सकाळीं मिसेस हॉर्न यांच्या बरोबर एक शाळा पाहण्यास गेलों. ही शाळा विशिष्ट प्रकारच्या मुलांसाठीं चालविली जाते. आस्ट्रेलियात सात वर्षांचें प्राथमिक

शिक्षण सक्तीचें असल्यामुळें सात ते चौदा वयाच्या सर्व मुलांना शाळेंत आणण्याचा प्रयत्न केला जातो. सर्वसाधारण बुद्धिमत्तेची मुलें प्राथमिक शाळेंत जातात. ज्यांचा बुध्यंश ( I. Q. ) सत्तर ते नव्वद असतो त्यांना Opportunity Grades School मध्यें पाठवितात. या शाळेची माहिती मागें आली आहेच. परंतु ज्या मुलांची बुद्धिमत्ता पन्नास ते सत्तर बुध्यंश ( I. Q. ) इतकीच आहे, अशा मुलांनीं शिक्षणावांचून राहूं नये म्हणून त्यांच्याकरितां खास शाळा येथें चालविल्या जातात. या मुलांच्या कुवतीला झेपेल असें शिक्षण अशा शाळांतून त्यांना दिलें जातें. असें करण्यांत हेतु हा आहे कीं, या मुलांचा पण समाजाला योग्य तो उपयोग व्हावा; निदान त्यांचा समाजावर बोजा कमींत कमी पडावा.

या शाळेंतील मुलें बुद्धिमत्तेनें फार कमी आहेत. हीं मुलें स्वतः होऊन शाळेंत येऊं शकत नाहींत. त्यांना नीट सांभाळून शाळेंत आणावें लागतें. या शाळेचें नांव ' मॉंटेग्यु स्पेशल हायस्कूल ' असें आहे. शाळा सरकारी आहे. ती १८८८ सालीं स्थापन झाली. मुलांप्रमाणें मुलीसुद्धां शाळेंत घेतल्या जातात. मुलांना आणण्या-नेण्यासाठीं दोन बसेस ठेविल्या आहेत. रोज मुलांना नेण्या-आणण्याचें काम एका अधिकाऱ्याकडे सोंपविलें आहे. जसजसा अनुभव येत गेला, तसतसा येथील अभ्यासक्रम बदलत गेला. या मुलांना क्रमिक विषयाचें शिक्षण फारच थोडें दिलें जातें. खेळ, गाणीं व हस्तव्यवसाय यांवरच मुख्य भर दिला जातो. हस्तव्यवसायांत-सुद्धां सुतारकीलाच प्राधान्य दिलें जातें.

आज या शाळेंत ८३ मुलें आहेत. सरकारनें निरनिराळ्या शाळांतून हीं मागासलेलीं मुलें येथें निवडून पाठविलीं आहेत. कांहीं मुलें पालकांनीं पाठविलीं आहेत. या मुलांवर वैयक्तिक देखरेख ठेवावी लागते व म्हणून या ८३ मुलांकरितां या शाळेंत १० शिक्षकांची नेमणूक करण्यांत आली आहे. या सर्व शिक्षकांनीं मानसशास्त्राचें विशेष शिक्षण घेतलेलें आहे. कांहीं समाजसेवक या शिक्षकांना नेहमीं मदत करीत असतात. मनोविकृति असलेल्या या मुलांचें घरगुती वातावरण शिक्षकांना संपूर्णपणें माहीत असणें जरूर असतें. या मुलांच्या पालकांसंबंधीं व घरांसंबंधीं जास्तींत जास्त माहीती हे समाजसेवक गोळा करतात. त्या माहितीचा योग्य उपयोग करून घेऊन शिक्षक त्या मुलांना सुधारण्याचा प्रयत्न करतात.

वरचेवर डॉक्टर येऊन या मुलांची तपासणी करतात. त्यांच्यावर जरूर ते उपाय करण्याची व्यवस्था डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणें सरकारमार्फत केली जाते. यांपैकीं

बरीचशीं मुलें मला तर शुद्ध वेडीं वाटत होतीं. आमच्याकडे आम्ही या मुलांच्या पाठीवर ' वेडीं ' असा शिक्का मारून त्यांना नक्कीच वाळींत टाकिलें असतें. यांपैकीं कांहीं मुलांचा बुध्यंश तर फक्त ३०।३५ च होता. मीं त्या बाईंना विचारलें, "यांपैकीं दोन तीन मुलें तरी मार्गाला लागतील का ?" त्या बाई म्हणाल्या, "येथील अभ्यासक्रम झाल्यावर पुष्कळ मुलें आपापल्या पायांवर उभीं राहूं शकतात. त्यांना कांहींतरी काम मिळवून देण्याची व्यवस्था आम्ही करतों. एखाद्या गवंड्याच्या हाताखालीं किंवा एखाद्या दुकानदाराच्या हाताखालीं हीं मुलें नीट काम करूं शकतात. ज्या विभागांत आमची शाळा आहे, त्याच विभागांत मोजे तयार करण्याच्या गिरण्या आहेत. यांपैकीं कितीतरी मुलामुलींना तेथें नोकरी मिळूं शकते. यांपैकीं कांहीं मुलांमुलींचीं लग्नें झाल्याचें पण मला माहीत आहे."

आतां शाळेंत मुलें जमलेलीं आहेत. एका मुलानें जोरजोरानें घंटा वाजवली. सर्व मुलें शाळेंतील अंगणांत जमलीं. मुलांना आपल्या वर्गांत पाठविण्यापूर्वी प्रथम त्यांना सर्वांना एकत्र आणलें जातें. सर्व शिक्षक व शिक्षिका या वेळीं हजर असतात. मुलांचीं नखें स्वच्छ आहेत का, त्यांचे दांत, कान, नाक साफ आहे कीं नाहीं इत्यादि गोष्टींची कसोशीनें पाहणी केली जाते. वर्गांत जाण्यापूर्वी प्रत्येक मुलानें आपलें नाक दोनतीन वेळां साफ करून मग वर्गांत जावयाचें असतें. हा सर्व कार्यक्रम आम्ही पाहात होतों. मुलें वर्गांत गेलीं व बाई मजजवळ येऊन म्हणाल्या, "या मुलांना सांगितलेल्या गोष्टी त्यांच्या ध्यानांत राहात नाहींत. त्या वरचेवर त्यांना करायला लावल्या तर हळूहळू संवयीमुळें त्या गोष्टी हीं मुलें नीट करूं शकतात."

"या मुलांना शिकविणें खूप कष्टाचें व जिकिरीचें असेल, नाहीं ?" मी म्हणालों. "तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें हें काम खरोखरच फार कष्टाचें आहे; पण ही दीनदुबळ्यांची सेवा आहे. आम्ही जर यांच्याकडे सहानुभूतीनें पाहिलें नाहीं, त्यांना जर नीट शिकविलें नाहीं, तर भावी आयुष्यांत त्यांना सुख व समाधान कसें लाभेल ?" बाई म्हणाल्या.

येथील शिक्षक मोठे ध्येयवादी दिसले. शिक्षक व शिक्षिका तरुण असूनसुद्धां अगदीं न कंटाळतां या मुलांच्या बरोबर मोठ्या आनंदानें वावरत होते. शाळा पाहून झाली व परत जाण्यासाठीं स्टेशनचा रस्ता मीं त्या बाईंना विचारला. त्यांनीं एका मुलाला बोलावलें. तो मुलगा आला. त्या म्हणाल्या,

" जॉन पाहुण्यांना स्टेशनवर घेऊन जा. " वेडसर दिसणाऱ्या त्या मुलाला पाहून मीं बाईंना विचारलें, " मला स्टेशनवर पोहोंचविल्यावर तुमचा जॉन सुखरूप परत येईल ना " ? बाई म्हणाल्या, " त्याची काळजी नको. आमच्या जॉनला मेलबोर्नचे सारे रस्ते आतां पाठ झाले आहेत. नाहीं का रे जॉन् ? " जॉन थोडा लाजला व ' हो ' म्हणाला. नंतर जॉननें आम्हाला स्टेशनवर नीट आणून सोडलें व तो हस्तांदोलन करून परत गेला. वेड्यांना शहाणे करून सोडणारी ही शाळा तर मला आवडलीच, पण त्या वेड्यांशीं इतक्या आपुलकीनें व प्रेमानें वागणाऱ्या त्या शिक्षक–शिक्षिकांना मीं मनांतल्या मनांत खूप धन्यवाद दिले.

१४ फेब्रुवारी ५२

आजचा सारा दिवस कांहीं शिशुगृहें पाहण्यामध्यें गेला. या शिशुगृहांत मुलांना फार चांगल्या रीतीनें वागविलें जातें. कुमारी टेलर बरोबर होत्या. आमच्याशीं बोलतांना चारपांच वेळां त्यांनीं आपल्या नवऱ्याचा उल्लेख केला. बाईचें नांव तर कुमारी टेलर; ही सारखी ' माझा नवरा ' म्हणून उल्लेख करते. हें गौडबंगाल आहे तरी काय ? शेवटीं धीर करून मीं तिला विचारलें, "आपण कुमारी टेलर कीं सौभाग्यवती टेलर ?" ती म्हणाली, " मी कुमारी टेलर असेंच नांव लावतें; परंतु माझें लग्न झालेलें आहे. " ऑस्ट्रेलियामध्यें अशी पद्धत आहे कीं, लग्न झाल्यावर सुद्धां मुलीची इच्छा असल्यास, तिला आपलें माहेरचें नांव कायम ठेवतां येतें. लग्नानंतर आपलें नांव बदलायचें किंवा नाहीं हें बहुधा लग्नापूर्वींच ती मुलगी आपल्या भावी वराशीं चर्चा करून ठरविते.




पूर्व प्राथमिक शाळेतील चित्रकार

फार दिवसांत घरून पत्र न आल्यामुळें व येथील जेवणाचाहि कंटाळा आल्यामुळें आतां घराकडे लक्ष लागूं लागलेलें आहे. आतां संस्था पाहण्यापलीकडे फारसा कार्यक्रम राहिलेला नाहीं. आज दुपारीं न्यूझिलंड सरकारचें आम्हांला आमंत्रण

आलें आहे. याबाबत भारत सरकारला पण न्यूझिलंड सरकारनें पत्र पाठविलें आहे. भारत सरकारची संमती आल्यास आम्हांला न्यूझिलंडला पाठविलें जाईल, अशी माहिती मिळाली.

१५ फेब्रुवारी ५२

मेलबोर्न नगरपालिकेनें चालविलेल्या कांहीं संस्था पाहिल्या. त्यांपैकीं बऱ्याचशा संस्था लहान मुलांकरितां चालविलेल्या होत्या. कांहीं शिशुगृहें होतीं. कांहीं क्रीडा-केंद्रें होतीं. येथील स्त्रियांना पुरुषांप्रमाणेंच दिवसभर नोकऱ्या कराव्या लागतात. त्यामुळें मुलांची काळजी घेणें त्यांना शक्य नसतें. हें काम सार्वजनिक संस्थांच्या मदतीनें नगरपालिका करीत असते. हीं सर्व मुलें शिशुगृहांत आणलीं जातात. परिचारिकांच्या मदतीनें त्यांची काळजी घेतली जाते. मुलांना दूध अथवा जेवण देण्याची व्यवस्था केली जाते. मुलांचें मनोरंजन करण्यासाठीं भरपूर खेळणीं ठेवलेलीं असतात. त्यामुळें मुलें येथें खूप आनंदांत राहतात.



सार्वजनिक क्रीडांगणांत खेळणारीं मुलें—

१६ फेब्रुवारी ५२

आज शनिवार. शाळा बंद. तेव्हां साहजिकच आज विश्रांति भरपूर मिळाली. शनिवारीं बोलपटगृहें चालू असतात. या बोलपटगृहांतून कांहीं वार्तापट दाखविले जातात. हा कार्यक्रम एका तासाचा असतो. नेहमींच्या आकारापेक्षां हे वार्तापट पाहायला आकार पण कमी पडतो. आपले पैसे खर्चून दोनतीन तास काळोखांत बसून बोलपट पाहण्याचा मला नेहमींच कंटाळा येतो. एक तासाचा सिनेमा पाह-ण्याची ही कल्पना मला फार आवडली. कार्यक्रम मीं आंत जाऊन पाहिला व तो मला आवडला. थोडा वेळ होता म्हणून एका म्युझियममध्यें गेलों. त्या ठिकाणीं इतर जें पाहिलें तें फारसें महत्त्वाचें नव्हतें; परंतु आठवणींत राहतील अशा दोन वस्तू मीं पाहिल्या. त्या म्हणजे हातबेड्या व पायबेड्या. पूर्वी ज्या वेळीं ब्रिटिश लोक आपले कैदी ऑस्ट्रेलियांत पाठवीत असत त्या वेळीं या भयंकर बेड्यांनीं त्या कैद्यांना

जखडून टाकण्यांत येत असे. स्वतःला सुधारलेले समजणारे हे इंग्रज लोक आपल्याच बांधवांशीं किती क्रूरतेनें वागत, याची कल्पना या वेड्यांनीं आली.

१७ फेब्रुवारी ५२

आज रविवार. पाऊस सारखा पडत होता. बिछान्यांत पडून कादंबरी वाचणें एवढाच उद्योग होता. जेवणाच्या वेळीं आमच्या निवासस्थानीं राहणारा एक चिनी मुलगा व एक ऑस्ट्रेलिअन् आमच्याजवळ येऊन म्हणाला, " आज दुपारीं तुम्हाला वेळ असेल तर आपण येथील चर्चमध्यें जाऊं या. आज तेथें सहाव्या जॉर्ज बादशहाच्या स्मरणार्थ उपासना आहे. तुमची जर हरकत नसेल तर तुम्ही उपासनेला जरूर हजर राहा. पण आम्ही तुम्हाला जें बोलावतों, तें त्यानंतरच्या दुसऱ्या एका कार्यक्रमाकरितां. उपासनेनंतर आमची एक युवक संघटनेची सभा आहे. त्या सभेला आपण हजर राहा व भारताबद्दल आम्हांला दोन शब्द सांगा." आम्हीं त्यांची विनंती आनंदानें मान्य केली. पांचच्या सुमारास आम्ही त्यांच्याबरोबर चर्चमध्यें गेलों. हें मेथॉडिस्ट पंथाचें चर्च होतें. धर्मोपदेशकानें उपासना चालविली. त्यानंतर युवक संघटनेची सभा सुरू झाली. जमलेल्या लोकांनीं भारताबद्दल आम्हांला प्रश्न विचारले व आम्ही तिघाचौघांनीं त्यांना उत्तरें दिलीं. त्यानंतर उपाहाराचा कार्यक्रम झाला.

१८ फेब्रुवारी ५२

येथील Y. M. C. A. व Y. W. C. A. या संस्था पाहण्यासाठीं आज आम्ही गेलों होतों. त्या ठिकाणीं मिस् लॉ या नांवाची एक बाई भेटली. या बाईनें अगदीं अलीकडेच भारताला भेट दिली होती. मुंबई–कलकत्त्यासारखीं मोठीं शहरें जवळ जवळ सर्व प्रांत फिरून तिनें पाहिलीं होतीं. शांतिनिकेतन-सारख्या संस्थांना तिनें भेट दिली होती. जवाहरलाल नेहरू, विजयालक्ष्मी पंडित, यांसारख्या भारतीय पुढाऱ्यांशीं तिचा परिचय झाला होता. माझ्यापेक्षां भारतांतील प्रमुख स्थळें तिनें जास्त पाहिलीं होतीं. या बाईनें वर उल्लेखिलेल्या त्यांच्या कार्याविषयीं माहिती सांगितली व भारताबाबत आम्हांस अनेक प्रश्न विचारून भारताबद्दलच्या आपल्या माहितीला उजळा देण्याचा प्रयत्न केला.

१९ फेब्रुवारी ५२

आज एका छोट्याशा शाळेंतील मुलांच्या पार्लमेंटच्या कार्यक्रमाला हजर राहिलों. लहान लहान मुलें आपापल्या भूमिका फार चांगल्या रीतीनें वठवीत होतीं. या पार्लमेंटसमोर श्रीयुत रॉयनें व मीं दोन शब्द सांगितले.

आज संध्याकाळीं युनेस्कोच्या स्थानिक शाखेनें आम्हांला चहाला बोलाविलें होतें. या प्रसंगीं चुरीदार पायजमा, काळी शेरवानी व गांधी टोपी असा संपूर्ण भारतीय पोशाख मीं परिधान केला होता. निवासस्थानापासून सभास्थानीं जाई-पर्यंत अनेक लोक या पोशाखाकडे टक लावून पाहात होते. सभास्थानीं गेल्यावरसुद्धां कित्येकांनीं या पोशाखाबाबत मला प्रश्न विचारले. हा राष्ट्रीय पोशाख आहे, असें मीं त्यांना सांगितलें. या ठिकाणीं आमचीं छायाचित्रें घेण्यांत आलीं. निवास-स्थानीं परत आल्यावर आमच्या गेस्टहाऊसच्या चालिका मिसेस लॅम्परिल व त्यांचे यजमान यांनीं या पोशाखाचें कौतुक केलें व मुद्दाम कॅमेरा आणून छायाचित्रें घेतलीं.

२० फेब्रुवारी ५२

आज येथील युनिव्हर्सिटी सेकंडरी स्कूल नांवाच्या शाळेला भेट दिली. विश्व-विद्यालयीन शिक्षण घेण्याची अपेक्षा बाळगणारे विद्यार्थीच या शाळेंत दाखल होतात. ऑस्ट्रेलियन परिभाषेंत या शाळेला 'Grammar School' असें म्हणतात. केवळ बौद्धिक विषयच येथें प्रामुख्यानें शिकवितात. हस्तव्यवसायाचें अथवा व्यापारविषयक शिक्षण येथें दिलें जात नाहीं. ज्यांना मॅट्रिकच्या परीक्षेला बसावयाचें आहे व पुढें विश्वविद्यालयीन शिक्षण घ्यावयाचें आहे तेवढेच विद्यार्थी या शाळेंत येतात. ज्या शिक्षकांना पुढें माध्यमिक शाळेंत काम करावयाचें आहे असे शिक्षक ज्या वेळीं ट्रेनिंगला येतात त्या वेळीं त्यांना या शाळेंतील विद्यार्थ्यांवर पाठ घ्यावे लागतात.

मुलगा नववींत गेला कीं तो या शाळेंत येऊं शकतो. दर आठवड्याला चाळीस तास व वर्षांतून ४० आठवडे या शाळेचें काम चालतें. प्रत्येक शिक्षकाला चाळीस तासांपैकीं अठ्ठावीस तास काम करावेंच लागतें. सर्व विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण दिलें जातें; परंतु हा विषय परीक्षेचा विषय म्हणून मानला जात नाहीं. शाळेंतील अभ्यासक्रमांत विश्वविद्यालयाच्या गरजेप्रमाणें फेरबदल केला जातो. शाळेंत एकूण ८२० मुलें आहेत. शिक्षकांचें प्रमाण पहिल्या दोनशें विद्यार्थ्यांपर्यंत वीस विद्यार्थ्यांना एक शिक्षक व दोनशेंच्या पुढें ३३ विद्यार्थ्यांना एक शिक्षक असें आहे.

शाळेंत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षण मोफत मिळतें, परंतु नापास होणाऱ्या विद्यार्थ्याला मात्र फी द्यावी लागते. शाळेच्या मुख्याध्यापकांनीं जर अशी

शिफारस केली कीं, नापास झाल्याबद्दल सदर विद्यार्थ्याला पूर्ण पश्चात्ताप होत आहे व आतां तो नीट सुधारूं शकेल, तर मात्र त्या मुलाला फीबाबत सवलत देण्यांत येते. फक्त निवडक मुलेंच शाळेंत येतात. शिक्षकांचें मुलांकडे वैयक्तिक लक्ष असतें. त्यामुळें फारच थोडीं मुलें नापास होतात.

शाळेचा एकूण दर्जा फारच चांगला आढळला. मुलें तरतरीत दिसलीं; प्रकृतीनें निकोप वाटलीं. शिस्त चांगली दिसली. मी .मुख्याध्यापकांना म्हणालों, "तुमची शाळा फार चांगली दिसते. सर्व गोष्टी तुम्हांला अनुकूल आहेत. तुम्हांला कांहीं अडचणी असूं शकतात का ?"

मुख्याध्यापक म्हणाले, "येथें सर्व कांहीं मनपसंत आहे असें तुम्ही मानूं नका. आम्हाला पण अडचणी आहेतच. आमची पहिली तक्रार अशी आहे कीं, शिक्षणावर सरकारनें जेवढा पैसा खर्चायला हवा तेवढा आज सरकार खर्च करीत नाहीं. याचा परिणाम असा झाला आहे कीं, आमच्या शिक्षकांना पुरेसें वेतन मिळत नाहीं. (ऑस्ट्रेलियांतील Skilled–जाणत्या–कामगारापेक्षां शिक्षकाचें मासिक वेतन सुमारें शंभर ते सव्वाशें रुपयांनीं कमी असतें.) आमची दुसरी तक्रार अशी आहे कीं, आमच्या शिक्षकांना आज जास्तींत जास्त मुलांना शिकवावें लागतें. त्यामुळें मुलांच्याकडे जितकें वैयक्तिक लक्ष द्यावें असें आम्हांला वाटतें, तितकें आम्ही देऊं शकत नाहीं."

शाळेंतील सर्व शिक्षक ट्रेंड आहेत. कांहींनीं पदवी घेतल्यावर ट्रेनिंग घेतलें आहे, तर कांहींनीं पदवी न घेतां दोन वर्षांचें ट्रेनिंग घेऊन डिप्लोमा मिळविला आहे. या शिक्षकांची एका प्रभावी संघटना आहे. शाळेंतील मुख्याध्यापक मला म्हणाले, "शाळेंत कोणतीहि गोष्ट करण्यापूर्वी मी त्याबाबत माझ्या शिक्षकांशीं विचारविनिमय करतों. त्यांना विश्वासांत घेऊनच आम्ही नव्या योजना आंखतों."

शाळेची तपासणी वर्षांतून एकदां होते. या वार्षिक तपासणीसाठीं जेव्हां सरकारी तपासणी–अधिकारी येतात, तेव्हां सर्व शिक्षक मोठ्या आशेनें त्यांच्या भेटीकडे डोळे लावून बसलेले असतात. शिक्षकांची वार्षिक पगारवाढ या तपासणी–अधिकाऱ्यांच्या रिपोर्टावर अवलंबून असते. सरकारी इन्स्पेक्टर प्रत्येक शिक्षकाचें वैयक्तिक काम पाहतात. त्या शिक्षकासंबंधीं जें जें कांहीं चांगलें त्यांना आढळून येतें त्याची ते लेखी नोंद करून घेतात व इन्स्पेक्शन् रिपोर्टांत त्याचा उल्लेख केला जातो. शिक्षकांच्या दोषांचा उल्लेख मात्र रिपोर्टांत मुळीं सुद्धां

केला जात नाहीं. दोषांचा उल्लेख व त्याबाबतची चर्चा शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या बरोबर इन्स्पेक्टर फक्त तोंडीं करतात.

आम्ही वर्गांतून हिंडून आलों. मुलांची तयारी एकंदरींत चांगली दिसली. शाळेचा दर्जा निःसंशय श्रेष्ठ दिसला. परंतु या चांगल्या शाळेंतसुद्धां एक गोष्ट मला खटकली. या मुलांशीं बोलतांना मला असें दिसून आलें कीं, भारताबद्दल या मुलांना फारशी माहिती नाहीं; जी आहे ती चुकीची आहे. आमच्या देशाबाबत भरपूर अज्ञान व गैरसमज या मुलांमध्यें पसरलेला आहे. ब्रिटिश साम्राज्यशाहीनें आपल्या वसाहतींतील लोकांबाबत केवढे भयंकर गैरसमज पसरविले होते, याची शाळांतून फिरतांना आम्हांला कल्पना आली. परदेशी लोकांचें आमच्याविषयींचें हें अज्ञान दूर करण्यासाठीं पद्धतशीर व संघटित प्रयत्न करणें अत्यंत जरूर आहे. परदेशांतील भारतीय वकिलातींनीं हा कार्यक्रम हातीं घ्यावा. भारताचें यथातथ्य वर्णन करणारे वार्तापट व बोलपट येथील मुलांना दाखविण्याची व्यवस्था व्हावी. त्याचप्रमाणें भारताबाबतचीं चित्रें व माहितीपत्रकें मुलांना पुरवावींत. शक्य असल्यास मुलांच्या पाठ्यपुस्तकांत भारताबाबत खरी माहिती देणारे कांहीं पाठ घातले जावेत.

येथील मुलांनीं आम्हांला विचारलेले प्रश्न पुढील स्वरूपाचे होते. "तुम्हांला सर्पांना वश करण्याची विद्या ( Snake Charming ) येते का ? तुम्हांला दोरीवरची कसरत (Rope walking) येते का ? हिंदी लोकांत एका वेळीं पुरुष पुष्कळ बायकांशीं लग्नें करतात, हें खरें का ? तुमचीं कितीं लग्नें झालेलीं आहेत ? तुम्ही कांहीं लोकांना अस्पृश्य म्हणून दूर ठेवतां ना ? तुमच्याकडील अन्नधान्याचा प्रश्न फारच बिकट झाला आहे, हें खरें का ? तुमच्या देशांतील मुलें कोणत्या प्रकारचे कपडे घालतात ? तुमचीं मुलें कोणती भाषा बोलतात ? मुलें कोणते खेळ खेळतात ? शाळेंत मुलें गणवेष घालतात का ? तो कसा असतो ?" नंतर एका धीट मुलानें विचारलें, " तुम्हीं ब्रिटिशांना घालवून दिलेंत. त्यांच्या मदतीवांचून तुम्हांला नीट जगतां येईल, असें तुम्हांस वाटतें का ? "

२१ फेब्रुवारी ५२

आज मिस्टर चिनरी या नांवाच्या गृहस्थाबरोबर माझी खास मुलाखत ठरविली होती. हे गृहस्थ येथील आदिवासी हितसंरक्षण खात्याचे मुख्य अधिकारी म्हणून कित्येक वर्षें काम करीत होते. आपल्या देशांतील आदिवासी लोकांच्यामध्यें सोळा

सतरा वर्षे मीं थोडेंबहुत काम केल्यामुळें या वन्य जमातीच्या प्रश्नांबाबत मला विशेष उत्सुकता वाटत होती. एके काळीं ऑस्ट्रेलियामध्यें हे आदिवासी (Aborigines) फार मोठ्या प्रमाणांत होते. आज त्यांची संख्या फारच घटलेली आहे. मिळालेल्या माहितीवरून आज या देशांत शुद्ध रक्ताचे असे सत्तेचाळीस हजार नऊशें-साठ (४७९६०) आदिवासी आहेत व संमिश्र वर्णाचे (२५३००) पंचवीस हजार तीनशें लोक आहेत. मेलबोर्न शहरांत इतक्या दिवसांत एकहि आदिवासी मला दिसला नाहीं. परंतु मेलबोर्नपासून कांहीं अंतरावरील एका खेड्यांत सडकेवर काम करणारे दोन आदिवासी मीं पाहिले. त्यांचे चेहरे ओबडधोबड होते. डॉ. चिनरी यांनीं आदिवासींबाबत मला पुढील माहिती सांगितली,



ऑस्ट्रेलियांतील एक आदिवासी

"आमच्या देशांतील प्रत्येक प्रांतीय राजानें आदिवासींच्या बाबतींत आपलें स्वतंत्र धोरण आखलेलें आहे. पूर्वी हे आदिवासी युरोपिअन लोकांपासून अगदीं दूर राहात असत. त्या वेळीं यांच्या उन्नतीसाठीं कोणीहि प्रयत्न करीत नसत. भूतदयेनें प्रेरित झालेल्या मिशनरी लोकांनीं प्रथम यांच्याकडे लक्ष दिलें. या लोकांनीं वन्य जमातीच्या या लोकांना कांहीं हस्तव्यवसाय शिकविण्याचा प्रयत्न केला. तत्पूर्वी हे लोक कांगारूंची शिकार करीत असत व कांगारूंचीं कातडीं विकून कांहीं पैसा मिळवीत. मिशनरी लोकांनीं जनावरांच्या चामड्यापासून कांहीं वस्तू तयार करण्याचें त्यांना शिक्षण दिलें. मिशनरी सोडले तर सर्वसाधारण गोऱ्या लोकांची त्यांच्याबाबतची वागणूक अत्यंत सहानुभूतिशून्य अशी होती. गोऱ्या लोकांशीं आलेल्या संपर्कामुळें यांचा फारसा फायदा झाला नाहीं; उलट तोटा मात्र झाला. स्वस्त दरानें मिळणारे मजूर म्हणून त्यांना भरपूर राबवून घेतलें जाई. त्यांच्या बायकामुलींशीं शारीरिक संबंध ठेवण्यांत आले. गोऱ्यांच्या सहवासामुळें दारू पिण्याचें व्यसन त्यांच्यामध्यें बळावत चाललें."

ही जमात नामशेष करण्याचे गोऱ्या लोकांनीं पद्धतशीर प्रयत्न केले. १९२८ ते १९३७ या काळांत आदिवासींची संख्या १३ टक्क्यांनीं घटली. १९४० सालीं

ही संख्या एक लाख होती. १९५२ सालीं ती ७३ हजारांवर आली. या बाबतींत ऑस्ट्रेलिअन कम्युनिटी नांवाच्या पुस्तकांत पुढील उद्गार काढले आहेत,

"The deplorable and shameful destruction of the aborigines has been brought about by no single process; but many of this primitive race have been destroyed deliberately and there is evidence to show that this callous brutality is not even to-day altogether a thing of the past."

मि. चिनरी पुढें म्हणाले कीं, "युरोपिअन लोकांच्यामध्यें आढळून येणारे दोष व व्यसनें यांपासून आदिवासी लोकांना दूर ठेवण्याच्या हेतूनें त्यांच्या नित्याच्या वातावरणांतच त्यांना ठेवणें जरूर आहे. त्यांच्या राहण्याच्या ठिकाणीं त्यांच्याकरितां कल्याणकारी योजना सुरू केल्या पाहिजेत. त्यांच्या मुलामुलींकरितां वसतिगृहें काढलीं पाहिजेत. आज मिश्रित रक्ताचे जे आदिवासी आहेत, त्यांपैकीं बहुतेकांचीं मुलें शाळेंत जातात; इंग्रजी पण चांगलें बोलतात. आदिवासी लोक शिक्षण घेऊं लागले आहेत व बुद्धिमत्तेच्या बाबतींत ते सर्वसाधारण लोकांसारखेच आहेत. नुकतीच एक आदिवासी मुलगी S. C. C. पास होऊन कॉलेजांत गेली आहे. ती शार्टहँड व टाइपराइटिंग पण चांगली शिकलेली आहे.

"सरकारचें आजचें धोरण भोंवतालच्या गोऱ्या समाजापासून आदिवासी लोकांना अलिप्त ठेवण्याचें नाहीं. त्याचप्रमाणें त्यांचा नायनाट करण्याचेंहि नाहीं; तर ऑस्ट्रेलियाच्या आजच्या वातावरणाशीं समरस होऊन गोऱ्या लोकांप्रमाणेंच या देशांत त्यांना सन्मानानें जगण्याची संधि देणें हें आजचें धोरण आहे. त्या दृष्टीनें त्यांच्याकरितां जेवढ्या सुखसोयी करतां येतील तेवढ्या करण्याचा सरकार प्रयत्न करीत आहे. त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था, राहण्याची व्यवस्था, करमणुकीची व्यवस्था व आरोग्यसंवर्धनाची व्यवस्था करण्याचा सरकार प्रयत्न करीत आहे. त्यांच्याकरितां इतर गोऱ्या लोकांसाठीं ज्याप्रमाणें कल्याणकारी योजनांचें जाळें या देशांत विणलेलें आहे, तोच फायदा आदिवासींना मिळवून देण्याचे प्रयत्न आज सरकारनें चालविले आहेत. त्यांच्याकरितां आदिवासी संरक्षण व संवर्धन कायदा १९३९ सालीं सुरू करण्यांत आला व १९४६ सालीं त्या कायद्यामध्यें इष्ट असे फेरबदल करण्यांत आले. या कायद्यांतील एका कलमाप्रमाणें आदिवासी लोकांना दारू पिण्याची सक्त मनाई करण्यांत आली आहे. मात्र या विभागाचे डायरेक्टर जरूर पडल्यास या अटींतून एखाद्याला मुक्त करूं शकतात."

आमची ही मुलाखत सुमारें तीन तास चालली व मि. चिनरी यांनीं अत्यंत खुल्या दिल्यानें व मोकळेपणानें मला जरूर ती माहिती दिली. त्यांचे मीं मनापासून आभार मानले व हा मुलाखतीचा कार्यक्रम संपला.

२२ फेब्रुवारी ५२

एका मुलींच्या शाळेला आज मीं भेट दिली. ९०० मुली या शाळेंत आहेत. ही शाळा एका चर्चमार्फत चालविली जाते. चर्चनें चालविलेल्या या खाजगी शाळांचा मगदूर फार चांगला असतो. सरकारी शाळेंत आपल्या मुली पाठविण्यापेक्षां या शाळांतून मुलींना पाठविणें पालक अधिक पसंत करतात. शाळेला जोडून एक वसतिगृह आहे. सुमारें १०० मुली या वसतिगृहांत राहतात.

आम्ही शाळेंत गेलों, तेंव्हां शाळेची मधली सुट्टी चालू होती. या सुट्टींत शाळेच्या विद्यार्थी–कौन्सिलची एक सभा चालू होती. या सभेच्या ठिकाणीं आम्ही गेलों व मागील बाकावर जाऊन बसलों. सभेचें काम आमच्या येण्यामुळें जरासुद्धां थांबलें नाहीं. कुमारी ॲना पेमेंटा या नांवाची एक मुलगी अध्यक्षस्थानीं बसली होती. इतर आठनऊ मुली सभासद म्हणून बसल्या होत्या. ॲनाच्या शेजारींच शाळेच्या मुख्याध्यापिका बसल्या होत्या. सभा गंभीरपणें मुलींकडून आलेल्या एका अर्जाचा विचार करीत होती. दुपारच्या सुट्टींत एका विशिष्ट जागीं दोरीवरून उड्या मारण्याला मुख्याध्यापिकेनें बंदी केली होती. ही बंदी उठवावी अशी मागणी अर्ज करणाऱ्या मुलींनीं केली होती. ॲनानें तो अर्ज वाचून दाखविला. तिनें इतर सभासदांचीं त्याबाबत मतें विचारलीं. नंतर तिनें मुख्याध्यापिकेला आपली बाजू मांडण्याची विनंती केली. त्या बाईनें गंभीरपणें आपल्या बंदी-हुकुमाच्या मागील भूमिका समजावून सांगितली. सर्वांचें बोलणें ऐकून घेतल्यावर अध्यक्ष ॲना म्हणाली, " आपल्या मोठ्या बाईनें केलेला खुलासा तुम्ही ऐकलांत. त्यावरून त्यांनीं काढलेला हा हुकूम सद्हेतूनें काढलेला आहे, हें स्पष्ट होतें. तथापि अर्ज करणाऱ्या मुलींची अडचण पण मला वाजवी वाटते. दुपारच्या रजेंत त्यांना खेळायला मिळालें पाहिजे. तो त्यांचा हक्क आहे. तुमची हरकत नसल्यास हा प्रश्न मी एका समितीकडे सोपवूं इच्छितें. मला वाटतें, अर्ज करणाऱ्या मुलींची एक प्रतिनिधी, विद्यार्थी–कौन्सिलची अध्यक्ष, म्हणजे मीं स्वतः व आपल्या मुख्याध्यापिका, अशा तिघांची ही समिति असावी व या समितीनें परस्पर–सहकार्यानें हा

प्रश्न सोडवावा. माझ्या सूचनेला कोणाचा विरोध आहे का ?" ॲनाची सूचना सर्वांनीं मंजूर केली. सभेचें काम संपलें. अत्यंत जबाबदारीनें व गंभीरपणानें ॲनानें ती सभा चालविलेली पाहून मला ॲनाबद्दल खूप कौतुक वाटलें. मुख्याध्यापिकेबरोबर आम्ही त्यांच्या खोलींत गेलों. त्यांनीं शाळेची थोडक्यांत माहिती सांगितली. त्यांनीं ॲनाला बोलावून घेतलें व तिची आणि आमची ओळख करून दिली. बाई ॲनाला म्हणाल्या, "ॲना, पाहुण्यांना शाळा दाखवावयाचें काम करशील ना ?" ॲना 'हो' म्हणाली. आमच्याकडे वळून बाई म्हणाल्या, "येणाऱ्या पाहुण्यांना शाळा दाखविण्याचें काम सध्यां ॲनाकडे आहे. आमच्या विद्यार्थी-कौन्सिलची ती प्रमुख आहे व त्यामुळें तो तिचा अधिकार आहे."

सुट्टी संपली व ॲनाच्या बरोबर आम्ही शाळा पाहावयाला निघालों. एखाद्या शाळेचे मुख्याध्यापक ज्या उत्साहानें, आपुलकीनें व शिताफीनें आपल्या शाळेचें वर्णन करतील, त्याच पद्धतीनें आपल्या शाळेबाबतची माहिती ॲना आम्हांला सांगत होती. एखादी शाळकरी पोरगी आपल्याशीं बोलते आहे, असें आम्हांला मुळींच वाटलें नाहीं. गेलीं तीन वर्षें ॲना शाळेमध्यें प्रिफेक्टचें काम करीत आहे. त्यामुळें ॲनामध्यें एवढा आत्मविश्वास आलेला आहे. यंदा ॲना मॅट्रिकच्या वर्गात आहे. हें तिचें शाळेंतील शेवटचें वर्ष आहे. मी ॲनाला म्हणालों, "पुढल्या वर्षी तुम्ही कॉलेजमध्यें जाणार असाल ?" ॲना म्हणाली, "नाहीं. नुसतें शिकत राहणें मला आवडत नाहीं. समाजाच्या उपयोगी पडण्यासाठीं शिक्षण घेणें मला आवडेल." "मग मॅट्रिक झाल्यावर पुढें तुम्ही कोणता अभ्यासक्रम हातीं घेणार ?" मीं विचारलें. ॲना म्हणाली, "Occupational Therapy शिकून आजाऱ्यांना विरंगुळा देण्याचें काम मी करणार." ॲनाचें हें उत्तर ऐकून मला आश्चर्य वाटलें. आमच्याकडील मुलींप्रमाणें लग्न जमेपर्यंत शिकत राहणारी ही मुलगी नाहीं. मॅट्रिक होण्याआधींच या मुलीनें आपलें ध्येय निश्चित केलेलें आहे व आश्चर्य म्हणजे समाजसेवा करण्याचें काम ती पुढें पत्करणार आहे. मीं तिला विचारलें, "तुमच्या शाळेंत मुलींना समाजसेवा करण्याची संधि दिली जाते का ?" माझा प्रश्न ऐकून ॲना म्हणाली, "आमच्या देशांत नोकरांची खूप टंचाई आहे. इस्पितळांतून अधिक श्रमाचीं ठराविक कामें करण्याकरितांच नोकर ठेवलेले असतात. बाकीचीं कामें स्वयंसेवकांकडून करवून घेतलीं जातात. अशा इस्पितळांतून कामें करावयाला आमच्या शाळेंतील मुली नेहमीं जातात. मुलांच्यासाठीं काढण्यांत आलेल्या शिशुगृहांना पण स्वयं-

सेवकांच्या मदतीची गरज असते. आमच्या कांहीं मुलींना तिथें पण पाठविलें जातें. याखेरीज इस्पितळांसाठीं, चर्चेसाठीं व इतर कांहीं संस्थांसाठीं निधि गोळा करण्याचें काम आम्हांला नेहमींच करावें लागतें."

या शाळेंत मुलींना विणकाम शिकविलें जातें. त्याचबरोबर टोपल्या तयार करणें, चामड्याच्या वस्तू बनविणें, कपडे शिवणें, मुलींच्या टोप्या तयार करणें, स्वयंपाक करणें, कपडे धुणें, इस्त्री करणें, गृहव्यवस्था राखणें, टंकलेखन करणें इत्यादि कामें मुलींना शिकविलीं जातात. ॲना म्हणाली, "अमुकच हस्तव्यवसाय मुलींनीं शिकला पाहिजे, अशी त्यांच्यावर सक्ति नाहीं. पण आमच्या मुली यांपैकीं दोनचार व्यवसाय तरी शिकून घेतातच."

या ठिकाणीं आणखी एक चांगली गोष्ट पाहावयाला मिळाली. शाळेंतील शिक्षिका मुलींना कांहीं प्रश्न देतात. या प्रश्नांचीं उत्तरें ग्रंथालयांत जाऊन पुस्तकांच्या मदतीनें मुलींना शोधून काढावीं लागतात. हीं उत्तरें कोणत्या पुस्तकांच्या मदतीनें मिळतील, त्याची यादी शिक्षिका मुलींना देतात. मिळालेली यादी जर अपुरी असेल, तर शाळेंतील ग्रंथपालिका मुलींना योग्य तीं पुस्तकें शोधायला मदत करते व अशा रीतीनें जरूर तीं पुस्तकें वाचून मुली विचारलेल्या प्रश्नाचीं उत्तरें शोधून काढूं शकतात. ग्रंथालयाचा वापर मुलींनीं पद्धतशीर रीतीनें कसा करावा याचें शिक्षण देणारा हा उपक्रम मला चांगला वाटला. शाळेंतील मुलींना आपला पुढील आयुष्यक्रम ठरविण्यासाठीं मदत करणारी एक व्यवसाय मार्गदर्शिका (Vocational Guidance Officer) या शाळेंत आहे. या बाईनीं या शास्त्राचें जसें अध्ययन केलें आहे, तसेंच मानसशास्त्राचें पण चांगलें शिक्षण घेतलेलें आहे. मुलींच्या वागणुकींबाबत उद्‌भवणारे सर्व प्रश्न शास्त्रीय दृष्टिकोनांतून हाताळण्याचें काम या शिक्षिकेकडे सोंपविण्यांत आलें आहे.

शाळा पाहून झाल्यावर ॲना आम्हांस मुख्याध्यापिकेकडे घेऊन गेली. तिथेंच आमच्या चहाची तयारी होती. आमच्या शेजारच्या खुर्चीवर ॲनाला बसण्याची मुख्याध्यापिकेनें विनंती केली. एक मिनिटभर ॲना त्या खुर्चीवर बसली. पण ॲनाचा पिंड स्वस्थ बसून राहण्याचा नाहीं. चहाची किटली आल्यावर ॲना उभी राहिली व तिनें आम्हांस चहा तयार करून दिला. सेवा करणें हा मला ॲनाचा स्थायीभाव वाटला. अशी ॲना निर्माण करणारी ही शाळा मला फार आवडली.

ॲनाचे मीं भरपूर आभार मानले व तिच्यासारखी चांगली मुलगी तयार केल्याबद्दल त्या मुख्याध्यापिकेचें अभिनंदन करून मी बाहेर पडलों.

२३ फेब्रुवारी ५२

आज शनिवार. विश्रांतीचा दिवस. दुपारचें जेवण होईपर्यंत कांहींच काम नव्हतें. कपडे धुण्याचा कार्यक्रम झाला. सुमारें दोनच्या सुमारास येथील शिक्षण खात्यातर्फे कांहीं बोलपट पाहण्यासाठीं आमंत्रण आलें होतें. त्या कार्यक्रमासाठीं त्या ठिकाणीं मी गेलों. मिस्टर गेझन बॉल या नांवाचे त्या खात्याचे प्रमुख अधिकारी भेटले. हे गृहस्थ भारत स्वतंत्र झाल्यानंतर मुंबईला आले होते. त्यांच्या तेथील मुक्कामांत भेटलेल्या चारदोन गृहस्थांची त्यांनीं चौकशी केली. त्यांच्याबरोबर मि. प्रिसले म्हणून व्यवसाय–मार्गदर्शन खात्याचे अधिकारी आले होते. त्यांची ओळख आली. या कार्यक्रमानंतर मि. रामचंद्रन्‌बरोबर डॉ. विश्वासना भेटायला गेलों. त्या ठिकाणीं रूपकुमारी नांवाची एक भारतीय विद्यार्थिनी भेटली. नांवाप्रमाणेंच ती रूपवती होती. या ठिकाणीं वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठीं ती आली होती. ती म्हणाली, "मला आतां या देशाचा अगदीं कंटाळा आला आहे. मी घरीं परत येतें, असें वडिलांना मी सारखें लिहितें. तर ते म्हणतात, अभ्यास पुरा कर व मग परत ये."

परदेशीय जीवनाशीं समरस होणें पुरुषांपेक्षां स्त्रियांना जास्त अवघड जातें व घराची ओढ त्यांना अधिक तीव्रतेनें भासूं लागते, असें रूपकुमारीच्या बोलण्यावरून माझ्या लक्षांत आलें. थोडा वेळ गप्पा मारल्यावर आम्हीं सर्व मंडळी जेवणासाठीं बाहेर पडलों. अशा वेळीं नेमका मोर्चा चिनी हॉटेलकडे वळायचा. परंतु रामचंद्रन् म्हणाले, "तुम्ही ग्रीक हॉटेलांत कधीं गेला होता का?" मी 'नाहीं' म्हणालों. त्यामुळें ग्रीक हॉटेलमध्यें जाण्याचा निर्णय घेतला गेला.

या ग्रीक लोकांचें जेवण व आपल्या येथील मांसाहारी जेवण यांत बरेंच साम्य दिसलें. यांच्या जेवणांत आपल्याप्रमाणेंच मसाल्याचा वापर भरपूर प्रमाणांत करतात. त्या ठिकाणीं कोबीची भरली भाजी व मोठ्या भरल्या मिरच्या आम्हीं खाल्ल्या. कोबीमध्यें व मिरचीमध्यें अगदीं बारीक केलेला खिमा मसाल्यांत शिजवून चांगला भरलेला होता. हे दोन्ही पदार्थ खूप रुचकर वाटले. एकूण जेवणाचा कार्यक्रम चांगलाच झाला. भोजनोत्तर एक वार्तापट पाहायला गेलों. त्या ठिकाणीं सहाव्या जॉर्जच्या अंत्य दर्शनाचीं दृश्यें पाहिलीं.

२५ फेब्रुवारी ५२

आज आजारल्यासारखें वाटत होतें. त्यामुळें उशीरा बाहेर पडलों. वरून दोन पत्रें आलीं होतीं. त्यामुळें बाहेर जायला उत्साह वाटला. दुपारीं येथील नॅशनल आर्ट गॅलरी पाहिली व नंतर किरकोळ खरेदीसाठीं दुकानांतून हिंडलों. स्वतःसाठीं एक गरम पुलओव्हर व प्रतिभेसाठीं एक छान फ्रॉक घेतला.

२६ फेब्रुवारी ५२

' टॅलीहो बॉईज् व्हिलेज ' या नांवाची एक संस्था पाहण्यासाठीं मेलबोर्नपासून कांहीं मैल दूर गेलों. ही संस्था गुन्हेगार मुलांसाठीं चालविली जात आहे. आज या ठिकाणीं नव्वद मुलें आहेत. त्या सर्वांची कोर्टानें येथें रवानगी केलेली आहे. आठ ते सोळा वयाचीं हीं मुलें आहेत. समाज त्यांना गुन्हेगार म्हणून ओळखतो. तपासांतीं समजलें कीं, यांपैकीं नव्वद टक्के मुलांचें गृहजीवन उध्वस्त झालेलें आहे. आईबापांनीं घटस्फोट घेतल्यामुळें घरांतील सुखाला यांपैकीं कितीतरी मुलें वंचित झालेलीं आहेत. संस्थेचे चालक म्हणाले, " ही संस्था काढण्यांत आमचा उद्देश कुटुंबजीवनासाठीं तळमळणाऱ्या जीवांना दिलासा देणें हा आहे. या ठिकाणीं येणाऱ्या मुलांच्यासाठीं कौटुंबिक वातावरण निर्माण करण्याची आम्ही धड-पड करीत असतों. आज एकेका खोलींत पन्नाससाठ मुलें आम्ही ठेवतों. त्याचा परिणाम मुलांवर चांगला होत नाहीं. आपण एखाद्या संस्थेच्या वसतिगृहांत राहतों, असें मुलांना वाटतें. याकरितां आम्हीं आतां छोटीं छोटीं घरें बांधायला सुरवात केलेली आहे. एक घर बांधून तयार झालें आहे. बारा मुलांची येथें सोय करण्यांत आली आहे. त्यांच्याकरिता एक खास परिचारिका पण नियुक्त केली आहे. आईप्रमाणें ती या बारा मुलांना संभाळते. त्यांचें जेवण स्वतंत्र



केलें जातें. तें त्यांच्या राहत्या घराच्या स्वयंपाकगृहांतच त्यांना मिळतें. त्यामुळें आपण घरींच आहोंत, असें त्या मुलांना वाटत असतें. या प्रकारचीं घरें सर्व मुलांना द्यावींत व पन्नाससाठ मुलें एकत्र ठेवण्यासाठीं असलेल्या खोल्या पाडून टाकाव्यात, असें आम्हांस वाटतें.




"येथें येणाऱ्या प्रत्येक मुलाकडे वैयक्तिक लक्ष पुरविलें जातें. प्रत्येक मुलाबाबतची बारीकसारीक माहिती मिळविली जाते व त्याच्या येथील वास्तव्यांत त्याला चांगलें शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो. आमच्या संस्थेजवळ एकशेंतीस एकर जमीन आहे. मुलांना शेतीचें शिक्षण दिलें जातें. शेतीच्या जोडीला गाई पाळणें, डुकरें पाळणें, कोंबड्या पाळणें, भाजीपाला लावणें इत्यादि जोडधंदे मुलें

करतात. सुतारकी प्रत्येक मुलाला शिकावीच लागते. याखेरीज इतर कांहीं व्यवसाय मुलांना शिकविले जातात.

"ही संस्था मेथॉडिस्ट चर्चमार्फत चालविली जाते. हीं मुलें कोर्टानें येथें पाठविल्यामुळें मुलांसाठीं होणाऱ्या खर्चापैकीं निम्मी रक्कम सरकारकडून मिळते व बाकीची निम्मी रक्कम स्वयंसेवक गोळा करितात. पालकांकडून थोडी मदत मिळते. येथें येणारीं मुलें खेड्यांतील आहेत तशींच शहरांतील पण आहेत. आपली शिक्षा पुरी झाल्यावर मुलें घरीं परत जाऊं शकतात. ज्यांना घर नसतें त्यांना एखादा उद्योगधंदा मिळवून देऊन त्यांचें जीवन स्थिर करण्याचा आम्ही प्रयत्न करतों. आमच्या संस्थेला जोडून एक सुसज्ज असा कारखाना असल्यामुळें येथील वास्तव्यांत मुलें एखादादुसरा तरी व्यवसाय फार चांगल्या रीतीनें शिकून घेतात. त्यामुळें त्यांच्या पुनर्वसाहतीचा प्रश्न फारसा त्रास देत नाहीं.

"येथें येणारीं मुलें येथें आल्यावरसुद्धां कांहीं गुन्हे करतात; चोऱ्यासुद्धां करतात. आम्हीं मुलांचें एक पार्लमेंट नेमलें आहे. त्याच्या चार उपसमित्या आहेत. मुलांनीं केलेल्या अपराधांची चौकशी मुलांच्या मार्फतच केली जाते. त्यांना शिक्षापण ही समितीच देते. कोणीं चोरी केली, तर चोरलेला माल त्या मुलाला मालकाला परत द्यावयाला लावतात. त्यानें जर तो माल हरवला असेल, तर त्या मालाची किंमत त्या मुलाकडून वसूल केली जाते. त्यासाठीं त्याला जादा काम दिलें जातें. येथें कोणत्याहि मुलाला शारीरिक शिक्षा केली जात नाहीं. त्यानें जर खिडकीची कांच फोडली, तर अधिक काम त्याच्याकडून करवून घेऊन त्या काचेच्या नुकसानीची भरपाई केली जाते. शिक्षा म्हणून काम देणें सहसा आम्हांला पसंत नसतें. केलेल्या कामाबद्दल आम्ही मुलांना पैसे देतों. परंतु हे पैसे चेकच्या स्वरूपांत असतात व हा चेक आमच्या शाळेच्या बँकेमध्येंच वटविला जातो. चेकच्या मोबदल्यांत मुलांना जरूर त्या वस्तू पुरविल्या जातात. आमच्या शाळेंतील खोल्यांना कुलुपें लावण्याची पद्धत नाहीं."

हें ऐकतांच मी म्हणालों, "तर मग मुलें पळून जात असतील ?"

त्यावर तें अधिकारी म्हणाले, "कांहीं पळून जातात. पोलीसमार्फत त्यांना परत आणलें जातें; परंतु पुष्कळदां तीं मुलें स्वतः होऊनच परत येतात. कारण बाहेरील वातावरणांत त्यांना येथें मिळणारें सुख मिळत नाहीं. साधारणपणें अठरा महिने मुलांना आम्ही ठेवून घेतों; परंतु जर तीं चांगलीं सुधारलीं, तर मुदतीआधीं सुद्धां त्यांना

सोडलें जातें. मुलींशीं बोलण्याचालण्याची संधि जर या मुलांना दिली तर त्याचाहि चांगला परिणाम त्यांच्यावर होतो. यासाठीं आम्ही कांहीं सांस्कृतिक कार्यक्रम घडवून आणतों. शहरांतील कांहीं मुलींना आम्ही आमंत्रणें पाठवून आणतों व त्या मुलींची या मुलांशीं ओळखी करून देतों. महिन्यांतून तीनदां मुलांना आम्ही मेलबोर्न शहरांत नेतों. परंतु अपराध करणाऱ्या मुलांची ही सवलत आम्ही रद्द करतों.

"येथील वास्तव्यांत मुलांशीं आमचें चांगलें नातें जडतें व त्यामुळें येथून गेल्यावर कित्येक दिवस मुलांची आम्हांला पत्रें येतात. त्यांनीं एखादी अडचण कळविली तर शक्य तों आम्ही त्यांना मदत करण्याचा प्रयत्न करतों. एकदां गेलेलीं मुलें पुन्हां गुन्हे करून सहसा परत येत नाहींत."

कांहीं मुलांशीं आम्ही मोकळेपणानें बोललों. त्यावरून हीं मुलें येथें आनंदांत राहात असल्याचें दिसून आलें. संस्था पाहून झाल्यावर शिक्षकांबरोबर चहापान झालें व आम्ही मेलबोर्नला परत आलों.

आज आम्हीं आम्हांला शिक्षण देणाऱ्या समाजकल्याण खात्यांतील अधिकारी स्त्रीपुरुषांना अल्पोपाहारासाठीं बोलाविलें. अशा रीतीनें त्यांनीं आम्हांला केलेल्या मदतीबद्दल आम्हीं कृतज्ञता व्यक्त केली.

२७ फेब्रुवारी ५२

येथील शिक्षण खात्याच्या कचेरीला पुन्हां भेट दिली व पुष्कळशी उपयुक्त अशी माहिती मिळविली. ऑस्ट्रेलियांत शाळांना जोडून एक 'मदर्स क्लब' (माता-समिति) स्थापन केला जातो. सर्वसाधारणपणें येथील पालक आपल्या मुलांच्या शिक्षणामध्यें खूप लक्ष घालतात. त्यांतल्या त्यांत बापापेक्षां आई ही जबाबदारी अधिक प्रमाणांत उचलीत असते. त्यामुळें सर्व शाळांमध्यें 'माता-समिति' असते. या माता-समितीचे सभासद शाळेच्या दैनंदिन कार्यांशीं घनिष्ट संबंध ठेवितात व शाळेच्या अडीअडचणी दूर करण्यासाठीं नेहमीं धडपड करीत असतात. आठवड्यांतून एकदां समितीचे सभासद शाळेंत येतात व मुख्याध्यापकांना भेटून शाळेबद्दलची माहिती मिळवितात. मुख्याध्यापक शाळेनें केलेल्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा त्यांच्यासमोर सादर करतात. शाळेच्या निकडीच्या गरजा कोणत्या आहेत, त्यांची ते मातांना कल्पना देतात. शाळाखात्यातर्फे किमान फर्निचर व साहित्य शाळांना पुरविलें जातें. परंतु शाळेला योग्य तो दर्जा मिळवून देण्यासाठीं शाळेला लागणारें जरूर

तें साहित्य व उपकरणें माता–समिति शाळेला मिळवून देते. त्यासाठीं समितीचे सभासद निधि गोळा करितात. आठवड्यांतून एकदां शाळेंतील मुलें एखादें नाणें शाळेसाठीं मदत म्हणून शिक्षकाजवळ देतात. अशा रीतीनें गोळा केलेल्या निधीचा हिशेब शिक्षक व माता–समिति यांच्यामार्फत ठेविला जातो. या पैशांचा विनियोग शाळेला मदत देण्यासाठीं केला जातो. माता–समिति वर्षांतून एकदोन भरगच्च कार्यक्रमांचे समारंभ घडवून आणते. या समारंभाचे वेळीं पण शाळेसाठीं निधि गोळा केला जातो. याखेरीज दुपारच्या रजेमध्यें मुलांसाठीं खाद्यपदार्थ बनविणें व ते स्वस्त किंमतीनें अथवा मोफत मुलांना पुरविणें, हें कामहि माता–समितीचे सभासद करितात. माता–समिति ही ऑस्ट्रेलियाच्या शिक्षण-क्षेत्रांतील अत्यंत अनुकरणीय अशी संस्था आहे, असें मला वाटलें.

२८ फब्रुवारी ५२

ऑस्ट्रेलिअन शिक्षणपद्धतीचें वैशिष्ट्य म्हणजे टपालामार्फत शिक्षण देणाऱ्या शाळा. या शाळांना Correspondence schools म्हणून संबोधतात. या शाळांची माहिती मिळवण्यासाठीं आम्हीं आज मेलबोर्नमधील केंद्र शाळेला भेट दिली व हें कामकाज नीट समजावून घेतलें.

ऑस्ट्रेलियामध्यें सहा ते चौदा वयाच्या मुलांसाठीं सक्तीच्या शिक्षणाची योजना लागू केलेली आहे. या देशांतील प्रत्येक मुलाला प्राथमिक शिक्षण मोफत मिळालें पाहिजे; त्याचा तो जन्म सिद्ध हक्क आहे, असें येथें मानण्यांत येतें. जीं मुलें दूर-दूरच्या विभागांतून विखुरलेल्या वस्तीमध्यें राहतात, त्यांना सोयीची अशी शाळा जवळपास नसते. कांहीं मुलें दीर्घ मुदतीच्या आजारानें इस्पितळांत पडून राहतात. अशा मुलांची सोय या टपालामार्फत शिक्षण देणाऱ्या शाळांमुळें होऊं शकते. खालीं नमूद केलेल्या सर्व मुलांची सोय या शाळेमार्फत केली जाते:—

( १ ) कोणत्याहि शाळेपासून तीन मैलांपेक्षां अधिक अंतरावर राहणारीं मुलें.

( २ ) ज्यांना शारीरिक व्यंग असल्यामुळें शाळेंत जाणें शक्य नसतें, अशीं मुलें.

( ३ ) सर्कशीसारख्या व्यवसायांत गुंतल्यामुळें ज्यांना भटकावें लागतें, अशीं मुलें.

( ४ ) ज्या मुलांचे आईबाप परदेशांत नोकरीला आहेत, अथवा परदेशांत राहत आहेत, अशीं मुलें.

( ५ ) परदेशांतून ऑस्ट्रेलियांत कायमचें अथवा हंगामी वास्तव्य करण्यासाठीं आलेल्या लोकांचीं मुलें.

याखेरीज तरुंगांतील ज्या कैद्यांना अधिक शिक्षण घ्यावयाचें असतें, त्यांच्या शिक्षणाची सोय या शाळांमार्फत केली जाते. तसेंच ज्या परदेशी लोकांना इंग्रजी येत नाहीं, अशा लोकांना इंग्रजी शिकवण्यासाठीं ही शाळा मदत करते.

या शाळेमार्फत विद्यार्थ्यांना ठराविक अभ्यासक्रम शिकवून परीक्षांसाठीं त्यांची तयारी केली जाते. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसवावयाचें नाहीं, असे कांहीं विद्यर्थी इंग्रजी, इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, हस्तव्यवसाय, गणित इत्यादि विषयांचें शिक्षण या शाळांमधून घेतात. मेलबोर्नमधील ही शाळा १४०० विद्यार्थ्यांना टपालमार्फत आज शिक्षण देत आहे व त्या शाळेंत ६० शिक्षक काम करीत आहेत. सिडने येथील शाळेंत तर ही विद्यार्थ्यांची संख्या सात हजार आहे व त्या ठिकाणीं १७५ शिक्षक काम करतात.

दर आठवड्यांत मुलें पांच दिवस शिक्षण घेतील व वर्षांतून चाळीस आठवडे त्यांचें शिक्षण चालेल, असें समजून कामाची आंखणी केली जाते. प्रत्येक कुटुंबाला धडे पाठविण्याचे व ते परत मागविण्याचे दिवस नक्की केलेले असतात. माध्यमिक शाळांतील मुलांसाठीं मासिक अभ्यासपत्रक निश्चित केलेलें असतें; परंतु त्यांना नवे धडे दर आठवड्याला पाठविले जातात. मुलांनीं पाठ तयार केला व तो लिहून परत शाळेकडे पाठविला कीं, विद्यार्थी आठवडाभर हजर आहे, असें मानलें जातें. धडे मुलांकडे पाठविण्यासाठीं व ते शाळेकडे परत आणण्यासाठीं लागणारा खर्च सरकारमार्फत केला जातो. त्याचप्रमाणें मुलाला लागणारें सर्व शैक्षणिक साहित्य सरकार पुरवितें. माध्यमिक शाळांतील मुलांना मात्र कांहीं पुस्तकें विकत घ्यावीं लागतात.

शाळेंतील शिक्षक खूप मेहनतीनें मुलांसाठीं कांहीं पत्रकें तयार करतात. मुलांच्या गरजा व त्यांची वैयक्तिक प्रगति लक्षांत घेऊनच हीं पत्रकें तयार केलीं जातात. या छापील पत्रकांच्या माध्यमामार्फत या मुलांना शिक्षण दिलें जातें. अशा रीतीनें तयार झालेलीं मुलें जवळच्या शाळेंतील वार्षिक परीक्षांना जाऊन बसतात; अथवा सरकारमार्फत होणाऱ्या परीक्षांना बसतात. मुलगा लायक दिसला कीं, त्याला वरच्या वर्गांत चढविलें जातें; परंतु ही त्याची बढती बहुधा वर्षाअखेरच होते. सबंध वर्षांत त्यानें केलेल्या कामाबद्दल त्याला गुण दिले जातात.

अनुक्रम 22991 दि: 21-6-93
नोंद क्रमांक 276 नों: दि: 3.7.16.1990


वार्षिक बढतीच्या वेळीं हे गुण लक्षांत घेतले जातात. ज्या मुलांचे आईबाप शिक्षित असतात व जे आपल्या मुलांना गृहपाठ करण्यांत मदत देऊं शकतात, अशा मुलांची प्रगति साहजिकच जास्त चांगली होते.

शाळेपासून दूर असल्यामुळें इतर मुलांच्या सहवासाला हीं मुलें पारखीं झालेलीं असतात. त्यांच्यामध्यें एकलेपणामुळें कांहीं विकृति उत्पन्न होऊं नये, म्हणून इतर मुलांना भेटण्याची अधूनमधून त्यांना संधि दिली जाते. नभोवाणीवरील कार्यक्रम, मुलांच्या शर्यती, शेतकी-प्रदर्शनें, विद्यार्थ्यांचीं मासिकें, ग्रंथालयाला भेटी इत्यादि कार्यक्रम करून या मुलांना आयुष्यांत थोडा बदल मिळविण्याची संधि दिली जाते.

मीं तेथील मुख्याध्यापकांना विचारलें, " या पद्धतीनें शिक्षण घेणाऱ्या मुलांची प्रगति नीट होऊं शकते का ? " त्या वेळीं ते म्हणाले, " हो, या शाळेंत शिक्षण घेणारे विद्यार्थी अधिक स्वावलंबी असतात. त्यांचा आत्मविश्वास चांगलाच वाढीला लागतो. सुसंगत लिहिण्याची त्यांना संवय लागते व त्यांची ग्रहणशक्ति सुद्धां चांगलीच वाढीला लागते." या मुलांनीं लिहून पाठविलेल्या पाठांच्या पत्रिका मीं पाहिल्या व त्यावरून शाळेपासून दूर राहिल्यामुळें जीं मुलें एरवीं शिक्षणाला वंचित झालीं असतीं, त्या मुलांचें शिक्षण चांगलें चालत असल्याचें आढळून आलें. आपल्या विद्यार्थ्यांबाबत कांहीं गंमती येथील शिक्षकांनीं सांगितल्या. बालपक्षघातानें आजारी असलेल्या एका विद्यार्थ्यानें आपलें मॅट्रिकपर्यंतचें सर्व शिक्षण या शाळेंतून केलें. त्या मुलाला शिकविणारी बाई मला भेटली. ती म्हणाली, " या मुलाला हातांत लेखणी धरतां येत नव्हती. दोन ओठांमध्यें लेखणी धरून तो आपलें लिखाण करीत असे. अशा रीतीनें या मुलानें आपलें शिक्षण पुरें केलें."

येथें शिकणाऱ्या मुलांना आपल्या शिक्षकांना भेटण्याची संधि मिळत नाहीं. या शाळेंतून शिक्षण घेऊन नोकरीला लागलेल्या एका बाईची गोष्ट येथील एका शिक्षकानें सांगितली. तो म्हणाला, " मेलबोर्न शहरांत नोकरीला राहिल्यावर ही बाई पहिली संधि साधून शाळेंत आली. माझें नांव तिला माहीत होतें. तिनें माझा तपास केला. माझी भेट होतांच माझा हात धरून तिनें किती वेळ तरी अश्रू ढाळले व आपली कृतज्ञता व्यक्त केली."

ही शाळा पाहून परत आल्यावर एका कार्यक्रमाला हजर राहिलों. येथील कल्याणकारी योजनांच्या खात्यातर्फे आम्हांला आज निरोप देण्यांत आला. मेलबोर्नमधील आमचें काम संपलें. एक दोन दिवसांतच न्यूझीलंडला जाण्यासाठीं आम्ही येथून

सिडनेला जाणार. येथील वास्तव्यांत गोळा केलेलीं पत्रकें, मासिकें व थोडीं पुस्तकें यांचें बंडल येथील अधिकाऱ्याकडे दिलें व त्यांना तें पुण्याला पाठविण्याची विनंती केली.

दुपारीं तीनच्या सुमारास मिस् टेलरबरोबर येथील दिवाणी व फौजदारी कोर्ट पाहण्यासाठीं गेलों. त्या ठिकाणीं मिसेस जोन रेझॅनो नांवाची स्त्री बॅरिस्टर भेटली. या ठिकाणीं बॅरिस्टर म्हणून काम करणारी ही एकमेव महिला आहे. मिस् टेलरनें तिची ओळख करून दिली. त्यानंतर मिसेस जोन म्हणाली, "वकील म्हणून मीं जेव्हां व्यवसाय सुरू केला त्या वेळीं पुरुष वकिलांनीं मला खूप त्रास दिला. त्यांनीं मला मदत तर केली नाहींच, परंतु माझ्या मार्गांत जेवढे अडथळे निर्माण करतां येतील तेंवढे अडथळे उभे करण्यांत या पुरुषांची एकमेकांशीं स्पर्धा चालली होती. प्रारंभीं मला ऑफिससाठीं जागा मिळणेंसुद्धां मुष्किल झालें होतें. खूप त्रास दिला या पुरुषांनीं मला माझ्या ऐवजीं दुसरी कोणी बाई असती तर, तिनें हा व्यवसाय करण्याचा नादच सोडून दिला असता. आम्ही वरून जरी सुधारलेले दिसत असलों, तरी आंतून आम्ही सर्व पुराणमतवादीच आहोंत. आमच्या देशाला आज नेहरूंची फार गरज आहे. नेहरूनें तुमच्या देशांत स्त्रियांना समान हक्क दिलेले आहेत. तुमच्या देशांतील प्रांतिक विधिमंडळांत व मध्यवर्ती लोकसभेंत कितीतरी स्त्रिया आहेत. आज आमच्या मेलबोर्नच्या पार्लमेंटमध्यें एकहि स्त्री प्रतिनिधि नाहीं. नेहरूंनीं कांहीं स्त्रियांना मंत्री नेमिलें आहे; गव्हर्नर नेमलें आहे: एका महिलेला परदेशी वकील म्हणून पाठविलें आहे. आमच्या देशांत एकच काम करणाऱ्या स्त्री-पुरुषांना समान वेतनसुद्धां मिळत नाहीं. पुरुष जें काम करतात तेंच काम जर बाईनें केलें तर बाईला पुरुषापेक्षां पंचवीस टक्के पगार कमी मिळतो. यावरून आमच्या देशांत स्त्री व पुरुष यांमध्यें आजहि किती भेद केला जातो हें आपल्या लक्षांत येईल."

२९ फेब्रुवारी ५२

उद्यां येथून निघावयाचें असल्यामुळें आज सकाळचा वेळ कपडे धुण्यासाठीं खर्च केला. त्यानंतर विमान कंपनीच्या कार्यालयांत जाऊन पुढल्या प्रवासाबाबत चौकशी केली. आम्हीं ज्या ठिकाणीं आमचा अभ्यास केला त्या इमारतींत चॅपेल नांवाचा एक म्हातारा इसम लिफ्टमनचें काम करीत होता. आम्ही येथें आल्यापासून हा गृहस्थ आमच्याशीं विशेष आपुलकीनें वागला. म्हणून आम्हीं आज त्याला आमच्या बरोबर एके ठिकाणीं जेवायला नेलें. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं हा गृहस्थ सैन्यांत

दाखल झाला होता व युद्धकाळांत तो मुंबईत येऊन राहिला होता. त्या वेळची एक आठवण जेवतांना त्यानें सांगितली. तो म्हणाला, " मला एकंदरींत तुमचा देश आवडला; पण एकदां मात्र मुंबईतील दोनतीन टारगट माणसांनीं माझी भलतीच थट्टा केली. मीं एका जागेचा पत्ता विचारला असतांना त्या गृहस्थांनीं मला असा पत्ता लिहून दिला कीं, त्यामुळें मुंबईतील गलिच्छ वस्तीमध्यें मी जाऊन थडकलों. भोंवतालचें वातावरण पाहून मी खूप गांगरून गेलों. त्या लोकांनीं माझी अगदीं निर्दय अशी थट्टा केली. "

आज मेलबोर्नमधील शेवटचा दिवस. गेल्या कित्येक दिवसांत आम्हीं या देशाबद्दल भरपूर माहिती मिळविली. कांहीं कल्याणकारी योजनांची जबाबदारी मध्यवर्ती सरकारनें पत्करलेली आहे, तर कांहीं योजना संपूर्णपणें प्रांतिक सरकारें हाताळीत असतात. या बाबतींत प्रांतिक सरकार व मध्यवर्ती सरकार यांच्यामध्यें पूर्ण सहकार्य आहे. या योजनांचा फायदा जनतेला मिळवून देण्यासाठीं समाजसेवक व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था खूप लक्ष घालतात. आयांच्या व मुलांच्या आरोग्याची संपूर्ण जबाबदारी आरोग्य खात्यानें संभाळलेली आहे. स्त्रियांना प्रसूतिपूर्व व प्रसूतिउत्तर जी जी मदत लागेल, ती सर्व देण्यांत आरोग्य खातें नेहमीं तत्पर असतें. मातांच्या व मुलांच्या प्रकृतीची वरचेवर तपासणी करणें, त्यांना अन्नवस्त्र वेळेवर पुरविणें, हें काम आरोग्य खातें व्यवस्थितपणें करतें. आईबापांना त्यांची मुलांबाबतची जबाबदारी समजावून देण्यासाठीं आरोग्य खात्यामार्फत व्याख्यानें घडवून आणलीं जातात. पुस्तकें छापून तीं लोकांना दिलीं जातात. लोकांची औषधपाण्याची सोय व्हावी, म्हणून ठिकठिकाणीं इस्पितळें व उपचारकेंद्रें काढलीं जातात. अगदीं दूर राहणाऱ्या लोकांच्यासाठीं त्या विभागांत विमानानें डॉक्टर पाठविले जातात.



येथें राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस सुखानें व समाधानानें जगतां यावें, म्हणून विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना आंखलेल्या आहेत. प्रसूतीसाठीं जाणाऱ्या आईला प्रसूतिभत्ता देण्यांत येतो. ही रक्कम साधारणपणें दोनशें सव्वादोनशें

रुपयेपर्यंत असते. याखेरीज ती बाई इस्पितळांत असतांना तिला रोज भत्ता मिळतो. मुलांची जोपासना नीट व्हावी, म्हणून आईबापांना आर्थिक मदत देण्याच्या हेतूनें मुलांचा भत्ता दिला जातो. ही रक्कम त्यांना दर आठवड्याला मिळते. पहिल्या मुलासाठीं दर आठवड्याला पांच शिलिंग भत्ता मिळतो. ही रक्कम तीं मुलें सोळा वर्षांचीं होईपर्यंत मिळूं शकते. याखेरीज वेकारीचा भत्ता मिळतो. मनुष्य आजारी पडला व तो कामावर जाऊं शकत नसला, तर त्याला भत्ता मिळतो. कांहीं कारणामुळें जर एखादा मनुष्य अपंग झाला, तर त्याला अपंगपणाबद्दल भत्ता मिळतो. एखादी बाई जर विधवा झाली अथवा तिला नवऱ्यानें टाकून दिलें अथवा






जर तिनें घटस्फोट घेतला आणि अशा रीतीनें कुटुंबभरणाची जबाबदारी जर तिच्या-वर पडली, तर तिला भत्ता मिळूं शकतो. एखादा मनुष्य जर तुरुंगांत गेला व त्याचीं बायकामुलें निराधार झालीं, तर त्यांनाहि भत्ता मिळूं शकतो. पासष्ट वर्षें

वयाच्या पुरुषाला व साठ वर्षें वयाच्या बाईला म्हातारपणाचा भत्ता मिळूं शकतो. कुटुंबांतील एखादा मनुष्य जर मरण पावला, तर त्याच्या दफनविधीसाठीं सव्वाशें दीडशें रुपयेपर्यंत मदत मिळूं शकते. मनुष्य थडग्यामध्यें जाऊन पोहोंचेपर्यंत त्याला जेव्हां जेव्हां व जी जी मदत लागेल ती ती या कल्याणकारी योजनांच्या मार्फत सरकार त्याला देत असते. त्यामुळें येथें राहणारा प्रत्येक पुरुष ( व स्त्री ) काळजीपासून मुक्त असतो. अन्न, वस्त्र, आसरा, शिक्षण, औषधपाणी या मनुष्यमात्राच्या किमान गरजा पुरविण्याची संपूर्ण जबाबदारी येथील सरकारनें स्वीकारलेली आहे.

आज संध्याकाळीं मिस् सँडर्सनें आम्हांला जेवायला बोलाविलें होतें. तिनें आपल्या दोनतीन मैत्रिणींना आमंत्रण दिलें होतें. त्या सगळ्याजणी मिळून खास भारतीय पद्धतीचें जेवण आम्हांला देण्याची धडपड करीत होत्या. त्यांच्याशीं अनौपचारिक गोष्टी करण्यांत दोन तीन तास चांगले मजेंत गेले.

१ मार्च ५२

सकाळीं नऊला कॉमनवेल्थ सरकारची गाडी आमच्या निवासस्थानीं आली व आम्हांला विमानतळावर घेऊन गेली. तिथें जाऊन तपास करतां विमान अर्धा तास उशीरा सुटणार असें कळलें. हें विमान ' ट्रान्स ऑस्ट्रेलिअन एअर वेज् ' कंपनीचें आहे. विमानांत बसून आम्हीं सिडनेपर्यंत प्रवास केला. सिडने येथें दुपारीं दोन वाजतां जाऊन पोहोंचलों. विमानतळावर परराष्ट्रीय खात्याचे एक अधिकारी आम्हांला भेटले. त्यांनीं आमचें सामान ताब्यांत घेतलें व ' हॉटेल वालडॉर्फ ' नांवाच्या एका चांगल्या हॉटेलमध्यें ते आम्हांला घेऊन गेले. सिडने शहरांत आम्ही सुमारें चारपांच दिवस राहूं व तिथून आम्हांला न्यूझीलंडमध्यें पाठविण्यांत येईल, अशी माहिती सदर अधिकाऱ्यानें आम्हांला दिली. सिडने हें एक मोठें बंदर आहे. ऑस्ट्रेलियांतील हें सर्वांत जुनें शहर आहे. येथें न्यू साउथ वेल्स या प्रांताची राजधानी आहे. या शहराच्या भोंवतीं निरनिराळीं उपनगरें पसरलेलीं आहेत. या उपनगरांतून हजारों लोक दररोज सिडने शहरामध्यें ये—जा करतात. ही सर्व वाहतूक मोटरलॉंचेसमार्फत होते. सिडने बंदरांत कित्येक मोठ्या आगबोटी, मोटरलॉंचेस, होड्या, यांची गर्दी आढळते. आम्ही राहात होतों तें वॉलडॉर्फ हॉटेल अशाच एका उपनगरांत होतें. संध्याकाळीं आम्ही मोटरलॉंचनें सिडने शहरांत आलों. बंदरावर येतांच तेथें भारतीय झेंडा लावलेली एक आगबोट आम्हीं पाहिली. आपल्या देशाचा झेंडा या परदेशी बंदरांत डौलानें फडकत अस-




लेला पाहून आम्हांला खूप आनंद झाला. किनाऱ्यावरून आम्ही रस्त्यावर आलों. तेथें कांहीं भारतीय खलाशी आम्हांला भेटले. एका मालवाहतूक करणाऱ्या आगबोटीवर ते काम करीत होते. त्यांची आगबोट येथें कांहीं दिवस राहणार होती. थांबून आम्हीं त्यांची आस्थापूर्वक चौकशी केली. त्यामुळें त्यांनाहि खूप आनंद झाला. जवळच्याच एका उपाहारगृहांत जेवण घेऊन आम्ही निवासस्थानीं परतलों.

२ मार्च १९५२

रात्रीं थोडासा ताप आला होता. त्यामुळें सकाळीं बिछान्यांतून उठवेना. कसाबसा उठून उभा राहिलों. समोर असलेल्या आरशानें नाक खूप सुजल्याची जाणीव करून दिली. या अकस्मात् आलेल्या आजारामुळें दिवसभर बिछान्यांत पडून राहणें क्रमप्राप्त झालें. दिवसभर एकटाच खोलींत पडून राहिलों होतों. संध्याकाळीं माझे मित्र राउत रॉय मला भेटायला आले. मी त्यांना म्हणालों, "मला सिबेझॉलच्या गोळ्या कुठून तरी आणून द्या." ते म्हणाले, "मजजवळ आहेत. मी आतां आणून देतों." थोड्या वेळानें त्यांनीं दोन गोळ्या आणून दिल्या व ते आपल्या खोलींत निघून गेले. मी त्या गोळ्या घेतल्या. इतक्यांत राउत रॉय घाबऱ्या घाबऱ्या माझ्या खोलींत आले. त्यांनीं मला विचारलें, "गोळ्या घेतल्या का?" मी, "हो" म्हणालों. ते म्हणाले, "मीं चुकीनें भलत्याच गोळ्या तुम्हांला दिल्या." त्यांनीं चुकीनें सिबेझॉलच्या गोळ्या

समजून 'ॲन्टी डिसेन्ट्री टॅब्लेटस्' मला दिल्या. श्रीयुत राउत रॉय हे कवि आहेत व त्यांच्या बाबतींत ही चूक अगदीं क्षम्य होती. परंतु या चुकीचा आपल्यावर काय परिणाम होईल याची मला काळजी वाटूं लागली. ती रात्र थोडी अस्वस्थतेंतच गेली.

३ मार्च ५२

रात्रीं नीट झोप मिळाली नाहीं. तथापि आज बिछान्यांत पडून राहणें शक्य नव्हतें. न्यूझीलंडला जाण्याची पूर्वतयारी करण्याकरितां त्या देशाचे ट्रेड कमिशनर मि. मॅनिंग यांना भेटण्यासाठीं गेलों. त्यांच्या कार्यालयांतून परराष्ट्रीय कचेरींत व तिथून पुन्हां त्यांच्याकडे, अशा दोनतीन चकरा मारल्या. सारा वेळ कामांत गेला. त्या घाईत नाकाकरितां औषध मिळविलें. सिडने येथें चिनी उपाहारगृहें फारच चांगलीं आहेत. त्यांपैकीं एका उत्तम उपाहारगृहांत जेवावयास गेलों. प्रकृति नीट नसल्यामुळें जेवणावर ताव मारतां आला नाहीं. या उपाहारगृहाची सर्व व्यवस्था एक चिनी बाई मध्यवर्ती असलेल्या एका मेजाभोवतीं बसून अत्यंत कर्तबगार रीतीनें पाहात होती. गोऱ्या लोकांच्या या देशांत एक पौर्वात्य महिला आपल्या संस्थेचा व्याप इतक्या आत्मविश्वासानें व कार्यक्षमतेनें पाहात असल्याचें पाहून मला कौतुक वाटलें.

४ मार्च ५२

आज पुन्हा न्यूझीलंड ट्रेड कमिशनरच्या कार्यालयांत जाऊन त्यांची भेट घेतली व त्यांना प्राप्तिकरापासून मुक्तता मिळविण्यासाठीं परराष्ट्र कचेरींतून मिळविलेला दाखला दिला. त्यानंतर न्यूझीलंडमध्यें जाण्यासाठीं परवाना मिळविण्यामध्यें थोडा वेळ गेला. येथील काम आटोपल्यावर सिडने येथील शिक्षणखात्याच्या कार्यालयाला भेट दिली व न्यू साऊथ वेल्स प्रांतांतील शिक्षणाबाबत जरूर ती माहिती मिळविली. तेथें मूर नांवाचे एक अधिकारी भेटले. त्यांच्याशीं बोलतांना ते म्हणाले, "आमच्या येथील प्राथमिक शिक्षणाचा काळ नऊ वर्षांचा आहे. या कालावधींत विद्यार्थ्यांना बाहेरील परीक्षांना बसावें लागत नाहीं. सर्व परीक्षा शाळेचे मुख्याध्यापकच घेतात. सर्व विद्यार्थी आपोआप माध्यमिक शाळेंत जातात. सहसा कुणाला खालीं ठेवण्यांत येत नाहीं." याप्रमाणें त्यांनीं आणखीहि बरीच माहिती सांगितली. "तुमच्या येथें अभ्यासक्रम कोण ठरवितो?" असा मीं प्रश्न विचारतांच ते म्हणाले, "त्या त्या विभागासाठीं एक बोर्ड नेमण्यांत येतें व तें बोर्ड हा अभ्यासक्रम ठरवितें." "या बोर्डावर शिक्षकांचे प्रतिनिधी घेतलेले

असतात का ? " असें मीं विचारतांच ते म्हणाले, " हो. आमच्या देशांतील शिक्षकांची संघटना चांगली प्रभावी आहे. या संघटनेला डावलून आम्ही कांहीं करीत नाहीं. ही संघटना शिक्षकांच्या हक्काकरितां व त्यांच्या अधिकारांचें संरक्षण करण्याकरितां जितक्या उत्साहानें झगडते, तितक्याच उत्साहानें शैक्षणिक क्षेत्रांत सरकारला सल्ला देण्याचें कार्य ती करीत असते."

५ मार्च १९५२

आज विशेष काम नसल्यामुळें येथील एकदोन शाळा पाहिल्या. त्या ठिकाणीं तपास करतां असें कळलें कीं, न्यू साउथ वेल्स् या प्रांतांत वस्ती विखुरलेली आहे. या प्रांतामध्यें एकशिक्षकी शाळांची संख्या विशेष आहे. त्याचप्रमाणें टपालामार्फत शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्यासुद्धां येथें चांगलीच आहे. मेलबोर्नप्रमाणें सिडने येथील शाळांतूनसुद्धां लांकूडकाम, विणकाम, चामड्याचें काम, पुट्ठाकाम, टोपल्या तयार करणें इत्यादि हस्तव्यवसाय मुलांना शिकविले जातात. त्याचप्रमाणें मुलींना कपडे शिवणें, टोप्या तयार करणें, टोपल्या तयार करणें, गृहव्यवस्था ठेवणें इत्यादि विषय शिकविले जातात. या शाळा पाहून परत येतांना वाटेंत विश्वविद्यालयांतील परराष्ट्रीय विभागाच्या कार्यालयांत गेलों. तेथें प्रवासाबाबत तपास केला. " श्री. भट व श्री. राउत रॉय, हे दोघे बरोबर प्रवास करतील व श्री. निखिल रॉय यांच्याबरोबर मला प्रवास करावा लागेल. सात तारखेला सकाळीं सिडने सोडावें लागेल. " असें सांगून विमानाचें तिकीट त्यांनीं माझ्या हातीं दिलें.

६ मार्च ५२

सकाळीं पुन्हां परराष्ट्रीय कचेरीच्या कार्यालयांत गेलों असतांना असें समजलें कीं, मुंबईपर्यंतचा परतीचा प्रवास आगबोटीनें करावयाचा आहे. ही बातमी ऐकून आमच्याबरोबर असलेले श्री. भट खूप आनंदित झाले. आगबोटीच्या प्रवासाची कल्पना नसल्यामुळें मी श्री. भट यांना म्हणालों, " बोटीनें जाण्यांत विशेष काय आहे ? उलट बोट लागण्याची भीति वाटते. " त्यावर श्री. भट म्हणाले, " प्रवास करावा तर तो आगबोटीनेंच. त्याची गंमत तुम्हांला नंतर कळेल." त्यांच्या आश्वासनानें माझें फारसें समाधान झालें नाहीं. आम्ही पी. अँड ओ. कंपनीच्या कार्यालयांत गेलों व पुढील प्रवासाबाबत त्यांच्याशीं चर्चा केली. आम्ही न्यूझीलंडमधून परत आल्यावर एका आठवड्याच्या आंत जी आगबोट निघणार असेल

त्या आगबोटींत आमची व्यवस्था करण्याची आम्हीं त्यांना विनंती केली. त्याप्रमाणें जरूर ती मदत करण्याचें आश्वासन त्यांनीं दिलें. त्यानंतरचा उरलेला सारा वेळ प्रवासाची तयारी करण्यांत गेला. हॉटेलचा हिशोब चुकता करून व त्यांना पहाटेला साडेतीन वाजतां उठविण्याची विनंती करून मी खोलींत परतलों.

पहाटेचे साडेतीन वाजले आहेत व हॉटेलचा मॅनेजर उठविण्यास आला आहे. गडबडीनें उठून निघण्याच्या तयारीला लागलों. एवढ्या पहाटे विमानकचेरीपर्यंत जाण्यासाठीं वाहन कसें मिळणार याचा आम्ही विचार करीत होतों तोंच त्या हॉटेलमधील व्यवस्थापकानें, "आपणांसाठीं टॅक्सी बोलावूं का?" असें विचारलें. ऑस्ट्रेलियामध्यें टेलिफोनवरून टॅक्सी मिळविणें सोपें जातें. इतकेंच नव्हे तर रस्त्यावर ठिकठिकाणीं या टॅक्सीवाल्यांचे खास टेलिफोन आहेत. तो रिसीव्हर उचलला कीं टॅक्सीवाल्यांनाच टेलिफोन मिळतो व तुम्ही उभे असाल त्या ठिकाणीं ती टॅक्सी तुम्हांला घ्यायला येते. या सोयीमुळें व्यवस्थापकानें बोलावलेली टॅक्सी आली व तेथून आम्ही विमानकंपनीच्या कार्यालयांत गेलों. पुढें कंपनीच्या मोटारींतून आम्ही विमानतळावर गेलों. न्यूझीलंडमध्यें जाण्यास जीं विमानें आहेत त्यांचा विमानतळ पाण्यामधेंच आहे. हीं विमानें समुद्रामध्येंच उतरतात व समुद्रावरून उडतात. एका मोटारलॉंचमधून आम्ही विमानतळावर गेलों व लॉंचमधून विमानामध्यें उतरलों. बरोबर साडेसात वाजतां आम्हीं सिडने सोडलें व ऑकलंडच्या प्रवासाला निघालों. थोडा वेळ अत्यंत जलद असा पाण्यांतून प्रवास केल्यावर हळूहळू विमान वर उडालें. हा प्रवास अतिशयच सुखद वाटला. आकाशांत प्रामुख्यानें निळा रंग सर्वत्र पसरलेला दिसत होता. क्वचित् प्रसंगीं या गर्द निळ्या रंगांत एकदोन दुसरे रंग मिळाल्यामुळें ही सजावट विशेषच खुलून दिसत होती. हा प्रवास साडेसात तास चालला. ऑकलंड हें न्यूझीलंडमधील एक अत्यंत मोठें शहर आहे, पण त्याची लोकसंख्या मात्र फक्त तीन लाख आहे. विमान पुन्हां पाण्यांतच उतरलें व मोटरलॉंचनें आम्ही किनाऱ्यावर आलों. त्या ठिकाणीं न्यूझीलंडच्या परराष्ट्रीय विभागाचे अधिकारी मिस्टर मिडिल्मस् व प्रौढशिक्षण खात्याचे डेप्युटी डायरेक्टर मिस्टर हिल्डन पॉवर यांनीं आमचें स्वागत केलें. ऑकलंडमध्यें आमचा मुक्काम चारपांच दिवस राहील व त्या कालावधींत येथील शिक्षणसंस्था आम्हांला दाखविल्या जातील, असें त्या मंडळींनीं सांगितलें. चहा झाला व आम्ही मि. पॉवर यांच्याबरोबर आमच्या निवासासाठीं निश्चित केलेल्या जागीं जावयास निघालों.

आमची राहण्याची व्यवस्था 'हॉटेल ऑकलंड' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या विश्रांतिगृहांत केली होती. हें हॉटेल खूपच मोठें आहे. येथील सर्व थाट अगदीं दरबारी वाटला. मला एक स्वतंत्र खोली मिळाली होती. खोलींत टेलिफोन होता. आमची व्यवस्था अत्यंत समाधानकारक झाली आहे, असें आमच्याकडून आश्वासन मिळाल्यावर मि. पॉवर आमचा निरोप घेऊन निघून गेले. जाण्यापूर्वी सकाळीं साडेआठला येण्याचें व तत्पूर्वी टेलिफोन करण्याचें अभिवचन त्यांनीं दिलें. आज एका नव्या देशांत आल्याचा आनंद झालेला आहे. परंतु त्याचबरोबर घरापासून अधिकच दूर झाल्याची जाणीव होत आहे. घरापासून जवळ जवळ दहा ते बारा हजार मैलांवर आज मी येऊन राहिलों आहें.

८ मार्च १९५२

सकाळीं मि. पॉवर येण्याच्या आंतच आम्ही न्याहारी वगैरे आटपून तयार राहिलों. ते गाडी घेऊन आले व आम्ही त्यांच्याबरोबर येथील प्रौढशिक्षण कार्यालयांत गेलों. तेथें मि. पॉवर व त्यांचे सहकारी यांनीं बरीचशी उपयुक्त माहिती सांगितली. ऑस्ट्रेलियाप्रमाणें न्यूझीलंडमध्यें सुद्धां प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत आहे. न्यूझीलंडमध्यें निरक्षरता मुळींच नाहीं. साक्षरतेचें प्रमाण शेंकडा शंभर आहे. येथील मजूरसुद्धां सोळा वर्षांपर्यंतचें मोफत मिळणारें प्राथमिक शिक्षण घेतल्यावर आणखी एक दोन वर्षें माध्यमिक शाळेंत घालवितात. देशांतील सर्व लोकांना शिक्षणाची समान संधि मिळावी, म्हणून येथील सरकार उदार हस्तानें शिष्यवृत्त्या देत असतें. त्यामुळें लायक विद्यार्थ्यांना विश्वविद्यालयीन शिक्षणसुद्धां घेणें शक्य होतें. सांपत्तिक परिस्थिति प्रतिकूल असल्यामुळें एखादी व्यक्ति शिक्षणाला वंचित झाली, असा प्रकार येथें सहसा घडत नाहीं. सार्वत्रिक शिक्षण इतक्या व्यवस्थित स्वरूपांत प्रत्येक व्यक्तीला येथें उपलब्ध असल्यामुळें प्रौढशिक्षणाच्या कार्याला फारसा वाव नाहीं. प्रौढशिक्षण समितीतर्फे तांत्रिक किंवा व्यावसायिक शिक्षण देण्याची व्यवस्था केली जात नाहीं; कारण हें काम येथील औद्योगिक शिक्षण देणाऱ्या संस्था करीत असतात. या संस्थांमार्फत सायंकाळचे वर्ग चालतात व ज्यांना असें व्यावसायिक किंवा तांत्रिक शिक्षण हवें असतें, ती मंडळी या वर्गांना हजर राहतात व तें शिक्षण मिळवितात.

प्रौढशिक्षण समितीला यामुळें फक्त एकदोन महत्त्वाच्या गोष्टी कराव्या लागतात. न्यूझीलंडमध्यें प्रत्येक कामगाराला आठवड्याला फक्त चाळीसच तास काम करावें

लागतें. शनिवारीं व रविवारीं सर्वांना संपूर्ण सुट्टी असते. या सुट्टीच्या काळांत लोकांना कशामध्यें तरी गुंतवून ठेवणें जरूर असतें. मिळालेल्या विश्रांतीचा सदुपयोग लोकांना करतां यावा, त्यांची सात्त्विक करमणूक व्हावी व त्यांच्या ज्ञानांत भर पडावी, यासाठीं प्रौढशिक्षण खात्यातर्फे करमणुकीचे पुष्कळसे कार्यक्रम आंखले जातात. नाटकें, गाणीं, वाद्यें वाजविणें इत्यादि कार्यक्रमांत भाग घेण्यासाठीं लोक प्रौढ-शिक्षण वर्गांत येतात. न्यूझीलंडमधील लोकांना सार्वजनिक सभेंत बोलण्याची व अध्यक्ष होण्याची हौस दिसून येते. त्यासाठीं या लोकांना जाहीर सभेंत भाषण करण्याचें व ती सभा चालविण्याचें शिक्षण प्रौढशिक्षण वर्गांतून दिलें जातें. स्त्रियांच्यासाठीं जे वर्ग चालतात, त्या वर्गांतून स्त्रियांना कपडे तयार करणें, टोप्या तयार करणें, मुलांसाठीं खेळणीं तयार करणें इत्यादि व्यवसाय शिकविले जातात. त्याचप्रमाणें शिशुसंगोपनाबाबत व्याख्यानेंहि प्रौढशिक्षण वर्गांमार्फत दिलीं जातात. प्रौढांना फुरसदीचा वेळ नीट घालवितां यावा, म्हणून त्यांना बोलपट, चित्रपट, नाटकें वगैरे दाखविण्याचे कार्यक्रम या संस्थेमार्फत वरचेवर घडवून आणले जातात. ऑस्ट्रेलियाप्रमाणें येथेंहि 'कम्युनिटी आर्टस् सर्व्हिस्' ही संस्था काम करीत असते व या संस्थेमार्फत खेडोपाडीं नाटकाचे कार्यक्रम केले जातात.

वरील संस्थेंत अडीच तीन तास आम्हीं घालविले व दुपारचा कार्यक्रम निश्चित केला. आमच्याशीं बोलतांना आम्ही दोघे भारतांतील कोणत्या विभागांतून आलों आहोंत हें त्या लोकांनीं समजून घेतलें. मी पुण्याहून आलों आहे, हें समजतांच मि. पॉवर गालांतल्या गालांत हसले व आपल्या दोनतीन सहकाऱ्यांशीं ओळख करून देतांना मी पुण्याहून आल्याचें त्यांनीं सांगितलें. त्या वेळीं 'पूना' हा शब्द उच्चारतांना त्यांनीं त्या शब्दावर जोर दिला व थोडें मिस्कील हास्य केलें. मीं मि. पॉवर यांना विचारलें, "तुम्हांला 'पूना' हा शब्द चमत्कारिक कां वाटतो? तो शब्द उच्चारतांना तुमच्या चेहऱ्यावर कांहीं बदल होतो, तो कां?" माझा प्रश्न ऐकून मि. पॉवर म्हणाले, "तुम्ही गैरसमज करून घेऊं नका. न्यूझीलंडमध्यें 'पूना' या शब्दाला एक विशेष अर्थ प्राप्त झाला आहे. हा मनुष्य 'पूना टाईप' आहे असें आम्ही जेव्हां म्हणतों, तेव्हां त्याचा अर्थ, तो अहंमन्य किंवा घमेंडखोर आहे, असा समजला जातो." मीं विचारलें, "आमच्या पुण्याला येथें इतका वाईट अर्थ कां मिळाला?" त्यावर त्यांनीं पुढील खुलासा केला. "ब्रिटिशांपैकीं जे अधिकारी भारतामध्यें नोकरीला गेले, त्यांपैकीं ज्यांनीं पुण्यामध्यें दीर्घकाळ काढला, ते

अधिकारी येथें येऊन स्थायिक झाले. हे सर्व लोक अत्यंत घमेंडखोर व अहंमन्य होते. साम्राज्यशाहीच्या धुंदींतच ते वावरत असत. भारतामध्यें नोकरीसाठीं गेलेले ब्रिटिश किंवा इंडोनेशियांत वास्तव्य करून आलेले डच, यांच्यासारखे उर्मट दुसरे कोणी नसतात. या दोन्ही जातींचे लोक आम्हां न्यूझीलंडवासियांना मुळींच आवडत नाहींत. असल्या उर्मट व घमेंडखोर लोकांना आम्ही पूना टाईप लोक मानतों. कालपासून आपला परिचय झाला, तेव्हांपासून मी पाहतों आहे. प्रत्यक्ष पुण्यांत राहणारा मनुष्य हा अत्यंत सौजन्यशील व नम्र असतो."

दुपारीं आम्ही एका ट्रेनिंग कॉलेजमध्यें गेलों. त्या ठिकाणीं दोन प्रकारचे विद्यार्थी शिक्षण घेत होते. जे मॅट्रिक झाले होते, त्यांना एकाच वर्षाचें ट्रेनिंग दिलें जात होतें. एक वर्षाचें ट्रेनिंग अगदींच अपुरें आहे, अशी या लोकांची समजूत आहे. म्हणून या वर्गाचा उल्लेख करतांना तेथील प्राचार्य म्हणाले, "आम्ही एक नॉर्मल वर्ग चालवितों व दुसरा 'प्रेशर कुकर सिस्टीम' चा वर्ग चालवितों. ज्याप्रमाणें प्रेशर कुकरमध्यें अन्न थोड्या वेळांत शिजविलें जातें त्याचप्रमाणें या शिक्षकांना एका वर्षाच्या अल्पावधींत सर्व ट्रेनिंग दिलें जातें." ही पद्धत या प्राचार्यांना पसंत नसावी असें त्यांच्या बोलण्यावरून दिसून आलें.

ट्रेनिंग कॉलेजच्या सभागृहांत आज प्रौढशिक्षण समितीतर्फे शेक्सपिअरच्या Merchant of Venice या नाटकाचा कार्यक्रम आहे. या कार्यक्रमाला हजर राहण्याचें आम्हाला आमंत्रण आहे. कार्यक्रम साडेसातला सुरू होणार आहे. मि. पॉवर यांच्याजवळ स्वतःची गाडी आहे. ते म्हणाले, "आपण शहरांत परत जाऊं व मिसेस पॉवरना घेऊन येऊं. त्या पण नाटकाला हजर राहणार आहेत. वाटेंत एका चिनी हॉटेलांत आपण जेवण घेऊं. मला चिनी हॉटेलांतील पदार्थ फार आवडतात. तुमची जर हरकत नसेल तर आपण हा कार्यक्रम निश्चित करूं या." आम्हीं अनुमति देतांच मि. पॉवर तयारीला लागले.

सातला आम्ही येथें आलों. थोड्या वेळांत नाटक सुरू होणार आहे. पडदे टांगण्याचें वगैरे काम करण्यांत नटनटी गढून गेल्या आहेत. या नटांची नेमणूक प्रौढशिक्षण समिति करते. तीन महिन्यांचा त्यांचा करार असतो. या तीन महिन्यांत समिति सांगेल त्या ठिकाणीं यांनीं नाट्यप्रयोग करावयाचे असतात. साधारणपणें या तीन महिन्यांसाठीं एकच नाटक बसविलेलें असतें. ज्या ठिकाणीं नाटकाचा कार्यक्रम व्हावयाचा असेल, त्या ठिकाणची ग्रामपंचायत प्रयोगाबाबतची सर्व

जबाबदारी स्वीकारते. नाटकाचें किमान उत्पन्न इतकें होईल, अशी हमी ही पंचायत प्रौढशिक्षण समितीला देते. प्रयोगासाठीं लागणारा हॉल व फर्निचर पुरविण्याची, तसेंच तिकिटाची विक्री करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची असते. खेळाचें जें उत्पन्न होईल, त्यापैकीं शेंकडा पन्नास टक्के उत्पन्न ग्रामपंचायतीकडे जातें. त्यामुळें हा प्रयोग यशस्वी करण्यासाठीं ते लोक खूप मेहनत करतात. असा प्रयोग झाल्यावर स्थानिक लोकांना त्यांनीं आपली स्वतःची नाटक कंपनी तयार करावी व एखादा खेळ बसवावा म्हणून प्रौढशिक्षण समिति हरएक प्रकारची मदत करते. या नाट्यविभागाची देखरेख करण्यासाठीं व त्याबाबत जरूर तें मार्गदर्शन करण्यासाठीं एक खास अधिकारी नेमलेला आहे. या अधिकाऱ्याला दोन मोठ्या फिरत्या गाड्या देण्यांत आल्या आहेत. त्या नेपथ्यासाठीं लागणारीं सर्व उपकरणें व साहित्य यांनीं सुसज्जित केलेल्या आहेत. या विभागामार्फत नाटकाच्या कार्यक्रमा-बरोबरच नृत्याचे व गाण्याचे कार्यक्रम पण घडवून आणले जातात. ‘ प्रिय गोपाल ’ नांवाच्या एका भारतीय नृत्यविशारदानें आम्ही येथें येण्याआधीं या भागाचा दौरा केला होता व त्याचे या देशांतील सर्व कार्यक्रम या विभागातर्फेंच आंखण्यांत आले होते.

नाटकाचा प्रयोग अत्यंत आकर्षक झाला. प्रयोग संपल्यावर नटनटींसमवेत आम्हीं कॉफी घेतली. परंतु त्यांच्यापैकीं कोणाचेंहि कॉफी घेण्याकडे मुळींच लक्ष नव्हतें. पडदे सोडण्यापासून सामानाची आवराआवर करण्यापर्यंतचीं सर्व कामें करण्यांत हे कलाकार गुंतून गेले होते. रंगभूमीची सेवा करतांना पडेल तें हलकें काम झटून करण्याची येथील नटनटींची प्रवृत्ति पाहून मला आश्चर्याचा धक्का बसला. रात्रीं दीडच्या सुमारास आम्ही निवासस्थानीं परत आलों. आजच्या दिवसांत जवळ जवळ शंभर मैलांचा प्रवास झाला.

९ मार्च १९५२

सकाळींच मि. पॉवर यांचा टेलिफोन आला. “ येथून सत्तर मैल दूर असलेल्या एका खेड्याला आज आपण भेट देणार आहांत. त्या ठिकाणीं ‘ मावरी ’ लोकांची वसाहत आहे. या लोकांसाठीं सामूहिक विकास योजना सुरू करण्यांत आली आहे. तेथील कामें पाहण्याकरितां आपण जाणार आहांत. मी एक तासानें गाडी घेऊन येतों. तुम्हीं तयार राहा. ”

मि. पॉवर यांच्या बरोबर आम्ही या मावरी वसाहतींत आलों आहोंत. मावरी लोक आदिवासी आहेत. हे मागासलेले आहेत, असें येथें येण्यापूर्वी आम्हीं ऐकलें होतें व वाचलेंहि होतें. परंतु या लोकांच्याबद्दल आमची माहिती किती चुकीची आहे, याची सार्थ कल्पना या लोकांच्यामध्यें कांहीं तास घालविल्यावर आली. आज न्यूझीलंडमध्यें जवळजवळ एक लाख सोळा हजार मावरी आहेत. एकंदर लोकवस्तीच्या $\frac{1}{16}$ इतके लोक मावरी आहेत.

आमच्याबरोबर मि. विनीएटा या नांवाचे एक मावरी अधिकारी होते. मावरी लोकांच्याबद्दल बरीचशी माहिती त्यांनींच आम्हांला दिली. आम्ही येणार असल्याची बातमी मि. विनीएटा यांनीं या लोकांना आधींच दिली होती. त्यामुळें आज या वसाहतींतील लोक आमच्या स्वागतासाठीं तेथें हजर होते. या ठिकाणीं एक मोठा दिवाणखाना आहे. त्याला ' मोराय ' म्हणतात. ही एक धार्मिक जागा आहे. या मोरायच्या बाहेरील बाजूला एक लहानसा उंचवटा आहे. त्यावर त्यांचे पुढारी उभे राहिले. मावरी भाषेंत या उंचवट्याला ' तुरंगा व्हाय व्हाय ' म्हणतात. पुढाऱ्याच्या समोरच्या बाजूला रॉय व मी उभे राहिलों. आम्हांला घेऊन येणारे अधिकारी आमच्या शेजारीं उभे राहिले. भोंवतालीं मावरी लोक उभे होते. एकाएकीं वातावरण शांत झालें व त्या पुढाऱ्यांपैकीं एकानें भाषणाला सुरुवात केली. मि. विनीएटा झटकन उठून त्या पुढाऱ्याच्या शेजारीं जाऊन उभे राहिले. सदर पुढारी मावरी भाषेंत बोलणार होता व विनीएटा त्याच्या भाषणाचें भाषांतर आम्हांला सांगणार होते. पुढाऱ्याच्या भाषणाला सुरुवात झाली. तो म्हणाला, " आम्ही सर्व मावरी लोक आपले अत्यंत प्रेमानें स्वागत करतों. भारतवासियांकडे आम्ही नेहमीं अत्यंत आदरानें पाहतों. याचें मुख्य कारण म्हणजे आमचे पूर्वज येथें तुमच्या देशाच्या बाजूनेंच आले. या वेळीं जी मंडळी मागें राहिली त्यामधेंच तुमचे पूर्वज असतील. आपण आमच्याच वर्णाचे आहांत. आमच्या संस्कृतीप्रमाणें आपली संस्कृतीसुद्धां फार जुनी आहे. त्यामुळें आपलें स्वागत करण्यांत आम्हांला विशेषच आनंद होत आहे. आज आपलें स्वागत करतांना आमच्या पूर्वजांच्या स्मृती आमच्या डोळ्यांसमोर उभ्या राहात आहेत. ज्या मार्गानें तुम्ही आलांत त्याच मार्गानें आमचे पूर्वज आले. आजसुद्धां त्यांचे आत्मे तुमच्याबरोबर येथें येऊन हजर झाले असतील. आज आम्ही जें स्वागत करतों, तें केवळ आपलें स्वागत नसून इसवी सन ९५० ते १३५० या काळांत सात होड्यांमधून जे आमचे मावरी

पूर्वज आले, त्या पूर्वजांचेंहि आम्ही स्वागत करीत आहोंत. एवढा प्रदीर्घ प्रवास करतांना आमच्या पूर्वजांपैकीं कांहींना जलसमाधि मिळाली. तुम्ही समुद्रावरून प्रवास केल्यामुळें त्या समुद्रांत बुडलेल्या आमच्या पूर्वजांचे आत्मेसुद्धां आज तुमच्याबरोबर आले असतील. आपलें स्वागत करण्यांत आम्हांला अधिक आनंद वाटण्याचें कारण म्हणजे आपण दोघे एकाच कॉमनवेल्थचे सभासद आहोंत. आमच्या सर्व मावरी जमातीतर्फे व आमचे मावरी राजेसाहेब यांच्यातर्फे व आमच्या राजकन्या प्रिन्सेस टापू यांच्यातर्फे आम्ही आपलें हार्दिक स्वागत करतों."

याप्रमाणें अत्यंत शांत व गंभीर वातावरणांत स्वागताचा कार्यक्रम पार पडला. आम्हांला असें सांगण्यात आलें कीं, ज्या सात होड्यांचा स्वागताच्या भाषणांत उल्लेख केला गेला त्या सात होड्यांतून सात मावरी घराणीं न्यूझीलंडमध्यें आलीं व आज येथें असलेल्या प्रत्येक मावरींचा या सातांपैकीं कोणत्या तरी घराण्याशीं संबंध आहेच.

यानंतर मि. विनीएटा यांनीं मावरी लोकांबद्दल व तेथें चालू असलेल्या सामूहिक विकास योजनेबद्दल आम्हांला माहिती सांगितली. त्या मावरी पुढाऱ्यांपैकीं दोघां पुढाऱ्यांनीं एक लाकडी पेटी आणली व ती टेबलावर आमच्यासमोर ठेविली. मग त्यांनीं ती पेटी उघडली व आंत हात घालून वर्तमानपत्रांतील अनेक कात्रणें आमच्या पुढें ठेविलीं. तीं चाळून पाहतां असें दिसून आलें कीं, भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचीं छायाचित्रें व त्यांच्या भाषणाचे अहवाल वर्तमानपत्रांत जिथें जिथें प्रसिद्ध झालेले त्यांना पाहायला मिळाले, त्याचीं सर्व कात्रणें या लोकांनीं अगदीं जपून ठेविलेलीं होतीं. आपण हें सर्व कां जपून ठेविलें आहे, असें मीं त्यांना आमच्या दुभाष्यामार्फत विचारतांच ते म्हणाले, "जगांतील आजचा सर्वांत मोठा माणूस म्हणजे पंडित नेहरू. आंतरराष्ट्रीय राजकारणांतील डावपेच बाजूला ठेवून सर्वांना मानवतेच्या धर्मानें वागविणारा एकच माणूस आज जगांत आहे व तो म्हणजे तुमचा नेहरू. गौरेतर लोकांचा तोच पाठीराखा आहे. गोऱ्या लोकांपेक्षां आम्ही कोणत्याहि बाबतींत कमी नाहीं, हें त्या लोकांना धैर्यानें ठासून सांगण्याचें काम आज हा माणूस करीत आहे. त्यामुळें गोऱ्या लोकांच्या देशांत अल्पसंख्येनें राहणाऱ्या आमच्यासारख्या गौरेतर लोकांना आज मोठा आधार वाटतो व म्हणूनच त्यांच्याबद्दल आमच्या मनांत खूपच आदर आहे. त्यांचीं वक्तव्यें आम्ही काळजीपूर्वक वाचतों; इतकेंच नव्हे तर तीं भक्तिभावानें जपून ठेवतों."

त्यांनीं केलेला हा खुलासा ऐकून माझ्या अंतःकरणांतील भावना उचंबळून आल्या. आम्ही नेहरूंना ' भारतभाग्यविधाते ' मानतों. नेहरू हे केवळ भारताचेच पुढारी नाहींत, तर जगांतील सर्व गौरेतर लोक त्यांना आपले पुढारी मानतात, याचा या वेळीं पुरेपूर प्रत्यय आला.

हें जें सभागृह होतें, त्या ठिकाणीं भिंतीवर व छतावर लाकडी कोरीव काम खूप चांगलें पाहावयाला मिळालें. या बाबतींत मि. विनीएटा म्हणाले, "लाकडावर कोरीव काम करण्यांत मावरी लोकांचा हातखंडा आहे. त्यांच्याजवळ ही निसर्गदत्त देणगी आहे. मावरी लोकांनीं आपली पुरातन कला जपून ठेवलेली आहे. आमच्या देशांत मध्यंतरीं एक असा काळ येऊन गेला कीं, ज्या वेळीं गोऱ्या लोकांचें अंधानुकरण करण्यामध्यें आमच्या तरुणांना अतिशय धन्यता वाटत असे. तरुणांच्यामध्यें बळावत चाललेली ही वृत्ति पाहून आमच्या समंजस पुढाऱ्यांना सारखी एक भीति वाटत होती, कीं आतां यापुढें मावऱ्यांची कला व त्यांची संस्कृति रसातळाला जाईल काय ? परंतु आमच्या सर्वांच्या सुदैवानें गेल्या दोनतीन दशकांमध्यें मावरी लोकांच्या दृष्टिकोनांत जबरदस्त बदल घडून आला आहे. आज मावरी भाषेत बोलण्यांत आम्हांला कमीपणा वाटत नाहीं. इतकेंच नव्हे तर मावरी भाषा, मावरी नृत्यें, मावरी कला, मावरी संस्कृति यांचें पद्धतशीर संगोपन करून तीं जगविण्याचा आमच्या तरुणांनीं व तरुणींनीं संकल्प केलेला आहे."

चहापाणी झाल्यावर मावरी लोकांनीं येथें चालविलेलें एक सांस्कृतिक केंद्र ( Community centre ) पाहण्यासाठीं आम्ही गेलों. या केंद्राचा खर्च येथें चालविलेल्या एका उपाहारगृहांतून ( Canteen ) मिळविला जातो. या ठिकाणीं मावरी स्त्रीपुरुष येऊन आपला फुरसतीचा वेळ घालवितात. केंद्रासाठीं बांधण्यांत आलेल्या इमारतीचा खर्च सरकारकडून मिळतो. उपाहारगृहांत मावरी स्त्रीपुरुष विनावेतन काम करतात. त्यामुळें उपाहारगृहाला नफा होऊं शकतो. या नफ्यांतूनच येथें होणाऱ्या सर्व सांस्कृतिक कार्यक्रमांचा खर्च केला जातो. जर कधींकाळीं तूट आली, तर लोक नृत्यासारखे कांहीं कार्यक्रम तिकीट लावून करतात व ती तूट भरून काढतात. प्रत्येक गोष्टींत सरकारवर अवलंबून राहण्याची वृत्ति या लोकांत नाहीं. आपल्या संस्था आपण चालविल्या पाहिजेत, त्याबाबतची सर्व जबाबदारी आपण उचलली पाहिजे, याची चांगली जाणीव येथील लोकांना झालेली दिसली.

लोकांच्यामध्यें शिक्षणाचा प्रसार व्हावा व त्यांचें जीवन सुखी व समृद्ध व्हावें, यासाठीं हीं सांस्कृतिक केंद्रें काढलीं जातात.

१० मार्च १९५२

न्याहरी झाल्यानंतर मि. पॉवर कालच्याप्रमाणेंच गाडी घेऊन आले. त्यांच्या बरोबरच मावरी कल्याण केंद्राच्या कार्यालयाला भेट देण्यासाठीं निघालों. वाटेंत मि. विनीएटा यांना आम्ही बरोबर घेतलें. सदर कार्यालयांत मि. क्लार्क या नांवाच्या मावरी अधिकाऱ्यानें आमचें स्वागत केलें. त्यानें मावरी लोकांच्याबद्दल भरपूर माहिती सांगितली. ते म्हणाले, " आम्हां मावरी लोकांना कोणावर तरी अवलंबून राहण्याची संवय लागलेली आहे. पूर्वीच्या काळीं आमच्याकडे अशी प्रथा होती कीं, आमचा एक पुढारी असे व त्या पुढाऱ्याचे सर्व लोक ऐकत असत. ते सर्व त्या पुढाऱ्यावर अवलंबून असत. काळ बदलला तरी ही वृत्ति मात्र बदललेली नाहीं. आज या ऑफिसमार्फत मावरी लोकांना मदत मिळते. त्या मदतीवर ते अवलंबून राहतात. आम्ही सुमारें दहा हजार मावरी लोकांची या कार्यालयामार्फत काळजी घेत असतों. त्यांच्यापैकीं ८०% लोक अद्यापि जुन्या मावरी रूढींना चिकटून आहेत. मावरी लोक अद्ययावत् पद्धतीचा युरोपियन पोषाख करीत असल्यामुळें हें तुम्हांला कदाचित् खरें वाटणार नाहीं. खेड्यांत राहणारा मावरी आपलें परंपरागत जीवन जगण्याचा प्रयत्न करीत असतो; तर शहरांत राहणारा मावरी भोंवतालच्या गोऱ्या लोकांपेक्षां आपण निराळे दिसूं नये म्हणून त्यांच्याचप्रमाणें राहण्याचा प्रयत्न करतो. आम्ही मावरी लोक फार खर्चिक आहोंत. पैशाची पूजा करणें आम्हांला मुळींच जमत नाहीं. हा मावरी लोकांचा स्वभावदोष लक्षांत घेऊन माझ्या या कार्यालयातर्फें मावरी लोकांना अल्पबचत करण्याचें शिक्षण देण्याचें काम करावें लागतें. मावरी हा उधळ्या असला, तरी तो दिलाचा सच्चा आहे. आपल्या धार्मिक 'मोरायवर' (वेदीवर) उभा राहून जर त्यानें अमुक एक गोष्ट कबूल केली, तर त्याची मान कापली तरी तो आपल्या वचनापासून ढळणार नाहीं.

" आमच्या या कार्यालयातर्फें मावरी लोकांना हरएक प्रकारची मदत केली जाते. त्यांना नोकऱ्या मिळवून देणें, हें पण काम आम्ही करतों. आमच्या देशाच्या घटनेप्रमाणें मावरी व गोरे यांच्यामध्यें मुळींच भेद केला जात नाहीं. तत्त्वतः हें जरी खरें असलें, तरी व्यवहारांत मात्र अनुभव वेगळा येतो. गेल्या वर्षापर्यंत

(१९५१) मावरी लोकांना बँकेमध्यें नोकरी मिळूं शकत नव्हती; परंतु खूप प्रयत्न करून आम्हीं आतां ही अडचण दूर केली आहे. सरकारी सनदी खात्यांत मावरी लोकांना नोकरी देण्याला प्रतिबंध नाहीं. खाजगी उद्योगधंदे हे सर्व गोऱ्या लोकांच्या हातीं आहेत. ते मावरी लोकांना नोकरीवर ठेवायला फारसे खूष नसतात; पण आमच्या देशांत माणसेंच कमी असल्यामुळें नाइलाजानें का होइना, त्यांना आम्हांला कामावर ठेवावेंच लागतें.

" खेड्यांत राहणारे मावरी शेती व दुग्धव्यवसाय या धंद्यांमध्यें गुंतलेले असतात. मावरी लोकांच्या स्वतःच्या अशा तीन दुधाच्या डेअऱ्या आहेत. एके काळीं जो तो आम्हां लोकांना, ' मावरी लोकहो, शेतावर चला, ' असा उपदेश करीत असे. पण आतां जमिनीच कमी असल्यामुळें हा उपदेश आपोआप कमी होऊं लागला आहे. साहजिकच मावरी लोकांना इतर उद्योगधंदे शोधावे लागले. मावरी लोकांमध्यें इंजिनीअर, डॉक्टर असे व्यवसाय करणारे लोक जवळजवळ नाहींतच.

" आजचा मावरी हा एका विशिष्ट परिस्थितींत सांपडलेला आहे. एका बाजूला आपली जुनी संस्कृति टिकवावी व आपण मावरीच राहावें, अशी त्याची वृत्ति आहे; तर दुसऱ्या बाजूला भोंवतालच्या गोऱ्या लोकांच्या संस्कृतीशीं समरस व्हावें व आधुनिक सुधारणेचे जास्तींत जास्त फायदे मिळवावेत, असें त्याला वाटूं लागलें आहे. मावरी लोकांकरितां सरकारमार्फत जे प्रयत्न केले जात आहेत, ते करण्यांत सरकारचा उद्देश असा आहे कीं, शक्य तितक्या लवकर मावरी लोकांनीं युरोपिअन लोकांच्या जीवनाशीं समरस व्हावें. या बाबतींत एक अडचण अशी आहे कीं, मावरी हा सनातनी प्रवृत्तीचा माणूस आहे. तो आपल्या कळपाच्या बाहेर जायला फारसा उत्सुक नाहीं. मावरी जमातींत स्त्रिया जरी मोकळेपणानें वागत असल्या, तरी त्यांना फारसें महत्त्वाचें स्थान नाहीं. येथील गोरे लोक आपल्या स्त्रियांना कपबश्या वगैरे धुण्यासाठीं मदत द्यायला पटकन धावून जातील; परंतु मावरी मात्र असलें हें स्त्रीदाक्षिण्य दाखवायला जाणार नाहींत. हीं कामें बायकांचींच आहेत व तीं त्यांनीं केलींच पाहिजेत, असें मावरी पुरुषांना वाटतें. आज येथील पार्लमेंटमध्यें फक्त चारच मावरी सभासद आहेत; तर युरोपिअन लोकांची संख्या बहात्तर आहे. मावरी लोकांसाठीं स्वतंत्र मतदारसंघ आहे. ते गोऱ्या लोकांना मतें देऊं शकत नाहींत. तरुण मावरी लोकांना याबद्दल खूपच खंत वाटते. त्यांना वाटतें कीं, आज ते या देशांत गोऱ्या लोकांच्या सहानुभूतीवर

जगत आहेत. ही कांहीं मोठी सन्मानाची अवस्था नाहीं. मजूर पक्ष जर अधिकारारूढ झाला, तर आम्हांला विशेष सहानुभूतीची वागणूक मिळते. तोंडानें बोलतांना मात्र आम्ही सगळे एक असल्याचें नेहमीं सांगण्यांत येतें; परंतु दैनंदिन जीवनांत मावरी व 'पाकेहा' (गोरे लोक) यांना भिन्न भिन्न रीतीनें वागविलें जातें.

"मावरी लोकांमध्यें सार्वत्रिक शिक्षणाचा चांगलाच प्रसार झाल्यामुळें आजचा मावरी माणूस खूपच आत्मविश्वासानें बोलूं लागला आहे. एके काळीं त्याची परिस्थिति बरीच अनुकंपनीय होती. एक वर्ण सोडला, तर इतर कित्येक बाबतींत तो आज गोऱ्यांशीं बरोबरी करूं शकतों. आपण मावरी आहोंत, हें सांगण्याची त्याला एके काळीं लाज वाटत असे. गोऱ्या लोकांकडून वाईट वागणूक मिळाल्यामुळें न्यूनगंडाची त्याला कायमची बाधा झालेली असे. संख्येच्या मानानें पाहतां गोऱ्या लोकांच्या $\frac{१}{१६}$ इतकी मावरी लोकांची संख्या आहे. आज गोऱ्या लोकांची धडपडसुद्धां अशीच आहे कीं, आपण मावरी आहोंत, हें या लोकांनीं विसरावें व त्यांच्या भोवतालच्या, म्हणजे युरोपियन संस्कृतीशीं संपूर्णतः समरस व्हावें. पण नवजवान मावऱ्यांची वृत्ति याच्या अगदीं उलट आहे. स्वतःला मावरी म्हणवून घेण्यांत त्याला धन्यता वाटते."

मावरी लोकांना हरएक प्रकारची विशेष मदत देण्याचें धोरण सरकारनें आंखलेलें आहे. त्यांच्या मुलांना व्यवसायाचें मार्गदर्शन करण्याकरितां व त्यांना नोकरी वगैरे मिळवून देण्याकरितां खास अधिकारी नेमलेले आहेत. या खात्याचे मुख्य अधिकारी मि. हॅरोविरा आज मला भेटले. त्यांनीं आपल्या कामाचें स्वरूप आम्हांला सांगितलें. ते म्हणाले, "मी निरनिराळ्या माध्यमिक शाळांमध्यें जातों. तेथें शिकणाऱ्या मुलांना भेटतों व त्यांच्या आवडी समजून घेतों. या बाबतींत मावरी पालक मुलांना मुळींच मदत देऊं शकत नाहींत. म्हणून मला पालकांशीं संबंध ठेवावा लागतो व त्यांच्या मुलांनीं कोणत्या प्रकारचें शिक्षण घ्यावें, याबाबत मला त्यांना सल्ला द्यावा लागतो. गोरे लोक आमच्या मावरी मुलांना नोकरीवर ठेवायला मुळींच खूष नसतात. त्यामुळें आमचें काम विशेष कठीण झालें आहे. आमचीं मावरी मुलें इतकीं चांगलीं तयार झालीं पाहिजेत कीं, कोणत्याहि चढाओढीमध्यें तीं गोऱ्या लोकांच्या मागें न राहतां त्यांच्यावर मात करूं शकतील. ही गोष्ट मावरी मुलांना व त्यांच्या पालकांना मी नेहमीं समजावून

सांगत असतों. आमच्या दुर्दैवानें सरकार मात्र मावरी व पाकेहा यांमध्यें कोणताहि भेद करीत नाहीं. मावरी मुलगा नोकरीवर जातांना आम्ही त्याला पुढील स्वरूपाचा उपदेश करतों. ' आज तूं ज्या कामावर जातो आहेस, त्या ठिकाणीं एक व्यक्ति म्हणून तूं जात नाहींस; तर मावरी लोकांचा प्रतिनिधी म्हणून तूं जात आहेस. तूं जर चांगलें काम केलेंस व तुझ्या मालकानें तुझ्यावर टाकलेला विश्वास व जबाबदारी सांभाळण्यास आपण लायक आहांत असें सिद्ध केलेंस, तर तुझी तर नोकरी टिकेलच, परंतु साऱ्या मावरी जमातीची त्यामुळें प्रतिष्ठा वाढेल व इतर मावरी मुलांसाठीं तूं योग्य वातावरण निर्माण करशील. मावरी मुलानें लक्षांत ठेविलें पाहिजे, कीं आपण स्वतःकरितां जगत नाहीं, तर आपल्या साऱ्या जमातीकरितां जगत आहांत. गोऱ्या लोकांपेक्षां अधिक कर्तबगार व अधिक कार्यक्षम झाल्यावांचून आपणांला या देशांत जगतां येणार नाहीं, आम्ही मुलांना ही शिकवण सारखी देत असतों. "

मावरी व गोरे यांना शिक्षणाच्या बाबतींत समान संधि दिली जाते. मावरी मुलांना कांहीं विशेष सवलती पण दिल्या जातात. सढळ हातानें त्यांना शिष्यवृत्त्या दिल्या जातात. सक्तीच्या शिक्षणाचा फायदा ६ ते १५ वयाच्या मुलमुलींना दिला जातो. त्यामुळें शिकणाऱ्या मुलालींमुची संख्या सारखी वाढत चालली आहे. मावरी मुलें माध्यमिक शिक्षण घेण्यास पण उत्सुक आहेत. मावरी मुलांकरितां स्वतंत्र अशा गोऱ्या लोकांच्या मुलांच्या शाळेंत जाऊन त्या मुलांच्या बरोबरीनें मावरी मुलें शिक्षण घेऊं शकतात, अशी माहिती त्या अधिकाऱ्यानें सांगितली. मीं त्यांना विचारलें, " अभ्यासाच्या बाबतींत मावरी मुलें गोऱ्या मुलांशीं कितपत स्पर्धा करूं शकतात ? " त्यानें उत्तर दिलें, " शैक्षणिक स्पर्धेत मावरी मुलें मुळींच मागें पडत नाहींत. आज अशा सात शाळा मला माहीत आहेत कीं, ज्या ठिकाणीं युरोपिअन मुलांनीं मावरी मुलाला आपला नायक म्हणून निवडला आहे. मावरी लोक शिक्षक म्हणून सुद्धां आज नेमले जातात. १९४० सालीं फक्त चारच मावरी शिक्षक ट्रेनिंग घेत होते. आज ही संख्या ५० वर आली आहे."

मावरी मुलांच्या शिक्षणाची एक दुसरी योजना या अधिकाऱ्यानें सांगितली. ज्या मावरी मुलाला शेतकीचें शिक्षण घ्यावयाचें, त्याला नाणावलेल्या शेतकऱ्याकडे शिक्षणासाठीं पाठविलें जातें. पांच वर्षेपर्यंत तो त्या शेतकऱ्याच्या हाताखालीं राहतो व त्या काळांत त्याला शेतकीचें शिक्षण देण्याबाबत तो शेतकरी

सरकारबरोबर लेखी करार करतो. या पांच वर्षांत त्या मुलाला ग्रँट मिळते. त्याच्या जोडीला शेतकरी त्याला थोडा पगार देतो. या पगारापैकीं निम्मा पगार तो शेतकरी सरकारी व्यवसाय मार्गदर्शन करण्याऱ्या खात्याकडे पोहोंचवितो व ती रक्कम त्या मुलाच्या नांवें जमा करण्यांत येते. पांचव्या वर्षाच्या शेवटीं मुलाचें शिक्षण पुरें होतें. सरकारी खात्यांत त्याच्या नांवें जमा झालेली रक्कम त्याला देण्यांत येते व त्या भांडवलावर त्या मुलाला आपला पुढील व्यवसाय सुरू करतां येतो.

संध्याकाळीं मावरी मुलींकरितां चालविलेल्या एका वसतिगृहाला भेट दिली. त्या ठिकाणीं मावरी भाषेतील कांहीं गाणीं ऐकलीं. कांहीं अभिनयगीतें पण झालीं. या वसतिगृहांत राहणाऱ्या मावरी मुली साधारणपणें सोळा ते पंचवीस वयाच्या होत्या. त्या शहरांत निरनिराळ्या ठिकाणीं नोकरी करीत होत्या. या मुलींचे आईबाप शहरापासून दूर राहतात. शहरांत राहणें या मावरी लोकांना परवडत नाहीं. अशा नोकरी करणाऱ्या मुलींची शहरांत राहण्याची फार गैरसोय होते व त्याकरितां त्यांच्यासाठीं अशीं वसतिगृहें सरकारच्या मदतीनें कांहीं मिशनरी संस्था चालवितात. वसतिगृहांत राहणाऱ्या जवळजवळ सर्व मुली प्रकृतीनें सुदृढ दिसल्या. सर्वसाधारणपणें मावरी लोक चांगलेच ताकतवान दिसले. या मुलींनीं आमचें अत्यंत आपुलकीनें स्वागत केलें व छोटासा पण चांगला असा करमणुकीचा कार्यक्रम करून दाखविला. कॉफी व इतर खाद्यें देऊन त्यांनीं आमचा सन्मान केला. भाषेची अडचण फारशी भासली नाहीं; कारण त्यांच्यापैकीं बहुतेक मुलींना इंग्रजी बोलतां येत होतें. सुमारें तीन तास या वसतिगृहांत आम्हीं घालविले व तेथील सर्व भगिनींचा निरोप घेऊन आम्ही बाहेर पडलों.

११ मार्च १९५२

आज मि. हिल्टन् पॉवर यांच्याबरोबर आम्ही येथून कांहीं मैलांवर असलेल्या एका शाळेला भेट देण्यासाठीं निघालों. सदर शाळेला एक वसतिगृह जोडलेलें होतें. आम्ही शाळा पाहाण्यास येतों, असें ज्या वेळीं शाळेच्या चालकांना कळविण्यांत आलें त्या वेळीं, 'तुम्ही पाहुण्यांना घेऊन जेवायलाच या,' असें चालकांनीं मि. पॉवर यांना कळविलें होतें. त्याच तयारीनें आम्ही निघालों.

आम्ही तेथें पोहोंचलों, त्या वेळीं शाळेचे मुख्याध्यापक कांहीं मुलांना बरोबर घेऊन पोहायला गेले होते. बाकीचीं मुलें भोजनगृहांत जाऊन बसलेलीं होतीं.

एका शिक्षकानें आमचें स्वागत केलें व आम्हांस भोजनगृहांत नेलें. त्या ठिकाणीं एका मध्यवर्ती टेबलावर आमचीं पानें मांडलेलीं होतीं.

या शाळेंत एकूण ११० मुलें आहेत व तीं मावरी जमातीचीं आहेत. भोजन-गृहांत जवळजवळ ८० मुलें जेवायला बसलीं होतीं. १० । १२ मुलें पोहायला गेलीं होतीं व बाकीचीं १० । १२ वाढण्याचें काम करीत होतीं.

आम्ही जाऊन बसल्यावर जेवणाला सुरुवात झाली. जेवतां जेवतां शाळेची माहिती सांगण्यास तेथील शिक्षकानें प्रारंभ केला. थोड्याच वेळांत मुख्याध्यापक आपल्या शिष्यांना घेऊन परत आले. ते येऊन आमच्या शेजारीं जेवायला बसले. त्यांचा व आमचा परिचय करून देण्यांत आला.

जेवण संपल्यावर आम्ही मुख्याध्यापकांच्या बरोबर त्यांच्या कार्यालयांत गेलों. बहु-तेक सर्व मुलें वर्गांत गेलीं. कांहीं मुलें जेवणाची खोली साफ करण्याच्या कामाला लागलीं. वाढपी मुलें जेवायला बसलीं. मुख्याध्यापक शाळेबद्दल माहिती सांगूं लागले.

" आमच्या शाळेंत आम्ही मुलांना शारीरिक कष्ट खूपच करायला लावतों. शेतीच्या हंगामाच्या दिवसांत आम्ही शाळा दहापंधरा दिवस साफ बंद ठेवतों. आमच्याकडे मजुरांचा तुटवडा आहे. त्यामुळें शेतकऱ्यांना मदतीची गरज लागते. आम्ही आमच्या मुलांना नजीकच्या शेतकऱ्यांकडे मदत करायला पाठवितों. शेतकरी त्यांच्या जेवणाखाण्याची चांगली व्यवस्था ठेवतात व त्याशिवाय मुलांना मजुरी देतात. हा पैसा मुलांच्या हातांत दिला जात नाहीं. मुलांना जी मजुरी मिळते ती त्यांच्या नांवें आम्ही शाळेंत जमा करून ठेवतों व या पैशांतून मुलांना दूरच्या सफरीवर नेण्याचा खर्च केला जातो.


" आमच्या शाळेंतील मुलें निरनिराळया प्रकारचे हस्तव्यवसाय करतात. जोडे शिवण्याचें काम आम्हीं त्यांना शिकविलें आहे. केशकर्तनाची कला त्यांच्यापैकीं कांहींनीं चांगलीच हस्तगत केली आहे. येथील मुलेंच एकमेकांचे केस कापतात. याबद्दल काम करणाऱ्या मुलांना जे पैसे मिळतात त्यांपैकीं निम्मे पैसे प्रत्यक्ष काम करणाऱ्या मुलांना दिले जातात. उरलेले निम्मे पैसे या शाळेच्या केशकर्तनाल्या-मध्यें नवें साहित्य विकत घेण्यासाटीं जमा केले जातात. त्यांनीं आतां एक आधु-निक पद्धतीची विजेची खुर्ची विकत घेतली आहे. त्यामुळें आमच्या केश-कर्तनाल्याला अद्ययावत्पणा आला आहे व त्याची शोभाहि वाढली आहे.

“आमचीं मुलें आपले कपडे स्वतःच धुतात. आमच्या शाळेंत एकहि गडी नाहीं किंवा शिपाई नाहीं. सर्व कामें मुलांनाच करावीं लागतात. कपडे धुऊन मुलांनीं कमावलेल्या पैशांतून मुलांनीं एक कपडे धुण्याचें विजेवर चालणारें यंत्र आणलें आहे. त्यामुळें त्यांचें काम आतां सोपें झालें आहे. या वर्षी आमच्या मुलांनीं एक नाटक बसविलें. त्याचा पहिला प्रयोग फारच चांगला झाला. नंतर मुलांनीं या नाटकाचे कांहीं प्रयोग केले व थोडे पैसे जमा केले. या पैशांतून त्यांनीं एक प्रोजेक्टर विकत घेतला आहे. आतां मुलांना हवा तेव्हां आम्ही सिनेमा दाखवूं शकतों.” बोलतां बोलतां आम्ही स्वयंपाकघरांत आलों. त्या ठिकाणीं भांडीं धुण्याचें काम मुलेंच करीत होतीं. स्वयंपाकघराच्या मागच्या बाजूला खूपच मोठी बाग होती. बागेंत सफरचंदाचीं झाडें फार दिसलीं. मुख्याध्यापक म्हणाले, “ही सर्व बाग आमच्या मुलांच्या मेहेनतीनें तयार झालेली आहे.” कित्येक झाडें सफरचंदाच्या फळांनीं चांगलींच वाकलेलीं होतीं. मीं त्या मुख्याध्यापकांना विचारलें, “कां हो, इतकीं सफरचंदें झाडावर राहातात कशीं? तुमचीं मुलें हीं फळें खात कशीं नाहींत”? त्यावर मुख्याध्यापक म्हणाले.

“या फळांवर मुलांचीच मालकी आहे. वर्षाच्या सुरवातीला मी मुलांना पहिल्या सभेंत समजावून सांगतों कीं, हीं फळें तुमचीं आहेत. तुम्हीं लावायचीं, तुम्हीं वाढवायचीं व तुम्हींच खायचीं. फळें जर तुम्हीं खाऊन टाकलींत तर या फळांचा मुरंबा (जॅम) तुम्हांला मिळणार नाहीं. मुरंबा हवा असला तर फळांची काळजी घेतली पाहिजे. मुलांना मुरंबा फार आवडतो व मुरंब्यासाठीं तीं फळें सांभाळून ठेवतात व त्यांची नीट काळजी घेतात. रोज जेवणाच्या वेळीं कांहीं फळें आम्ही मुलांना देतोंच; पण बाकीच्या सर्व फळांचा मुलें मुरंबा तयार करतात. गेल्या वर्षी आमच्या मुलांनीं सहा हजार रत्तल (३००० शेर) मुरंबा तयार केला व सर्व मुलांनीं तो पोटभर खाल्ला.

“आमच्या शाळेंत मुलांना सुतारकाम सुद्धां शिकविलें जातें. आमच्या शाळेंतील एका वर्गातील मुलांनीं त्यांच्या वर्गाला लागणारें सर्व फर्निचर स्वतः एका वर्षांत तयार केलें. आमच्या शाळेंत प्रत्येक मुलाला एक छोटेसें कपाट दिलेलें आहे. हें कपाट ज्याचें त्यानें बनवायचें असतें. शाळा सोडतांना मुलगा तें कपाट आपल्या घरीं घेऊन जातो. आमच्या मुलांना हस्तव्यवसायाचें काम करण्यासाठीं प्रशस्त अशी चांगली जागा नाहीं. वर्कशॉपची आम्हांला फार गरज आहे. ही गरज आमच्या

मुलांनीं समजून घेतली आहे. सध्यां मुलें एका शिक्षकाच्या देखरेखीखालीं एक



हॉल बांधीत आहेत. सदर शिक्षक पूर्वी एका इमारत बांधणाऱ्या कंत्राटदाराकडे काम करीत होते. त्यांना या कामाचा अनुभव आहे. मुलें त्यांच्या मार्गदर्शनाखालीं कामें करतात. गवंड्याचें, सुताराचें, मजुराचें व मुकादमाचें काम मुलेंच करीत आहेत.

"आमच्या वसतिगृहांत जसा शिपाई किंवा गडी नाहीं त्याचप्रमाणें वसतिगृहावर देखरेख करण्यासाठीं पगारी सुपरिंटेंडेंट नाहीं. हें काम आम्ही मुलांकडेच सोपविलें आहे. येथील मुलांपैकीं जबाबदार मुलें शोधून त्यांच्याकडे तें काम पाळीपाळीनें सोपविण्यांत येतें" शाळेच्या प्रांगणांत पुष्कळच वस्तू ठिकठिकाणीं पडलेल्या दिसल्या. त्या पाहून मी मुख्याध्यापकांना म्हणालों, "येथें निरनिराळ्या प्रकारचें इतकें साहित्य पडलें आहे. याचा हिशेब तरी तुम्ही कसा ठेवतां?" ते म्हणाले, "अगदीं सोपी गोष्ट आहे ही. मुलांच्याकडेच तें काम मीं सोपविलेलें आहे. सर्व वस्तूंचा हिशेब बिनचूक ठेवला जातो. शाळेंतील एखादी वस्तु हरवली किंवा तिची फूटतूट झाली, तर मुलें आपल्या पैशांतून त्या जागीं दुसरी वस्तु विकत आणून ठेवतात. शाळा त्यांचीच आहे. त्यामुळें शाळेंतील प्रत्येक गोष्ट व्यवस्थित ठेवण्याची, ती स्वच्छ ठेवण्याची व नीट सांभाळण्याची जबाबदारी त्यांचीच आहे. सबंध शाळेची झाडलोट करण्याचें व रंगसफेती लावण्याचें कामहि हीं मुलेंच करतात."

"एकंदरींत तुमच्या शाळेंत मुलांना शारीरिक कष्ट खूपच करावे लागतात असें दिसतें. त्यामुळें त्यांच्या अभ्यासावर अनिष्ट परिणाम होत असेल. सार्वजनिक परीक्षेंत चांगले गुण अथवा बक्षिसें मिळविणारे विद्यार्थी तुमच्या शाळेंत जवळ जवळ नसतीलच. काय अनुभव आहे तुमचा?"

माझा हा प्रश्न त्यांना कांहीं फारसा आवडलेला दिसला नाहीं. ते म्हणाले, "इतर मुलांच्या मानानें माझीं मुलें अभ्यासांत मुळींच मागें पडत नाहींत, असें मी तुम्हांला खात्रीनें सांगूं शकतों. परंतु या बाबतींत मीं एक निश्चित दृष्टिकोन आपल्यासमोर ठेवलेला आहे. सार्वजनिक परीक्षेंत बक्षिसें मिळविण्यासाठीं मुलें तयार

१०७३६ दा. क्र. १०१

करणें हें आमच्या शाळेचें ध्येय नाहीं. स्वावलंबी, चारित्र्यवान, उत्तम नागरिक तयार करणें हेंच आमचें ध्येय आहे. परीक्षेंत मुलाला जास्त गुण कसे मिळतील हें पाहाण्यापेक्षां तो सद्वर्तनी, स्वतःच्या पायावर उभा राहणारा व जबाबदार असा नागरिक कसा होईल हें पाहण्याकडे आमचें सर्वांत जास्त लक्ष आहे. आमची शाळा म्हणजे एक मोठें कुटुंबच आहे. हें आमचें सारें कुटुंब मोठ्या समाधानांत व आनंदांत या ठिकाणीं राहात आहे. आमच्या गरजा पार पाडण्यासाठीं लागणारी सुपीक अशी २५० एकर जमीन आमच्याजवळ आहे. पाणी मुबलक आहे. जमिनींतून हवें तें उत्पन्न करण्याची इच्छा व धडाडी असणारीं अशीं ताकद्वान मुलें आमच्याजवळ आहेत. आम्ही सर्वजण मिळून आमची ही शाळा, नव्हे आमचें हें कुटुंब, मोठ्या आनंदानें चालविण्याचा प्रयत्न करीत आहोंत."

ही शाळा पाहात असतांनाच येथील मुलांशीं व शिक्षकांशीं खूप मनमोकळे-पणानें मीं चर्चा केली. जरूर ती माहिती अत्यंत मोकळेपणानें त्यांनीं मला दिली आणि मला सांगायला मोठा आनंद वाटतो कीं, ही शाळा मला खूप आवडली !

दुपारीं मि. विनीएटा यांच्याबरोबर येथील मावरी वसाहतींत चालणारा एक प्रौढशिक्षणाचा प्रयोग पाहायला गेलों. मावरी लोकांमध्यें साक्षरतेचें प्रमाण जवळ जवळ शंभर टक्के आहे. पण त्यांना चांगले नागरिक बनविण्यासाठीं आणि त्यांची कर्तृत्वशक्ति व ज्ञान वाढविण्यासाठीं प्रौढशिक्षणाचा फार चांगला कार्यक्रम येथें आंखलेला आहे. हे मावरी प्रौढशिक्षणाच्या वर्गांमध्यें यायला फारसे उत्सुक नाहींत. यांच्यासाठीं विशिष्ट प्रकारचा कार्यक्रम आंखला पाहिजे, असें येथील अधिकाऱ्यांना वाटतें. या बाबतींत बोलतांना मि. विनीएटा म्हणाले, "प्रौढशिक्षणाचा कार्यक्रम जर यशस्वी करावयाचा असेल, तर प्रौढांचें शिक्षण हें प्रौढांच्या जीवनाशीं निगडित झालें पाहिजे. जें शिक्षण प्रौढांच्या गरजा पुऱ्या पाडण्याच्या कामीं मदतरूप होऊं शकत नाहीं, तें शिक्षण आकर्षक व टिकाऊ होणार नाहीं. जीवन व शिक्षण यांची जर फारकत झाली, तर शिक्षणाचा कार्यक्रम यशस्वी होत नाहीं. सबब ज्या प्रौढांना शिक्षण द्यावयाचें आहे, त्यांचें जीवन समृद्ध होऊं शकेल, असें शिक्षण त्यांना दिलें पाहिजे."

" तुमचें हें सर्व तत्त्व मला पूर्ण मान्य आहे. पण या बाबतींत तुम्हीं एखादा प्रयोग केला असल्यास, त्याची माहिती मला सांगा. ती समजावून घेण्यास मी फार उत्सुक आहें." मी म्हणालों. त्यावर मि. विनीएटा म्हणाले, " याच प्रयोगाची माहिती सांगण्यासाठीं येथपर्यंत येण्याची आम्हीं आपणांस तसदी दिली आहे." नंतर मि. विनीएटा यांच्याबरोबर हिंडून व चर्चा करून मीं तो प्रयोग समजावून घेतला. त्याचें स्वरूप पुढीलप्रमाणें होतें.

प्रारंभीं येथील मावरी प्रौढांसाठीं वर्ग काढण्याचा प्रयत्न केला गेला. तो यशस्वी झाला नाहीं. नंतर या लोकांच्या गरजा समजावून घेण्यासाठीं मि. विनीएटा त्या लोकांच्यामध्यें वरचेवर जाऊन बसूं लागले, त्यांच्याशीं बोलूं लागले. परिचय वाढल्यावर त्यांना त्या लोकांच्या परिस्थितीची व गरजांची पूर्ण कल्पना आली.

या मंडळींना राहण्यास चांगलीं घरें नाहींत. येथें घरें लाकडांचीं बांधतात. लाकूड फार महाग आहे. तयार लाकूड विकत घेऊन घर बांधणें त्यांना परवडत नाहीं. कांहीं लोकांच्या जमिनीवर स्वतःच्या मालकीचीं झाडें आहेत. लाकूड चेरण्याच्या ( कापण्याच्या ) ज्या गिरण्या आहेत, त्या गोऱ्या लोकांच्या मालकीच्या आहेत. आपलीं लाकडें कापण्यासाठीं जर तेथें पाठविलीं, तर ते लोक अवास्तव आकार घेतात व त्यामुळें त्या गिरण्यांवर अवलंबून राहून आपणांला चालणार नाहीं; तरी आपण आपली स्वतःची गिरणी चालविली पाहिजे, असा लोकांनीं निर्णय घेतला. शनिवारीं व रविवारीं श्रमदान करून गिरणी उभारण्याचें ठरलें. सर्वांनीं थोडें थोडें भांडवल देण्याचें कबूल केलें. दर शनिवारीं व रविवारीं प्रौढ-शिक्षणाचा वर्ग सकाळीं सुरू होऊं लागला. या वर्गांतून या गिरणीबाबत पुढील प्रश्नावर चर्चा होऊं लागली.

( १ ) गिरणीला लागणारें भांडवल कसें गोळा करावें ?

( २ ) गिरणीला लागणारा लाकडांचा पुरवठा कसा करावा ?

( ३ ) या गिरणीचा व आपल्या जमातीचा संबंध कोणता असावा ?

( ४ ) गिरणी उभी करतांना कोणकोणत्या सरकारी खात्याची मदत लागेल ? त्या त्या खात्याकडे कोणतें काम असतें ?

( ५ ) कारखान्यांत तयार झालेला माल आपल्या गरजेपेक्षां जर जास्त निघाला, तर त्याची विक्री कशी करावी ? त्याची वाहतूक कशी करावी ?

( ६ ) गिरणी उभी झाल्यावर केवळ लाकूड कापण्याऐवजीं त्यापासून दुसरें काय निर्माण करतां येईल ?

( ७ ) ही गिरणी विजेनें चालणार. तरी दुसरे जोडधंदे कोणते काढतां येतील ?

दर शनिवारीं व रविवारीं निरनिराळ्या खात्यांचे माहितगार लोक गिरणी चांगली कशी चालवावी, याची माहिती देऊं लागले. विषय अत्यंत जिव्हाळ्याचा असल्यामुळें गांवांतील सर्व मावरी नियमितपणें वर्गांत येऊं लागले. वकील, सहकारी खात्याची मंडळी, जंगल खात्याची मंडळी, हिशेब-तपासनीस, तंत्रज्ञ इत्यादि सर्व मंडळी या प्रौढ वर्गांत येत व या गिरणी चालविण्याबाबत हरएक प्रकारची माहिती लोकांना देत. लोक त्यांच्याशीं मनमोकळेपणानें बोलत व आपल्या शंकांचें निरसन करून घेत. गिरणी चालविण्यास आपल्या जमिनीवरचें लाकूड अपुरें पडेल; इतर जंगलांतून लाकूड विकत घ्यावें लागेल, ही गोष्ट त्यांना या चर्चेमध्यें दिसून आली. मग स्वस्त भावांत लाकूड कोठें मिळेल, याचा पण ते विचार करूं लागले. लाकडाच्या निरनिराळ्या जाती कोणत्या ? कोणतें लाकूड कोठें खरेदी करावें ? तें स्वस्त भावांत कोठें मिळेल ? ही पाहणी करण्याच्या निमित्तानें या वर्गांतील प्रौढांनीं सफरी काढल्या. त्याचप्रमाणें युरोपिअन लोक या गिरण्या कशा रीतीनें चालवितात, याची पाहणी करण्याच्या हेतूनें त्यांच्या कांहीं कारखान्यांना या प्रौढांनीं भेटी दिल्या. हा सर्व कार्यक्रम मि. विनीएटा यांच्या मार्गदर्शनाखालीं सुरू होता. लोकांचा उत्साह दांडगा होता. सर्वांचें सहकार्य मिळालें होतें. जसजशी ही गिरणी तयार होऊं लागली तसतसा प्रौढ वर्ग देखील जोरांत चालू झाला. गिरणी उभारली जात असतांना प्रौढांना खूपच उपयुक्त अशी शैक्षणिक माहिती मिळाली. आम्ही गिरणी पाहायला गेलों त्या वेळीं वर्गांतील प्रौढ मोठ्या उत्साहानें आपल्या गिरणीची माहिती आम्हांला सांगत होते. मि. विनीएटा यांनीं दुभाष्याचें काम केलें. एका आठवड्यानें या गिरणीचा उद्‌घाटन–समारंभ होणार होता. या समारंभाला हजर राहण्याचा येथील लोकांनीं आम्हांला खूप आग्रह केला. प्रौढशिक्षणाच्या वर्गामुळें गांवांत ही गिरणी आली, असें लोकांनीं मला समजावून सांगितलें. प्रौढशिक्षणाचा प्रश्न हाताळण्याची ही एक अभिनव पद्धति मीं येथें पाहिली. आपल्या प्रौढशिक्षणाच्या वर्गाला लोक जमतच नाहींत, अशी आपली नेहमीं तक्रार असते. प्रौढांना देण्यांत येणारें शिक्षण जर त्यांच्या जीवनविषयक प्रश्नांची पकड घेऊं शकलें तर मला वाटतें, आपल्या प्रौढशिक्षण वर्गालाहि खूप गर्दी होईल !

संध्याकाळीं एका मिशन संस्थेनें चालविलेल्या मावरी मुलींच्या वसतिगृहामध्यें आम्हांस भोजनाचें आमंत्रण होतें. त्या ठिकाणीं आम्ही गेलों. तिथें मिस् गारनेट या नांवाची एक तरुण मुलगी सुपरिन्टेन्डेंट म्हणून काम करीत होती. तिच्या मदतीला मिस् रॉय नांवाची एक पोक्त मिशनरी बाई होती. येथील सर्व मुलींनीं व व्यवस्थापिकांनीं आमचें खूप आदरानें स्वागत केलें. भोजनाचा कार्यक्रम चालू झाला. जेवतां जेवतां मुली गाणी म्हणत होत्या. तीनचार गाणीं सामुदायिकपणें गायिलीं गेलीं. आपला एक नातेवाईक दूर समुद्रावरून परदेशीं जात आहे, त्याचा प्रवास सुखाचा होवो, तो पुनः स्वगृहीं सुखरूप परत येवो, असा आशय शेवटच्या गाण्यांत होता. जेवण संपलें. आज रात्रीच्या गाडीनें आम्ही वेलिंग्टन्‌ला परत जायला निघणार, म्हणून सामान मोटारींत घेतलेलेंच होतें. स्टेशनवर जायची वेळ झाली. आम्ही मोटारींत जाऊन बसलों. आम्हाला निरोप देण्यासाठीं मिस् गारनेट, मिस रॉय व मि. विनीएटा आमच्याबरोबर स्टेशनवर आले होते. वेळ थोडा राहिला होता. गाडी आली. आम्ही गाडींत बसलों. पुन्हां एकदां त्या साऱ्या बायांनीं मघाचें तें गाणें म्हटलें व आम्हांला निरोप दिला. ऑकलंडच्या या थोड्या दिवसांच्या वास्तव्यांत मावरी जीवनाचें चांगलें दर्शन झालें. त्यांच्या निरागस व अतिथ्यशील वागण्याचा माझ्या मनावर फार मोठा परिणाम झाला व त्या सुखद स्मृतीची जपणूक करीत मीं या शहराचा निरोप घेतला.

१२ मार्च १९५२

रात्रभर प्रवास झाला. प्रवासांत झोंप चांगली मिळाली. येथील आगगाड्यांच्या एकदोन डब्यांमध्यें झोपण्याची व्यवस्था होती. अशाच डब्यांतून आमची व्यवस्था करण्यांत आल्यामुळें झोंप चांगली मिळाली. पहाटे लवकर जाग आली व म्हणून लवकर उठून बसलों, तों अतिशय रमणीय असें सृष्टिसौंदर्य पाहायला मिळालें. ऑस्ट्रेलियाच्या मानानें न्यूझीलंड हा देश सृष्टिसौंदर्याच्या बाबतींत खूपच चांगला वाटला. साडेसात आठच्या सुमारास वेलिंग्टन शहरांत उतरलों. त्या ठिकाणीं परराष्ट्रीय खात्याचे प्रतिनिधि. मि. मॅक्विन् यांनीं आमचें स्वागत केलें. आमचें सामान ताब्यांत घेऊन त्यांनीं आपल्या गाडींतून आम्हांस आमच्या निवासस्थानीं नेलें. येथील सॅल्व्हेशन आर्मीच्या ( मुक्तिफौजेच्या ) शाखेनें ' पीपल्स् ' पॅलेस या नांवाचें एक वसतिगृह चालविलेलें आहे. या ठिकाणीं आमची व्यवस्था करण्यांत आली होती. आमच्यापासून कांहीं काळ दूर झालेले आमचे दोघे भारतीय मित्र श्री. भट व

राऊत रॉय आम्हांला येथें भेटले. या ठिकाणीं तीनचार दिवसांत मुक्तिफौजेच्या कार्यकर्त्यांची एक मोठी परिषद भरणार आहे व त्या परिषदेकरितां निरनिराळ्या देशांतून प्रतिनिधीं येणार आहेत. कांहीं प्रतिनिधि तर येथें येऊन पोहोचले आहेत. आम्ही सरकारचेच पाहुणे असल्यामुळें अशा वेळींसुद्धां या ठिकाणीं आमची सोय होऊं शकली. आमच्या आजूबाजूला भगवे कपडे घातलेले मुक्तिफौजेचे स्त्रीपुरुष फिरत आहेत.

मि. मॅकविन् यांनीं आमच्यासाठीं खास शाकाहारी जेवण एके ठिकाणीं तयार ठेवलें होतें. त्यांच्याबरोबर आम्ही जेवणास बाहेर पडलों. जेवण झाल्यावर वेलिंग्टन विश्वविद्यालयाचे प्राध्यापक मि. मार्क्स यांना भेटण्यासाठीं आम्ही मि. मॅकविन् यांच्याबरोबर गेलों. मि. मार्क्स यांनीं न्यूझीलंडमधील कल्याणकारी योजनांबाबत भरपूर माहिती सांगितली. त्यांच्या माहितीवरून येथें खाजगी संस्था जनतेला मदत करण्याकरितां फार मोठ्या प्रमाणांत पुढें येत नाहींत, असें दिसून आलें. जनतेला या योजनांचा फायदा मिळवून देण्याचें काम सरकारी यंत्रामार्फतच फार मोठ्या प्रमाणांत करावें लागतें. कांहीं मिशनरी संस्था मात्र या कामाचा फार मोठा वाटा उचलतात, असें दिसून आलें. न्यूझीलंडमधील प्रत्येक व्यक्तीला आपण कमावलेल्या प्रत्येक पौंडामागें दीड शिलिंग इतकी रक्कम कल्याणकारी योजनांचा कर द्यावा लागतो. या योजनांचा फार मोठा फायदा लोकांना मिळत असल्यामुळें या देशांतील लोकांचें जीवनमान चांगलेंच वाढलेलें आहे.

मि. मार्क्स यांच्याबरोबर उपयुक्त चर्चा झाल्यावर, मि. मॅकविन् आम्हांस कार्यालयांत घेऊन गेले. तेथें चहा झाला. इतक्यांत मि. ग्रे. नांवाचे एक गृहस्थ तेथें आले. मि. मॅकविन् यांनीं त्यांच्याशीं आमची ओळख करून दिली. मि. ग्रे येथील प्रौढशिक्षणाधिकारी आहेत. चहा संपल्याबरोबर आम्हांला त्यांच्याबरोबर २५/३० मैल दूर असलेल्या एका गांवीं जावयाचें आहे.

चहा संपल्याबरोबर मि. ग्रे यांच्या बरोबर आम्ही गाडींत जाऊन बसलों. गाडी चालू झाली व वाटेंत मि. ग्रे यांनीं आपल्या देशांतील प्रौढशिक्षणाच्या कामाबद्दलची बरीच माहिती सांगितली. सुमारें पाऊण तासाच्या आंतच गाडी थांबली व आम्ही खालीं उतरलों. मि. ग्रे यांच्या खात्यांतील एका अधिकाऱ्यानें आमचें स्वागत केलें. या ठिकाणीं कांहीं स्त्रीपुरुष जमले होते. प्रौढशिक्षण खात्यामार्फत येथें एक कार्यक्रम आंखला होता व त्यासाठीं हे लोक आले होते. येथील पालक-शिक्षक संघानें सुद्धां हा

कार्यक्रम घडवून आणण्याच्या कामीं या संस्थेशीं सहकार्य केलें होतें. मि. ग्रे यांनीं आमची सर्वांशीं ओळख करून दिली व नियोजित कार्यक्रम सुरू करण्याची त्यांना विनंती केली.

'मुलें कां बिघडतात ?' या विषयावर एक लघुपट दाखविण्यांत येणार होता. प्रारंभीं प्रौढशिक्षणाधिकाऱ्यानें आजच्या लघुपटांत काय पाहायला मिळेल याची लोकांना कल्पना दिली. नंतर लोकांनीं हा लघुपट पाहिला. त्यानंतर या विषयावर चर्चा सुरू झाली. या चर्चेमध्यें जमलेल्या कांहीं स्त्रीपुरुषांनीं मोठ्या उत्साहानें भाग घेतला. फक्त श्रोत्याचें काम करण्याचा माझा प्रथम निश्चय होता. परंतु जसा जसा वादविवाद रंगूं लागला तसतसा मी त्यामध्यें खेंचला गेलों. सुमारें तास दीड तासपर्यंत चांगली चर्चा रंगली व शेवटीं प्रौढशिक्षणाधिकाऱ्यानें समारोप केला. आजच्या विषयाला धरून असलेल्या इतर कांहीं लघुपटांची त्यांनीं श्रोत्यांना कल्पना दिली व त्यांपैकीं कोणते त्यांना पुढल्या वेळीं पाहायला आवडतील, याची नोंद करून घेतली. मूकपट अथवा लघुपट प्रौढशिक्षणाचें माध्यम म्हणून कसे वापरावेत, याची फार चांगली कल्पना आजच्या कार्यक्रमामुळें येऊं शकली. यानंतर पालक–शिक्षक संघामार्फत उपस्थितांना अल्पोपाहार देण्यांत आला. आतां थंडी खूप पडलेली आहे. रात्रीचे साडे अकरा वाजलेले आहेत. त्यामुळें सर्वांचा निरोप घेऊन आम्ही आमच्या 'जनतेच्या राजवाड्याकडे' निघालों.

१३ मार्च ५२

सकाळींच मि. मॅकविन् व शिक्षणखात्याचे उपविद्याधिकारी आम्हांला भेटण्यासाठीं आले. त्यांच्याबरोबर येथील कल्याणकारी योजनांच्या मुख्य कार्यालयाला भेट देण्यासाठीं आम्ही गेलों. गेलीं शंभर वर्षें हें खातें जनतेला हरएक प्रकारची मदत देण्याचें काम करीत आहे. येथील अधिकाऱ्यांनीं आम्हांला या योजनांबाबतची भरपूर माहिती सांगितली. १८९८ सालीं वृद्धांना पेन्शन् द्यायला सुरवात झाली. १९११ सालीं विधवांना पेन्शन मिळूं लागलें. १९१५ सालीं या देशांत Miners Pfeysis या नांवाचा एक रोग फैलावला. त्या वेळीं येथील कल्याणकारी योजनांच्या या खात्यामार्फत जनतेला भरपूर सहाय्य देण्यांत आलें. आज या देशांत कोणत्याहि प्राण्याला तो जन्माला येण्याच्या आधींपासून तों थडग्यांत जाऊन आराम घेईपर्यंत हरएक प्रकारची मदत दिली जाते. या कार्यालयांत

फिरतांना मला असें आढळून आलें कीं, या देशांत मनुष्यबल कमी असल्यामुळें यंत्रांचा वापर कार्यालयांतून फार मोठ्या प्रमाणांत केला जातो. या बाबतींत आम्हांला असें सांगण्यांत आलें कीं, जें काम करण्याकरितां १२० कारकून लागले असते तें काम यंत्रांच्या मदतीमुळें फक्त १४ कारकून ठेवून होऊं शकतें.

येथून बाहेर पडल्यावर एका चिनी उपाहारगृहांत आम्हीं जेवण घेतलें व नंतर मावरी लोकांच्या हितसंवर्धनासाठीं काढण्यांत आलेल्या 'मावरी ट्रायबल वेल-फेअर डिपार्टमेंटच्या' कार्यालयांत गेलों. त्या ठिकाणीं मि. रॉयल आणि मि. जोन्स् या नांवाच्या दोन मावरी अधिकाऱ्यांनीं आमचें स्वागत केलें व त्यांनीं या खात्यामार्फत चालविलेल्या कामाची आम्हांला कल्पना दिली. "मावरी लोकांपैकीं पुष्कळांची अशी समजूत आहे कीं, ते लोक भारतांतूनच येथें आले. प्रारंभीं त्यांची व गोऱ्या लोकांची सारखी चकमक उडत असे. फ्रेंच व ब्रिटिश या दोन जमातींच्या लोकांनीं मावरी लोकांवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला. प्रारंभीं या गोऱ्या लोकांचें धोरण आम्हां मावरी लोकांचा पूर्णपणें नायनाट करण्याचें होतें. एका बाजूला हे आम्हांला मूठमाती द्यायला तयार झाले होते, तर दुसऱ्या बाजूला आम्ही मावरी आपसांत झगडत होतों. त्यामुळें आमची संख्या सारखी घटूं लागली. या वेळीं कुचे-ष्टेनें युरोपिअन् लोक म्हणत कीं, 'थडग्यांत जाणाऱ्या त्या मावरी जमातीला आरामांत तेथें विश्रांति घेण्याची व्यवस्था आपण करूं या.' परंतु मावरी जमात इतकी सुखा-सुखी नाहींशी होणार नव्हती. स्वभावतःच आम्ही झुंझार प्रवृत्तीचे लोक. त्यामुळें १८४० सालीं आमच्याबरोबर ब्रिटिशांना तह करावा लागला व व्हिक्टोरिया राणीनें आम्हांला नागरिकत्वाचे हक्क बहाल केले. आज आमच्या मावरी लोकांमध्यें जें कांहीं चांगलें तुम्हांला दिसेल, त्याचें सारें श्रेय आमच्या एका मावरी पुढा-ऱ्याला आहे. तुमचे जसे महात्मा गांधी, तसे आमचे **अपिरंगा टी. नागाटा.** या थोर व्यक्तीनें मावरी लोकांना प्रतिष्ठा व सुख मिळवून देण्यासाठीं जिवापाड मेहनत घेतली. मावरी लोकांच्या देवालयाला 'मोराय' म्हणतात. प्रत्येक मोरायला जोडून त्यानें एक मोराय समिति नेमिली व या मोराय समितीमार्फत मावरी लोकांच्या शिक्षणाची, आरोग्याची व राहण्याची व्यवस्था करण्याचें काम सुरू झालें.

"१९३९ सालीं दुसरें महायुद्ध सुरू झालें. या युद्धामध्यें ब्रिटिशांना सर्व प्रका-रची मदत करण्याचा निर्णय मावरी जमातीनें घेतला. मावरी लोकांची एक खास

पलटण उभी करण्यांत आली. या युद्धामध्यें मावरी लोकांनीं आपली संघटना फार प्रभावी केली. युद्धकाळांत उभारलेली ही संघटना त्यांनीं युद्धानंतर सुद्धां टिकवून धरली आहे. या युद्धामध्यें मावरी लोकांनीं केलेल्या त्यागामुळें व दाखविलेल्या शौर्यामुळें येथील राज्यकर्ते त्यांच्याकडे विशेष आपुलकीनें पाहूं लागले व त्यांचा उन्नतीकरितां हरएक प्रकारच्या नव्या योजना हातीं घेऊं लागले. त्यांच्या हितसंरक्षणाकरितां सरकारनें आज एक खास खातें उघडलें आहे. मावरी लोकांत दरहजारीं बालमृत्यूचें प्रमाण ११४ आहे, तर गोऱ्या लोकांत तें फक्त २८ आहे. तथापि हें बालमृत्यूचें प्रमाण कमी व्हावें म्हणून प्रयत्न चालू आहेत. मावरी मुलांकरितां व मुलींकरितां शाळा उघडल्या जात आहेत. दरसाल सुमारें दोन हजार मुलें आपलें शिक्षण पूर्ण करून बाहेर पडत आहेत. या लोकांना रोजगार मिळवून देण्याचें काम या खात्यामार्फत केलें जात आहे. शहरांत त्यांची राहण्याची व्यवस्था करण्याकरितां वसतिगृहें बांधलीं जात आहेत. आपल्या जमातीची उन्नति जर व्हावयाची असेल, तर आपल्या स्त्रिया आधीं सुधारल्या पाहिजेत याची त्यांना पूर्ण जाणीव झालेली आहे. त्यामुळें स्त्रियांच्या उन्नतीसाठीं एक मध्यवर्ती संघटना काढून तिच्या शाखा सर्वत्र उभारल्या जात आहेत."

मावरी लोक मावरी भाषा बोलतात. या भाषेला लिपी नाहीं त्यामुळें रोमन लिपीचाच ते वापर करतात. त्यांची भाषा काळजीपूर्वक ऐकत असतांना त्यांच्या भाषेंत पुष्कळ संस्कृत शब्द असल्याचें मला आढळून आलें. 'जात' या अर्थी 'ज्ञाति' हा शब्द प्रचलित असल्याचें दिसलें.

आज संध्याकाळीं भारताचें न्यूझीलंडमधील ट्रेड कमिशनर मि. संन्याल यांना भेटायचें ठरलें होतें. त्यांनीं आम्हांस भोजनाचें आमंत्रण दिलें होतें. आम्ही मि. संन्याल यांच्या घरीं जाऊन पोहोंचलों. तिथें दोन हिंदी गृहस्थ आधींच आले होते. त्यांपैकीं बलदेवसिंग हे पंजाबचे होते व आनंद हे सिमल्याचे होते.

आम्ही येथें आलों त्यापूर्वी मि. संन्याल यांची पत्नी निवर्तली होती. त्या गेल्याला थोडेच महिने झाले होते. ही बाई अत्यंत हुषार, कलानिपुण व मनमिळाऊ होती. त्यामुळें येथील गोऱ्या लोकांमध्यें तिची चांगली छाप पडली होती. कोणत्याशा आजारानें ती तडकाफडकी वारली. तिच्याबद्दल कित्येक लोकांनीं आमच्याजवळ फार गौरवाचे उद्गार काढले. आज ती घरांत नव्हती; परंतु मि. संन्याल यांनीं वरील दोन मित्रांच्या मदतीनें भारतीय पद्धतीचा थाट फार चांगला

केला होता. मदत करण्यासाठीं कमला नांवाच्या एका फिजी मुलीला त्यांनीं बोला-विलें होतें. घर सोडल्यापासून इतकें चांगलें जेवण मिळालें नव्हतें.

येथील भारतीय लोकांबाबत मि. संन्याल यांच्याशीं बोलतांना असें आढळून आलें कीं, ऑस्ट्रेलियांत व न्यूझीलंडमध्यें जे भारतीय लोक येऊन राहिले आहेत, ते येथील जीवनाशीं मुळींच समरस होऊं इच्छित नाहींत; अगदीं अलिप्तपणें राहतात. त्यांचें सारें लक्ष येथें पैसा कमावून तो आपल्या गांवीं जास्तींत जास्त कसा पाठवितां येईल, याकडे लागून राहिलेलें आहे. आलेले लोक सर्व-साधारणपणें अगदीं मामुली धंदे करतात. कित्येकांचीं भाजीचीं दुकानें आहेत; तर कांहीं लोक रिकाम्या बाटल्या गोळा करून त्या विकतात. भारतीय लोकांपेक्षां चिनी लोक भाजीचा व्यापार, अधिक चांगल्या रीतीनें करतात, असें दिसून आलें. येथें स्थायिक झालेल्या लोकांचा शैक्षणिक दर्जा फारसा मोठा नसल्या-मुळें या देशांतील राजकीय अथवा सामाजिक जीवनांत ते महत्त्वाचा भाग घेऊं शकत नाहींत. रात्रीं १२ च्या सुमारास मि. संन्याल यांनीं आपली मोटर काढली व आम्हांस आमच्या निवासस्थानीं आणून सोडलें.

१४ मार्च ५२

सकाळीं येथील प्रौढशिक्षण कार्यालयाला भेट दिली. या खात्याचे डायरेक्टर व इतर अधिकारी यांच्याबरोबर चर्चा केली. सर्वसाधारणपणें ऑस्ट्रेलियांतील प्रौढशिक्षणपद्धति व या देशांतील प्रौढशिक्षणपद्धति यांत बरेंचसें साम्य आहे. संध्याकाळीं येथील फिल्म् लॅबोरेटरीला भेट दिली. त्या ठिकाणीं मि. हॅरिस नांवाचे एक गृहस्थ भेटले. ते पूर्वी भारतांत येऊन गेले होते. मुंबईतसुद्धां त्यांनीं तीन चार दिवस घालविले होते. त्यांनीं बरीच उपयुक्त माहिती सांगितली. त्यांच्या मतें पुस्तकांसारख्या औपचारिक साधनांपेक्षां बोलपट, रेडिओ, नाटकें इत्यादि अनौपचारिक साधनांनींच प्रौढशिक्षणाचा चांगला प्रसार होऊं शकेल. येथून आम्ही मि. हॅरिस यांच्याबरोबर त्यांच्या मोटरींतून फिरायला निघालों. त्यांनीं वेलिंग्टन शहराचा आम्हीं न पाहिलेला असा बराचसा भाग आम्हांला दाखविला. सारा वेळ रस्त्यानें ते प्रौढशिक्षणाबाबत बोलत होते. ते म्हणाले, " प्रौढांच्या हातांत पुस्तकें वाचायला देण्यापेक्षां त्यांना वाचायला देण्याचा मजकूर फिल्मस्ट्रिप-वर तयार करावा व त्या फिल्मस्ट्रिपस्, प्रोजेक्टरच्या मदतीनें त्यांना वाचण्याची संधि द्यावी. या साधनांनीं त्यांना लवकर वाचायला शिकवितां येईल. "

सकाळीं पाऊस खूप पडत होता. रविवार होता. त्यामुळें दोन वाजेपर्यंतचा काळ खोलींत पडून पुस्तकें वाचण्यांत घालविला. तीनच्या सुमारास मि. माऊंट जॉय नांवाचे प्रौढशिक्षणाधिकारी आम्हांला नेण्यासाठीं आले. त्यांच्याबरोबर त्याच खात्यांतील एक जोडपें मिस्टर ॲण्ड मिसेस् फिलीप्स व एक मुलगी होती. आम्ही खूप दूरवर मोटारमधून हिंडून आलों. फिलीप्स् दांपत्यानें आम्हांला आग्रहानें आपल्या घरीं जेवणास नेलें. त्यानंतर आम्ही मि. हॅरिस् यांच्या घरीं गेलों. त्यांनीं कांहीं फिल्म्स् दाखविल्या. भारतांतील आपल्या कांहीं आठवणी त्यांनीं सांगितल्या व आम्हांला अल्पोपाहार दिला.

१७ मार्च ५२

आजच्या दिवसांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे मि. मॅकमूर्ती नांवाच्या गृहस्थाबरोबर झालेली मुलाखत. येथील तुरुंगांमधून कैद्यांच्या शिक्षणाचें काम कसें चालतें हें जाणून घेण्याची मीं उत्कंठा दाखविली. यामुळें ही भेट घडवून आणली होती. त्यांच्याशीं बोलतांना कैद्यांच्या शिक्षणाबाबत पुढील माहिती मिळाली.

" पूर्वीं आमच्या देशांत संध्याकाळीं साडेपांचपासून ते सकाळीं साडेपांचपर्यंत कैद्यांना नुसतें कोंडून ठेवण्यांत येत असे. आतां कैद्याला नुसतें कोंडण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें आम्हांला समजलें आहे. तुरुंग सोडतांना कैदी हा एक चांगला नागरिक म्हणून बाहेर जावा, या हेतूनें प्रौढशिक्षणाचा कार्यक्रम तुरुंगामध्यें आम्हीं हातीं घेतला आहे. आमचें पहिलें काम म्हणजे प्रत्येक कैद्यामध्यें आपण चांगले नागरिक बनावें, अशी इच्छा निर्माण करणें हें होय. या दृष्टीनें चांगला नागरिक होण्यासाठीं कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत याचा आम्ही विचार करू लागलों. प्रत्येक माणसाला जर प्रामाणिकपणें आपला उदरनिर्वाह करावयाचा असेल, तर आपल्या मालकाला आपली उपयुक्तता पटावी, म्हणून कोणता ना कोणता तरी गुण अथवा कला आपल्याजवळ असली पाहिजे. यासाठीं कैद्यांना एखादी कला अथवा धंदा आम्ही शिकवूं लागलों. दुसरी गोष्ट म्हणजे प्रत्येक माणसाजवळ अशी कांहीं तयारी असली पाहिजे कीं, त्यायोगें त्याला आपला फुरसुतीचा वेळ चांगल्या रीतीनें घालवितां येईल. या हेतूनें आम्ही कैद्यांना निरनिराळे छंद, हस्तव्यवसाय, कला शिकवितों. येथें कोणी नाट्याचें शिक्षण घेतात; कोणी गाण्याचें; कुणी वाद्य वाजविण्याचें; कोणी निरनिराळे खेळ शिकतात; कसरती करतात अथवा वादविवाद-मंडळें चालवितात. तिसरी गोष्ट, ज्या जगांत आपण

राहतो त्या जगाची माहिती मिळविणें व त्या जगामध्यें आपलें स्थान कोणतें हें जाणून घेणें हें फार महत्त्वाचें आहे. समाजानें आपणांला कोणते हक्क दिले आहेत व त्या समाजाबाबत आपल्या जबाबदाऱ्या कोणत्या यांची माहिती आम्ही कैद्यांना देत असतों. त्याचप्रमाणें रूढ अर्थाचें शिक्षण पण त्यांना दिलें जातें. प्रत्येक कैद्याला तो तुरुंगांत आल्यापासून सहा महिन्यांच्या आंत एखादा तरी हस्त-व्यवसाय शिकावा लागतो. आमच्याकडे तुरुंगांना जोडून मोठी शेती असते. एका तुरुंगाजवळ सहा हजार एकर जमीन आहे. त्यामुळें शेती, दुग्धव्यवसाय, कोंबड्या पाळणें, मेंढ्या पाळणें, मधमाशा पाळणें, फळबागा लावणें इत्यादि धंदे कैदी करूं शकतात. सर्व कैद्यांमध्यें सहजीवनाची भावना निर्माण व्हावी, म्हणून त्यांना एकत्र जेवण घेण्याची संधि दिली जाते. औद्योगिक शाळेंतील अथवा इतर शाळांतील शिक्षकांना तुरुंगांत येऊन कैद्यांना शिकविण्याची संधि दिली जाते. कैद्यांच्याकरितां संध्याकाळचे वर्ग चालविले जातात. कैद्यांच्या शिक्षणाच्या योजना आंखणें व त्यांची अंमलबजावणी करणें, हें काम शिक्षण खात्याकडे सोंप-विलेलें आहे. वेगवेगळे खेळ खेळण्याची त्यांना संधि दिली जाते व जिल्ह्यामध्यें होणाऱ्या सामन्यांमध्यें त्यांना भाग घेतां येतो. ”

संध्याकाळीं आम्ही येथील राष्ट्रीय ग्रंथालयाच्या कार्यालयाला भेट दिली व तेथील कामाची माहिती मिळविली. न्यूझीलंडमध्यें सुमारें ८०० मोठीं ग्रंथालयें आहेत. जीं वाचनालयें आपल्या वाचकांना फुकट पुस्तकें वाचायला देतात त्यांना या मध्यवर्ती वाचनालयामधून सारखीं नवींनवीं पुस्तकें पुरविलीं जातात. त्यासाठीं सहा व्हॅन्स ठेविल्या आहेत. या व्हॅनबरोबर एक एक बाई जाते. व्हॅन चाल-विण्याचें त्याचप्रमाणें ग्रंथपालाचें काम ती एकटी बाई करते.

१८ मार्च ५२

सकाळीं शिक्षण खात्याचे तपासनीस आम्हांस नेण्यासाठीं आले. त्यांनीं आम्हांस एक दोन शाळा दाखविल्या. त्यानंतर शिक्षण खात्यांतील प्रौढशिक्षणाधिकारी मि. टॉमस व त्या खात्याचे विद्याधिकारी मि. बिब्री यांच्याबरोबर मुलाखत झाली. रात्रीं एका प्रौढशिक्षण केंद्राला भेट दिली. त्या ठिकाणीं समाजाच्या विकासांत ‘ क्रीडा केंद्रांचें स्थान ’ या विषयावर एक अत्यंत उपयुक्त अशी चर्चा उपस्थित प्रौढांनीं चालविली होती. तो कार्यक्रम ऐकून आम्ही परत आलों. कार्यक्रम मला आवडला.

आमच्याबरोबर उद्योग आणि व्यापार खात्यांतील एक अधिकारी डॉ. सॅश नांवाचे गृहस्थ होते. बोलतां बोलतां मी त्यांना म्हणालों, "तुमच्या या छोट्या देशानें एवढी प्रगति कशी केली?" माझा प्रश्न ऐकून ते म्हणाले, "न्यूझीलंडच्या भरभराटीचें सर्व श्रेय येथील गवताला आहे. Grass या एका शब्दांत आमच्या राष्ट्राचें सारें वैभव सामावलेलें आहे. गवतामुळें आमचा दुग्धव्यवसाय चांगला चालतो. त्यामुळें दूध, लोणी येथें भरपूर प्रमाणांत मिळतें. गवतामुळें चांगल्या मेंढ्या पाळतां येतात. त्यामुळें आमच्या देशाला लोणी, चीज, मांस, लोकर इत्यादि पदार्थ परदेशांत पाठवून भरपूर पैसा मिळविता येतो.

१९ मार्च १९५२

सकाळीं एका बागेंत गेलों. त्या ठिकाणीं झेंडू, गुलबक्षी, सदाफुली, चाफा, जास्वंद, शेवंती, डेलिया इत्यादि परिचित फुलें पाहिलीं. त्याचप्रमाणें मटार, वांगीं, गाजर, कॉलीफ्लॉवर, मुळें, काकडी, घेवडा इत्यादि भाज्या पाहिल्या. आपण परदेशांत आहोंत, असें थोडा वेळ सुद्धां वाटलें नाहीं. अर्थात् बागेंतील टापटीप, तिची आंखणी इत्यादि गोष्टी विशेष आकर्षक होत्या. उद्यां येथून निघावयाचें असल्यामुळें बांधाबांध करण्यांत कांहीं वेळ घालविला. दुपारीं सहज कांहीं तरी खरेदी करावें म्हणून बाजारांत गेलों. त्या ठिकाणीं चि. आशाकरितां एक सुंदरसें रिस्टवॉच विकत घेतलें. सायंकाळीं येथील असिस्टंट ट्रेड कमिशनर मि. लक्ष्मीपति या भारतीय गृहस्थाला भेटण्यासाठीं गेलों. त्यांनीं व त्यांच्या पत्नीनें खूप प्रेमानें स्वागत केलें. सुप्रसिद्ध मद्रासी मेदूवडे त्या बाईनें स्वतः तयार करून आम्हांला भरपूर खायला घातले. मि. लक्ष्मीपतीनें मावरी लोकांच्या भाषेचा विशेष अभ्यास केला आहे. त्यांच्या भाषेंत संस्कृत शब्द भरपूर आहेत, असें त्यांनींहि सांगितलें. मध्यरात्रीपर्यंत त्यांच्याबरोबर वेळ काढल्यावर आम्ही परत यायला निघालों. बाहेर कडाक्याची थंडी पडली होती. उद्यां येथून निघावयाचें असल्यामुळें लवकरच जाऊन झोपण्याचा विचार होता; परंतु गप्पांच्या नादांत वेळेचें भान राहिलें नाहीं.

२० मार्च ५२

न्यूझीलंड आज सोडावयाचें, म्हणून सकाळीं लवकरच उठलों व प्रवासासाठीं तयार झालों. सुमारें नऊच्या सुमारास मि. मॅकविन् सरकारी गाडी घेऊन आले व आम्ही विमानतळावर गेलों. त्या ठिकाणीं श्रीयुत व श्रीमती नारण नांवाचें

गुजराथी जोडपें भेटलें. त्यांनीं न्यूझीलंडमधील आपले अनुभव सांगितले. ते त्या ठिकाणीं वास्तव्य करून राहिलेले आहेत. ते म्हणाले, "माणसाला ज्या सुखसोयी न्यूझीलंडमध्यें मिळतात, तेवढ्या स्वर्गांतसुद्धां असतील कीं नाहीं याची शंका वाटते."

११। च्या सुमारास आम्ही वेलिंग्टन् सोडलें व ५॥ ला सिडनेला जाऊन पोहोंचलों. सिडने येथें 'क्रोमॉन' नांवाच्या भागांतील वॉलडॉर्फ हॉटेलमध्यें आमची राहण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. येथून सिडने शहरांत येण्यासाठीं स्टीमलॉंचचा उपयोग करावा लागतो. दिवसभर कंटाळवाणा प्रवास झाल्यामुळें भोजनोत्तर विश्रांति घेण्यापलीकडे कांहीं केलें नाहीं.

२१ मार्च ५२

आजचा सारा दिवस भारतांत येण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या प्रवासाच्या पूर्वतयारीमध्यें गेला. थॉमस कुक् कंपनी, पी. ॲण्ड ओ. कंपनी इत्यादि कार्यालयांमध्यें जाऊन आलों. २८ तारखेला निघणाऱ्या 'स्ट्रॅथेड' बोटीमध्यें आमच्यासाठीं जागा राखून ठेवण्यांत आल्याचें कळलें.

सिडनेमध्यें चिनी लोकांनीं चालविलेलीं फारच चांगलीं उपाहारगृहें आहेत. त्यांपैकीं 'चेकर्स' नांवाचें जें उपाहारगृह आहे तें तेथील लोकांचें अत्यंत आवडतें दिसलें. सकाळीं येथें फारशी गर्दी नसते; परंतु संध्याकाळीं सिडनेमधील मोठ्या फॅशनेबल लोकांचें तें एक आरामस्थान बनतें. येथें एकदां सकाळीं मीं जेवण घेतलें होतें. आज संध्याकाळीं पुन्हां येथें गेलों, त्या वेळीं तेच पदार्थ घेतले. परंतु पैसे द्यावयाच्या वेळीं पूर्वीच्या तिप्पट आकाराचें बील हातीं आलें. निमूटपणें आल्या प्रसंगाला तोंड दिलें. तपासाअंतीं असें कळलें कीं, संध्याकाळीं सर्व पदार्थांचे आकार दुप्पटीतिप्पटीनें वाढविण्यांत येतात. त्याशिवाय त्या ठिकाणीं जें गाणें वगैरे चालतें, त्यासाठीं पण कांहीं आकार घेतला जातो.

२२ मार्च ५२

आज शनिवार. त्यामुळें कार्यक्रम असा कांहीं नाहीं. वाचन, पत्रलेखन इत्यादि कामांत वेळ घालविला. ज्या हॉटेलांत आम्ही राहात होतों, त्या हॉटेलांत फक्त न्याहारी घेणें व राहणें एवढ्यापुरताच ठराव झालेला होता. त्यामुळें सकाळसांज स्टीमलॉंचनें सिडने शहरांत जाऊन चिनी हॉटेलमध्यें अथवा इतरत्र जेवण घ्यावें लागे. आज पाऊस फार होता; तथापि हा फेरफटका टाळतां आला नाहीं.

२३ मार्च ५२

पाऊस पडतच आहे. आज रविवार आहे. रिकामें बसून दिवस कसा जाणार? त्रावणकोर–कोचीनचे श्रीयुत अय्यर व सौराष्ट्राचे श्रीयुत विभाकर हे भेटायला आलेले आहेत. "आज तुमचा कांहीं विशेष कार्यक्रम आहे का? नसल्यास तुम्ही आमच्याबरोबर चला. आम्हीं रविवारसाठीं एक खास कार्यक्रम आंखला आहे." असें ते म्हणाले. त्यांच्या आमंत्रणाचा स्वीकार करून मी त्यांच्याबरोबर निघालों.

आम्ही सिडने येथील सुप्रसिद्ध मत्स्यालय पाहिलें. अनेक प्रकारचे मासे कांचेच्या पेट्यांमध्यें ठेवलेले पाहायला मिळाले. भारतामध्यें एकहि 'मत्स्यालय' मीं पाहिलेलें नव्हतें. त्यानंतर 'टोरंगा पार्क झू' या नांवाचें प्रसिद्ध प्राणिसंग्रहालय पाहिलें. आपली भारतीय म्हैस प्रेक्षणीय जनावर म्हणून या संग्रहालयांत ठेवण्यांत आलेली आहे.

२४ मार्च ५२

येथील शिक्षण खात्याच्या कार्यालयांत गेलों. त्या ठिकाणीं न्यू साऊथ वेल्स् प्रांतांतील शिक्षणपद्धतीविषयीं खूप माहिती मिळाली. आपल्या देशामध्यें वार्षिक परीक्षांना जितकें महत्त्व दिलें जातें, तितकें येथें दिलें जात नाहीं. मुलांना वरच्या वर्गांत चढवितांना त्याचें सबंध वर्षभरचें काम लक्षांत घेतलें जातें. प्राथमिक शाळेंतील अभ्यासक्रम संपल्यावर ज्यांना पुढें अभ्यास करावयाचा आहे, तीं मुलें स्कॉलरशिप परीक्षेला बसतात व आपलें पुढील शिक्षण शिष्यवृत्त्या मिळवून चालू ठेवतात.

२५ मार्च ५२

आज येथील भारतीय ट्रेड कमिशनरच्या कार्यालयाला भेट दिली. त्याचप्रमाणें भारतीय माहिती खात्याच्या कार्यालयांतहि जाऊन आलों. पहिल्या ठिकाणीं श्री. सहाई नांवाचे गृहस्थ भेटले. भारताची माहिती देणारें एक वार्तापत्र या कार्यालयामार्फत मिळतें. त्याच्या कांहीं प्रती घेऊन परत आलों. कित्येक दिवसांत भारतामधील कांहींच हकिकत कळली नव्हती. विशेषतः सार्वत्रिक निवडणुकीच्याबाबत माहिती मिळविण्यासाठीं आम्ही उत्सुक होतों.

२६ मार्च ५२

आतां बोट सुटेपर्यंत सिडनेला थांबावें लागणार आहे. कार्यक्रम कांहींच नसल्यामुळें निष्कारण वेळ घालविणें कंटाळवाणें होत आहे. येथील प्रवासांत गोळा

केलेलें साहित्य वाचण्यांत आजचा दिवस घालविला. संध्याकाळीं श्री. अय्यर व श्री. विभाकर यांच्याबरोबर जाऊन कांहीं वार्तापट पाहिले. ऑस्ट्रेलियांत ही सोय फार चांगली आहे. हा कार्यक्रम तास दीड तासाचाच असतो. २॥ ते ३ तास अंधारांत बसून कंटाळवाणे बोलपट पाहण्यापेक्षां हे वार्तापट पाहणें मला आवडलें.

२७ मार्च ५२

आज आगबोटीचें तिकीट घेण्याकरितां गेलों; परंतु प्राप्तीवरील कराबाबतचें सर्टिफिकिट हातीं आलें नसल्यामुळें तें आणल्यावांचून तिकीट मिळणार नाहीं, असें सांगण्यांत आलें. मग परराष्ट्र खात्याच्या कचेरींत जाऊन तेथून मि. बर्मन् नांवाच्या एका अधिकाऱ्याला बरोबर घेऊन जरूर तें सर्टिफिकिट मिळविलें व तें आगबोट कंपनीच्या कार्यालयांत हजर करून तिकीट मिळविलें. आमच्याकरितां आगबोटीच्या प्रथम वर्गामध्यें सोय करण्यांत आली होती. पी. ॲण्ड ओ. कंपनीच्या ‘ स्ट्रॅथेड ’ नांवाच्या बोटीनें आतां आमचा प्रवास होणार आहे. आमच्याबरोबरचे श्री. भट म्हणाले, “ आपलं नशीब चांगलं, म्हणून आपणांस इतकी चांगली आगबोट मिळाली. ”

२८ मार्च ५२

सकाळीं सिडने शहरांत गेलों असतांना मि. जी. हज् नांवाचे एक गृहस्थ भेटले. श्री. भट यांच्याबरोबर त्यांची आधीं ओळख झालेली होती. त्यांच्या मतें आजच्या जगाचे दोन भाग पडतात. एका भागावर पोपचें वर्चस्व आहे, तर दुसऱ्या भागावर क्रेमलिनचें वर्चस्व आहे. या दोहोंपैकीं कोणत्याहि एका विभागांत जाऊन पडण्याची भारताला मुळींच गरज नाहीं. त्या दृष्टीनें भारताचें आजचें धोरण तर्कशुद्ध आहे.

सुमारें दीडला आम्हीं ‘ वॉलडॉर्फ ’ हॉटेल सोडलें. सरकारी गाडी तयार होतीच. आम्ही २॥ वाजतां बोटींत जाऊन बसलों. बोट सुटण्याच्या वेळचें किनाऱ्यावरील दृश्य फारच मनोरंजक दिसलें. अनेक स्त्रीपुरुष आपल्या मित्रांना व नातेवाइकांना निरोप देण्यासाठीं किनाऱ्यावर आले होते. बोट सुटण्याच्या वेळीं प्रवासाला जाणारा इसम बोटींत असतो व त्याचे नातेवाईक किनाऱ्यावर उभे असतात. आपल्या मुली वेणीला जी रिबिन बांधतात, तशा तऱ्हेच्या निरनिराळ्या रंगांच्या रिबिनचीं बंडलें लोक बरोबर आणतात. यांचें एक टोक किनाऱ्यावरील मनुष्य हातांत धरतो व तें बंडल बोटीवरील इसमांकडे तो फेकतो. आगबोट सुटेपर्यंत या ‘ रज्जू ’ मार्फत

ते परस्परांशीं संबंध ठेवतात. अशा कित्येक रिबनी किनाऱ्यावर लोंबतांना दिसतात. इंग्रजींत त्याला Streamers म्हणतात. आगबोट सुरू झाली कीं, थोड्या अंतरापर्यंत ही मंडळी Streamer चें एक टोक हातांत धरून हळूहळू किनाऱ्यावर चालतात. या स्ट्रीमर्स कागदाच्या असतात व त्यामुळें त्या लवकर फाटतात. श्री. विभाकर व श्री. अय्यर आम्हांला निरोप द्यायला आले होते. त्यांनीं अशा Streamers आणल्या होत्या.

आतां बोट सुटली. हळूहळू किनाऱ्यावरील माणसें दिसेनाशीं झालीं. बोटीमध्यें मला जी केबिन मिळाली होती तिच्यांत श्री. भट हे पण राहणार होते. सुदैवानें आम्हां दोघांनाहि खालची जागाच मिळाली होती. केबिन लहान होती पण तिची सजावट अत्यंत आकर्षक व अद्ययावत् होती. साधारणपणें माणसाला लागणाऱ्या सर्व सुखसोई या छोट्या केबिनमध्यें पुरविण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. एक प्रच्छन्न भीति वरचेवर मनांत डोकावत होती. आपल्याला बोट लागेल का ? आणि लागली तर त्रास कितपत होईल ?

२९ मार्च ५२

आजपासून बोटीवरील आयुष्याला सुरुवात झाली. सकाळीं उठण्याच्या आंतच चहा व सफरचंद खोलींत येऊन थडकलें. बोटीवर सारा वेळ खाण्यामध्येंच जातो, असा अनुभव आला. पहाटे चहानंतर साडेआठला न्याहरी, साडेदहाला आईस्क्रीम, साडेबाराला जेवण, साडेतीनला चहा, सात वाजतां पुन्हां जेवण व रात्रीं कॉफी, असें सारखें खाणें चालू होतें. बोटीवर वेळ घालविण्याचा हा एक मार्ग असावा. सकाळीं न्याहरीनंतर वरच्या डेकवर येऊन बरेचसे लोक चालण्याचा व्यायाम घेत आहेत, असें दिसून आलें. मी त्यांचें अनुकरण केलें व हा उपक्रम येथें असेंपर्यंत चालू ठेवण्याचें ठरविलें. साधारणपणें बोटीला आठ चकरा मारल्यावर एक मैलाइतकें फिरणें होतें, असें समजलें. बोटीवर एक विलायती मद्याचें दुकान आहे, पुष्कळ लोक तेथें मेजाभोंवतीं बसून आपला वेळ घालवितात. याशिवाय आरामखुर्चीवर बसून वाचनामध्यें मग्न असलेले कांहीं लोक मला दिसले. आज बोटीचा कोणताहि त्रास झाला नाहीं. रात्रीं बोटीवरील उतारूंचा नृत्याचा कार्यक्रम झाला. त्या वेळचें पार्श्वसंगीत मला विशेष आवडलें.

३० मार्च ५२

आज सकाळीं लवकर उठलों. कारण आज बोट मेलबोर्न बंदरांत शिरणार होती·

आगबोट बंदरांत शिरतांनाचें दृश्य विशेष प्रेक्षणीय असतें. भोजनोत्तर आम्ही राहात असलेल्या निवासस्थानीं गेलों व तेथें मिस्टर ॲण्ड मिसेस् लॅम्परिल यांना भेटलों. तेथें राहात असलेल्या एका इटालियन् डॉक्टरची व आमची ओळख झालेली होती. आम्ही भेटल्यामुळें त्या कुटुंबाला विशेष आनंद झाला. त्याची पत्नी पुनर्विवाहित होती. तिला ॲना नांवाची प्रथम नवऱ्यापासून झालेली एक मुलगी होती. ती दहाबारा वर्षांची मुलगी अत्यंत समजूतदार व शहाणी होती. युद्धोत्तर इटलीमध्यें लोकांचें जीवन फार कष्टमय झालें होतें. जगण्यासाठीं कित्येक लोक देशाच्या बाहेर पडले व पडत आहेत. कांहीं लोक ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथें येऊन स्थायिक झाले. हा गृहस्थ डॉक्टर असून व तो गोरा असूनसुद्धां त्याला ऑस्ट्रेलियांत डॉक्टर म्हणून प्रॅक्टीस करण्याची परवानगी मिळालेली नाहीं. प्रारंभीं येथील एका इस्पितळामध्यें पुरुष-सेवकाचें ( Male Nurse ) काम त्यानें केलें. आतां तो एका गिरणीमध्यें काम करीत आहे. आपली डॉक्टरी विद्या गंजत चालली आहे, याची त्याला सारखी खंत वाटत होती; परंतु जगण्यासाठीं मिळेल तें काम प्रामाणिकपणें करण्याची त्याची तयारी होती. या मंडळींच्या सहवासांत कांहीं वेळ घालविल्यावर संध्याकाळच्या जेवणासाठीं बोटीवर परतलों. ही बोट लोंकर घेण्यासाठीं मेलबोर्नला दोनतीन दिवस थांबणार आहे.

३१ मार्च ५२

सकाळची न्याहरी झाल्यावर शहरांत गेलों. ज्या ठिकाणीं आमचें येथील शिक्षण झालें, तेथील सर्व मंडळींना जाऊन भेटलों. न्यूझीलंडमधील अनुभवाबाबत संस्थेच्या कार्यकर्त्यांबरोबर विचारविनिमय केला. येथील वास्तव्यांत ओळख झालेल्या मित्रांना पुन्हां भेटण्यांत आजचा दिवस घालविला.

१ एप्रिल ५२

येथें आल्यापासून जीं पुस्तकें, पत्रकें इत्यादि सामुग्री गोळा केली होती, ती सर्व बांधून आमच्या येथील ऑफिसमध्येंच ठेविली होती. गठ्ठे मोठे होते; परंतु सरकारी गाडी मिळाल्यामुळें सर्व सामान बोटीवर व्यवस्थित आणतां आलें. आज रात्रीं येथून निघणार असल्यामुळें सर्वांचा अखेरचा निरोप घेतला.

बोट आतां सुटणार होती. संध्याकाळीं ६ पासून येथून बोटींत बसणाऱ्या उतारूंना निरोप देण्यासाठीं किनाऱ्यावर लोकांची गर्दी जमली होती. बोट सुटण्याच्या

वेळीं जें दृश्य सिडनेच्या किनाऱ्यावर दिसलें, हुबेहूब तसेंच दृश्य येथें पाहायला मिळालें. ठीक आठ वाजतां मेलबोर्नला अखेरचा प्रणाम करून आम्ही निघालों.

२ एप्रिल ५२

न्यूझीलंडमधून ऑस्ट्रेलियांत आम्ही आलों, तेव्हां दोन तास घड्याळ मागें केलें. आज पुन्हां अर्धा तास घड्याळ मागें करावें लागलें. घड्याळ लावण्याच्या तारखा येथें फळ्यावर लावलेल्या आहेत. त्याप्रमाणें ५ तारखेपासून १० तारखे-पर्यंत रोज अर्धा तास घड्याळ मागें करावें लागलें. ११।१२।१३ या तारखांना रोज वीस मिनिटें घड्याळ मागें केलें जाईल आणि अशा रीतीनें भारताच्या घड्याळाबरोबर आमचें घडयाळ येईल.

आज सकाळपासून खूप अस्वस्थ वाटत आहे. बोट लागत असल्याचीं हीं चिन्हें दिसतात. कांहीं खाण्याची इच्छा होत नाहीं. आमचा स्टुअर्ड मि० बॉब हा मधून मधून येऊन मला भरपूर खायला सांगतो, पण उलटी होण्याची भीति वाटत असल्यामुळें मी दिवसभरांत कांहींसुद्धां खाल्लें नाहीं. बॉब मला उठून फिरण्याचा आग्रह करीत होता, पण तेंहि मला जमेना. मी बिछान्यांत पडूनच होतों. थोडा वेळ तोच येऊन बोलत बसला. त्यानें आपली हकिकत सांगितली. तो लंडनमधील एका बँकेमध्यें हिशोबतपासनीसाचें काम करतो. पृथ्वीपर्यटन करण्याची व निरनिराळे देश पाहण्याची इच्छा त्यानें फार दिवसांपासून उराशीं बाळगली होती. जवळ पैसा नाहीं; मग ही इच्छा पुरी कशी होणार? त्यानें बँकेंतून दोन वर्षांची बिनपगारी रजा घेतली; P. & O. कंपनीकडे अर्ज केला; व स्टुअर्डची नोकरी मागितली. ती त्याला मिळाली. या कंपनीच्या आगबोटी निरनिराळ्या मार्गांवरून प्रवास करतात. सध्यां तो इंग्लंड ते ऑस्ट्रेलिया या मार्गावर प्रवास करणाऱ्या आगबोटीवर काम करीत आहे. या मार्गावरील सर्व बंदरें त्यानें पाहिलीं. थोड्या दिवसांनीं त्याची दुसऱ्या मार्गावर बदली होईल व अशा रीतीनें नवीं नवीं शहरें पाहण्याची त्याची इच्छा सफल होईल. बॉब हा अत्यंत उत्साही आहे. त्याचा स्वभाव विनोदी व मनमिळाऊ आहे. त्याच्या वागण्यामध्यें शालीनता आहे. त्यामुळें त्याला मित्र खूप मिळतात. बोट आज खूपच हालत आहे. त्यामुळें पडून राहण्यापलिकडे आज कांहीं केलें नाहीं.

३ एप्रिल ५२

सकाळीं लवकर उठलों. आज खूप उत्साह वाटत आहे. आज बोट ॲडिलेड बंदरांत जाऊन थोडा वेळ थांबणार आहे. सात साडेसातला आम्ही बंदरांत आलों. मेलबोर्न येथें असतांना भट यांना टॉमस् जॉनस्टन् या नांवाचा एक गृहस्थ भेटला होता. त्यानें श्री. भट यांना सांगितलें होतें कीं, " जातांना जर ॲडिलेडवरून गेलांत, तर मला पत्र लिहा. मी येऊन तुम्हांला भेटेन." त्याप्रमाणें श्री. भट यांनीं त्याला एक पत्र टाकलें व ती गोष्ट ते स्वतः विसरून पण गेले. बंदरांत बोट आल्यावर आम्ही न्याहरीसाठीं भोजनगृहांत बसलों होतों. इतक्यांत एक नोकर वरील गृहस्थाच्या नांवाचें कार्ड घेऊन आला व म्हणाला, " हे गृहस्थ आपणांस भेटण्यास आलेले आहेत." मीं तें कार्ड श्री. भट यांना दिलें व ते न्याहरी आटोपून बाहेर गेले. त्या गृहस्थाला भेटून ते आंत आले व म्हणाले, "आपणांला ॲडिलेड शहर दाखविण्याकरितां एक गृहस्थ आले आहेत. आपणांला त्यांच्या-बरोबर जावयाचें आहे."

मि. जॉन्स्टन् यांच्याबरोबर आम्ही ॲडिलेड शहर पाहण्याकरितां त्यांच्या मोटारींतून निघालों. या शहराची बांधणी विशेष आकर्षक आहे. त्यांनीं आम्हांस ' माउंट लॉफ्टी ' या नांवाच्या एका उंचावर असलेल्या टेकडीवर नेलें. हें ठिकाण समुद्रसपाटीपासून २३३४ फूट उंच आहे. येथून शहराचा देखावा आम्हीं पाहिला. ॲडिलेडमध्यें जें जें कांहीं पाहण्यासारखें होतें तें तें त्यांनीं दाखविलें. सुप्रसिद्ध क्रिकेट खेळाडू ब्रॅडमन् येथें राहतात, असें आम्हांस समजलें; तेव्हां त्यांचें घर पाहावें व जमल्यास त्यांना भेटावें म्हणून आम्ही त्या ठिकाणीं गेलों. त्यांचें घर पाहिलें पण ते तेथें नसल्यामुळें त्यांची भेट होऊं शकली नाहीं. त्यानंतर येथील एका चांगल्या हॉटेलांत मि. जॉन्स्टन् आम्हांला जेवायला घेऊन गेले. ॲडिलेडमध्यें या वेळीं अखिल ऑस्ट्रेलियाचें एक शाही प्रदर्शन भरलेलें होतें. सदर प्रदर्शन पाहण्यासाठीं या गृहस्थानें तीन तिकिटें काढून ठेविलीं होतीं. दोन तास प्रदर्शनांत फिरलों. तेथें त्यांनीं चहा दिला व नंतर आम्हीं त्यांचा निरोप घेण्याची इच्छा दर्शविली. त्या वेळीं ते म्हणाले, " तुम्हांला जर मीं घरीं न नेतां येथूनच परत जाण्याची परवानगी दिली, तर माझ्या पत्नीचें व माझें भांडण होईल. ही आगळीक केल्याबद्दल ती मला दोष देईल. तेव्हां आपण माझ्या घरीं जाऊं या."

आम्ही त्यांच्याबरोबर त्यांच्या घरीं गेलों. त्यांच्या पत्नीनें आमचें आपुलकीनें स्वागत केलें. घर ल्हानसेंच पण अत्यंत आकर्षक होतें. ते म्हणाले,

"माझें पूर्वीचें घर मीं हौसेनें खूप प्रशस्त असें बांधलें होतें. एवढें मोठें घर व्यवस्थित ठेवणें आम्हां दोघांना जमेना. नोकरांची गरज होती; परंतु नोकर कायम टिकत नव्हते. त्यामुळें कंटाळून तें मोठें घर विकून टाकलें." त्यांच्या पत्नीनें आम्हांला अल्पोपाहार दिला व मि. जॉन्स्टन्नें आम्हांला बोटीवर आणून सोडलें. आज सकाळपासून ते आतां पांच वाजेपर्यंत या गृहस्थानें आपला सारा वेळ आमच्यासाठीं खर्च केला. किती तरी पेट्रोल जाळलें, जेवण्याखाण्याचा खर्च केला. आमची व यांची ना ओळख, ना देख. आम्हीं त्याचे मनापासून आभार मानले. त्यावर ते म्हणाले, "तुम्ही ऑस्ट्रलियाचे पाहुणे म्हणून माझे पाहुणे. मीं जे तुमच्यासाठीं कांहीं थोडें केलें असेन तसेंच तुम्ही' आपल्या देशांत येणाऱ्या परकीय माणसासाठीं करीत असाल. आपणां सर्वांना नेहमीं असेंच वाटत असतें, कीं परदेशी माणसानें आपल्या देशांतून बाहेर जातांना सुखद स्मृति बरोबर घेऊन जावें. त्यासाठींच आपली धडपड असते. मग यांत आभार कसले मानायचे ?" परदेशांत आपल्या देशाचें नांव चांगलें व्हावें, याबद्दल या लोकांना तळमळ वाटत असते. आतां सहा वाजले आहेत व ॲडिलेडचा किनारा सोडून आमची आगबोट पुढील प्रवासासाठीं मार्गस्थ होत आहे.

४ एप्रिल ५२

आतां बोट जरा जास्तच हालूं लागली आहे. ॲडिलेडपासून 'फ्री मॅंटल' ( Perth ) या बंदरापर्यंत प्रवास करतांना फार वादळी भागांतून जावें लागतें. या विभागाला 'बाईट्' असें म्हणतात. या शब्दाचा नक्की अर्थ मला समजला नाहीं. परंतु Perth ला बोट जाईपर्यंतचे हे तीनचार दिवस खूप त्रासाचे जातील. बोट अतिशय हालेल, असें सर्व लोक सांगत होते. सुदैवानें आजच्या दिवसांत मला कांहीं त्रास झाला नाहीं. लिहिण्यावाचण्यांत वेळ गेला. रात्रीं बोटीवर हौसी हौसी (Housie, Housie) या नांवाचा एक खेळ चालू होता. त्यांत रॉयनीं व मीं भाग घेतला व तीन पौंडाचें बक्षिस मिळविलें.

५ एप्रिल ५०

बोट खूपच हालत आहे. अद्यापि त्याच वादळी भागांत आम्ही आहोंत. आजहि मला कांहीं त्रास होत नाहीं. आरामखुर्चीवर पडून पुस्तक वाचण्यांत वेळ घालविला.

बोटीवर एक चढाओढ लावतात. २४ तासांत बोटीनें किती मैल प्रवास केला, हें नक्की सांगणारांना बक्षिस देण्यांत येतें. बोटीनें केलेल्या प्रवासाच्या आसपास ज्याचें उत्तर येईल त्यालाहि बक्षिस देण्यांत येतें. चढाओढीची फी एक शिलिंग असते. या चढाओढींत मींसुद्धां भाग घेतला होता. परंतु अंदाज थोडक्यांत चुकला. अर्थात् बक्षिसहि चुकलें. रात्रीं बोट विशेषच हालत होती. झोपेंतसुद्धां मी तीनचार वेळां उठून बसलों. परंतु कोणताहि त्रास झाला नाहीं.

६ एप्रिल १९५२

आज दुपारीं चारपांचच्या सुमारास या वादळी विभागांतून बाहेर पडूं, असें सांगण्यांत आलें. बोट हालतेच आहे; पण मी मात्र मजेंत आहे. खाणें, फिरणें, वाचणें यांमध्यें दिवसाचा वेळ सहज निघून जातो. आतां हें बोटीवरील जीवन चांगलेंच अंगवळणीं पडलें आहे; इतकेंच नव्हे तर तें आवडूंहि लागलें आहे.

७ एप्रिल १९५२

आज सकाळीं लवकरच फ्री मॅंटल् या बंदरांत येऊन पोहोंचलों. बोटीनें प्रवास करणाऱ्या उतारूच्या जीवनांत बोट बंदराला लागते तो दिवस विशेष आनंदाचा असतो. पश्चिम ऑस्ट्रेलियांत प्रवेश करण्यासाठीं या फ्री मॅंटल् बंदराचा उपयोग करावा लागतो. पर्थ् ही पश्चिम ऑस्ट्रेलियाची राजधानी आहे.

बोट बंदराला लागल्यावर आम्ही खालीं उतरलों. 'ज्यांना शहरांत जावयाचें आहे त्यांच्यासाठीं बाहेर बस उभी आहे,' असें आम्हांस सांगण्यांत आलें. या बसमध्यें बसून आम्ही शहरामध्यें गेलों. पर्थ हें एक सुंदर शहर आहे. बोट पांच वाजतां सुटणार आहे. तेव्हां चार साडेचार वाजेपर्यंत फिरायला मोकळीक आहे. एवढ्या वेळांत आम्हीं शहरांत जेवढें हिंडतां येईल तेवढें हिंडून घेतलें व जास्तींत जास्त जेवढें पाहायला मिळालें, तेवढें पाहून घेतलें.

पांच वाजून दहा मिनिटांनीं आम्हीं 'फ्री मॅंटल' सोडलें. ऑस्ट्रेलियांतील आमच्या प्रवासांतलें हें शेवटचें बंदर. याचा अर्थ आम्हीं ऑस्ट्रेलियाचा जवळ जवळ अखेरचा निरोप घेतला. अजूनपर्यंत बोटीवर ऑस्ट्रेलियन पौंड हें चलनी नाणें होतें. आतां सर्व व्यवहार इंग्लिश पौंडानें करावा लागणार. बोटीवर अनेक वस्तु विकण्याचें एक दुकान आहे. ओशन ट्रेडिंग कंपनीमार्फत हें दुकान चालविलें जातें. फ्री मॅंटल बंदर सोडल्यावर या दुकानामध्यें वस्तु खूपच स्वस्त असतात. 'येथून कोलंबोल

पोहोंचेपर्यंत वस्तूंवर जकात घेतली जाणार नाहीं,' असें सांगण्यांत आलें. त्यामुळें आतां या दुकानासमोर खूप गर्दी आहे. बोट हालतेच आहे. रात्रीं बोटीवरील नृत्याचा कार्यक्रम व्यवस्थित चालू आहे. थोडा वेळ तेथें जाऊन बसलों. तो कार्यक्रम पाहिला.

८ एप्रिल १९५२

आतां बोटीनें हिंदी महासागरांत प्रवेश केला आहे. बोटीवरील युरोपियन उतारूंनीं आपल्या गरम कपड्यांना रजा दिली आहे. अंगावर कमींत कमी कपडे घालण्याची आज चढाओढ सुरू झाली कीं काय, असा विचार या लोकांचे कपडे पाहून मनापुढं उभा राहतो. दिवसा जवळजवळ अर्धनग्न असलेले हे लोक संध्याकाळच्या जेवणाच्या वेळीं मात्र नित्याचीं सर्व वस्त्रें अंगावर घालून जास्तींत जास्त अद्ययावत् दिसण्याचा प्रयत्न करीत होते. आतां येथील उतारूसुद्धां जास्त ओळखी करूं लागले आहेत. सर्वांशीं अधिक मनमोकळेपणानें ते वागूं लागले आहेत. बोटीवर एक वाचनालय आहे. त्यांतून मी पुस्तकें आणतों. आज एक विशेष चांगली कादंबरी मिळाली. त्यामुळें दिवसभर त्या पुस्तकांत रमून गेलों. रात्रीं 'ॲन् अमेरिकन इन् पॅरिस' या नांवाचा एक बोलपट दाखविण्यांत आला. बोट हालत होती. तरी आजचा प्रवास विशेष चांगला झाला.

९ एप्रिल ५२

आतां बऱ्याच गोऱ्या उतारूंशीं ओळखी झाल्या आहेत. त्यामुळें मधून मधून जे भेटतील त्यांच्याशीं गप्पा मारण्यांत वेळ जातो. कल्कत्ता येथील बाटा कंपनीच्या चालकवर्गांतील दोन गृहस्थ व त्यांच्या कुटुंबांतील मंडळी सहलीसाठीं म्हणून ऑस्ट्रेलियांत आली होती. त्यांचा परिचय झाला. ते भारतांतच राहात असल्यामुळें परदेशीं असूनसुद्धां परकीय वाटले नाहींत.

१० एप्रिल ५२

आतां बोट झपाट्यानें विषुववृत्ताच्या जवळ जात आहे. त्यामुळें उकाडा खूप होत आहे. जातांना सुती कपडे बरोबर घेतले नव्हते. पण ऑस्ट्रेलियांत असतांना एकदोन कपडे या प्रवासासाठीं म्हणून तेथील मित्रांच्या आग्रहामुळें विकत घेतले होते. त्यामुळें येथील उष्णता फारशी जाणवली नाहीं. संध्याकाळीं हौसी हौसी खेळांत भाग घेतला. दोन शिलिंगांमध्यें करमणूक पडली.

११ एप्रिल ५२

आज 'गुड् फ्रायडे'. बोटीवरील युरोपियन् लोकांसाठीं सकाळची प्रार्थना होती. त्यामुळें येथील जीवन सकाळीं बरेंच लवकर सुरू झालें होतें. आज जेवणाचा बेतहि विशेष होता. आज आणखी एक कादंबरी मिळविली व ती वाचण्यांत वेळ घालविला. रात्रीं शर्यतीचा कार्यक्रम जाहीर करण्यांत आला होता. येथें शर्यत होणार कशी, हें पाहण्याच्या उत्सुकतेनें मी कार्यक्रमाला हजर राहिलों. एका मध्यवर्ती टेबलावर एक छोटेसें 'मेरी गो राऊंड्' सारखें यंत्र ठेवण्यांत आलें होतें. त्यावर दहा बारा छोटे पत्र्यांचे घोडे होते व त्या प्रत्येक घोड्यावर एक एक जॉकी होता. चावी दिली कीं थोडा वेळ हे घोडे पळत. या प्रत्येक घोड्यावर लोकांनीं पैसे लावले होते. बाकीचा सर्व तपशील खऱ्या शर्यतीच्या वेळचा होता. थोडा वेळ गंमत पाहून पुस्तक वाचण्यासाठीं खोलीवर परतलों.

१२ एप्रिल ५२

आज सकाळपासून बोटीवर खूप गडबड चालू होती. कारण आज आम्ही विषुववृत्त ओलांडणार, या निमित्तानें बोटीवर एक मनोरंजक कार्यक्रम आखण्यांत आला होता. समुद्रावर 'फादर नेपच्यूनचें' अधिराज्य असतें.व त्याच्या परवानगीवांचून जो मनुष्य विषुववृत्त ओलांडतो, त्याला गुन्हेगार मानून 'फादर नेपच्यून' शिक्षा करतो असा समज आहे.

सकाळीं ९॥ च्या सुमारास हा कार्यक्रम सुरू झाला. बोटीवरील सर्व मंडळी कार्यक्रम पाहण्यासाठीं जमा झाली होती. जेवढीं लहान मुलें बोटीवर होतीं, त्यांना सर्वांना एके ठिकाणीं बसविण्यांत आलें होतें. मध्यभागीं एक सिंहासन तयार करण्यांत आलें होतें. बँड वाजूं लागला. फादर नेपच्यून् आपल्या लवाजम्यानिशीं दरबारांत आला. त्याच्या बरोबरीच्या स्त्रीपुरुषांनीं झाडाच्या पानांनीं आपलीं शरीरें सुशोभित केलीं होतीं. राजेसाहेब सिंहासनावर येऊन बसले. सर्वत्र शांतता पसरली. विषुववृत्त ओलांडण्याचा गुन्हा कोणीं केला याचा तपास करण्यांत आला. त्या वेळीं गुन्हेगार म्हणून बोटीवरील सर्व छोट्या मुलामुलींना पुढें उभें करण्यांत आलें. "या सर्व मुलांच्या डोक्यांना आईस्क्रीम लावा व त्यांची वस्तऱ्यानें हजामत करा." असा फादर नेपच्यूननें हुकूम दिला. लागलीच सेवक पुढें झाले. पांचसहा लाकडी टबांत आईस्क्रीम तयार केलेलें होतें. तें त्या मुलांच्या डोक्यांस फासण्यांत आलें व लाकडी वस्तऱ्यानीं त्यांची लुटुपुटीची हजामत झाली. मुलांच्या डोळ्यांत

व नाकातोंडांत आईस्क्रीम गेलें व तीं भराभर पळूं लागलीं. माझ्याजवळ पळून आलेल्या एका मुलाला मीं विचारलें, “ चांगलें आईस्क्रीम खायला मिळत होतें, तर पळालास कशाला ? ” त्यावर तो म्हणाला, “ आईस्क्रीममध्यें साखर मुळींच नव्हती. नुसतें मीठच घातलेलें होतें. तें डोळ्याला झोंबायला लागलें. मग पळूं नको तर काय करूं ? ”

त्यानंतर दुसरा एक कार्यक्रम झाला. या वेळीं तीन ते पांच वयाचीं मुलें गुन्हेगार म्हणून पुढें उभीं करण्यांत आलीं. त्यांपैकीं मुलांना मुलींचे व मुलींना मुलाचे पापे घेण्याची शिक्षा दिली. या वेळीं हीं छोटीं छोटीं मुलें खूपच लाजलीं. पापे घेतल्यावांचून जोडीला सोडत नव्हते. एखाद्या जोडीनें शिक्षा अंमलांत आणली कीं, टाळ्यांचा खूप कडकडाट होई. त्यामुळें बाकीचीं मुलें अधिकच ‘ नर्व्हस् ’ होत होतीं. या कार्यक्रमानंतर सर्व उतारूंना खरेंखुरें आईस्क्रीम देण्यांत आलें व विषुववृत्त ओलांडल्याबद्दलची सनद मामुली किंमत देऊन घेऊन जाण्याची विनंती करण्यांत आली. गंमत म्हणून मीं पण ती सनद घेतली. आठवण म्हणून जातांना व येतांना मिळालेल्या या दोन्ही सनदा मीं जपून ठेविल्या आहेत.

आज संध्याकाळच्या वेळीं सर्व उतारू डेकवर जमले होते. आज सूर्यास्ताची शोभा अत्यंत अपूर्व होती. ती पाहण्यामध्यें सर्वजण रंगून गेले होते. मी कवि किंवा चित्रकार नसल्याबद्दल मला आयुष्यांत केव्हांहि खंत वाटली नाहीं; परंतु आज मात्र ती प्रकर्षानें वाटत आहे ! सृष्टिसौंदर्याचा एक अपूर्व मासला आज मला पाहायला मिळाला. प्रत्यक्ष विषुववृत्त आज रात्रीं किंवा उद्यां भल्या पहाटे ओलांडलें जाणार आहे. आज नृत्याचा खास कार्यक्रम झाला.

१३ एप्रिल १९५२

आज विशेष उल्लेखनीय असें कांहीं घडलें नाहीं. लिहिण्या-वाचण्यांतच वेळ गेला. आतां घर जवळ येत चाललें आहे. उद्यां आम्ही कोलंबोला जाऊन पोहोंचणार.

१४ एप्रिल १९५२

आज कोलंबो बंदराला बोट लागणार. त्यामुळें आमच्या बरोबरचे कांहीं सिलोनी प्रवासी विशेष गडबडींत होते. ‘शुभसिंह’ या नांवाच्या प्रवाशाशीं माझी विशेष ओळख झाली होती. तो आज चार वर्षांनीं स्वगृहीं परत जाणार होता. बोट बंदराला लागली व आम्ही खालीं उतरलों.

आमच्याबरोबर ऑस्ट्रेलियांत असलेले सिलोनी विद्यार्थी आधींच येऊन पोहोंचले होते. आम्ही आज येणार असल्याचें त्यांना माहीत होतें. त्यांच्या अपेक्षेपेक्षां बोट उशीरा बंदराला लागली. त्यामुळें त्यांनीं आमच्यासाठीं आंखलेला बराचसा कार्यक्रम रद्द करावा लागला.



उतरल्याबरोबर त्यांनीं आणलेल्या मोटारींतून आम्ही त्यांच्याबरोबर निघालों. न्यूझीलंडमध्यें ' कुरे ' नांवाच्या एक बाई भेटल्या होत्या. त्या सिलोन येथील वरिष्ठ गृहाच्या सभासद होत्या. ' तुम्ही कोलंबोमध्यें याल त्या दिवशीं माझ्याकडेच जेवायला या ' असें आमंत्रण त्यांनीं देऊन ठेवलें होतें. त्याप्रमाणें आम्ही त्यांच्याकडे गेलों. आमची वाट पाहून त्या अगदीं कंटाळल्या होत्या. परंतु आम्ही आल्याचें पाहून त्यांना खूप आनंद झाला. अतिशय उत्कृष्ट असा जेवणाचा बेत त्यांनीं आंखला होता. पाऊस खूपच पडत होता. तथापि मोटारमधून आम्ही शहर पाहण्यास निघालों. आमच्याबरोबर सिलोनमध्यें आलेल्या मिसेस विक्रमसिंह पण आपली मोटार घेऊन आम्हांस भेटण्यास आल्या. बरोबर त्यांचे यजमान होते. हे गृहस्थ येथें असिस्टंट इन्कमटॅक्स कमिशनर आहेत. श्री. भट व श्री. राऊत रॉय एका मोटारींतून स्थानिक लोकांबरोबर गेले व रॉय आणि मी दुसऱ्या मोटारींतून विक्रमसिंह दंपतीबरोबर बाहेर पडलों.

कोलंबो शहरांत हिंडतांना भारतांत हिंडल्यासारखेंच वाटत होतें. या शहरांत नारळीचीं व सुपारीचीं झाडें विशेष दिसलीं. कुलाबा जिल्ह्यांतील जंजिरा, किंवा रत्नागिरींतील मालवणपासून वेंगुर्ल्यापर्यंतचा विभाग किंवा पूर्वीचें मुंबईजवळील जुनें माहीम या भागांची कोलंबो पाहात असतांना प्रकर्षानें आठवण झाली.

पावसानें साथ सोडली नव्हती. सिलोनी मित्र म्हणाले, " आजच्यापेक्षां अधिक वाईट हवा कोलंबोंत कधींच पडत नाहीं. " परंतु वाहनाची अनुकूलता असल्यामुळें पाऊस विशेष जाणवला नाहीं. शहर पाहून बोटीवर यायला निघालों, तों वाटेंत घरीं तार करण्याची कल्पना आली. त्याबाबत व्यवस्था केली व बोटीवर येऊन पोहोंचलों. रात्रीं १०–१०॥ च्या सुमारास आम्हीं कोलंबो शहराचा निरोप घेतला. येथील कँडी नांवाचें सुप्रसिद्ध स्थळ पाहण्याची इच्छा होती. दिवसभरामध्यें बसनें तेथें जाऊं शकलों असतों. परंतु त्यामुळें सिलोनी मित्रांची निराशा झाली असती. त्यांचा खास आग्रह होता. योग असला तर पुन्हां केव्हां तरी कँडी पाहतां येईल; परंतु या मित्रांना नाराज करणें बरें नाहीं, या विचारानें तो मोह आम्हीं टाळला. शहरांतच हिंडलों व आम्ही त्याचा निरोप घेऊन निघालों.

१५ एप्रिल ५२

आतां घरीं जाण्याची उत्कंठा जास्त वाढूं लागली आहे. आगबोटीच्या वरच्या मजल्यावर एक रेषाचित्र लावलेलें आहे. त्या चित्रावरून आपल्या प्रवासाची प्रगति लक्षांत येऊं शकते. आतां मुंबई बंदर जवळ येत चालल्यामुळें अधूनमधून या रेषाचित्राजवळ येऊन तें पाहात राहणें हा सर्वच उतारूंचा एक आवडता उद्योग झाल्याचें दिसलें. अर्थात् मी याला अपवाद नव्हतों.

१६ एप्रिल ५२

उद्यां सकाळीं आम्ही मुंबईंत जाऊन पोहोंचणार व आमचा बोटीवरचा प्रवास आतां संपणार. त्यामुळें येथें ओळखीची झालेली ऑस्ट्रेलियन् मंडळीं आज अधून-मधून भेटली व त्यांपैकीं बहुतेकांनीं आजच आमचा निरोप घेतला व ओळख कायम ठेवण्याची विनंती केली. आजच्या रेषाचित्रावरून आम्हीं रात्रीच्या सुमारास मुंबईला पोहोंचूं असें दिसत होतें. परंतु श्री. भट म्हणाले " एवढ्या रात्रीं बोट बंदराला लागणार नाहीं. "

आज रात्रीं झोंप लागली नाहीं. पहाटे तीनच्या आंत तीनचार वेळां उठून मुंबई दिसते का हें बोटीच्या 'पोर्ट होल' मधून पाहाण्याचा मीं प्रयत्न केला. तीन साडेतीनच्या सुमारास मुंबईचे दिवे अंधुक अंधुक दिसूं लागले. बोटीवरील बरेचसे प्रवासी मुंबई पाहण्यासाठीं जागेच होते. चार साडेचारला तर मुंबई अगदीं जवळ आल्यासारखी वाटत होती. तथापि प्रत्यक्ष बंदरांत जायला अजून दीड दोन तास लागतील, असें जाणती मंडळी सांगत होती. घरीं जाण्याची ओढ माणसाला

किती तीव्रतेनें लागू शकते, याचा आज प्रत्यय आला. एखाद्या लहान मुलाच्या अधीरतेनें आम्ही आतां उतरण्याच्या तयारीला लागलों.

१७ एप्रिल ५२

सकाळचे साडेसहा वाजले आहेत व आमची बोट आतां मुंबईच्या किनाऱ्याला येऊन पोहोंचली आहे. किनाऱ्यावर बरीचशी मंडळी आपल्या मित्रांचें व नातेवाइकांचें स्वागत करण्याकरितां जमलेलीं आहेत. सुमारें तासाभरानें आम्ही खालीं उतरलों व कस्टम वगैरेच्या तपासणीच्या कार्यक्रमांतून बाहेर पडलों. आजचा दिवस मुंबईतच राहिलों.

१८ एप्रिल ५२

आज सकाळीं पूना एक्स्प्रेसनें पुण्यांत येऊन दाखल झालों. स्टेशनवर घरांतील व इतर परिचित मंडळीं यांनीं माझें स्वागत केलें. विषुववृत्ताच्या पलीकडे जाऊन तीन साडेतीन महिने झाले. मी घरीं परतलों. एकंदरींत प्रवास खूपच चांगला झाला. या एवढ्या थोड्या अवधींत अनेक चांगल्या गोष्टी पाहावयाला मिळाल्या. हजारों मैलांचा हा सर्व प्रवास विमानानें केला, तरी तो निर्विघ्नपणें पार पडला ही एक अत्यंत समाधानाची गोष्ट समजून मीं परमेश्वराचे आभार मानले ! उद्यांपासून कामावर हजर राहायचें व नित्याच्या जीवनक्रमास सुरुवात करावयाची. आयुष्यांतील या नव्या अनुभवाचा आपल्या पुढील कामांत कसा उपयोग करून घेतां येईल कुणास कळे ! इतकें मात्र खरें कीं, या प्रवासानें माझा तरी खूपच फायदा झाला आहे. अनेक नवे अनुभव मिळाले, नवें ज्ञान मिळालें, चांगलीं माणसें भेटलीं.

## सिंहावलोकन

८० लाख लोकवस्तीचा हा देश. या देशानें सुमारें दोन अडीचशें वर्षांमध्यें आपली खूपच प्रगति केली आहे. येथील सर्वसाधारण माणसाला पोटभर अन्न, अंगभर कपडा, त्यांच्या मुलबाळांना शिक्षण, औषधपाणी सर्व व्यवस्थित मिळत आहे. ऑस्ट्रेलियांतील राहणी अत्यंत खर्चाची आहे. तथापि येथील सर्व लोकांना किमान वेतन चांगलेंच मिळत आहे. येथील कल्याणकारी योजनांचें जाळें खूप चांगलें विणण्यांत आल्यामुळें सर्वसाधारण नागरिकाचें जीवन चांगलें सुखाचें झालेलें आहे. त्याला कोणत्याहि प्रकारची काळजी उरलेली नाहीं.

ऑस्ट्रेलियानें औद्योगिक क्षेत्राच्या अथवा शेतीच्या क्षेत्रांत जशी प्रगति केलेली आहे त्याचप्रमाणें इतर अनेक क्षेत्रांमध्यें सुद्धां तितकीच समाधानकारक अशी प्रगति करून घेतली आहे. या देशांत मार्कस् क्लार्क, मिसेस कॅम्बर प्राईड, ॲडा केंब्रिज यांच्यासारखे कादंबरीकार व हेन्री केन्डॉलसारखा प्रतिभावान् कवि जन्माला आला व त्यांनीं देशाची कीर्ति वाढविली. या देशांत ग्रंथकारांना मदत करण्याकरितां साहित्यनिधि निर्माण करण्यांत आला आहे. एखाद्या साहित्यिकाला एखाद्या विशिष्ट प्रकारचें लेखन करावयाचें असल्यास त्याला अडीचशें पौंडपर्यंत मदत मिळूं शकते.

ऑस्ट्रेलियामध्यें साहित्य, संगीत, नाटकें या बाबतींत सुद्धां खूपच काम झालेलें आहे. लोकांमध्यें नाटकें पाहण्याची इच्छा वाढत्या प्रमाणांत दिसून येते. त्यामुळें नवे नट, गायक व लेखक आज मोठ्या प्रमाणांत क्षितिजावर दिसूं लागले आहेत.

येथें मजुरांची संघटना फार चांगली आहे. त्यामुळें मालकांना मजुरांशीं फार जपून वागावें लागतें. घरगुती नोकरांचा प्रश्न फारच बिकट झालेला आहे. त्यामुळें येथील बायकांना खूप काम करावें लागतें. आपल्या घरांत अथवा दुकानांत काम करणाऱ्या लोकांशीं मालक अगदीं अदबीनें वागतात व ते नोकरसुद्धां ठराविक काम अत्यंत प्रामाणिकपणें करतात. कामाचे तास निश्चित झालेले असतात व त्यानंतर एक मिनिटभरसुद्धां मालक नोकराला थांबवून घेऊं शकत नाहीं व नोकरहि थांबत नाहींत.

एकदां अशी गंमत झाली. मी एका चिनी हॉटेलांत जेवायला गेलों होतों. उशीर बराच झाला होता. सर्वसाधारणपणें सहा ते साडेसात, ही संध्याकाळची

जेवणाची वेळ. पण साडेसातला मी व माझा एक मित्र जेवायला आलों. आमच्या शेजारच्याच टेबलावर उपाहारगृहाचा मालकहि जेवायला होता. आठच्या सुमारास जेवण सपलें व मी पाणी पिण्यास मागितलें. मालकानें एका सेविकेस बोलावून मला पाणी देण्यास सांगितलें. त्या बाईनें आपल्या मनगटावरील घड्याळ पाहिलें व ती म्हणाली. “ माफ करा हं आठ वाजले. माझी वेळ झाली.” असें म्हणून ती आपल्या वस्तू घेऊन उपाहारगृहाच्या बाहेर पडली. मालकानें तेथील दुसऱ्या बाईला बोलावून तिला पाणी आणण्यास सांगितलें. तिनें पण आपल्या भगिनीचें अनुकरण केलें. मला पाणी न देतांच ती सुद्धां निघून गेली. दांतओठ खात मालक जागेवरून उठला व त्यानें स्वतां मला पाणी आणून दिलें.

येथील प्रत्येक मनुष्य ज्याप्रमाणें आपल्या हक्काला जपतो, त्याचप्रमाणें आपल्या जबाबदाऱ्यासुद्धां तो व्यवस्थितपणें पार पाडतो. कित्येक वेळां मी असें दृश्य पाहिलें आहे कीं, बसचा ड्रायव्हर व तेथील कंडक्टर बाई आपले कामाचे तास पुरे झाले, म्हणून बस् मुक्कामाला पोहोचायच्या आंतच अर्ध्या वाटेवर बस उभी करून जात असत. अशा वेळीं मनांत विचार येई कीं, बस पुढें कोण नेणार ? येणाऱ्या जोडीला कांहीं कारणानें उशीर झाला तर ? आपणांला येथें किती वेळ तिष्ठत राहावें लागणार ? परंतु दुसरी जोडी त्या ठिकाणीं नेमकी वेळेवर तयार असे. त्यामुळें रस्त्यामध्यें कधींहि खोटी झाली नाहीं.

लोकांना आर्थिक स्वास्थ असल्यामुळें त्यांचें सर्व दृष्टींनीं फार चागलें चाललेलें आहे. औद्योगिक व शेतीच्या क्षेत्रांत उत्पादन खूप वाढल्यामुळें, उत्पन्न केलेल्या मालाला चांगल्या बाजारपेठा मिळाल्यामुळें व विशिष्ठ अशी राजकीय धोरणें संभाळल्यामुळें येथील लोकांचें जीवन सुखावह झालेलें आहे. फक्त ८० लाख अशी मर्यादित लोकसंख्या असल्यामुळें व सुबत्ता असल्यामुळें या देशाला लोकहिताच्या अनेक योजना व्यवस्थित रीतीनें हाताळतां आल्या आहेत. दीडशें वर्षें परकीय राजसत्तेखालीं भरडल्या गेलेल्या; अज्ञान रोगराई व दारिद्र्य या आपत्तींमध्यें कित्येक वर्षें पिचत पडलेल्या, औद्योगिक क्षेत्रांत मागासलेल्या पस्तीस कोटींच्या आमच्या देशाला आस्ट्रेलियापासून नेमकें काय घेतां येईल, हें निर्णायक रीतीनें सागणें फार कठीण आहे. परंतु लोकशाहीचा प्रयोग यशस्वी रीतीनें हाताळणाऱ्या या देशापासून भारताला निश्चितच पुष्कळ घेतां येण्यासारखें आहे, यांत मात्र संशय नाहीं. कोलंबो योजनेमध्यें

८७३६



आपल्याप्रमाणेंच ऑस्ट्रेलिया सामील झाल्यामुळें भारताला तांत्रिक शिक्षणाबाबत व औद्योगिक शिक्षणाबाबत खूपच चांगलें मार्गदर्शन या देशापासून मिळूं शकेल. आपला व या देशाचा जसजसा संबंध वाढत जाईल तसतसा उभय देशांना अधिकाधिक फायदा होईल यांत वाद नाहीं.

ऑस्ट्रेलियन लोकांमध्यें विशेष प्रामुख्यानें आढळलेले कांहीं गुण जर आम्ही समजून घेतले व त्यांची वाढ आपल्या देशांत जर आपण करू शकलों, तर आपला देश खूपच मोठा होऊं शकेल. या देशांतील माणसें माणसा–माणसांमध्यें फरक करीत नाहीं. मोटार ड्रायव्हर व त्या मोटारीचा मालक एका टेबलावर बसून जेवण घेतात. अधिकारी व त्याच्या हाताखालीं काम करणारा नोकर एकमेकांशीं प्रेमानें वागतात. स्त्रियांना व मुलांना जास्तींत जास्त मदत द्यायला सर्व लोक तयार असतात. शक्य तों दुसऱ्याला मदत द्यावयाची, पण कोणावर अवलंबून राहायचें नाहीं. हातानीं पडेल तें काम करावयाचें. आपल्या दुःखाचें व अडचणींचें तुणतुणें चारचौघांसमोर वाजवायचें नाहीं. सर्वांनीं आपआपलीं ठराविक कामें शांतपणें, शिस्तीनें व प्रामाणिकपणें करावयाचीं. गडबड नाहीं, गोंधळ नाहीं.

आपल्या देशाची प्रगती झाल्यावांचून आपली प्रगति होणार नाहीं. देशाची प्रगति होण्यासाठीं प्रत्येकानें आपापलीं कामें चोखपणें व व्यवस्थिशीरपणें बजावलीं पाहिजेत, याची जाणीव येथील लोकांना असल्याचा अनेकदां प्रत्यय आला. मनुष्याच्या किमान आर्थिक गरजा पुऱ्या झाल्यावर त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन बदलूं शकेल व तो अधिक सुसंस्कृतपणें वागूं शकेल. त्याचें जीवन सुखी व समृद्ध झालें तर तो चांगला माणूस होऊं शकेल, असा विश्वास या प्रवासामुळें मिळाला. माणूस हा मुळांत चांगला राहूं शकतो, याचा प्रत्यय आला. हीच या प्रवासाची फलश्रुति !

नों. दि. ..............

REFBK-0009736

REFBK-0009736

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

अनुक्रम ........................ वि: ......................

क्रमांक ........................ नों: दि: ......................